म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

REFBK-0010253

# सा ग र



श्रीकृष्ण केशव क्षीरसागर



मराठींतील सौंदर्यवादी टीकाकार म्हणून प्रा. क्षीरसागर हे विख्यात आहेत. 'राक्षस विवाह' या भावकथेनें ते प्रथम प्रसिद्धीस आले. काव्यमय विषयांत कोमल असलेली त्यांची प्रज्ञा तितकीच झुंझारहि आहे. हें भाषा-शुद्धीपासून नवकवितेपर्यंत अनेक विषयांवर त्यांनीं जे सामने दिले त्यांवरून दिसून येईल.

महान् व्यक्तींचें महत्त्वमापन हा तर त्यांचा खास विषय म्हणून सांगतां येईल. 'सुवर्णतुला', 'व्यक्ति आणि वाङ्मय', 'वाङ्मयीन मूल्यें' या त्यांच्या ग्रंथांत त्यांच्या गुणविशेषांचें प्रतिबिंब पडलेलें दिसेल. बडोदें येथील प्रांतिक संमेलनाचे व अमळनेर येथिल टीका-विषयक शाखा-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. आतां ४१ व्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचा अध्यक्षपदाचा मान देऊन मराठी रसिकांनीं त्यांच्या यशोमंदिरावर सुवर्ण कळस चढविला आहे.

याच मुहूर्तावर प्रसिद्ध होणारें प्रा. क्षीरसागर यांचें प्रस्तुत 'सागर-मंथन' हें पुस्तक त्यांच्या लेखणीच्या आत्मीय विशेषांची दाट ओळख करून देईल. प्रस्तुत संग्रहांतील दहाहि विभूति आधुनिक जगांतील महान् नेते आहेत. त्यांच्या जीवनांतील 'श्रीमत्' आणि 'ऊर्जित' क्षीरसागरांनीं आपल्या अननुकरणीय शैलीनें अगदीं सुगम केलें आहे.

* * *


**व्हीनस प्रकाशन**

**४१० शनवार पेठ : पुणें २**

# सागरमंथन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
वि
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम : ................ वि: ..................
क्रमांक ......११८५५...... नों: दि ............ १५/८/५८

लेखक

प्रा. श्री. के. क्षीरसागर, एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२५३

संपादक

गोपीनाथ तळवलकर

REFBK-0010253

मूल्य रु. ३.५०

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली

★

मे १९५९

★

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

★

प्रकाशक :

**सदाशिव कृष्ण पाध्ये**

व्हीनस प्रकाशन

४१० शनवार पेठ : पुणें २

★

मुद्रक :

**चिंतामण गणेश वझे**

साधना प्रेस

३७४ शनवार पेठ : पुणें २

ज्यांच्या छत्रामुळें मला चिन्तनाला व लेखनाला
पुरेसें स्वास्थ्य व आयुष्य लाभलें
त्या माझ्या
ज्येष्ठ बंधूस व सौ. वहिनींस—
आदरपूर्वक समर्पण

श्री. के. क्षी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
१०२५३
अनुक्रम २४०००
क्रमांक ९२७४५
वि: १०.१
नों: दि: १९/५/५४

# सागर-वेलेवर

'सुवर्णतुला' या विभूतिपरिचयात्मक पुस्तकानंतर प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर यांचें याच धर्तीचें हें दुसरें पुस्तक. महाराष्ट्रीय लेखकाच्या जीवनांतील साडेतीन शुभमुहूर्तांपैकीं एका मुहूर्तावर—म्हणजे साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद त्यांस मिळालें त्या वेळीं—हें पुस्तक प्रकाशांत येत आहे हा दुर्मिळ योगच म्हणावा लागेल. दुर्मिळ म्हणण्याचें कारण कित्येक नामवंत लेखकांच्या आयुष्यांत हा मुहूर्त येतोच असें नाहीं आणि कित्येकांना मुहूर्त लाभला तरी या तोलाचा दर्जेदार लेखसंग्रह प्रसिद्ध करण्यास त्यांच्या संग्रहीं नसतो! क्षीरसागरांना दोन्हीं गोष्टी साधल्या, याबद्दल त्यांचें अभिनंदन करतांना महाराष्ट्रीय रसिकजन व प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशक यांना धन्यवाद दिल्याशिवाय राहवत नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांतील दहा लेख कांहीं योजना आंखून लिहिले आहेत असें नाहीं. यांत कांहीं गौरवलेख आहेत तर कांहीं मृत्युलेख आहेत. कांहीं विशिष्ट प्रसंगास अनुसरून क्षीरसागर यांनीं आपण होऊन लिहिले आहेत, तर कांहीं नियतकालिकांची मागणी पुरविण्यासाठीं लिहिले आहेत. लांबी आणि रचना यांत सारखेपणा दिसत नाहीं तो याचमुळें. परंतु बाह्य स्वरूपांत दिसणारा फरक आशयांत शिरल्यावर मात्र मुळींच जाणवत नाहीं. कारण वृत्तपत्राचे स्तंभ नेमानें सजवितांना देखील क्षीरसागरांसारखा स्वयंप्रज्ञ लेखक स्वतःची अभिरुचि कधीं डावलीत नाहीं. ज्यासंबंधीं आपणांस आस्था आहे असाच विषय ते निवडणार आणि जाणकार संपादकदेखील त्यांना कशांत रस आहे हें हेरूनच त्याप्रमाणें लेखनसाह्य देण्याविषयीं विनंति करणार. यामुळें प्रस्तुत संग्रहांतील लेख हे मधून मधून प्रसंगविशेषीं कधीं स्वयंस्फूर्तीनें तर कधीं संपादकांनीं विनंति केली म्हणून लिहिले असले तरी त्या सर्वांत एक आंतरिक सुसंगति आहे. सर्वच आपापल्या परीनें उत्कट, रसाळ व विचारगर्भ असे उतरले आहेत.

विषय निवडण्यांत क्षीरसागरांनीं अर्धी लढाई जिंकली असें म्हटलें तरी चालेल. प्रत्येक विषय म्हणजे बावनकशी सोनें आणि जितका असामान्य

तितकाच लोकविख्यात. सावित्रीदेवी मुखर्जी यांच्यासारखी एकादी परदेशी विदुषी किंवा इक्बालसारखे मराठी वाचकांस अपरिचित असे उर्दू महाकवि अथवा राजवाड्यांसारखा जनसंमर्दात विजनाचा अनुभव घेणारा ज्ञानयोगी वगळल्यास यांतील इतर विभूति लोकांच्या निरतिशय कुतूहलास आणि प्रेमास पात्र झालेल्या आहेत. त्यांचीं चरित्रें लोकांना मुखोद्गत आहेत. त्यांच्या-विषयींच्या आख्यायिका हें आजच्या युगांतलें लोकवाङ्मयच म्हणतां येईल. शॉनीं कोण्या रूपगर्विता नटीचा बिनतोड कोटिक्रमानें कसा उपहास केला, अरविंदबाबू आय्. सी. एस्. ला कां उत्तीर्ण होऊं शकले नाहींत, किंवा विवेकानंदांवर अमेरिकन लोक कसे बेहद्द खूष होते, या कथा आतां लोकांत प्रतिष्ठित झाल्या आहेत. आपल्या वंद्य विभूतींच्या चरित्रांत निराधार घटना आपल्या कल्पनेनें घालून त्यांच्या आख्यायिका करण्यास भाविक मनें पुढाकार घेतात. एखाद्या महापुरुषानें जरी असल्या आख्यायिकांचा इन्कार केला तरी लोक त्या विसरायला किंवा दुरुस्त करायला तयार नसतात. नेहरूमंडळी आपले कपडे पॅरिसला धुवायला पाठवीत, ही गोष्ट खोटी असल्याचें खुद्द पं. नेहरूंनींच आपल्या आत्मचरित्रांत जाहीर केलें तरी लोक अजूनहि त्या आख्यायिकेंत रंगतात! लोकांना त्या महापुरुषाच्या जीवनवैभवाबद्दल काय वाटतें, हें असल्या कमीजास्त सत्यांश असलेल्या आख्यायिकांवरून समजतें. प्रस्तुत पुस्तकांत क्षीरसागरांनीं घेतलेले वर्ण्यविषय हे असे आहेत. ते विषय लोकविलक्षण, लोकविख्यात आणि लोकप्रिय आहेत. त्यांचीं चरित्रें लोकांनीं वाचलेलीं आहेत, पाहिलीं आहेत. त्यांच्याविषयीं आजवर ऐकलेलें पुनः ऐकायला लोक तयार आहेत आणि कांहीं नवीन ऐकण्याविषयीं तर 'श्रवणाच्या जिभा' करून बसले आहेत. पुस्तकाचें स्वागत होण्यास रसिकांच्या मनांची याहून कोणती तयारी पाहिजे ?

पण भव्य विषय निवडल्यानें क्षीरसागरांचें काम जितकें सुकर झालें तितकीच एका परीनें त्यांची जबाबदारी अतोनात वाढली. एवढ्या थोर विषयांची बडदास्त नीट ठेवतां आली तरच ते विषय निवडल्याचें सार्थक. या विषयांवर अनेक प्रतिभावंतांनीं आपल्या कसलेल्या लेखण्या चालविलेल्या. विवेकानंदांवर रोमाँरोलाँसारख्या युगप्रवर्तक विचारवंतानें लिहिलें. शॉच्या अनेक परस्परविरोधी भूमिकांची चेस्टर्टनसारख्या प्रतिमल्लानें अद्वितीय

चिकित्सा केली. नेहरू हा तर अनेक क्षेत्रांतील नामवंतांच्या वाणी-लेखणीचा आवडता विषय. या आणि अशा विपुल साहित्याच्या झगझगीत पार्श्वभूमीवर आपलें संतर्पण फिकें न पडावें, ही मोठीच जबाबदारी क्षीरसागरांवर होती. परंतु क्षीरसागरांनीं ती उत्तम तऱ्हेनें पार पाडली, ही आनंदाची गोष्ट होय.

लोकोत्तर पुरुष हा प्रतिभावंत ललितलेखकाला अत्यंत रम्य विषय वाटतो. ' महापुरुष म्हणजे देवानें भूमीवर फेकलेली जळती मशाल होय ' असें कार्लाईल म्हणतो. पण चमत्कार असा आहे कीं, एक मशाल दुसरीसारखी नसते. आणि प्रत्येक मशालीनें जो प्रदेश उजळला जातो तोहि वेगळाच असतो. एखाद्या मशालीनें बर्फाच्छादित प्रदेश उजळून हृदयंगम सूक्तांचें पठण चाललेलें दिसेल तर एकादी मशाल रुक्ष वाळवंटांत रखडत जाणाऱ्या कारवानाला पुढचा मार्ग दाखवील. एक मशाल भूतकाळांत अदृश्य झालेल्या सुवर्णनगरीचें दर्शन घडवील, तर दुसरी मशाल भविष्यांतली थोडी पाऊलवाट दृष्टिपथांत आणील. मशालीच्या तेजांतील दिव्यतेचा साक्षात्कार घडवून त्या मशालीचा उजळलेल्या प्रदेशाशीं गाढ स्नेह जोडून देणें हें ललितलेखकांचें कार्य असतें. तें कार्य किती प्रमाणांत साधलेले आहे यावर लेखकाचें यश अवलंबून असतें.

विसाव्या शतकाच्या आरंभीं महापुरुष हा परिस्थितीचाच एक उद्रेक असतो, हा विचार प्रतिष्ठित झाला. ऐतिहासिक नियतिवाद हा जगांतील संस्कृति, धर्म, इतिहास, साहित्य इ०कडे पाहण्याचा दृष्टिकोन बनला. वर्गकलहाच्या भूमिकेवरून प्रत्येक गोष्ट तपासून पाहण्यामुळें मानवी प्रतिभेला अगदींच खालचें स्थान मिळूं लागलें. धर्मांतरित हे त्या धर्मांतल्या मूळ लोकांपेक्षां अधिक कडवे असतात, या नियमास अनुसरून आमचे महाराष्ट्रीय पुरोगामी लोक या ऐतिहासिक जडवादाचे अतिरेकी पुरस्कर्ते बनले. गोवर्धनोद्धाराची कथासुद्धां वर्गकलहाच्या चौकटींत घालून इंद्र हा पिळवणूक करणारा सावकार तर श्रीकृष्ण हा पुरोगामी लोकनेता अशा तुलना करण्यापर्यंत मजल केली ! जगांतील सारें साहित्य वर्गलक्षणेनें युक्त आहे, या(अ)धर्मवेड्या कल्पनेनें साहित्य टीकेला ग्रासून टाकलें ! आज तो कडवेपणा तितका राहिला नाहीं याचा आनंद वाटतो. मानवी जीवनांत ऐहिक परिस्थिति हा महत्त्वाचा घटक आहे

हें खरें. आणि मोठालीं चरित्रें घडविण्यांत परिस्थितीचा हात मोठा असतो हेंहि खोटें नाहीं. पण मानवी प्रतिभेचा विलासहि तितकाच दुर्दम्य आहे, याचा विसर पडला तर जगांतलें सौंदर्य अर्धेअधिक नष्ट होईल. प्रतिभा ही सांचेबंद असूं शकत नाहीं, हेंच जगांतलें आनंददायक आश्चर्य आहे आणि या आश्चर्याचा प्रत्यय येईनासा झाला तर मग जीवितांत स्वारस्य तें काय राहिलें ? प्रा. क्षीरसागरांच्या प्रस्तुत पुस्तकांत हा प्रत्यय वाचकांना करून देण्याचा फार मोठा प्रयत्न आहे, हें या पुस्तकाचें सर्वांत मोठें वैशिष्ट्य होय.

या पुस्तकांतले दहाहि पुरुष लोकोत्तर आहेत. योग्यता आणि कीर्ति यांचें प्रमाण सर्वत्र सारखेंच पडेल असें नाहीं. पण प्रतिभेचा मूळ कंद किती योग्यतेचा आहे याचें नीट परीक्षण केलें तर ही सर्व माणसें सारखींच मातबर ठरतील यांत शंका नाहीं. हे लेख एकदम एखादी योजना आंखून लिहिले नसले तरी त्यांत एक सुसंगति सहज ध्यानांत येण्यासारखी आहे. क्षीरसागर हे सौंदर्यवादी आहेत हें प्रसिद्धच आहे. अर्थात् जें दिव्य-भव्य असेल त्यावर कुरबानी करणें हा सौंदर्यवाद्याचा स्वभाव असतो. त्या दृष्टीनें आपल्या लेखनविलासाकरितां आजच्या युगांतील असामान्य पुरुषांचीं चरित्रें क्षीरसागरांनीं निवडलीं हें ठीकच झालें. पण सौंदर्यवादी क्षीरसागर हे सामर्थ्योपासकहि आहेत हें विसरून चालणार नाहीं. सौंदर्यवादांत जो निराशावाद्यांचा एक पंथ आहे, त्यांतल्या लोकांचा कार्यकारणभावावर विश्वास नसतो. जॉर्ज संतायाना यांनीं असल्या निराश सौंदर्यवाद्यांचें सुंदर वर्णन करतांना म्हटलें आहे, " निराश वृत्तीच्या सौंदर्यवाद्याला हें समजून घेणें अशक्यच होतें कीं, निरनिराळ्या युगांत लोकांनीं ज्यावर जीव लावला तें ध्येय केव्हांतरी त्यांना प्राप्त झालें आणि मानवी इच्छा व आचार यांना अधिक शिस्त लागेल तर हें समाधान त्यांना ( मानवांना ) अधिक वेळां व अधिक प्रमाणांत मिळूं शकेल."* क्षीरसागरांच्या सौंदर्यवादांत अशा तऱ्हेच्या

---

* It is beneath the romantic pessimist to remember that people, in all ages, sometimes achieve what they have set their hearts on, and that if human will and conduct were better desciplined, this contentment would be more frequent and more massive –" George Santayana.

वैफल्यविचाराची छाया नाहीं, याचें कारण त्यांनीं सौंदर्यवादाला सामर्थ्य-पूजनाची जोड दिली आहे. सामर्थ्याच्या अनुपानानें स्वीकारलेला सौंदर्यवाद हा अधिक टिकाऊ नव्हे तर अधिक सुंदर होतो. मात्र हें सामर्थ्यपूजन आत्मगौरवाकरितां नव्हे तर समाजहिताकरितां असलें पाहिजे.

ही भूमिका लक्षांत घेतली कीं, क्षीरसागरांनीं प्रस्तुत पुस्तकांतल्या महा-पुरुषांची निवड करतांना कोणती दृष्टि ठेवली होती हें नीट उमगेल. विवेका-नंद आणि अरविंद हे मनुष्यांतील देवत्वाची जाणीव जगाला करून देणारे पुरुषार्थवादी योगेश्वर. ' नर का नारायण ' करण्याचा आदेश त्यांनीं दिला. सावित्रीदेवी मुखर्जी यांची सूर्योपासनेची परंपरा ही बलोपासनेचीच; किंबहुना हिंदुधर्माचें त्यांना आकर्षण वाटलें तें त्यांतील तेजस्वितेमुळें. इक्बाल हे महा-कवि थोर बलोपासक. मनुष्यांतलें तेज जास्तींत जास्त प्रदीप्त व्हावें यासाठीं त्यांनीं आपलें तत्त्वज्ञान मांडलें. इक्बालप्रमाणें आहिताग्नि राजवाडे यांच्या तपाळ जीवनावर नीत्शेचाच प्रभाव पडला होता. ' जेथें बलेच्छा कोती पडते तेथें ऱ्हास सुरू होतो, ' हें नीत्शेचें वाक्य दोघांनाहि ध्रुवताऱ्याप्रमाणें वाटत होतें. आणि बर्नार्ड शॉ हे स्वतः समाजवादी आणि लोकसत्तावादी असले तरी नीत्शेच्या ' अतिमानव ' ( Superman ) भावनेनें त्यांच्याहि तेजाळ प्रतिभे-ला मोहिनी घातली होती हें सुप्रसिद्ध आहे. डॉ. केतकर यांची ज्ञानोपासना ही समाजाला बलिष्ठ करण्याकरितांच होती. ज्ञान हें पवित्र आहे, म्हणून नव्हे तर तें मानवाला बलिष्ठ करतें म्हणून माणसानें त्याची साधना केली पाहिजे, हेंच केतकरांच्या जीवनाचें सार म्हणून सांगतां येईल. या दृष्टीनें या पुस्तकांतील दहा महापुरुषांपैकीं सात जण एका गोत्राचे वाटण्यास हरकत नाहीं. बल हा या गोत्राचा ऋषि आहे. क्षीरसागरांच्या या निवडींत त्यांच्या स्वतः-च्या मताचें प्रतिबिंब दिसतें.

मात्र बलेच्छा हा मानवाच्या प्रगतीचा एकमेव आधार असें क्षीरसागरांना वाटत नाहीं. त्यांच्या विचाराला भक्तीची, मानवतावादाची दुसरी एक नाजूक बाजू आहे. आणि नेहरू किंवा रॉय यांच्यासारख्या उदार आधुनिक नेत्यांची आणि व्हिटमनसारख्या लोकशाहीच्या उद्गात्याची थोरवी क्षीरसागरांनीं एवढ्या भाविकपणें चितारली ती त्यामुळेंच. क्षीरसागर हे एखाद्या ठोकळेबाज

पंथाला आपली बुद्धि वाहून मोकळे झाले नाहींत किंवा मोठेपणाचा एखादा सांचा त्यांनीं ठरवून ठेवलेला नाहीं. प्रतिभावंताकडे 'आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनम्' अशा स्तिमित वृत्तीनें पाहणारे ते अत्यंत सहृदय लेखक आहेत. आणि म्हणूनच विविध प्रकारच्या महापुरुषांचा मोठेपणा ते इतक्या यशस्वीपणें चितारूं शकले.

थोर विभूतींचा परिचय ही साहित्याची एक स्वतंत्र शाखाच पाश्चात्य लेखकांनीं निर्माण केली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यक्तिचित्र किंवा स्वभावचित्र त्यांत असतेंच, पण त्यापेक्षां आणखी कांहीं असतें. असामान्य पुरुष निर्माण केल्यानंतर निसर्ग तो सांचा मोडून टाकतो, असें इमर्सननें म्हटलें आहे. याचाच अर्थ एक महापुरुष हा दुसऱ्या महापुरुषासारखा नसतो. म्हणूनच कांहीं ठरीव कसोट्या लावून किंवा नेहमींचे मानदंड वापरून महापुरुषाच्या कार्याचें व व्यक्तिमत्त्वाचें मूल्यमापन होत नाहीं. त्यासाठीं परिचय-लेखकाला नवे मार्ग व नवें तंत्र दरवेळीं शोधावें लागतें. गार्डिनरसारख्या ज्या लेखकांनीं हा वाङ्मयप्रकार जगभर लोकप्रिय केला त्यांनीं थोर पुरुषांच्या खाजगी व सार्वजनिक जीवनांतील कांहीं दुर्मिळ प्रसंग व क्षण रंगवून त्या त्या पुरुषांच्या चरित्राची मधुर मानवी बाजू विशेष तन्मयतेनें रेखाटली. अर्थात् यांत वर्ण्यविषयाचें मोठेपण दिसावें, असाहि त्यांचा हेतु होता. एमिल लडविग किंवा केसरलिंग यांच्यासारखी मंडळी आपल्या चरित्रनायकाच्या प्रतिभेची जात कोणती, हेंच विशेष प्रामुख्यानें पहात आले. ऑंद्रे मोर्वा यांची तरल व पराकाष्ठेची सहृदय प्रज्ञा वर्ण्य विभूतीच्या उणीवांचें सुद्धां इतक्या सहानुभूतीनें चित्रण करते कीं, संपूर्ण निर्दोष माणसेंहि जणूं त्या तुलनेनें थिटीं वाटावींत ! पण हे सारे शब्दचित्रकार आपापल्या वर्ण्य पुरुषांचीं हुबेहूब चित्रें काढण्याची विशेष दक्षता घेणारे होत. आपल्याला ज्याचा परिचय करून द्यावयाचा आहे त्याचा जीवनसंदेश कोणता होता आणि आजच्या समाजाला तो कुठें व कसा लागू पडेल, याची मूलग्राही चर्चा हा या थोर लेखकांचा प्रधान हेतु होता असें म्हणवत नाहीं.

या दृष्टीनें दोन जगद्विख्यात लेखकांचा ढंग व दर्जा कांहीं वेगळाच वाटतो. जॉर्ज संतायाना आणि हॅवलॉक् एलिस् हे ते दोन लेखक होत. संतायाना

हे तत्त्वज्ञ, तर एलिस हे शास्त्रज्ञ. दोघांची विद्वत्ता अगाध आहे. दोघांनींहि महापुरुषवर्णनांच्या ओघानें एवढें मौलिक साहित्य निर्माण केलें आहे कीं, कांहीं वेळां त्यांच्या असामान्य वर्ण्य विषयांच्या मानानेंहि ते मोठे वाटतात. संतायाना अधिक चिकित्सा करतात तर एलिस हे अधिक स्पष्टीकरण करतात. पण त्या त्या महापुरुषांच्या जीवनाचा हेतु कोणता, तो जगाला पटावा म्हणून त्यांनीं काय केलें, जुन्यानव्या तत्त्वप्रणालींचें आणि त्यांच्या संदेशांचे साम्य-विरोध कोणते, हें सर्व त्यांचीं चरित्रें रसाळपणें सांगतांना या प्रज्ञावंतांनीं स्पष्ट केलें. नदींतून कमळें वहात यावींत त्याप्रमाणें चरित्रनिवेदनाच्या ओघांत ही सुंदर व सुगंधित सामुग्री आपणांकडे येत राहते. शेलीवरील संतायानाचें लिखाण आणि 'सेंट फ्रॅन्सिस् ऑफ् ॲझिझी' हा हॅव्ह्लॉक् एलिस् यांचा अनन्यसाधारण लेख वाचल्यास मी काय म्हणतों त्याचा प्रत्यय येईल.

विभूतिपरिचयाची क्षीरसागरांची घाटणी या दोघां लेखकांसारखी कांहींशी आहे, असें मला म्हणावयाचें आहे. मराठींतल्या प्रसिद्ध स्वभाव-चित्रलेखकांशीं क्षीरसागरांची तुलना करून वाचकच काय तो निर्णय घेतील, म्हणून त्यांत मी पडत नाहीं. पण संतायाना, एलिस यांच्या परिचय-लेखांच्या तोडीचें एक सुंदर लिखाण कदाचित् वाचकांना आठवणार नाहीं म्हणून मी नम्रतापूर्वक त्याचा उल्लेख करतों. हर्बर्ट स्पेन्सर यांच्यावर लोकमान्य टिळकांनीं लिहिलेला मृत्युलेख या संदर्भात मला आठवतो. स्पेन्सरचें व्यक्ति या दृष्टीनें असलेलें महनीयत्व आणि त्याचा जीवनसंदेश यांची ओळख इतक्या सरळ, वजनदार, अननुकरणीय शैलीनें लोकमान्यांनीं करून दिली आहे कीं, हा लेख वाचल्यावर स्पेन्सरइतकाच लोकमान्यांच्या माहात्म्याचा प्रभाव वाचकांवर पडतो. या संग्रहांतले कांही लेख त्या तोडीचे जरी नाहींत तरी त्या जातीचे आहेत एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या उत्कृष्ट-पणाबद्दल आणखी कांहीं सांगायचें उरलें नाहीं असेंच कुणीहि म्हणेल.

क्षीरसागरांची भाषाशैली प्रांजलपणांत टिळक, केतकर, लोकहितवादी यांच्यासारखी असली तरी चिपळूणकरांची ढंगदार कलाकुसरहि तिच्यांत आहे. आशयाइतकेंच आशयाच्या आविष्काराकडे क्षीरसागरांचें लक्ष असतें. संस्कृत शब्दांचा वापर ते मोठ्या कुशलतेनें करतात. 'ब्रह्मस्व' किंवा 'वीर-

शैव ' यासारखे नेहमींचे शब्द वेगळ्या अर्थानें वापरण्याची हातोटी जागोजाग आढळून येते. हिंदु संस्कृतीच्या सर्वश्रेष्ठतेचा पगडा त्यांच्यावर आहे, हें ठिकठिकाणीं कमीअधिक प्रमाणांत प्रकट झालें आहे. पण उर्दू भाषेच्या उत्कटतेचेहि ते परम भक्त आहेत. त्यामुळें पुष्कळदा संयत आणि अत्युक्त अशा विधानांचा बेमालूम मिलाफ त्यांच्या लिखाणांत झालेला दिसतो. इंग्रजी वाङ्मयाच्या वाचनानें एक प्रकारचें औदार्य ( Catholicity ) त्यांच्यांत आली आहे. त्याचाहि प्रत्यय वाचकाला जागोजाग येतो. पण अन्य भाषांच्या संस्कारांनीं त्यांची शैली बनलेली असली तरी मराठीच्या मूळ सौंदर्याची किंवा वळणाची हानि होईल असा शब्द किंवा लकब त्यांच्यांत कधींहि दिसणार नाहीं. या दृष्टीनें क्षीरसागर हेच खरे भाषाशुद्धिवादी आहेत, असें म्हणतां येईल !

क्षीरसागरांच्या लेखनाचे बरेच पैलू प्रस्तुत संग्रहांत दिसतात. केतकरांच्या निधनाचा शोक करतांना ते कमालीचे भावनाप्रधान झाले आहेत. तें एक गद्य काव्यच आहे असें म्हटलें तरी चालेल. या विलापिकेला उर्दू काव्यपंक्तींनीं सुरुवात झाली आणि तीच उत्कटता व काव्यमयता शेवटपर्यंत टिकली आहे. केतकरांचें वेगळें मोठेपण व समाजप्रेम वर्णन करतांना किंवा शिष्ट समाजाचा दंभस्फोट करतांनाहि या लेखाला रुक्षता आलेली नाहीं. कांहींसा हाच थाट बर्नार्ड शॉ यांच्यावरील लेखाचा आहे. व्हिटमनवरील लेख वाचल्यावर वाचक त्याचे भक्तच बनतील. विवेकानंदांवरील प्रकरण आणखी रंगावयास हरकत नव्हती. पण महापुरुषांचें निधन आपल्या डोळ्यांसमोर घडल्यानें जो भावकल्लोळ उठतो तो उठण्याची शक्यता विवेकानंदांवर लिहिण्याचे वेळीं नव्हती. सावित्रीदेवी मुखर्जी यांना आपल्या संस्कृतिमंदिरांत क्षीरसागरांनीं मोठ्या इतमामानें आणून बसविलें आहे. अरविंद व रॉय यांच्या मूल्यमापनांत क्षीरसागरांची आमच्या सौंदर्यवादाच्या मातृभूमीविषयींची (बंगालविषयींची) महान् भक्ति फार सुंदर रीतीनें व्यक्त झाली आहे. आहिताग्नि राजवाडे यांच्या तर माजघरांतच क्षीरसागर आपणांस घेऊन जातात. इतर कुठल्याहि लेखाला न लाभलेला घरगुतीपणा या लेखांत आला आहे. नेहरू हे क्षीरसागरांचें खरें दैवत नव्हे. त्यांच्यावर क्षीरसागर कांहींसे रुष्टच आहेत. परंतु पंडितजींचें विलोभनीय माहात्म्य असें कीं, क्षीरसागरांसारख्या तर्ककर्कश

विरोधकाला त्यांच्यावर महिम्नस्तोत्र लिहावेंसें वाटलें. आणि क्षीरसागरांचेंहि कौतुक करावेंसें वाटतें कीं, केतकरांचें अनुकरण करून ' राजकारणांतील एक खुळी व्यक्ति ' असें ज्या पंडितजींना ते म्हणतात, त्यांच्या प्रतिभेचा विलास क्षीरसागरांनीं फार बहारीनें रंगविला आहे.

या पुस्तकाच्या गुणवत्तेबद्दल आणखी पुष्कळच लिहितां येण्यासारखें आहे. पण आतां अधिक विस्तार करीत नाहीं. क्षीरसागर हे व्यक्ति-माहात्म्याची एक वेगळी बाजू दाखवितात, तिचा वाचकांनीं विशेष परामर्श घ्यावा हें मात्र मुद्दाम सांगावेंसें वाटतें. केतकर हे लोकांत विद्वान् म्हणून प्रसिद्ध होते, पण क्षीरसागरांनीं त्यांना नेते ठरविलें आहे. बर्नार्ड शॉ म्हणजे जहांबाज टीकाकार म्हणून विख्यात, पण क्षीरसागरांनीं त्यांच्यांतल्या कवीचें मनोज्ञ दर्शन घडविलें आहे. आणि हें सर्व अंतःकरणास पटावें अशा पद्धतीनें. प्रस्तुत पुस्तकाचा हृदयंगम विशेष तो हाच, असें म्हणतां येईल. असो. सागरांत अवगाहन करायला उत्सुक असलेल्या वाचकांना सागर-वेलेवर जास्त खोळंबून धरण्यांत अर्थ नाहीं. मानवी जीवनांतील तीन महालाभांत ' महापुरुषसंश्रयः ' असा एक लाभ आचार्यांनीं सांगितला आहे. तो लाभ प्रत्यक्ष नाहीं तरी वाङ्मयाच्या द्वारें मिळवून देणारें हें पुस्तक चिरकाल संग्रहणीय वाटेल, याविषयीं मला बिलकुल शंका वाटत नाहीं.


नातूबाग, पुणें २<br>
रवीन्द्रजयन्ती :<br>
८ मे १९५९

**गोपीनाथ तळवलकर**

# अनुक्रम

१. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर .... १
२. स्वामी विवेकानंद .... २९
३. महम्मद इक्बाल .... ४५
४. आहिताग्नि राजवाडे .... ६०
५. मानवेंद्रनाथ रॉय .... ७५
६. वॉल्ट व्हिटमन .... ८१
७. श्रीअरविंद .... ९८
८. बर्नार्ड शॉ .... १०७
९. सावित्रीदेवी मुखर्जी .... १२४
१०. पं. जवाहरलाल नेहरू .... १३५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २५...७... दि: १०.५.६५
क्रमांक ...११७५... नों: दि: २५.१०.६५



: १ :

## डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर

कब् आप खाकमें मुझको मिला नहीं सकते ?
मेरे गुबारको लेकिन् दबा नहीं सकते ! *

" आपण मला मातींत मिळवूं शकत नाहीं असें थोडेंच आहे !.... पण माती फिरून उठूं लागल्यास तुम्ही तिला खालीं दडपूं कसें शकणार ? "

रविवार तारीख अकरा एप्रिलच्या सकाळच्या वृत्तपत्रांनीं अशी एक वार्ता प्रसिद्ध केली कीं, ती ऐकण्यास कोणाचीच तयारी नव्हती. ज्यास अखिल महाराष्ट्र ज्ञानाचा महानद, धैर्याचा पर्वत, आनंदाचा झरा आणि अखंड कौतुकाचा विषय म्हणून ओळखीत होतें, तो एका अमावास्येच्या रात्रीं अचानक निर्दय काळाचा घास झाला ! डॉ. केतकर यांचे अंगीं अचलत्व

* शेवटचे निजाम उस्मानअली खानबहादूर यांनीं लिहिलेल्या एका स्फूर्तिदायक गजलमधून वरील ओळी घेतल्या आहेत.

आणि अखंडत्व यांची कल्पना सर्वांनीं इतकीं वर्षें सतत केली होती कीं, त्यांच्या मृत्यूनें दुःखित होण्यापूर्वीं सर्व स्तिमितच झाले. क्षणभर भीतिग्रस्तहि झाले !

पहिला आश्चर्याचा आणि भीतीचा धक्का कमी होतांच सर्वांच्या मनांत एकच उत्कंठा लागली व ती म्हणजे या महापुरुषाच्या यथोचित अंत्य-विधीची. हें शेवटचें दर्शन आपणांस लाभतें कीं नाहीं कोण जाणे....हें शेवटचें पूजन तरी आमच्या हातून यथासांग पार पडो !....कोणी रुग्णालयाकडे ( होय ! या महाराष्ट्राच्या ज्ञानदात्या पित्यानें एका यहुदी गृहस्थाच्या नांवें चाललेल्या सार्वजनिक रुग्णालयांत देह ठेवला ! ).... कोणी गांवापासून दूर अशा त्यांच्या निवासस्थानाकडे.... तर कोणी पुण्याच्या इतिहासप्रसिद्ध स्मशानभूमीकडे— याप्रमाणें साहित्यभक्त धावूं लागले.... आम्ही साहित्य-भक्त म्हणविणारे....केतकरांचे चहाते म्हणविणारे देखील....या महान् साहित्यसेवकापासून किती दूर दूर होतों हें, आम्हांस प्रथम त्या दिवशीं कळलें !

देवाची कृपा आणि दैवाचें साहाय्य म्हणून या शेवटच्या सोहळ्याला आम्ही अंतरलों नाहीं. सायंकाळच्या सुमारास साहित्यपरिषदेच्या गृहांत या पूज्य पुरुषाच्या पार्थिव अवशेषाचें दर्शन घडत होतें. प्रातःकाळच्या विलक्षण वार्तेनें बधिर झालेलीं मनें हळूंहळूं काय झालें याचें आकलन करूं लागलीं होतीं. अंतिम सोहळ्याबद्दल चिन्तातुर झालेल्या अल्पसंख्य साहित्यिकांस, साहित्यिकांशिवाय असंख्य नागरिकांसहि केतकर प्रिय होते, याचें प्रत्यंतर पाहून गर्व वाटूं लागला होता ! वृद्ध, तरुण; धनवान्, निर्धन; विद्वान्, अविद्वान्; स्त्रिया, बालकें; अज्ञ, अभिज्ञ; हिंदू, अहिंदू; सर्व एकाच भावने-नें आकृष्ट होऊन टिळक रस्त्यावरील त्या लहानशा साहित्यगृहाभोंवतीं जमा झाले होते. कोणी काळाच्या निर्घृणतेबद्दल....कोणी मृताच्या श्रेष्ठतेबद्दल.... कोणी त्याच्या अतुलनीय कर्तृत्वाबद्दल....कोणी त्याच्या सर्वप्रियतेबद्दल, तर कोणी प्रेमळपणाबद्दल उद्गार काढीत होते. कित्येक विख्यात लेखक कोणी आप्तच निवर्तल्याप्रमाणें अंत्यविधीच्या व्यवस्थेंत खपत होते. कित्येक प्रमुख नागरिक आपणहि केतकरांची थोरवी ओळखीत होतों, हें पटविण्यास आतुर

होते. ज्यांस अनेक वर्षांत व्यवहाराच्या कोलाहलांत साहित्याचें नांवहि ऐकण्यास फुरसत झाली नाहीं, अशांसहि या वीर पुरुषाच्या धीरगंभीर मुद्रेचें शेवटचें दर्शन घेण्यांत अपार आदर वाटत होता....प्रत्येकास ' कांहींतरी केलें पाहिजे ' ' आतां तरी करूं या XXX ' अशा कांहींशा अस्फुट अनुतापाच्या टोचणीनें घेरल्याचें दिसत होतें. स्त्रिया....सुशिक्षित युवती....कीं ज्यांस साहित्य म्हणजे केवळ एक विलास वाटावा, त्या तर साहित्यक्षेत्रांतील हें वीरमरण पाहून भयभीत झाल्या होत्या....आणि साहित्याची फारशी स्मृति नसणारांसहि या ब्राह्मण वीरासन्निध दिसणारी त्याची विजातीय वीर-पत्नी पाहून दुःखावेग दुःसह होत होता.

उदरभरणमग्न उदासीन जनतेस अखेर काळाच्या धक्क्यानें जागें केलें ! एवढ्या पर्वतप्राय बुद्धिमत्तेचें व पराक्रमाचें आकलन एका क्षणांत कुठून होणार ?....पण, यथार्थ आकलनाचें सूक्ष्म बीज जें प्रेम व आदर तें मात्र सर्वांच्या चर्येवर दिसत होतें. कुठें कुठें तर तें नेत्रावाटे द्रवून बाहेर पडत होतें....या विविध जनसमूहांत असेहि कांहीं ज्ञानमार्गाचे वाटसरू असतील कीं, ज्यांनीं काळाच्या या निर्दय आघातापूर्वींच डोळे उघडून या ज्ञानदेवाचें, या अर्वाचीन व्यासमुनीचें अभिज्ञतेनें अभिवादन केलें असेल....ज्यांना त्यांचा विशाल देह पाहतांच त्यानें उघडलेल्या अफाट ज्ञानप्रदेशाचा अनुभव घडत असेल....ज्यांना त्याचे सूचक आणि उद्बोधक संवाद स्वातीच्या पर्जन्यबिंदूंप्रमाणें वाटत असतील....जे या ज्ञानकल्पतरूस अधीरपणें शोधीत असतील....आणि भेटतांच वंदन करीत असतील !

दुःखाश्रूंच्या अंजनानें उघडलेल्या डोळ्यांनीं का होईना, आपण या लोकोत्तर पुरुषाचें एकवार दर्शन घेऊं या ! आणि आपल्या अल्पात्म्याच्या मापानें हा महात्मा मापतां येईनासा झाल्यास निदान त्याच्या विविधगुण-सागरांत या श्राद्धपर्वणीच्या प्रसंगीं तरी एकवार निमज्जन करूं या ! महा-पुरुषाच्या महत्त्वमापनांच्या महत्त्वाकांक्षेपेक्षां ही सात्त्विक आकांक्षाच या पवित्र पर्वणीस अधिक साजेल !

**अब् जियादा न रंज दो मुझको**
**कब्रपर उसकी ले चलो मुझको ।।**

" छे ! आतां मला अधिक कष्ट देऊं नका ! मला त्याच्या समाधी-पाशींच घेऊन चला ! "

* * *

डॉ. केतकर यांस महाराष्ट्र एक अजोड विद्वान् आणि ज्ञानकोशासारखा अजस्र ग्रंथ हातीं घेऊन पार पाडणारे दीर्घोद्योगी ग्रंथकार म्हणून ओळखतो. यापलीकडे महाराष्ट्रीयांची केतकरांसंबंधीं कल्पना म्हणजे चार बऱ्यावाईट व अव्यवस्थित कादंबऱ्या व अनेक विक्षिप्त लेख लिहिणारे विचित्र विद्वान् अशी सांगतां येईल. या सर्व कल्पना स्थूलमानानें खऱ्याहि आहेत. पण कार्यावद्दलच्या इतक्या स्थूल कल्पनेनें कर्त्याच्या वैशिष्ट्याचें अथवा थोरपणाचें आकलन होणें अशक्य आहे. शिवाय ज्याला सर्वसामान्य कुतूहल आहे अशा माणसासहि प्रचंड विद्वत्ता, अतर्क्य लेखन-कर्तृत्व आणि विक्षिप्तपणा यांचें साहचर्य पाहून या मनाच्या ठेवणींत कांहीं वेगळें होतें असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. सारांश, विद्वान् आणि विक्षिप्त हीं जीं दोन ठरीव विशेषणें डॉ. केतकरांच्या बाबतींत सदैव योजलेलीं आढळतात तीं केतकरांच्याविषयींचें फारच अल्प आकलन दाखविणारीं आहेत.

पण ज्यांनीं केतकरांचें थोडेंबहुत लिखाण वाचलें आहे व ज्यांस त्यांचा किंचित्काळ परिचय लाभला आहे, अशांस तर विद्वत्ता व विक्षिप्तपणा याहून फार मोठे विशेष या पुरुषाचे अंगीं आहेत असें दिसून आल्याखेरीज राहिलें नसतें. अर्थात् पहाणाऱ्याच्या आकलनशक्त्यनुरूप त्यानें त्यांची कमी-अधिक मीमांसा केली असती, हें उघडच आहे. पण ज्यांस त्यांचीं शेकडों पानें लिखाण वाचावें लागलें असेल व ज्यांस त्यांची शेकडों वेळां भेट झाली असेल, अशांतहि ' विद्वान् आणि विक्षिप्त ' एवढेंच डॉक्टरांचें वर्णन करणारे अनेक सांपडावे, हें अर्थातच शोचनीय होय.

डॉ. केतकर हे विद्वान् होते, म्हणजे विद्वान् जन्मले असें अर्थातच नाहीं. त्यांनीं ती विद्वत्ता प्राप्त करून घेतली. तसेंच विद्वान् हा पदार्थ इतका दुर्मिळ नाहीं कीं, डॉ. केतकर केवळ विद्वान् म्हणून इतके प्रसिद्ध व्हावे. तर डॉ. केतकर यांच्या विद्वत्तेचें व तिच्या विनियोगाचें स्वरूप कांहीं वेगळें होतें हें त्यांच्या प्रसिद्धीचें कारण होतें, हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे.

केवळ संशोधक म्हणजेहि विद्वानांतील अग्रवर्गीय होत. पण डॉ. केतकर केवळ संशोधक नव्हते. केवळ समाजशास्त्रज्ञ म्हटला तरी महाराष्ट्रांत दुर्मिळ होय, पण केतकर केवळ समाजशास्त्रज्ञ नव्हते. केवळ ज्ञानकोश आंखून लिहून लिहवून पुरा करणें म्हणजेहि भगीरथ कार्य होय. पण मनुष्य नुसता ज्ञानकोशकार आणि विक्षिप्त एवढेंच असणें शक्य आहे असें मानणाऱ्या मनुष्यास ज्ञानकोशाविषयीं मोठेंच अज्ञान असलें पाहिजे.

परीक्षेंत वर नंबर, मोठी नोकरी व स्वास्थ्य मिळाल्यावर विद्वत्तेचें सहज फळ म्हणून ग्रंथनिष्पत्ति असें केतकरांच्या विद्वत्तेचें किंवा लेखनाचें धोपट स्वरूप नव्हतें. केतकरांच्या ज्ञानार्जनाचें व ज्ञानसंतर्पणाचें अलौलिक रहस्य त्यांच्या चिरपरिचितांकडून तर आपणांस कळेलच, तथापि त्यांचें केवळ सार्वजनिक चरित्र्यास अवलोकिल्यासहि ते केवळ विद्वान् व केवळ साहित्यिक नसून राष्ट्रोद्धारक महापुरुष होते व राष्ट्रोद्धाराचें साधन म्हणून त्यांनीं असामान्य ज्ञानसंभाराचें अर्जन व प्रसार यांत जन्म घालविण्याचें ठरविलें असें दिसून येईल.

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, एम्. ए., पीएच्. डी., हें नांव महाराष्ट्रांत प्रथम सुमारें चोवीस वर्षांपूर्वीं गाजलें ते त्यांच्या केसरींतील जातिभेदविषयक लेखांनीं. केतकर या वेळीं नुकतेच पीएच्.डी. होऊन आले होते. त्यांचे जातिभेदावरील ग्रंथहि त्यांनीं यापूर्वींच लिहिले होते व ते कलकत्ता विद्यापीठांत एम्. ए. च्या पदवीधर विद्यार्थ्यांचे अध्यापक नेमले गेले होते. तथापि त्यांची पदवी व त्यांनीं चालविलेला विचारप्रसार यांची संगति लावणें कठीण होतें. पीएच्. डी. झालेला, पांचसहा वर्षें परदेशीं राहिलेला, नुकतीच पंचविशी उलटलेला विद्वान् म्हणजे पगारमान जोखून बडी नोकरी जमविण्याच्या नादांत असावयाचा. आणि या तरुण पंडितास साजेशी नोकरी लाभलीहि होती. अशा अवस्थेंतील विद्वानांचे पुढचे उद्योग अगदीं वेगळ्या प्रकारचे असतात. भांडारकर-तेलवलकरांप्रमाणें जनतेनें दुरून वंदन करण्यालायक विद्येचे पर्वत, एवढेंच या वेळीं अशा विद्वानाचें भवितव्य कोणींहि वर्तविलें असतें. पण अशा सुस्थित होण्याच्या वेळींच केतकर एक अत्यंत जहाल लेखक म्हणून केसरींत व इतर मराठी पत्रांतून प्रसिद्धि पावत होते.

या विद्वानाला नोकरीनें स्वास्थ्य लाभणार नाहीं, हें त्यांच्या वरील उद्योगावरून कोणासहि सहज समजलें असतें. त्याच्या डोक्यांत कांहीं वेगळे विचार खेळत होते व अशा विचारांचीं माणसें नोकरीच्या चाकोरींत टिकत नसतात.

केतकरांचे या सुमाराचे स्फुट लेख जहाल आहेत हें तर खरेंच; पण त्या वेळच्या लोकांस ते नुसते तिखटच वाटले असें नव्हे तर भांबावून सोडणारे वाटले. कारण त्या वेळच्या सुशिक्षितांच्या रूढ कल्पनांस या लेखांनीं फार मोठे धक्के दिले. त्या वेळच्या सुधारकांस केतकर सुधारक म्हणावयास तयार नव्हते. त्या वेळच्या स्वार्थत्यागास केतकर श्लाघ्य म्हणण्यास तयार नव्हते आणि त्या वेळच्या देशभक्तास केतकर " मी देशभक्त आहें म्हणूनच सुधारकही आहें " असें आक्रोश करून सांगत होते. यामुळें हा तरुण विद्वान् त्या वेळच्या सर्वच सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या आखाड्यांत विलक्षणच वाटला. सुधारक म्हणून गणला जाणारा वर्ग, कमी पगारावर काम करून शाळा-कॉलेजें काढणारे विद्वान् आणि पुराणमताभिमानी देशभक्त या सर्वांसच, तुम्हांला अद्याप फार शिकावयाचें आहे, असें सांगण्यास या विद्वानानें सुरवात केली.

१९१३–१९१४ हीं वर्षे केतकरांच्या दोन तपांच्या सार्वजनिक आयुष्याच्या वीररसात्मक प्रथमप्रवेशाचीं वर्षे म्हटलीं तरी चालेल. असें म्हणतां येणार नाहीं कीं, केतकरांनीं आपला राष्ट्रोद्धाराचा ' प्रोग्राम ' कधींच आंखून ठेवला होता, पण या स्थैर्य-प्राप्तीच्या काळांतहि त्यांच्या पोटांत जी राष्ट्रस्थितीबद्दलची आग दिसून येत होती, तिचा संबंध त्यांच्या तत्पूर्वींच्या व तदनंतरच्या चरित्रखंडाशीं सारखाच पोंचतो. आयुष्याच्या या आणीबाणीच्या वर्षांत जो असे विचार लिहितो, तो पैशाच्या वासावर परदेशास गेला नव्हता, हें चाणाक्ष मनुष्यास सहज ओळखलें असतें. त्याचप्रमाणें परत आल्यावरहि या मनुष्यास याचा देश स्वास्थ्य देणार नाहीं, हें तितकेंच उघड दिसलें होतें.

अमेरिकेस जाण्यापूर्वीं केतकरांच्या डोक्यांत काय खेळत होतें, अमेरिकेस गेल्यावर त्यांनीं काय केलें, इंग्लंडमध्यें काय पाहिलें, परत स्वदेशीं येतांच मनाशीं काय ठरविलें, वगैरे गोष्टी बऱ्याच अंशीं केतकरांना स्वतः प्रसंग,

विशेषीं कथन केल्या आहेत व त्यांचे अधिकारी सहकारी प्रस्तुत विशेष अंकांत त्या सांगतीलच. तथापि त्या सर्वांतून एकच स्पष्ट बोध होतो, तो म्हणजे कांहीं असाधारण प्रेरणा केतकरांच्या विद्यार्जनास चालना देत होती व तीच असाधारण चालना विद्यार्जनानंतर त्यांस स्वास्थ्य लाभूं देत नव्हती.

विद्यार्थीदशेंतच आपलें ध्येय निश्चित ठरविणारी मंडळी आपल्या पाहण्यांत अनेक येतात. तशा अर्थानें केतकरांनीं आपलें ध्येय ( ? ) ' राष्ट्रोद्धार ' हें ठरविलें असें म्हणणें अर्थातच अवास्तव होईल. फार काय, ज्ञानकोशासारखें प्रचंड कार्य अंगावर घेण्याकरितांच हा पुरुष जन्मला आहे, अशी कांहींशी अस्फुट कल्पना केतकरांस त्यांच्या बालपणापासून होत असे, हेंहि खरें असलें तरी ज्ञानकोश लिहिण्याचें ध्येयहि केतकरांनीं एखाद्या शेख महंमदी पोराप्रमाणें मनोराज्यांत ठरविलें नाहीं. टिळक अथवा केतकर यांच्यासारख्या व्यक्ति विशिष्ट आणि महत् कार्याकरितां जन्मलेल्या असतात म्हणजे काय, हें साधारण मनुष्यास चांगलेंसें उमगत नाहीं. टिळकांनीं सरकारी नोकरीकरितां अर्ज केला होता, हें कळतांच ते देशभक्त झाले हा अशा मंडळींस आकस्मिक योगायोग वाटूं लागतो. तथापि मोठ्या व्यक्तीच्या मनाचा विकास शोधतांना याहून खोल दृष्टि ठेवल्यास फार निराळेंच स्वरूप ध्यानांत येतें. ज्याप्रमाणें टिळक डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या संकुचित कार्यक्षेत्रांतून अपरिहार्यत्वानें बाहेर पडले, त्याप्रमाणेंच ते सरकारी नोकरींतूनहि अल्पकाळांतच बाहेर पडले असते व या दृष्टीनें पाहतां मोठीं माणसें ध्येय ठरवून जीवनाच्या आखाड्यांत उतरतात असें मानणें हें कोत्या बुद्धीचें लक्षण होय. मोठीं माणसें आपल्या मोठेपणासह दिलेल्या त्या अल्पक्षेत्रांत वावरूं लागतात व आपल्या मोठेपणामुळें कांहीं क्षेत्रें टाकाऊ ठरवितात; कांहींत क्रांति घडवितात व आपलें म्हणून एक स्वतंत्र क्षेत्र निर्माण करतात. त्यांनीं आपण अमक्यासारखें मोठें व्हावयाचें असें ठरविलेलें नसतें. मात्र ज्या ज्या क्षुण्ण वाटेवर ते पाऊल ठेवितील ती अपुरी आणि सदोष असल्याचें त्यांस आढळतें आणि तें लोकांस पटवून द्यावयास लागण्यापासूनच त्यांच्या कार्यास सुरुवात होते.

केतकरांचेंहि असेंच झालें. केवळ विद्वत्तेची वाट त्यांस पुरणें शक्य नव्हतें. केवळ पंडितांत मान्यता होण्यांत त्यांस समाधान नव्हतें. त्यांस सामाजिक

सुधारणा अवश्य हवी होती. पण चालू सुधारणा हास्यास्पद व अज्ञानमूलक वाटत होती. त्यांस राजकीय पुढाऱ्यांचें काम म्हणजे विद्वानांचा प्रान्त नव्हे असें तर वाटत नव्हतेंच, उलट राजकीय कार्यासच आपल्यासारख्या अनेक-विद्या-विभूषित पंडितांच्या साहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे असें दिसत होतें. सारांश, ज्ञानसमृद्ध आणि बुद्धिगर्वित अशा या नरर्षभास मातृभूमीवर पाय ठेवतांच एक प्रकारच्या सात्त्विक धुंदीमुळें काय करूं आणि काय नको करूं, असें झालें होतें. ही महत्त्वाकांक्षा, राष्ट्राच्या भूत आणि भविष्या-विषयींची ही जाणीव, हा असामान्य आत्मविश्वास, हें तत्कालीन कार्यक्षेत्रा-विषयींचें असमाधान, त्यांच्या त्या वेळच्या वाक्यावाक्यांत, शब्दा-शब्दांत दिसत आहे. अशा प्रकारचें लिखाण एवढ्याशा वयांत महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणींहि लिहिलें नाहीं व इतर राष्ट्रांत ज्या थोड्या लोकांनीं लिहिलें ते जगद्विख्यात होऊन गेले.

तथापि या महान् विहंगमास पहिल्या उड्डाणापासूनच आपल्या मार्गाविषयीं निश्चित कल्पना होती, हीहि तितकीच आश्चर्याची गोष्ट आहे. त्या वेळच्या आपल्या लेखनाविषयीं केतकर म्हणतात, " राजकीय अगर सामाजिक सुधारणेविषयीं जे लोक कांहींतरी कार्य करूं इच्छितात, तथापि.... सोपपत्तिक ज्ञान मिळविण्यास ज्यांस अवकाश नसतो, ज्यांच्या अंगीं प्रयत्न करण्याची इच्छा आहे व कर्तेपणा आहे, अशा लोकांस यांपैकीं कांहीं लेख उपयोगी पडतील असें वाटतें....

" कर्त्या माणसास मदत करणाऱ्या इतर माणसांची जरूर आहे. कार्यांत मदत करणाऱ्या लोकांस जे लोक हातीं घ्यावयाचे त्यांसहि सामान्यतः कर्तव्य-जागृति लागते. सामान्य जनांस कांहीं विचारांची ओळख करून दिली तर पुढाऱ्यांचें काम सुलभ होईल....

" राष्ट्रघटनेस व राष्ट्रबलसंवर्धनास जें ज्ञान उपयोगी पडेल त्याचा थोडा अंश या लेखांत आला आहे. "

" माझें काम शिक्षकाचें आहे. "

वर उद्धृत केलेल्या अगदीं साध्या शब्दांत या तरुण कार्यकर्त्यास आपल्या कार्याच्या महत्त्वाविषयींची व त्याबरोबरच नैसर्गिक मर्यादेविषयींची असलेली

जाणीव स्पष्ट दिसून येते. केतकर यांस बहुजनसमाजांतच नव्हे, तर पुढाऱ्यांतहि राष्ट्रीय कार्यास अवश्य असलेल्या शास्त्रीय ज्ञानाचा अभाव आढळला. देशांत विद्वान् नव्हते असें नव्हे, तर विद्वान् आणि कर्ते यांचे परस्पर संबंध घडून आलेले नव्हते. जे विद्वान् होते ते अकर्ते होते—आणि जे कर्तव्य करीत होते त्यांस आपल्या पुढील कार्यांची योग्य कल्पना नव्हती. पण या धाडसी विद्वानाच्या असंतोषास आणखीहि कारणें होतीं. देशांतील विद्वान् देशांतील कर्त्या पुरुषांस सहाय्य करीत नव्हते, एवढेंच नव्हे तर देशांतील यच्चयावत् विद्वत्तेसच एक महान् रोग जडला होता. तो म्हणजे बौद्धिक दास्याचा. या बौद्धिक दास्यावर केतकरांनीं त्यांचे बाहु ‘ ब्रह्मतेजोबलानें ’ स्फुरूं लागल्यापासून जितके प्रहार केले असतील तितके दुसऱ्या कशावरच केले नसतील. सार्वजनिक जीवनाच्या प्रवेशकालीं लिहिलेल्या उपरिनिर्दिष्ट लेखापासून तों अगदीं परवां मरण्यापूर्वीं लिहिलेल्या लेखापर्यंत प्रत्येक लेखांत, प्रत्येक ग्रंथांत केतकरांनीं ‘ इंग्लंडपूजन’, ‘ आङ्ग्लशूद्रत्व ’, ‘ मिशनऱ्यांपासून राष्ट्रीय प्रश्नावर विचार स्वीकारणारे सुधारक ’ या सर्वांवर सतत ताडन केलें आहे. ही बौद्धिक दास्याची चीड म्हणजे केतकरांच्या कर्तृत्वाचें रहस्य म्हटलें तरी चालेल. ते विद्वान् होते म्हणून त्यांनीं विद्याप्रसार केला असें म्हणण्यापेक्षां त्यांच्या या बौद्धिकदास्यविषयक जुगुप्सेनें त्यांस विद्वानांहून सर्वस्वीं वेगळें बनविलें, असें म्हणावें लागेल. केतकर विद्वान् नव्हते, तर राष्ट्रोद्धाराप्रीत्यर्थ हें साधन वापरावयाचें ठरविणारे राष्ट्रपुरुष होते, असें म्हणणें योग्य होईल.

पण विद्वत्तेनें राष्ट्रोद्धार करावयाचा म्हणजे काय करावयाचें ? विद्यालय काढावयाचें ? वृत्तपत्रांतून मासिक, साप्ताहिक किंवा दैनिक ज्ञानप्रसार करावयाचा ? व्याख्यानें द्यावयाचीं कीं पुस्तकें लिहावयाचीं ? आणि पुस्तकें कोणकोणत्या विषयांवर तरी लिहावयाचीं ? हें कार्य इतकें व्यापक व गुंतागुंतीचें होतें कीं कार्याची शक्ति असणारास देखील कार्यपद्धति ठरविण्यांत यश येणें कठिण होतें आणि हा देखावा केतकरांस भोंवतालीं दिसतच होता.

वरील सर्वच कार्यें विविध लोकांनीं चालविलीं होतीं. केतकर यांस आत्मविश्वास एवढाच कीं, हीं सर्वच कार्यें करण्यास आपण एकटेच समर्थ आहोंत. इतकेंच नव्हे तर प्रत्येक क्षेत्रांतील पूर्वील अग्रणीपेक्षां सर्वस्वीं अधिक लायक

आहों. सामर्थ्याविषयीं अलोट विश्वास आणि अमर्याद कार्यक्षेत्रामुळें उत्पन्न झालेला अविश्वास अशा मनःस्थितींतच हायस्कूलमध्यें असल्यापासून केतकरांच्या मनांत प्रवेश करणारें ज्ञानकोशाचें स्वप्न फिरून भासमान होऊं लागलें. केतकर यांस विधात्यानें ज्ञानकोशाकरितां घडविलें होतें असें आतां आपण सहज म्हणून जातों. पण विधात्याच्या अस्फुट सूचनेचा केतकरांनीं निश्चित स्वीकार करीपर्यंत या ध्येयानें कितीतरी हेलकावे खाल्ले. उमरावतीच्या सिटी लायब्ररींतील तेराव्या वर्षीं पाहिलेला एन्सायक्लोडिया व त्या सुमारास केतकर यांच्या वर्गावरील कोणा थत्ते मास्तरांनीं गमतीनें केतकर यांस दिलेलें ' एन्सायक्लोपीडिया ' हें नांव, हार्वर्ड युनिव्हर्सिटीमध्यें असतांना वेब्स्टरच्या डिक्शनरीचे संपादक डॉ. लँग यांस आपल्या खोलींत निजावयास बोलावून मारलेल्या गप्पा व पुढें डॉडमिड कंपनीकरितां केलेलें कॅन्व्हासिंगचें काम, हिंदुस्थानांत आल्यावर भासलेली ज्ञानप्रसाराची आवश्यकता, त्यांतच बाणेदारपणामुळें सरकारी नोकरीचा दुरावलेला संभव यांपैकीं कोणतें कारण ज्ञानकोशासारखें राष्ट्रीय कार्य हातीं घेण्यास अधिक प्रेरक झालें, हें स्वतः केतकरच आपल्या निवेदनांत ठरवूं शकलेले नाहींत. किंबहुना आपल्या नेहमींच्या उमद्या थट्टेखोर वृत्तीनें बेकारीमुळेंच कांहीं अंशीं आपण ज्ञानकोशाकडे वळलों, असेंहि ते म्हणतात. तरी हिंदुस्थानांत आल्यानंतरचे डॉक्टरांचे विविध व्यवहार लक्षांत घेतल्यास राष्ट्रकार्यविषयक, संस्कृतिविषयक व स्वकर्तृत्वविषयक विचार डॉक्टरांच्या मनांत त्या वेळीं निश्चित ठरत होते, असें दिसून येईल. अखेर या तरुण वीरानें अनेक व्यावहारिक अडचणींचा विचार न करतां किंवा आपल्या खेळकर वृत्तीनें कांहीं भासलेवाईकपणें विचार करून अखेर ज्ञानकोशाचा अपूर्व आखाडा थाटला.

कांहींतरी अजस्र काम हातीं घेऊन पुरें करावयाचें किंवा ' आपल्या मराठींत अमुक नाहीं तें आणावयाचें, ' असल्या व्रतोद्यापनाच्या किंवा शर्यती घोड्याच्या वृत्तीनें या विद्वान् मल्लानें केवळ कंडूशमनार्थ जें सांपडेल तें काम अंगावर घेतलें, अशीं कित्येक ठिकाणीं समजूत दिसून येते, ती अर्थातच खुळचटपणाची आहे. संस्कृतिविषयक, समाजविषयक व राष्ट्रोद्धारविषयक सिद्धान्त ठाम झाल्यानंतरच केतकरांनीं आपल्या जीवनक्रमास सुरवात केली. त्यांनीं कोणतेंही कार्य अंगीकृत केलें असतें तरी तें अजस्रच व राष्ट्रोद्धारकच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळ
अनुक्रम २४०७० दि: ११-१०-७५
क्रमांक ३१७५ नों. दि: २४।

झालें असतें. स्वतः केतकरांनींहि शेंकडों वेळां आपल्या कार्याविषयीं व ध्येयाविषयीं निःसंदिग्ध कल्पना दिल्या आहेत. ज्ञानकोशाच्या ध्येयाविषयीं त्या वेळच्या 'लोकशिक्षणांत' त लेख लिहून त्यांनीं पुढील कल्पना दिल्या होत्या. "महाराष्ट्रीय ज्ञानकोश म्हणजे पूर्वपरंपरागत ज्ञान आणि भविष्यकालीन स्थिति यांस जोडणारा दुवा होय." "पाश्चात्य संस्कृति व परंपरागत संस्कृति यांचें एकीकरण करण्याचें स्थान म्हणजे महाराष्ट्रीय ज्ञानकोश होय!" "शेतकी व सुशिक्षित वर्गाचे धंदे हे करण्यापलीकडे महाराष्ट्रांत कार्यक्षमता नाहीं, तर समाजाचें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत होण्यासाठीं वाङ्मयद्वारें जी मदत करणें शक्य असेल ती करणें ज्ञानकोशाचें कर्तव्य होय." "महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा महाराष्ट्राचें बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्यासाठीं झालेला ग्रंथ होय."

वरील ब्रीदवाक्यांत केतकरांनीं पीएच्. डी. होऊन आल्यावर व नंतर बंगालपासून सीलोनपर्यंत हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांचें कार्यनिरीक्षण केल्यानंतर हातीं घेतलेल्या कार्याच्या राष्ट्रीय महत्त्वाची जाणीव स्पष्ट दिसून येते. आणि म्हणूनच त्यांनीं हातीं घेतलेलें कार्य केवळ साहित्य-सेवा या सदरांत घालणें म्हणजे अज्ञान होय. "सामान्य जनता व आपल्या देशासंबंधानें संशोधन करणारा वर्ग यांच्या ज्ञानांतील जमीन-अस्मानाचें अंतर दूर करण्याची महाराष्ट्रीय जनतेची बौद्धिक गरज" जरी स्थूलमानानें ज्ञानकोशानें म्हणजे पर्यायानें अनेक विद्वानांस हातीं धरून डॉ. केतकर यांनीं पुरविली असली तरी केतकर-वाङ्मयाचें कार्य व उडी यांच्या पलीकडे होती. लो. टिळकांसारख्या मंडळींस देखील केतकरांस ज्ञानकोशकार्य पेलेल कीं नाहीं याची शंका होती. पण डॉ. केतकर यांनीं लोकमान्यांनीं वर्तविलेल्या वीस वर्षांच्या कालमर्यादेपेक्षां जवळजवळ निम्म्या अवधींत ज्ञानकोश तर संपवलाच, पण आपणांस ज्ञानकोशहि पुरत नाहीं, हेंहि त्यांनीं दाखविलें. केतकरांस ज्ञानकोश दोन अर्थांनीं पुरला नाहीं. एक तर ज्ञानकोश पुरा करून ज्ञानकोशाइतकेंच इतर प्रचंड शास्त्रशुद्ध, ज्ञानदायक व राष्ट्रोपयोगी लिखाण त्यांनीं लिहिलें व दुसरें म्हणजे केवळ आर्षींचें ज्ञान सुव्यवस्थित मंडित करून केतकरांनीं आपला लेखनसंसार थाटला नाहीं. त्यांचीं ध्येयें व महत्त्वाकांक्षा यापलीकडचीं होतीं.

ज्ञानकोशाच्या शास्त्रीय चक्रव्यूहांत ज्या ध्येयसृष्टीस संकोचानें संचार करावा लागत होता, तिचा स्वैर प्रवाह केतकरांच्या इतर वाङ्मयाच्या रूपानें बाहेर

पडला. मोठमोठालीं शास्त्रें टीचभर लिखाणांत बसविणें, लोकांस क्षुद्र वाट-णाऱ्या विषयास आपल्या व्यापक दृष्टीमुळें नूतन शास्त्रांच्या पदवीस पोंचविणें आणि सामान्य संभाषणांत सुद्धां केवळ नवीन माहितीच्या माऱ्यानें विद्वान् श्रोत्यांसहि चकित करून सोडणें या गोष्टी म्हणजे केतकरांच्या हातचा मळ होता. 'विद्यासेवक' मासिक, 'पुणें समाचार' दैनिक, 'महाराष्ट्रीयांचें काव्य-परीक्षण' यांसारखे अनिच्छया जन्मलेले ग्रंथ, शिवाय अनेक नियतकालिकां-तून जातां जातां लिहिलेले लेख हे सर्व केतकरांच्या कल्पनासृष्टीचा पूरच होत. या सर्वांतून दिसणारा एक ओघ आणि या सर्वांस जन्म देणारा एकच उगम यांचें आकलन करणें एका पिढीच्या आवाक्याबाहेरचें आहे. 'पुणें समाचारां'त केतकरांनीं पुण्याच्या खानावळींवर एक लिहिला होता, तर नुकताच कांहीं दिवसांमागें पुण्याच्या एका दैनिकांत त्यांनीं तमाशाच्या उद्धारासंबंधीं एक लेख लिहिला होता! आमच्या घोपटमार्गी सुशिक्षित वर्गास हा विद्वान् ब्राह्मण थट्टा करीत आहे एवढाच बोध अशा लिखाणावरून होत असे. अशा आडदांड विद्वानानें कादंबरीसारखा नाजुक वाङ्मयप्रकार हातीं घेतांच प्रति-ष्ठित वाचकांची व चैनी प्रतिभासाधकांची उडालेली तारांबळ काय विचारावी! प्रतिष्ठितांना अशा बाबतींत दोष देण्यांत अर्थ नाहीं. केतकर कित्येकदां खरो-खरच थट्टेचा अतिरेक करीत यांत शंका नाहीं. कित्येक वाङ्मयप्रकारांची केवळ थट्टा करण्याचा हेतु त्यांनीं कां धरला, काव्यें आणि कादंबऱ्या लिहून प्रतिष्ठित वाचकवर्गास चिडाविण्यांत त्यांस काय लाभलें, हें कळण्यास या विलक्षण लेखनाच्या व लेखकाच्या अंतरंगांतच प्रवेश व्हावयास हवा. एरवीं केतकरांच्या कादंबऱ्या म्हणजे कादंबऱ्या नव्हेत, असें म्हणणारास बोल लावण्यांत अर्थ नाहीं.

इतरांच्या वाङ्मयाप्रमाणेंच केतकरांच्या वाङ्मयाचे देह व आत्मा असे पाडावेच लागतील. त्यांच्या वाङ्मयाच्या देहाकडे अथवा फॉर्मकडे पाहून इतरांबरोबर आपणहि हंसू या. केतकरांनीं तें बुद्ध्या तसें सजवलें होतें व त्यांचे वाङ्मयविषयक विचार* हे त्यांच्या इतर विचारांप्रमाणेंच चिंतनीय

* १ गांवसासू, प्रस्तावना.
२ जुनें लोकशिक्षण, १८२६ आणि २८.
३ ज्ञानकोश, खंड २१.

होते, हें सत्य असूनहि तूर्त आपण त्याच्या आत्म्याचाच विचार करूं. केतकरांनीं आपल्या अनेकविध लेखनाच्या द्वारें कोणती ध्येयसृष्टि निर्माण केली? स्वतःबद्दल व स्वतःच्या देशाबद्दल केतकरांच्या मनांत कोणतीं मनोराज्यें चालत ? आज तरी मनोराज्येंच वाटतील तीं. तथापि तीं आकलन करून घेण्याचा प्रयत्न आपणांस श्रेयस्कर होईल.

हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशांतील पहिलें मनोराज्य म्हणजे देशांतील परकीय सत्ता नष्ट करणें. आपणां सर्वांप्रमाणें केतकरहि अर्थातच आपल्या विद्यार्थिदशेंत बंडाला अधीर आणि बंडखोरांचे चाहते होते. तथापि ज्ञानक्षेत्राचा अमर्याद विस्तार झाल्यावर केतकरांच्या पारतंत्र्य-नाशाच्या व त्याच्या साधनांच्या कल्पना सर्वस्वीं बदलल्या. त्या इतक्या आमूलाग्र बदलल्या कीं, मूळचा तंट्या भिल्लाचा, फडके-चाफेकरांचा हा अधीर चाहता अखेर राजकीय क्रांति जवळ जवळ आध्यात्मिक उपायानें करूं योजतो. "मला राष्ट्राच्या मानसिक भावनेंतच फेरबदल घडवून आणावयाचे आहेत. त्यालाच मी आध्यात्मिक कार्य म्हणतों." "राजकीय सुधारणा म्हणजे मी केवळ सामाजिक सुधारणाच साध्य करण्याचें यंत्र समजतों." "सामाजिक, राजकीय, आर्थिक या सर्व प्रकारच्या गोष्टी घेऊन त्यांत भवितव्य आशादायक कसें कसें आहे हें दाखवयाचें आहे." "लोकोपयोगी कृत्यें करण्यांत ज्या मानानें आपण प्रवीणता दाखवूं त्या मानानें सरकारला आपल्याच तंत्रानें वागावें लागेल." .... "लोकांच्या विचारांत क्रांति करावयाची आहे आणि ती क्रांति समाज नैराश्यांतून आशावादीपणाकडे ओढण्याच्या स्वरूपाची आहे." वरील अवतरणांत केतकरांच्या एका आत्मीयतेनें रंगविलेल्या—जवळजवळ स्वतःचेंच चित्र अशा—पात्राचीं देशासंबंधींचीं स्वप्नें दिलीं आहेत. ज्या 'राजश्री मोहनदास गांधीं'ना केतकर मनमोकळेपणानें शिव्या देत त्यांच्याच—अक्षरशः त्यांच्याच—शब्दांत केतकर बोलत आहेत! 'निःशस्त्रांचें राजकारण' या केतकरांच्या प्रचलित राजकारणविषयक ग्रंथांतील विचारसरणीचा पायाहि थेट कोणत्याहि विख्यात शांततावाद्यासारखाच आहे. "पराभूत आणि परतंत्र राष्ट्रास आपण या निःशस्त्र उपायांनीं स्वातंत्र्य मिळवून दिलें म्हणजे जगद्विकासामध्यें हिंदुस्थाननें महत्त्वाचें कार्य केलें असें होईल आणि 'ब्रह्मतेजोबलं बलम्' असें मोठ्या आवेशानें सांगणाऱ्या वसिष्ठाचे शब्द खरे केल्या-

सारखें होईल." हे उद्गार गांधींचे कीं केतकरांचे हें ओळखणें सोपें नाहीं! केतकरांचा हा आशावाद शांततामय आणि आध्यात्मिक क्रांतीवरच थांबत नाहीं. हिंदुस्थान आशावादी होतांच स्वातंत्र्य तर मिळवीलच, पण समाज व संस्कृति यांच्या विकासाच्या कूट प्रश्नांत जगाचें गुरुत्व करील, हें पुढें त्यांनीं लवकरच आपल्या समाजशास्त्रावरील ग्रंथांत अलौकिक आत्मविश्वासानें प्रतिपादिलें आहे. "शिष्टवर्गाचे सामाजिक नियम सर्व जनतेवर लादण्याविरुद्ध जें समाजाचें बंड झालें, तें रशियन प्रयत्नांत आज दृश्य होत आहे. कालांतरानें युरोपचें स्थिरस्थावर होईल आणि भिन्न वर्गास भिन्न धर्मशास्त्र या ब्राह्मणी तत्त्वाचा स्वीकार युरोपांतहि होईल." या भविष्यवाणीनें केतकरांचा दीड वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालेला समाजशास्त्रावरील ग्रंथ समाप्त होतो!

उपरिनिर्दिष्ट आशावादाचा प्रवक्ता केवळ ज्ञानकोशकार नव्हता. ज्ञानकोश रचतां रचतां तो त्याच्याहि वर चढत होता असें दिसून येईल. वरील आशावाद आपल्या परिचयाचा आहे व आकलन करण्यास सुलभहि आहे. तरी केतकरांच्या ध्येयसृष्टीचा विस्तार आणखी कितीतरी अकल्पनीय प्रांतांत झालेला आहे, हें त्यांच्या ग्रंथांच्या वाचकांस सांगावयास नकोच. त्यांची मातृसत्ताक समाजाची कल्पना, त्यांचें ऋषिमंडळाचें ध्येय, 'समाजग्राह्य' काव्याविषयींचा त्यांचा सर्वस्वीं अतिसमाजवादी ( Ultra-Socialistic ) साहित्यसिद्धान्त*, कला व धर्मशास्त्र यांसहि×समाजकार्यास लावण्याचा त्यांचा हिय्या, वगैरे गोष्टी आकलन करण्याचें कार्य एका पिढीच्या आवाक्याबाहेरचें आहे. अनेक बुद्धिमंतांकडून त्यांच्या विविध अंगांचें अध्ययन, त्यांच्या ग्रंथांवर ग्रंथ, केतकर-वाङ्मयाच्या एकेका कल्पनेचा विस्तार आणि प्रत्यक्ष प्रयोग असें होतां होतां भविष्यकालांत केतकरांच्या ध्येयसृष्टीची आणि सिद्धान्तांची योग्यता अधिक आकलनसुलभ होईल. हें दुष्कर कार्य अंगावर घेऊन केतकरांचें महत्त्वमापन करण्याची वेडी महत्त्वाकांक्षा प्रस्तुत लेखक धरीत नाहीं. तरी त्यांच्या वाङ्मयांत ठिकठिकाणीं दिसणाऱ्या उत्तुंग ध्येयांच्या छाया डोळ्यांपुढें आल्यावांचून रहात नाहींत त्याला काय करावें!

* महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण ( विद्यासेवक ).

× विचक्षणा.

केतकरांच्या महत्त्वाकांक्षेकडे पाहतांना आपणांस आपल्या प्राकृत महत्त्वाकांक्षांस त्या दृष्टीनें 'महत्त्व'च नाहीं, हें प्रथम ओळखलें पाहिजे. राजकीय पुढारी होणें, त्याकरितां स्वार्थत्याग करणें, रूढी मोडणें, वगैरे आपणां इंग्रजी शिक्षितांच्या परिचयाच्या शतकृत्यांस केतकरांनीं मागेंच भोळसटपणांत काढलें होतें. एवढा ज्ञानसागर ओलांडल्यावर केतकरांस कोणतीं उत्तुंग गिरिशिखरें दिसूं लागलीं होतीं ? स्वार्थत्यागी देशसेवकाहून, रूढिभंजक सुधारकाहून, भावनाविकल कवीहून, तर्कशुद्ध शास्त्रज्ञांहून कोणती पदवी केतकरांना लोभनीय वाटत होती ? त्यांचा आदर्श पुरुष ( Superman) त्यांचा आदर्श समाज ( Utopia ) होता तरी कसा ? कीं, या शास्त्रप्रेमी संशोधकास स्वप्नरंजन प्रियच नव्हतें ? छे ! केतकरांचें श्रेष्ठत्व हेंच कीं, ते जितके तर्कनिष्ठुर संशोधक होते तितकेच काव्यमग्न ध्येय-चित्रकारहि होते ! पुढें उद्धृत केलेल्या ध्येयसृष्टीइतकीं धाडसीं ध्येय चित्रें प्लेटोनें तरी रंगविली आहेत काय ? कदाचित् ध्येयराज्याच्या त्या रंगेल राजानेंच रंगविलीं असलीं तर असतील ! " पण आजच्या धर्मसमतेच्या कल्पनेशी जुळलेलें धर्मशास्त्र नाहीं म्हणून तेंच धर्मशास्त्र मी वैजनाथ सांगत आहे, " जगांतील अत्युत्कृष्ट कार्य करण्यासाठीं हा संघ स्थापन करावयाचा. संघानें प्राचीन ऋषिमंडळाचें विचारस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य घेऊन केवळ ज्ञानविकासाच्या पाठीमागें लागावयाचें आहे.... ऋषिमंडळ ही जाति नाही व हें विशिष्ट धर्माच्या लोकांसाठीं नाहीं. सर्व धार्मिक संप्रदाय त्यांच्या संस्थापकाच्या नांवानें केवळ धंदा करणाऱ्या पुढाऱ्यांनीं चालविलेले आहेत....जगदैक्य घडविण्यासाठीं जो समाज स्थापावयाचा तोच हा आहे व आजपासून सर्व जगाचें ऐक्य होण्यास प्रारंभ होत आहे. "

हें ज्ञानविकासाचें अमर्याद आणि विशाल ध्येय आणि त्यासाठीं केवळ विचारस्वातंत्र्य नव्हे तर आचारस्वातंत्र्यहि भोगणाऱ्या Intellectual Aristocracy ची कल्पना, कोणत्याहि वेषानें वावरणाऱ्या बौद्धिक, सांप्रदायिक दास्याबद्दल तिरस्कार आणि शुद्धज्ञानाच्या अंतिम विजयाबद्दलची श्रद्धा, यामुळें केतकरांच्या लेखांस, शास्त्रग्रंथांस, कादंबऱ्यांस एक प्रकारच्या ऋषिप्रणीत श्रुतिग्रंथाचें स्वरूप ठिकठिकाणीं प्राप्त झालें आहे.

केतकर-वाङ्मयाचें हें विविध आणि विशाल स्वरूप साकल्यानें फार

थोड्यांच्या ध्यानांत येतें व तें ध्यानांत आल्यावर तर केतकरांच्या या प्रतिभेच्या विशिष्ट स्वरूपाविषयीं मति अधिकच गुंग होते !

केतकर मूळ प्रकृतीनें संशोधकी बाण्याचे होते, कीं समाजसुधारक होते कीं सनदशीर स्वराज्याग्रही होते ? इंग्रजद्वेष्टे होते कीं अहिंसावादी आणि विश्वबंधुत्ववादी होते ? ते कधीं आपल्या कोंकणस्थ पोटजातीचा अभिमान न लाजतां दाखवून एखाद्या व्हॅलेंटाईन चिरोलसारख्या चित्पावनद्वेष्ट्यास लंडनमधील सभेंत चपराक लगावतात, तर कधीं जगदैक्याचीं स्वप्नें रंगवितात. व्यक्तित्वमापनाच्या परिचित परिभाषेंत बोलावयाचें झाल्यास केतकर Scientific प्रवृत्तीचे होते कीं Humanitarian होते, कीं Utopian होते ? जातिनिष्ठ होते की कम्युनिष्ट होते ? रोमॅंटिक होते कीं प्युरिटन होते ? विनोदी होते कीं शास्त्ररुक्ष होते ? एवढी विविधता आणि विशालता त्यांच्यांतच कां दिसावी ? कदाचित् ते तुलनेस घेतां येण्यासारख्या अनेक विख्यात भारतीयांहून श्रेष्ठ तर नसतील ? छे ! पण इतका साधा, इतका विचित्र, इतका निर्धन, इतका अपरिचित मनुष्य फार मोठा ठरवितांनाहि जरा अवघड वाटतें. खरोखर असामान्य व्यक्तींचें महत्त्वमापन ही देखील एक असामान्य गोष्ट होऊन बसते !

" स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ! " केतकरांच्या योग्यतेचें मापन आणि प्रतिभेचें लक्षण ठरवितांना अनेक देशीविदेशी व्यक्ति डोळ्यांपुढें येऊन जातात. तुलनेनें हें कार्य संपणार नाहीं तरी त्यांतील बराच भाग विनाकष्ट आवरेल म्हणून आपण कांहीं प्रचलित तुलनांचाहि विचार करूं या. केतकरांचा विचार करतांना अनेकांस आठविलेली पहिली व्यक्ति म्हणजे राजवाडे. या दोन व्यक्तींची तुलना करण्याचा मोह अनावर असला तरी येथें त्यांत शिरणें शक्यहि नाहीं व उपयुक्तहि नाहीं. मी एवढेंच म्हणेन कीं, प्रखर बुद्धीच्या पुरुषास भोंवतालचा मूर्ख, सुस्त अथवा हलकट समाज पाहून जो वैताग येतो तो राजवाड्यांस आलेला होता. राजवाड्यांच्या वैतागाचें नवल नाहीं व तो आपला येथील वर्ण्य विषयहि नाहीं. राजवाड्यांच्याहूनहि अधिक प्रखर बुद्धि असून आणि भोंवतालच्या अंधकाराचा अनुभव त्यांजहूनहि अधिक असून केतकर वैतागले कसे नाहींत ?....

दुसरी व्यक्ति म्हणजे लो. टिळक. ज्या एकाच आधुनिक भारतीयापुढें केतकरांचें शिर अवनम्र होत असे ते म्हणजे टिळक. टिळक केतकरांपेक्षां अर्थात् व्यक्ति या दृष्टीनें कांहीं अत्यंत महत्त्वाच्या आत्मिक गुणांत श्रेष्ठ होते. टिळक कर्मवीर होते. आजच्या समाजापुढील आत्तांच्या क्षणींचें (ऐतिहासिक) कार्य जास्तींत जास्त उमगणारा आणि उरकणारा वीर म्हणून टिळकांची योग्यता केतकरांहून मोठी आहे. तथापि भूतकाल आणि भविष्यकाल यांचें आकलन करण्याची प्रतिभा ( Imagination ) केतकर यांत टिळकांहून अधिक होती. टिळक पराक्रमी कर्मवीर होते, तर केतकर द्रष्टे ऋषि होते. आणि आपल्यांत जें अंग नाहीं त्या अंगाविषयीं थोर मनास नेहमींच आदर वाटतो, तसा केतकरांस टिळकांविषयीं वाटत असे.

डॉ. जॉन्सनचें नांव अनेकांनीं एतत्प्रकरणीं काढलें आहे. अवाढव्य देह, निःस्पृह वृत्ति, तीव्र मर्दानी बुद्धिमत्ता, कोशरचना वगैरे सादृश्यांमुळें, आणि किंबहुना दोघांसहि विशेषेंकरून शोभणाऱ्या डॉक्टर या उपपदामुळें, ही तुलना स्वाभाविकच आहे. तथापि मोठमोठीं सैन्यें हालविणारा आणि लढाया मारणारा नेपोलियन अगर सिकंदरासारखा सेनापति आणि आपल्या गल्लींतील आखाडा चालविणारा आणि बक्षिसाच्या कुस्त्या खेळणारा पेशा-पेहलवान यांत जें अंतर तेंच केतकर आणि जॉन्सन यांत होतें. आपल्या मनावरील इंग्रजीचें दडपण जरा बाजूस केल्यास जॉन्सन हा केतकरांच्या पासंगासहि पुरणार नाहीं, हें दिसून येईल.

यानंतर तुलनेकरितां येणारी मंडळी म्हणजे एन्सायक्लोपीडिया लिहून विचार-क्रांति घडवून आणणारी दिदरो आदिकरून फ्रेंच मंडळी. या मंडळींचा विद्य-मान स्थितीच्या विनाशावर एवढा भर होता कीं, विदारण, उपहास, हत्या हींच त्यांच्या ज्ञानाचीं फळें होत. फ्रेंच ज्ञानकोशाचे पिते आणि महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचा पिता यांस तराजूंत घालणें प्रस्तुत अल्पबळ लेखकाच्या शक्तीबाहेरचें आहे. तथापि वर दिलेलीं फ्रेंच फळेंच आपल्या ज्ञानगंगेच्या तीरावरहि वाढणार असें केतकर यांस दिसलें असतें, तर त्यांस अर्थातच मोठासा गर्व वाटला नसता. केतकर यांस हवी असलेली निःशस्त्र क्रांति, जगदैक्य, ज्ञानोपासन

आणि ऋषींची श्रेष्ठ जात कधीं निर्माण होईल ती होवो. त्यांच्या ग्रंथांनीं घडणारी विचारक्रांति देखील आमच्या गतानुगतिक समाजांत कालांतरानें दृश्यमान होणार. तथापि जी विचारक्रांति आणि सामाजिक क्रांति केतकर वांछीत होते, ती फ्रेंच क्रांतीहून फारच उच्च दर्जाची होती. अर्थात् तिला पोषक असा केतकर यांचा ग्रंथ-संभारहि केवळ विनाशप्रेरक नाहीं.

संशोधक राजवाडे, राष्ट्रोद्धारवीर टिळक आणि क्रांतिकारक फ्रेंच मंडळी यांहून केतकर अनेक बाबतींत वेगळे होते. केतकरांच्या प्रतिभेंत संशोधकाची चिकित्सकता, प्लेटोसारख्या ध्येयपूजकाची काव्यमयता आणि प्राचीन ऋषींच्या स्वैर ज्ञानोपासक जातींतील आर्षता यांचें विलक्षण मिश्रण झालें होतें ! हें असामान्य मिश्रण ओळखणें कठीण असलें तरी त्यांची श्रेष्ठता प्रतीत मात्र होणें कठीण नाहीं. उलट असामान्य श्रेष्ठ व्यक्ति पाहतांच तिच्या श्रेष्ठत्वाकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून असामान्यत्वास तेवढें विक्षिप्त म्हणत सुटणें हें मात्र अडाणीपणाचें लक्षण होय.

केतकरांच्या व्यक्तिमत्तेचे हे रासायनिक घटक लक्षांत घेतल्यास, त्याच्या अनेक बऱ्यावाईट पण असामान्य अंगांची संगति लागते. त्यांच्या योजना, त्यांची भाषासरणी, त्यांचे पोशाख, त्यांचा विनोद त्यांचा हेतुपुरस्सर ग्रात्यपणा हे सर्व विशेष स्वाभाविक आणि रमणीय वाटूं लागतात. आणि तरीही केतकरांची श्रेष्ठता दृष्टीआड होत नाहीं. किंबहुना अधिक रमणीय दिसूं लागते.

अनेक लोकोत्तर गुणांची दुसरी बाजू म्हणून थोर व्यक्तींत दिसून येणाऱ्या अवगुणांकडे आपण जसा कानाडोळा करतों, तसा केतकरांच्याहि बाबतींत करणें श्रेयस्कर होईल. पण कित्येकदां हे अवगुण केवळ लोकभ्रमांतच जन्मलेले असतात. जो आपल्याहून वेगळा तो विक्षिप्त, ही सामान्यजनाची व्याख्या असते आणि असामान्य मनुष्य सामान्य मनुष्यासारखा कोठून असणार ? मिशनऱ्यांनीं पिकवलेला हिंदूंच्या प्राचीन संस्थांचा आणि संस्कारांचा इतिहास तुम्ही ऐतिहासिक सत्य धरून चालणार आणि ज्याच्या ग्रंथांनंतर युरोपीय पंडितांनीं आपल्या ग्रंथनिविष्ट शोधांत दुरुस्त्या केल्या त्यास विक्षिप्त म्हणणार, असा प्रकार केतकरांच्या बाबतींत अनेकदां घडला आहे. कांहीं बाबतींत केतकर आपल्या प्रकृतिवैशिष्ट्यामुळें अतिरेक आणि दुराग्रह दाखवीत हेंहि खरें,

( उदाहरणार्थ–बुद्ध आणि गांधी यांस लबाड म्हणणें ) पण बहुतेक बाबती अशाच होत्या कीं, ज्यांत केवळ रूढ समजुतींवर आघात होत आहे एवढ्यामुळें आमचे सुशिक्षित भाबडे केतकरांस विचित्र ठरवून मोकळे होत. अनेक प्रांत, हजारों जाती, त्यांचे असंख्य रीतीरिवाज आणि लाडक्या समजुती यांचा केतकरांजवळ एवढा संग्रह होता कीं, आमच्या ग्रामांतरहि न करणाऱ्या वाचकांस त्यांचे लेख कल्पित नवलकथेप्रमाणें वाटत आणि नवलकथा इंपिरियल गॅझेटियर-सारख्या भासत ! ब्रह्मोंचे पोटभेद, सिंधी झनान्याचें रहस्य, नायर तरुणांच्या विवाहविषयक सुटसुटीत कल्पना यांचें केतकर-पुराण ऐकून आमचे परीक्षांपुरते विद्वान् सहज असें अनुमान काढीत कीं, "हा मनुष्य उगीच कांहींतरीच आहे !" समाजांतील आघात-प्रत्याघात, समज-गैरसमज–थोडक्यांत म्हणजे Social Psychology ओळखण्यांत तर डॉक्टरांचा हातखंडाच होता. आपलें आणि आपल्या जातीचें अन्तर्मन डॉक्टर म्हणतात तसें असेल काय ? एखाद्या कथानकाच्या पहिल्या पानावरच डॉक्टर आईच्या प्रेमाच्या मर्यादा वर्णन करणार ! तर त्याच कादंबरींत एक फटकळ पात्र निर्माण करून त्याच्या-करवीं नाणावलेल्या व्यक्तींची हजेरी घेणार ! अशा स्थितींत डॉक्टरांचीं मतें, भाषा आणि माहिती हीं सर्वत्र बोचरीं भासल्यास नवल काय ! पण हे सर्व फणसाचे कांटे असत. त्याच्यामागें समाजप्रेम आणि मनाचें औदार्य हीं दडलेलीं असत. वरील कांटे पाहून फळ समजलें असें समजणारा समाज बुजरेपणानें स्वतःचेंच नुकसान करून घेत नाहीं काय ? डॉक्टरांच्या जवळ एवढी नवीन माहिती आणि नवीन दृष्टि असे आणि समाजाची सुस्ती आणि अज्ञान घाल-विण्याची त्यांस एवढी त्वरा असे कीं, ते सारखे दुतर्फा डिंवचत आणि बोचत जात. पण तें शत्रूचें भोसकणें नव्हतें; मित्राचें उद्बोधन होतें. आणि तोहि मित्र सदैव उमदा ! उघडा आणि मर्दानी वृत्तीचा ! क्वचित् स्वतःचें हंसें करून घेऊनहि ते स्वजनांस शिकविण्यास तयार होते. त्यांच्या अवलियावजा संभाषणाचें आणि बर्नार्ड शॉप्रमाणें दचकवून सोडणाऱ्या लेखनपद्धतीचें रहस्य वरील गोष्टींत आहे. ते स्वतःचें हंसें करूनहि शिकविण्यास तयार असतील–पण हंसले असे फार; शिकले असे थोडे !

विद्याप्रेमी केतकर म्हणजे एक अविरत संशोधक होत. अशीं माणसें आपल्या परिचित अशा मॅक्समूलर, विंटरनिट्झ् या वर्गांत मोडतात. पण

समाजप्रेमी केतकर ही व्यक्ति थोडीशी अपूर्व आणि म्हणूनच समजण्यास कठिण आहे. केतकरांचें समाजप्रेम म्हणजे संशोधकाचेंहि नव्हतें, सुधारकाचेंहि नव्हतें व पुराणमताभिमान्याचेंहि नव्हतें. संशोधकाप्रमाणें ते समाजास प्रयोगशाळा किंवा रुग्णालय समजत नव्हते. सुधारकांप्रमाणें त्यांस चार-दोन रूढी मोडतांच स्वर्गप्राप्ति होणार असें वाटत नव्हतें आणि पुराणमताभिमान्या-प्रमाणें त्यांस जुने पापुद्रे गळूं लागतांच रडूंहि येत नव्हतें. समाज हा त्यांनीं आपल्या काव्यमय प्रेमाचा ( रोमान्सचा ) विषय बनविला होता ! त्यांस तो कधीं आपल्या कुटुंबाप्रमाणें वाटे, कधीं अजाण पण प्रिय बालकाप्रमाणें वाटे; तर कधीं चातुर्यानें सजविण्याच्या वडिलार्जित बगीच्याप्रमाणें वाटे. त्यांच्या हजारों योजनांचें आणि विलक्षण कादंबऱ्यांचें इंगित या त्यांच्या Socialistic Rommance मध्यें सांपडेल ! त्यांस नेहमींच्या अर्थानें रोमँटिक म्हणावें, तर ते स्वयंकेंद्रित नव्हते. सर्वस्वीं समाजाभिमुख होते. आणि त्यांस नेहमींच्या अर्थानें 'सोशॅलिस्ट' दृष्टिकोनाचे म्हणावें तर ते समाजाकडे रूक्ष जडवादी आणि भवितव्यवादी ( Determinist ) दृष्टीनें पाहणारे नव्हते. त्यांना केवळ ध्येयवादी ( Utopian ) म्हणावें, तर त्यांचें वस्तुस्थितीचें आणि भावी क्रांतीचें आकलन त्या मानानें फारच शास्त्रशुद्ध होतें. त्यांनीं आपल्या ज्ञानप्रसाराच्या कार्यक्रमास 'आध्यात्मिक' असें म्हटलें असलें तरी "काय हो, आत्मा ही काय चीज आहे ?" असेंहि ते कांहीं अध्यात्मवादी साहित्यिकांस विचारीत ! "संरक्षणाची व राष्ट्रसंवर्धनाची जबाबदारी डोक्यावर असली म्हणजे परमार्थाच्या अगर ईश्वरसाधनाच्या कल्पना मनुष्याचीं डोकीं बहकूं देत नाहींत व ती जबाबदारी नसली म्हणजे परमार्थ बराच बोकाळतो !" अशा 'लोकहितवादी' वचनांनीं त्यांनीं हरएक प्रसंगीं लोकांस खुळचट पारलौकिकतेपासून परावृत्त केलें आहे. तथापि धार्मिक संस्कार, आचार आणि संस्था यांना कांहींच समाजधारणा-हेतु असणें शक्य नाहीं, अशी मठ्ठपणाची कल्पना घोकून त्यांचा नाश करण्याचाहि त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. परलोकाविषयीं आणि वैयक्तिक मोक्षसाधनाविषयीं ते सर्वस्वीं उदासीन होते, तथापि त्यांची ऐहिकता इंद्रियतृप्ति हेंच सुख समजणाऱ्या आधुनिक जडवाद्याच्या हीन संस्कृतींत कधींच शिरली नाहीं. ज्ञानाची अमर्याद स्पृहा आणि भारतीय समाजावर आणि संस्कृतीवर निस्सीम प्रेम या दोन मोहांनीं

ते इतके वेडावून गेले होते कीं, कित्येक अनभिज्ञ आणि अकृतज्ञ मंडळीस ते खरोखरीचेच पागल वाटत !

पण केतकरांच्या विशाल बुद्धीइतका किंबहुना त्याहूनहि अधिक उपयोग त्यांस त्यांच्या वेडेपणाचा, प्रेमवेडेपणाचा....पागलपणाचा झाला ! कोणत्याहि शहाण्या माणसास केतकरांचे अवाढव्य कार्यक्रम शक्य कोटींतले वाटले नव्हते, कोणत्याहि शहाण्या माणसास ते शेवटास नेतां आले नसते. कोणत्याहि शहाण्या माणसास या ज्ञानयज्ञांतून निर्माण झालेल्या ब्रह्मस्वामुळें अधिक उद्योगास मानसिक स्वास्थ्य उरलें नसतें. केतकर वेडे होते म्हणूनच अनेक पिढ्यांनंतर बहरणाऱ्या तरूंची लागवड धीरानें आणि हंसतमुखानें करीत बसले. एरवीं स्वतःच्या संसाराकडे दुर्लक्ष करून जगाच्या संसारांत रमणारा, समाज हाच आपला पिता आणि भावी पिढ्या हीच आपली संतति असें मानणारा कोणत्या वैतागाची धन करतो, हें राजवाड्यांच्या विषादकारक वार्धक्यावरून दिसतच आहे !

हें विलक्षण धैर्य आणि त्याबरोबरच हें " Forgive them, Oh Lord, they know not what they do " असें म्हणणारें समाजप्रेम केतकरांस कोठून लाभलें ? ज्वानींतील प्रेम, प्रिय रमणीचीं गाणीं रस्तोरस्तीं गाऊन बदनाम होणारें प्रेम, देशाच्या गतवैभवामुळें आणि चालू विटंबनेमुळें मस्त होऊन फांशीच्या दोराचें चुंबन घेणारी बेहोष ज्वानी सर्व देशाच्या परिचयाची आहे. आमच्याहि परिचयाची आहे. पण ज्या उन्मादाचा उगम सोळा वर्षांच्या मुखचंद्रांत नसून सोळा शतकांच्या गतवैभवांत असतो, आणि ज्याची मस्ती देहाच्या ज्वानीबरोबर समाप्त होत नाहीं, असें अमर्याद सात्त्विक प्रेमवेड ही एक दुर्लभ वस्तु आहे ! ज्यांना जीवनकार्य सांपडलें त्यांस कार्लाइल धन्य मानतो; पण ज्यांचें जीवितकार्य म्हणजे एक प्रेमवेड झालें त्यास कार्लाइलनें काय मानलें असतें ? केतकरांचे कामाचे पर्वत ( आणि आपणांस दृष्टि असल्यास त्यांतील ठिकठिकाणच्या हिऱ्यांच्या खाणी ) आणि त्यांचें विक्षिप्तपण या दोन अलग नव्हत्या. ज्या परिस्थितींत महाबुद्धिमन्तासहि याच्या शतांश देखील काम करतां आलें नसतें, तींत केतकर अखंड काम करीत यांचें इंगितच त्यांच्या ' वेडेपणांत ' आहे.

ज्या समाजाचीं ध्येयें रंगविण्यांत केतकर स्वतःचा संसार विसरले आणि ज्या संस्कृतीबद्दलच्या विश्वासानें त्यांस जवळ जवळ दैवी श्रद्धा लाधली, त्या

समाजानें त्यांचें काय केलें आणि त्या संस्कृतींतील त्यांच्या वांट्यास काय आलें ? केतकरांसारख्या समाजपुरुषासंबंधीं समाजाचें म्हणून कांहीं कर्तव्य आहे काय, ही योग्यताच ओळखली नाहीं म्हटल्यावर आपण कर्तव्यांतूनहि मुक्त होतो ? ज्या भारतीय संस्कृतीचें रहस्य शिकवून आपल्या समाजास जगाचा आदर्श बनविण्याची हिम्मत केतकरांनीं धरली त्या संस्कृतीनें समाजास आपल्या उपकार-कर्त्याविषयीं जीं कर्तव्यें सांगितलीं आहेत तीं आपण नंतर पाहूं. आजच्या समाजाचीं आपल्या महापुरुषासंबंधींची वृत्ति काय आहे ? केतकरांच्या शोकप्रदर्शनाच्या सभेंत कोणी एक वक्ते बोलले कीं, मोठ्या माणसांचे असे हाल व्हायचेच. एका विषादकारक प्रकाराची ही उपपत्ति मोठी गमतीची म्हटली पाहिजे. पण सदर वक्त्यांच्या भाषणांत सत्य अगदींच नव्हतें असें नव्हें. प्रतिभावंताच्या मनांत तीव्र बुद्धि-मत्ता आणि एखाद्या विषयाचें अनिवार वेड यांचें कांहींसें आत्मघातकी मिश्रण असतें. ज्या उपजत स्वार्थबुद्धीमुळें ( Self-preservation Instinct मुळें ) मनुष्य आपल्या बुद्धीचा उपयोग आपल्या सुखाकरितां करून घेतो ती मूळ प्रवृत्तीच प्रतिभावंताच्या अंगीं कमी झालेली दिसते. एखाद्या वेडामुळें ते स्वसुखाविषयीं बेदरकार बनतात, जेवण विसरतात, झोप विसरतात आणि आपलें मूल्यवान् आयुष्य अल्पतर करून घेतात. न्यूटन घड्याळ शिजत टाकतो, शेले बेपर्वाईनें जलसमाधि घेतो....

सारांश, प्रतिभावंत आणि स्त्रिया यांच्या वांट्यास आकर्षकता आणि यातना देवानेंच ठेवल्या आहेत, असें म्हणून मोकळें होणें फार सोपें झालें आहे. आणि खरोखरच प्रतिभावंत म्हणून ओळखले जाणारे मोहक वेडे कित्येकदां याहूनहि आत्मघातकी दुर्गुणांनीं पछाडलेले असतात. आपल्या प्रमुख व जगदुपकारक वेडाबरोबरच त्यांस अनेक भिकार गोष्टींचेंहि वेड लागलेलें असतें. वृत्ति नुसती प्रेमळ न राहतां फाजील काकळ (Sensitive) आणि ठिसूळ बनून जाते. म्हणून कोणी कवि एखाद्या मानवी कीटकाच्या दंशानें मरतो तर कोणी शास्त्रज्ञ एखाद्या नादान पोरीमुळें बेचैन होऊन आपले शोध गुंडाळून ठेवतो आणि कोणी होतकरू महापुरुष जग आपणांस आगाऊच ओळखून जांवई बनवून दिवाळसण देत नाहीं म्हणून अंधारांत केस तोडीत कडवट आणि विटकें लिखाण लिहीत बसतो. खरोखरच.... " अशांचें कोण करिल तरी

काय?" असें म्हटल्यास फारसें असत्य नाहीं. (पण अशाहि बिघडलेल्या गुणी बाळास कामाला लावील तोच समाज खरा योजक!)

केतकर अशा दुबळ्या प्रतिभावंतांपैकीं होते काय? आपल्या दुःखाचें घर करून दार लावून बसणाऱ्या हळुवार आत्मकेंद्रित कलावंताची आमच्या बेबंद समाजानें उपेक्षा केली तर आश्चर्य नाहीं; पण समाजप्रेमामुळें जो स्वगृह विसरला आणि उपेक्षा, हाल आणि साधनांचा अभाव यांची क्षिति न बाळगतां कामाचे डोंगर उभारून गेला, त्यास सुखी करणें समाजास अशक्य नव्हतें. एका वृत्तपत्रानें केतकरांच्या मृत्यु-लेखांत फ्रेंच ज्ञानकोशकार दिदरो याचेहि असेच हाल झाले यासंबंधीं मोलंकृत वर्णन दिलें आहे. मुलीच्या हुंड्याची तरतूद म्हणून दिदरो यास आपला ग्रंथसंग्रह विकावा लागला याची स्मृति सदर वृत्तपत्रास झाली आहे. पण आम्हांला एवढेंच आठवून रहात नाहीं. त्याबरोबरच आम्हांला हेंहि आठवतें कीं, दिदरोचा ग्रंथसंग्रह रशियाच्या राणीनें पंधरा हजार पौंडांस विकत घेतला "आणि तो त्याच्याच ताब्यांत ठेवून त्याची काळजी घेण्याबद्दल एक हजार पौंडांचें वर्षासन नेमून दिलें." (आणि तेंहि तो किती वर्षे जगेल याचा हिशेब न करतां पन्नास वर्षांचें वर्षासन आगाऊ देऊन टाकलें.) अठराव्या शतकांतील या अभिज्ञतेहून आज विसाव्या शतकांत कितीतरी अधिक दिसावयास पाहिजे. आमचे फंड, आमचीं विद्यापीठें, आमचें सुधारलेलें सरकार, कर्णाचे अवतार असे आमचे संस्थानिक....पण त्याचें काय? केतकरांचें कार्य कशानेंच अडलें नाहीं. उलट ते आपल्या केवळ अनुपमेय आनंदी वृत्तीनें म्हणत, "एक चांगला कॅन्व्हासर मला दोन महाराजांपेक्षां अधिक वाटतो!!"

केतकरांचें कांहींच बिघडलें नसेल, पण आपली वाट काय? ज्याचें दैन्य पाहून केतकरांनीं जन्माचें यशकंकण बांधलें, ज्याचें बौद्धिक दुर्भिक्ष जाणून ज्ञानाच्या सरितांना उगम दिला, त्याच अनुकंपनीय समाजाकडून केतकर अनुकंपेची अथवा प्रशस्तिपत्राची अपेक्षा करतील, असें समजणें हास्यास्पद होईल. ज्या ज्ञानगर्विष्ठ विद्वानानें आमचें सुधारलेलें सरकार आणि आधुनिक विद्वन्मंडळ यांना आपल्या सार्वजनिक चरित्रारंभींच जोखून, उणें ठरवून, दिलदारपणें माफी केली होती, तो सामान्य जनांच्या अज्ञानानें रुष्ट होणें शक्यच नव्हतें. पण केतकर सामान्य जनांवर रुष्ट नव्हते म्हणूनच त्यांना त्यापासून कांहीं अपेक्षा

होत्या. त्यांनीं एखाद्या ब्राटग्याप्रमाणें स्वसमाज त्याज्य ठरविला नव्हता. उलट त्यांस आपल्या समाजांत मिसळण्यांत जेवढी धन्यता वाटे, तेवढी ज्ञानकोश लिहिण्यांत अथवा पढतमूर्खांस पराभूत करण्यांतहि वाटत नसे. असा कोणताहि सामाजिक प्रसंग नव्हता कीं, ज्याकरितां तासांचे तास मोडण्यास केतकर उत्सुक नव्हते. एवढा उद्योग करणारा पुरुष यांत कालाचा अपव्यय मानीत नसे, यावरून कांहींच बोध घेतां येण्यासारखा नाहीं काय? समाज म्हणजे लोकसंख्येचे आंकडे असें समजणारे केतकर नव्हते. ते जिवंत चालत्या-बोलत्या स्वजनांचे अभ्यासक आणि भुकेले होते. म्हणूनच केतकरांस समाजाविषयीं अशा कांहीं आशा होत्या कीं, ज्या आजच्या पोटापुरत्या समाजास समजणार नाहींत! कशाशाच वाटतील! पण केतकर-वाङ्मयाच्या अंतरंगांत कल्पकतेनें प्रवेश करणारास त्या समजावयास हव्यात. फार कशाला? ज्यांना डोळे आहेत, अशांना एका भेटींतहि केतकरांच्या त्या सात्त्विक आशा दिसल्या असत्या. प्राचीन काळीं विद्वान् आणि विश्वकुटुंबी माणसांस जें सर्वत्र स्वागताचें वातावरण लाभे त्याचे केतकर भुकेले होते.त्यांचे आजोबा छापखान्यांचा प्रसार होण्यापूर्वीच्या काळांतील हस्तलिखित पुस्तकांचे प्रसारक होते. त्यांचें चित्र रंगवितांना केतकर लिहितात, "आमचे आजोबा नेहमीं दहापासून वीसपर्यंत खटारे घेऊन फिरत. या खटाऱ्यांतून पुस्तकें भरलेलीं असत. आणि पुष्कळदां एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणावर जातां जातां त्यांनीं सुरक्षित पोंचावें म्हणून ज्या संस्थानांतून ते निघत तें संस्थान बरोबर स्वारहि पाठवी....जातांना मध्यें मोठमोठ्या गांवीं मुक्काम होई. त्या प्रसंगीं बैलांची व घोड्यांची दाणावैरण गांवच पुरवीत असे व असला पुस्तकसंग्रहवाला आला म्हणजे त्याच्या सर्व मंडळीचें स्वागत गांवाकडून चांगल्या रीतीनें होई....जमीनदार वगैरे पुस्तकें घेत असत. परंतु भिक्षुक मंडळींना पुस्तकें घेणें शक्य नसे. तेव्हां भिक्षुकांस पुस्तकें दान देण्याकरितां म्हणून श्रीमंत लोक पुस्तकें घेऊन ठेवीत."

"एखाद्या संस्थानिकाच्या गांवांत हे ग्रंथविक्रेते गेले म्हणजे तो संस्थानिक त्यांची चांगली बडदास्त ठेवी....हे पुस्तकविक्रेते—म्हणजे आमचे आजोबा—व संस्थानिक यांच्या भेटी व परतभेटीहि होत. व सहकुटुंब असल्यास त्यांच्या कुटुंबाच्या व संस्थानिकाच्या घरच्या मंडळीच्या भेटी व परतभेटी होत. (हस्तलिखित पुस्तकांच्या तत्कालीन भरपूर किमतीची माहिती देऊन पुढें

केतकर लिहितात ) — किंमतीखेरीज वैयक्तिक बिदागी मिळे. बायकांना जरीकांठी लुगडीं मिळत, मुलांना....सल्ल्यांची जोडी मिळे.... " इत्यादि.

आपल्या भारतीय समाजशास्त्रावरील ग्रंथांत भारतीयांच्या दानसंस्थेचें समाजशास्त्रीय रहस्य सांगणारे केतकर वरील जुनें समाजचित्र रंगवितांना त्याकडे संतोषानें व किंचित् आशेनेंहि ( Wistfully ) पहात आहेत कीं काय, अशी शंका सहृदय वाचकास आल्यावांचून रहाणार नाहीं. या मनोवृत्तीला Revivalism ही घोकीव शिवी देणारास पूर्वीच्या मनोवृत्तीचें स्थान आज कशानें घेतलें आहे, हें पाहण्यास लागणारी समाजपरीक्षणशक्ति मात्र नसते हें दुर्दैव होय !

आपल्या कल्पनासृष्टींतील स्वामी ब्रह्मगिरी यांस एका सन्मार्गगामी तरुण वेश्येनें आणून दिलेल्या केशरी लाडवांचा गोड तपशील देणारे केतकर, प्रत्यक्ष जीवनांत अनेक वेळ "ब्राह्मणो भोजनप्रियः" असें म्हणून समाजाच्या स्वागताचें आनंदानें प्रतिस्वागत करीत ! समाजकार्य करणाऱ्या आणि ज्ञानोपासना करणाऱ्या व्यक्तींना समाजानें कुटुंबीयाप्रमाणें मानावें;...त्यांस विचाराचें व आचाराचें स्वातंत्र्य असावें, या कल्पनेनें त्यांचें वाङ्मयच नव्हे तर जीवनहि रंगून गेलें होतें. जुन्यास पारखा आणि नव्यास अपात्र अशा आमच्या घाबरट आणि अज्ञ 'सुशिक्षित' समाजास त्यांचें वाङ्मय आणि त्यांचें जीवन दोनहि तितकेंच समजलें !... आणि असेहि थोडे असतील की, वेगळ्याच युगांत संचार करणारी ही आनंदमूर्ति पाहतांच ज्यांस कोणी आप्त-स्वकीय, कोणी गुरुजन भेटल्याप्रमाणें वाटलें असेल,... आणि ज्यांनीं आपली दारें लावून घेतलीं नसतील ....आणि जे उपचारबंधनाहून हृदयाच्या बंधनासच अधिक मानते झाले असतील, ते माणुसकीला मुकले नाहींत. सुधारणेला आंत घेतांना त्यांनीं संस्कृतीला बाहेर लोटलें नाहीं. भावी पिढ्या त्यांस दुवा देतील आणि त्यांचा हेवाहि करतील ! आणि संस्कृति म्हणजे तरी काय ? — समाजानें आपले आदराचे विषय ओळखणें व त्यांचा आदर करण्याच्या कर्तव्यांत न चुकणें ही जर संस्कृति नसेल तर न्हावी आणि परीट देतील तेवढ्याच संस्कृतीवर कृतकृत्य मानावें लागेल !

थोर मनानें लहान माणसांत मिसळणाऱ्या उपकारकर्त्यांची मार्मिकतेच्या नांवाखालीं चेष्टा करतां करतां आपण उचित आदरभावाला कायमचे पारखे

तर झालों नाहीं ?....आजच्या पिढीनें केतकरांस ओळखलें कीं नाहीं आणि ओळखलें असल्यास आपलें कर्तव्य केलें कीं नाहीं, याचें होय अगर नाहीं असें उत्तर देणें सोपें नाहीं. तरी आपण आपल्या मनाचा ठाव घेतल्यास कांहीं तरी चुकलें, याची जाणीव झाल्यावांचून राहणार नाहीं. केतकरांचें शव शहरांत नेऊन अंत्यदर्शनार्थ साहित्यपरिषदेंत ठेवण्यांत यावें, ही साहित्यभक्तांची सूचना ऐकून त्यांच्या पत्नीनें काढलेले उद्गार सार्वत्रिक मनोवृत्तीवर प्रकाश पाडणारे आहेत. त्या म्हणाल्या, " But would people come ? " अरेरे ! ' महाराष्ट्र' नामक लोकसमूह जोंपर्यंत या पृथ्वीवरून नष्ट झाला नाहीं तोंपर्यंत ज्यास पितृतर्पणांत आणि ऋषितर्पणांत उच्च स्थान द्यावें लागेल, त्याच्या शेवटच्या दर्शनास लोक जमलेच नाहींत तर ?.... अशी त्याच्या पत्नीला चिंता पडावी ?....पण त्या स्त्रीनें केतकरांचेंहि जीवन पाहिलें होतें आणि महाराष्ट्राचेंहि जीवन पाहिलें होतें. त्या अशुभ प्रसंगानें नकळत निघालेले उद्गार हेंच आमच्या राष्ट्रीय अभिज्ञतेचें वर्णन !

" St. Joan :—O God, That madest
this beautiful earth,
when will it be ready to
receive thy saints ?
How long,
O ! Lord, how long ? "

—**Bernard Shaw**

केतकरांच्या मृत्यूनंतर सभा झाल्या, लेख आले आणि केतकरांच्या गुणांच्या गौरवाचें मार्मिक मापनहि झालें. कोणी प्रेत पाहून रडले तर कोणी ' दफन ' पाहून हंसले ! अज्ञानास सर्वच माफ आहे ! निदान केतकरांनीं खास आनंदानें माफी केली असती.

केतकरांचें लिखाण समजावून घेतलें, तर ज्यांनी जन्म सार्थकीं लावल्यासारखें होईल आणि ज्याच्या सर्व ग्रंथांतील मिळून ज्ञान केतकरांच्या एका लेखांत—एका विधानांत, एका विशेषणांतहि सहज सांपडेल–अशा एखाद्या फुसक्या लेखकाला विंचू अगर ढेकूण चावल्याची वार्ता अग्रभागीं देणाऱ्या

आमच्या ‘ अद्ययावत् ’ वर्तमानपत्रास केतकर मृत्युशय्येवर पडल्याची वार्ता ‘ न्यूज ’ वाटली नाहीं ! तालुक्याच्या गांवीं आपल्या पक्षाच्या निवडणुकीस उपयोगी पडलेल्या एखाद्या ‘ शेट ’च्या साठाव्या वाढदिवसावर अग्रलेख लिहिणाऱ्या आमच्या वृत्तपत्रीय मृगराजांनीं मोठ्या दिलदारपणानें आपल्या पत्रावळीएवढ्या पत्राचा एक कोपरा परलोकवासी केतकरांस मोकळा करून दिला ! आणि आजच्या अडाणी राजकारणांतील अराजकामुळेंच जीं आज पुढारीपणाच्या ऐरावतावर विराजमान दिसतात, अशा ‘ धनिक-वणिक-वाळां ’च्या विमान-भ्रमणावर स्तोत्रें रचणारे आजचे महाकवि या गरीब पंडिताच्या प्रेतयात्रेस वेळ खर्चून ‘ उपस्थित ’ झाले ! ज्यांचे निनाद अनेक शतकें ऐकूं येत राहतील, अशा घटना ओळखणारे कवि आणि कंकणाचे निनादच तेवढे ओळखणारे कवि या दोन सर्वस्वीं भिन्न जाती तर नसतील ?

एवढ्या पुरुषाचें काय करावें, हें समजण्याची आपल्या समाजांत पात्रता आलेली नाहीं हेंच खरें. आणि म्हणून तर अशा पुरुषांच्या अवतारांची आवश्यकता अधिकच ! पण जो अशीं लोकोत्तर माणसें घडवितो त्यानें त्यांची जीवनरेषा आधींच आंखून ठेवलेली असते. ज्यानें केतकरांना विशालबुद्धि दिली त्यानेंच त्यांस हर्षामर्ष, भयोद्वेग न मानणारें समुद्रासारखें गंभीर मन दिलें. आणि या उदासीन समाजाच्या वैराणांत त्यानेंच केतकरांस मायेचा एक अखंड झराहि दिला. ज्या माउलीच्या हातानें परमेश्वरानें महाराष्ट्राचा हा बिनमोल ठेवा त्रेपन्नाव्या वर्षापर्यंत का होईना जगविला आणि सुखविला तिला आपण आपली राष्ट्रीय माता म्हणून कृतज्ञतेनें वंदन करूं या.

केतकरांच्या प्रचंड ज्ञानसाधनानें लाभणारें लोककल्याण आणि सात्त्विक क्रांति घडणार असेल तेव्हां घडेलच. कदाचित् त्यांच्या योजना आणि त्यांच्या परम सात्त्विक महत्त्वाकांक्षा कल्पनासृष्टींतच राहून ब्रह्मतेजोबलास ग्रहण लावणाऱ्या शूद्र-सामर्थ्याचाच कांहीं काल चढाव दिसेल—तरी केतकरांच्या जीवनाच्या आणि अंताच्या चिंतनानें पुनीत झालेल्या मनानें आपण आज एक सामाजिक कर्तव्य ओळखूं या. आदरणीयांचा आदर याहून तें वेगळें तें काय असणार ? आणि केतकरांविषयीं आदर म्हणजेच बौद्धिक दास्याविषयीं तिटकारा. आपल्या प्राचीन समाजाचें आणि गूढ संस्कृतीचें शास्त्रशुद्ध आकलन करण्यास

अवश्य तें साहित्य केतकरांनीं संपादून ठेविलें आहे. पश्चिमेकडून येणाऱ्या प्रत्येक लोंढ्यास गंगोदक न समजतां चिकित्सकता, उद्योगप्रियता आणि आशावाद यांचे ध्वज प्रत्येक महाराष्ट्रीय अंतःकरणांत उभे राहतील, तर तें एक केतकरांस शोभेसेंच राष्ट्रीय स्मारक होईल. महाराष्ट्र आपलें कर्तव्य करील काय ?

महाराष्ट्र केतकरांसंबंधींच काय पण प्रत्येक बाबतींतील आपलें कर्तव्य करील यांत संदेह नाहीं. अद्यापि प्रखर अशा नूतन शोकानलाच्या उदास उजेडांत प्रस्तुत लेखकासारख्या प्राकृत जनांस जरी निराशेचीं भुतें दिसलीं तरी.... ह्या निराशेचा केतकरांनीं निषेधच केला असता. केतकर म्हणजे मूर्तिमंत आशावाद होते. केतकर म्हणजे राष्ट्रीय श्रद्धेची अखंड ज्योत होते. इतिहासाच्या वाटेवरील दीड वितीच्या अंधारास ते जगाचा अंत समजण्यास तयार नव्हते. त्यांस भारताच्या भूतकालांतील आणि जगाच्या भविष्यांतील अनंत सूर्य दिसत होते. त्यांचेंच तेज त्यांच्या ग्रंथसंभारांत सांठविलेलें आहे. केतकरांस जें कार्य करावयाचें होतें, त्यास शतायुष्यहि अपुरेंच पडलें असतें. पण केतकरांनीं जें करून ठेविलें आहे तें अनेक शतकांस खास पुरण्यासारखें आहे ! केतकरांचें अल्प पण तेजस्वी जीवन संपलें. त्यांच्या वाङ्मयाचें अखंड तेजोमय जीवन आतां सुरू झालें. मरणोत्तर सर्वच मृत्तिकेंत मिसळून जातात; पण महापुरुषाच्या मृत्तिकेचे कण फिरून सजीव होतात आणि त्यांस अनेक शतकांचें दिव्य आयुष्य लाभतें !

या दीर्घ आणि दिव्य जीवनावर, काळा ! तुझी सत्ता ती काय चालणार ?

“ कब् आप् खाकमें मुझको मिला नहीं सकते ?
मेरे गुबारको लेकिन दबा नहीं सकते ! ”

: २ :

## स्वामी विवेकानंद



'राष्ट्रशक्ति' साप्ताहिकाच्या या हिंदुत्व विशेषांकांत आधुनिक हिंदुस्थानमधील कित्येक थोर नेत्यांच्या हिंदुत्वविषयक दृष्टिकोनावर तज्ज्ञांकडून लेख लिहवून घेण्यांत येत आहेत. संपादकीय योजनेप्रमाणें मी 'विवेकानंदांच्या हिंदुत्वविषयक दृष्टिकोना' वर लिहावें अशी अपेक्षा आहे. तथापि विवेकानंदांनीं हिंदुत्वाचा कांहीं वेगळा अर्थ लावला असें मला वाटत नाहीं. त्यांची कामगिरी एका प्राचीन धर्माचा वेगळा अर्थ लावण्याची नसून एका प्राचीन समाजाला कालानुरूप जीवन-संदेश देण्याची आहे. या संदेशाचें वैशिष्ट्य पाहणें म्हणजे विवेकानंदांच्या धर्मविषयक विचारांचें व कार्याचें रहस्य समजावून घेणें होय, किंबहुना जगांतील प्रमुख धर्म हे विशिष्ट ऐतिहासिक क्षणीं विशिष्ट समाजाला एखाद्या ईश्वरदत्त नेत्यानें दिलेले संदेशच आहेत.

विवेकानंदांच्या संदेशाला दोन पृथक् बाजू ( Aspects ) आहेत. त्यांच्या संदेशाची एक बाजू पश्चिमाभिमुख आहे; तर दुसरी बाजू भारताभिमुख आहे.

विवेकानंद हे कोणी प्राचीन विद्यासंशोधक नव्हते. ( त्या पेशाला लागणारी विद्वत्ता व चिकित्सकता त्यांच्याजवळ नव्हती, असा अर्थ नव्हे; तर त्यांच्या जीवनाची दिशा वेगळी होती एवढाच अर्थ. ) इतकेंच नव्हे, तर स्पायनोझा, काण्ट्, हेगेल् यांच्याप्रमाणें एखादें नवें ' दर्शन.' सांगणारे असे ते आधुनिक दार्शनिकहि नव्हेत. हिंदुस्थानच्या इतिहासांतील एका नाजुक आणि गंभीर क्षणीं त्याला निर्वाणीचा संदेश सांगण्याची कामगिरी कालपुरुषानें त्यांच्यावर सोपविली होती.

पण विसाव्या शतकाच्या उदयकाळीं कोणतेंहि राष्ट्र इतकें विभक्त राहिलेलें नव्हतें कीं, त्याच्या एकट्याच्या कानांत एखादा संदेश सांगतां यावा. हिंदुस्थानचे कान तर आर्धाच एका पाश्चात्य राष्ट्राच्या हातीं गेलेले होते ! अशा स्थितींत अर्वाचीन भारताच्या या संदेशदात्याला हिंदुस्थानबरोबर जगाचाहि विचार करावा लागला. त्यानें जगालाहि संदेश दिला. पण विवेकानंदांच्या कोणत्याहि ग्रंथाचा, व्याख्यानाचा, किंबहुना स्फुट वचनाचाहि, विचार स्थलकालनिरपेक्ष सिद्धान्त म्हणून करतां येणार नाहीं. त्यांचें प्रत्येक वाक्य ' श्रोतृसापेक्ष ' आहे. त्रिकालाबाधित न्यायघटित सिद्धान्त मांडून दाखविणें हा त्यांचा हेतु नाहीं. तर विशिष्ट श्रोत्याच्या विशिष्ट ' मिथ्या ज्ञाना'चा निरास करणें, हें त्यांचें इथून तिथून सर्वत्र उद्दिष्ट आहे. राजयोगासारख्या लिखित ग्रंथांत देखील त्यांची ही विशिष्ट श्रोतृवर्गाची दृष्टि सुटलेली नाहीं. मग कोलंबोपासून आल्मोऱ्यापर्यंत या धर्मवीराच्या स्वागतोत्सवाकरितां गोळा झालेल्या भारतीय जनसमूहापुढें बोलतांना तर सर्वरवीं हीच ' विशिष्ट-संदेशां'ची दृष्टि प्रबळ असणार हें उघड आहे. त्यांची भूमिका पंडिताची नव्हती, दार्शनिकाचीहि नव्हती; तर उघड उघड ईशप्रेषिताची (Prophet ची) होती* आणि न्यायशास्त्राच्या ' सीमेंट'नें बांधून काढलेल्या सिद्धान्तांतूनहि जेथें अनंत वैकल्पिक अर्थ निघतात, तेथें ऐतिहासिक निकडीनें वेडावून गेलेल्या विवेकानंदांसारख्या देशभक्त परिव्राजकाच्या काव्यमय वक्तृत्वांतून परस्परविरोधी संदेश निघाल्यास नवल काय ?

* स्वतः विवेकानंदांना मात्र ईशप्रेषित = Prophet म्हटलेलें आवडलें नसतें. त्यांनी स्वतःला ' गुरुप्रेषित '—Apostle–असें म्हणविण्यांतच आनंद मानला असता. तथापि ऐतिहासिक दृष्ट्या पाहणाराला हिंदूजातीच्या जीवनांत त्यांचें स्थान ईशप्रेषिताचेंच होतें, असे दिसून येईल.

त्यांच्या सर्व उद्गारांत सुसंगति दाखविण्याची जबाबदारी माझी नाहीं. तथापि एक प्राथमिक भयसूचना मात्र देऊन ठेवणें जरूर आहे. विवेकानंदांनीं हिंदुस्थानला सांगितलेला हिंदुत्वाचा अर्थ, आणि इंग्लंड–अमेरिकेला सांगितलेला अर्थ, यांत पुष्कळदां तफावत दिसून येईल. सासरीं जाणाऱ्या मुलीची आई, मुलीच्या कानांत जें सांगेल तेंच तिच्या सासूच्या कानांत सांगेल असें नाही ! पण त्या दोन्ही कानमंत्रांचा रोख मुलीच्या भावी जीवनाकडेच असतो.

आणि म्हणूनच माझ्या मतें ‘ राष्ट्रशक्ति ’ साप्ताहिकासारख्या विशिष्ट ध्येयप्रेरित साप्ताहिकानें, त्यांच्या वाङ्मयाचा विचार तात्त्विक हिंदुत्वचर्चा म्हणून न करतां, विशिष्ट राष्ट्रीय संदेश म्हणूनच करावा.

विवेकानंदांच्या पूर्वींचे कित्येक धर्मसुधारक व समाजसुधारक न्याय, समता, निर्गुणोपासना यांच्या आकर्षणानें हिंदुधर्माच्या सुधारणेला सिद्ध झालेले होते. आपल्या उपासनेंत व आपल्या सामाजिक रचनेंत बराच तर्कविरुद्ध भोळसर भाग शिरला आहे, तो काढून टाकून तिला पाश्चात्यांच्या ‘ तर्कशुद्ध ’ धर्माच्या बरोबरीला आणून सोडणें, हें आमच्या सुधारकांचें ध्येय होतें. कोणाला मूर्तिपूजेचें वावडें होतें, कोणाला अनेक देवतांचें शल्य खुपत होतें, कोणाला जातिभेदांतील विषमता रुचत नव्हती, तर कोणाला विधवांचे विवाह होण्याची त्वरा होती.

याउलट राजकीय सुधारकांना सर्व राष्ट्रीय विपन्नतेचें मूळ परकीय अमलांतून मुक्त होण्याची त्यांची धडपड होती. या दृष्टीनें पाहतां विवेकानंद धार्मिक सुधारकहि नव्हते व राजकीय चळवळ्येहि नव्हते. त्यांना देवीच्या देवालयांतील एका निरक्षर पुजाऱ्याची भाबडी मूर्तिपूजाहि गर्ह्य वाटत नव्हती; नव्हे तो पुजारीच अखेर त्यांचा गुरु झाला ! आणि त्यांना विधवा-विवाह, मिश्र विवाह यांचीहि घाई नव्हती. आणि राजकीय चळवळ्यांचा तर ते मनःपूर्वक तिटकारा करीत, हें प्रसिद्धच आहे.

विवेकानंद हे मूळचे नास्तिक होते व रामकृष्ण परमहंसांच्या कृपाप्रसादानें आस्तिक झाले, ही गोष्ट आतां सर्वश्रुत दंतकथेंत मोडते. पण रामकृष्ण-परमहंसांसारख्या बालसदृश वृत्तीच्या साक्षात्कारी साधूचा हा शिष्य पर्वतप्राय

समाजसेवेच्या आणि क्रान्तिकारक सामाजिक संदेशाच्या बाजूला कसा झुकला, यासंबंधीं सर्वसाधारण वाचकांनीं तितकासा विचार केलेला नसतो.

विवेकानंदांच्या जीवनसंदेशाचा आणि जीवनकार्याचा गाभा त्यांच्या आस्तिक्यांत नसून दलित बहुजनसमाजासंबंधींच्या त्यांच्या तळमळींत आहे. ज्याला दुपारच्या वेळीं पोटांत घालायला घासभर अन्न नाहीं; ज्याच्यापुढें त्याचीं अजाण अर्भकें 'खायला दे' म्हणून रडत आहेत, त्याला धर्म सांगणें म्हणजे मूर्खपणा आहे, असें त्यांना वाटे, हें प्रसिद्धच आहे. अमेरिकन जनतेचें हृदय काबीज केल्यावर विवेकानंद अनेकदां कोट्यधीशांच्या महालांत पराच्या गाद्यांवर लोळत असत. परंतु अन्नाला मोताद व रस्त्यावर झोपणाऱ्या दरिद्री देशबांधवांचें स्मरण होऊन अशा विलासाच्या सान्निध्यांतहि कित्येकदां ते अक्षरशः तळमळत असत. किंबहुना ते अमेरिकेला गेले, ते इकडील अद्वैत-सिद्धान्ताच्या श्रेष्ठतेनें पाश्चात्य पंडितांना कुंठित करण्याकरितां गेले नव्हते, तर कोट्यवधि अर्धपोटी देशबांधवांना अमेरिकेसारख्या धनाढ्य देशाकडून मदत मिळेल ह्या वेड्या आशेनें गेले होते, असें म्हणण्यालाहि आधार आहे!

सारांश, या बुद्धिमान् व मानी क्षत्रिय संन्याशाचें अन्तरंग अद्वैत सिद्धान्तानें जितकें भरलें होतें, त्याहूनहि अधिक तें दलितांच्या दारिद्र्यानें आणि गुलामगिरीनें भरलें होतें. या कोट्यवधि दलित बांधवांच्या तोंडांत पोटभर घास आणि डोक्यांत थोडेंफार ज्ञान घालील तोच खरा धर्म व तोच खरा पुढारी, अशी त्यांची भूमिका होती.

ते म्हणतात, "आणखी पन्नास वर्षें तरी आपल्या मनांतून आपण बाकीचे खोटे देव घालवून देऊं या. एकच दैवत काय तें जागृत आहे—आणि तें म्हणजे आपली जाति ( Race ). सर्वत्र त्याचेच कर्ण आहेत. तो सर्वांना व्यापून आहे. इतर सर्व देव झोपीं गेलेले आहेत. असे कुठचे खोटे देव आणले आहेत, कीं त्यांच्यामागें लपून आपण आपल्या चारी बाजूंना दर्शन देणाऱ्या या विराट् हिंद पुरुषाची पूजा विसरावी?....ज्या देवांची पूजा आपण सर्वांआधीं करायला हवी, ते देव म्हणजे आपले स्वतःचे हे देशबांधव होत."

रामकृष्ण परमहंसांनींहि वेगळें आणि नवें असें तत्त्व कोणतेंच सांगितलें नाहीं. हिंदुस्थानच्या धर्मभूमींत शतानुशतकें अनेक साक्षात्कारी पुरुष निर्माण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २८०४८ वि: ३३/ ...
क्रमांक ११८०५ नों: दि: ८/८/७१

होत आहेत, त्यांच्यासारखेच तेहि होते. तथापि त्यांच्या श्रेष्ठत्वाचें कांहीं वैशिष्ट्य सांगावयाचेंच म्हटलें, तर आपल्या कक्षेंत येणाऱ्या कोणाहि आर्त जीवाला उद्धाराचा रस्ता दाखवून देण्याची त्यांची मातृसदृश तळमळ हें पहिलें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल; तर दुसरें वैशिष्ट्य म्हणजे हा रस्ता ठरवितांना परमार्थाच्या मार्गावरील प्रवाशाची कुवत अचूकपणें हेरणें व त्याला झेपेल तोच मार्ग दाखवून देणें. या बाबतींत रामकृष्ण हे एक जन्मजात धन्वंतरी होते यांत शंका नाहीं. पण या साक्षात्कारमग्न गुरूच्या आणि त्याच्या परमार्थ-वेड्या शिष्यांच्या या छोट्याशा संप्रदायांत एका राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाचा दुर्दम्य प्रवाह सोडून देण्याची करामत केवळ विवेकानंदांचीच होय. नाहीं तर या परमहंसांचें कार्य इतर परमहंसांच्या कार्यासारखें लहानशा शिष्यसंप्रदायाचें एक कौटुंबिक कार्य होऊन बसलें असतें.

पण याचा अर्थ जें रामकृष्णांच्या डोक्यांत नव्हतें, तें विवेकानंदांनीं बळेंच त्यांच्या संप्रदायांत कोंबून भरलें असा नव्हे. ( प्रारंभीं प्रारंभीं विवेकानंदांच्या प्रत्यक्ष गुरुबंधूंनाहि तशी शंका आल्याखेरीज राहिली नाहीं ! ) तर परम-हंसांच्या प्रेममय, ब्रह्ममय आणि समदर्शी वृत्तीचा अर्थ विवेकानंदांनीं राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संदर्भाला लावून, आपलें व आपल्या संप्रदायाचें जीवित-कार्य ठरविलें. रामकृष्ण हे बीज होत; तर विवेकानंद हे नव हिंदुत्वाचे अश्वत्थ वृक्ष होत. जें कार्य विवेकानंदांनीं आंखलें, तें रामकृष्णांच्या दर्शनांत व संदेशांत बसणारेंच होतें. नेमक्या त्या स्वरूपांत स्वतः रामकृष्णहि ते आंखूं शकले असते असें मात्र नाहीं आणि म्हणूनच हिंदुत्वेतिहासाच्या दृष्टीनें पाहतां, रामकृष्ण व विवेकानंद हे दोन पुरुष मिळून एक अवतार बनतो, असें मानलें पाहिजे. आस्तिक्य, प्रेम, आणि औदार्य हीं रामकृष्णांच्या धर्माचीं वैशिष्ट्यें होतीं; महात्म्यांत–दुरात्म्यांत, बगीच्यांत–वाळवंटांत सर्वत्र रामकृष्णांना समर्थ, मनोहर आणि वत्सल अशी कालीमाता दिसे. दुर्दम्य नास्तिकाच्या उद्धारा-बद्दलहि त्यांचें अंतःकरण प्रेमानें भरून येई आणि कालीमातेची मूर्ति फोडण्यांत पुण्य मानणाऱ्या माथेफिरूच्याहि धर्मांतील साधना स्वतः आचरून पाहण्यांत रामकृष्ण कमीपणा मानीत नसत.

अहोरात्र ईश्वरी साक्षात्कारांत जगणाऱ्या रामकृष्णांसारख्या पुरुषाच्या संगतीचा आणि निःसीम प्रेमाचा लाभ हा विवेकानंदांच्या जीवनांतील एक

भाग झाला. पण दुसरा तितका दुर्मिळ नसला, तरी तितकाच महत्त्वाचा होता व तो म्हणजे ऐश्वर्यांत जन्माला येऊन ऐन उमेदींतच घरीं अन्नान्नदशा पाहण्याची वेळ येणें ! हिंदुस्थानांत दारिद्र्याला तोटा नाहीं. पण आत्मोद्धाराच्या तजविजींत असलेल्या एका पराक्रमी प्रतिभावंताला ' आपली सत्त्वधीर आई आज जेवलेली नाहीं ' हें पाहण्याचा प्रसंग येणें, ही गोष्ट कांहीं वेगळीच आहे. असा मुमुक्षु मोक्षाचा विचार क्षणभर बाजूला ठेवतो; आईच्या जेवणाची तरतूद तर करतोच, पण मोक्षाचाहि त्याला त्यांतून कांहीं नवाच अर्थ दिसूं लागतो. ज्याला जन्मांत एकदां तरी जेवणाची भ्रान्त पडलेली नाहीं, त्याला खरें ज्ञान प्राप्त होणेंच शक्य नाहीं, असें मला कधीं कधीं वाटतें ! विवेकानंदांसारख्या मानी क्षत्रियाला ऐश्वर्यांत वाढलेल्या स्वतःच्या आईची आणि पाठच्या भावाची उपासमार पाहण्याची वेळ आल्यास, तो हृदयविदारक अनुभव फुकट जात नाहीं. विवेकानंदांचें तत्त्वज्ञान वैयक्तिक परमार्थसाधनाकडून ' मिशनरी ' वळणाच्या समाजसेवेकडे वळलें, याचें मूळ अशा अनुभवात्मक दर्शनांत आहे. विवेकानंदांचा तिसरा अनुभव म्हणजे आसेतुहिमाचल सामान्य बैराग्याप्रमाणें केलेली पायीं यात्रा. ह्या यात्रेंत त्यांना खऱ्या हिंदुस्थानचें दर्शन झालें. खरा हिंदुस्थान जितका शेतकऱ्यांच्या अंग-मेहनतींत आहे, तितकाच तो बैराग्यांच्या अंगांवरील राखेंतहि आहे. मोक्षाची ओढ, विरक्तीची मोहिनी, तीर्थयात्रांचें वेड, सिंधूपासून कावेरीपर्यंतच्या महानद्यांचें प्रेम या गोष्टी ज्यानें डोळ्यानें पाहिल्या नाहींत, त्याला हिंदुस्थान समजला नाहीं. विवेकानंदांना या यात्रेंत हिंदुस्थानचें बळहि समजलें व वर्मेहि सांपडलें. अध्यात्म हें त्याचें सनातन बल आहे आणि अज्ञानयुक्त दारिद्र्य हा त्याचा पुरातन रोग आहे. त्याच्या दारिद्र्याकडे दुर्लक्ष करणें म्हणजे प्राण घालवून नंतर रोग बरा करण्यांतला प्रकार होय !

ज्यांचा जीव अज्ञ आणि दरिद्री देशबांधवांकरितां क्षणशः तुटत आहे आणि ज्यांचा आध्यात्मिक बळावर विश्वास आहे, अशा श्रद्धावान् देशसेवकांची ' धर्मसेना ' तयार करणें, हें त्यांना पहिलें जीवितकार्य वाटलें.

त्यांना या देशांतील सुशिक्षितांचा—मग ते राजकीय चळवळ्ये असोत—अनुभव होताच. स्वार्थ, शिवराळपणा, उथळ अनुकरण आणि परस्पर मत्सर

यांनीं हे सारे नखशिखान्त पिडलेले होते आणि म्हणून परमहंसांचीं आध्यात्मिक लेकरेंच या घाणींतून अलिप्त राहून खरें कार्य करतील, अशी त्यांना खात्री होती. त्यांना त्यांचा मार्ग अमेरिकेंतून परत येण्यापूर्वींच दिसला होता. त्यांच्या मद्रासी मित्रांना त्यांनीं लिहिलेल्या पत्रांत त्यांची श्रद्धा, त्यांचा वैताग आणि त्यांची निर्वाणी दिसून येईल.

" माझ्या बंधूनो, आपण गरीब आहोंत; यःकश्चित् माणसें आहों. पण ( लक्षांत ठेवा ) सर्वश्रेष्ठ जगच्चालक अशांनाच हातीं धरून काम करून घेत असतो. "

हिंदुस्थानांत—कोलंबोंत—पाय ठेवतांच त्यांनीं आपला अपूर्व संदेश उच्चारण्यास सुरुवात केली. मला वाटतें, ' आजच्या हिंदुस्थानच्या दृष्टीनें विवेकानंदांचा हिंदुधर्म कोणता ? ' म्हणून विचारलें, तर कोलंबोपासून आल्मोऱ्यापर्यंत, प्राचीन ऋषिगणांच्या या आध्यात्मिक संतानाच्या मुखांतून जी मंत्रतुल्य वाणी स्रवली, तिच्याकडेच बोट दाखवावें लागेल. आध्यात्मिक श्रद्धा, सामाजिक क्रान्तिवाद आणि काव्यमय देशाभिमान या तिहींचा एवढा दैवीं उद्रेक कोणाहि अर्वाचीन सन्ताच्या अगर पुढाऱ्याच्या वाणींत पहावयास सांपडणार नाहीं.

प्रत्येक देशाच्या शेकडों वर्षांच्या आयुष्यांत कोणता तरी एक जीवन-हेतु दिसून येतो. एखाद्या राष्ट्राचा प्राण राजकारणांत असतो, एखाद्याचा कलेंत असतो. हिंदुस्थानचा प्राण धर्मांत आहे. त्या धर्माचा प्राण आत्म्याच्या अविनाशित्वावरील त्याच्या श्रद्धेंत आहे. हीच हिंदुस्थानची सनातन प्रकृति आहे. विवेकानंद मद्रासमधील पहिल्याच व्याख्यानांत गर्जून आव्हान देतात : " I challenge any one to give it up. How can you change your nature ? " इतकेंच नव्हे, यदाकदाचित् आपण आपली प्राणभूत धार्मिक प्रकृति सोडून, ' राजकीय ' अगर ' सामाजिक ' प्राणी बनण्यांत यश मिळविलेंच, तर आपण नष्ट होऊन जाऊं, असें त्यांनीं बजावलें आहे. राजकारण आणि समाजसुधारणा हीं देखील धर्माच्या अनुपानाखेरीज लागू पडणार नाहींत, असें त्यांनीं बजावलें आहे.

पण धार्मिक पुढारी असोत कीं राजकारणी पुढारी असोत, सर्वांनाच त्यांचा पहिला आदेश समाजाभिमुख होण्यासंबंधीं होता. जुने धर्मसाधना

करणारे व्यक्तिवादी बनतात; तर नवे पुढारी प्रसिद्धीचे अगर पुस्तकीपणाचे गुलाम बनतात, विवेकानंदांच्या दृष्टीनें समाजसेवेची खरी कसोटी हृदयाच्या तळमळींत आहे. ज्याला तळमळ नाहीं त्याचें वैयक्तिक ब्रह्मज्ञान अगर पुस्तकी पुरोगामित्व त्यांच्या उपयोगी नव्हतें. या पहिल्याच व्याख्यानांत ते म्हणतात,

"म्हणून म्हणतों, माझ्या भावी देशभक्तांनो, तुमचें हृदय जागृत होऊं द्या. तुम्हांला तळमळ लागली आहे का? देवदेवतांचे आणि ऋषिमुनींचे कोट्यवधि वंशज आज जवळ जवळ गुराढोरांच्या अवस्थेला जाऊन बसले आहेत त्याबद्दल तुमचा जीव तुटतो का? लाखों लोक आज उपास काढीत आहेत आणि कोट्यवधि लोक शतकानुशतकें उपास काढीत होते, याचें तुम्हांला कधीं दुःख झालें आहे काय? या देशाला अज्ञानरूपी काळ्याकभिन्न ढगांनीं घेरून टाकलें आहे, याचें तुम्हांला कांहीं वाटलें आहे का? त्यामुळें तुम्ही बेचैन झाला आहांत का? त्यामुळें तुम्हांला झोंप नाहीं असें झालें आहे का? त्यानें तुम्हांला वेड लागण्याच्या बेतांत आलें आहे का? तुम्हांला तुमच्या नांवाचा, प्रसिद्धीचा, बायकामुलांचा—नव्हे स्वतःच्या देहाचा विसर पडला आहे काय? .... देशभक्त होण्याची ही पहिली पायरी आहे!"

धार्मिक सिद्धान्तांचें ग्रहण करतांना विवेकानंदांचा पहिला आग्रह कठोर बुद्धिवादासंबंधीं असे. कुठल्याहि प्रकारच्या अन्धश्रद्धेला थारा देऊं नका. प्रत्यक्ष देवाला देखील त्याच्या देवत्वाबद्दल पुरावा (Credentials) मागा. असा त्यांचा आग्रह असे. पण उलट समाजोद्धाराच्या क्षेत्रांत उतरतांच, भावनांच्या साम्राज्याची हद्द लागे. या राज्यांत तळमळीशिवाय, प्रेमाशिवाय काय करतां येणार? व म्हणूनच त्याच्या दृष्टीनें आदर्श धर्म तोच होय कीं, ज्यांत शंकराचार्यांची प्रखर बुद्धि आणि बुद्धाचें हृदय हीं दोन्ही एकवटलेलीं असतील.

पण याचा अर्थ त्यांचा आदर्श समाजसेवक हा रडवा, दुबळा, भावनांनीं थबथबलेला व लिबलिबीत असा असेल असें मात्र नव्हे. परमेश्वरावरील विश्वासाच्याहि आधीं, मनुष्याचा स्वतःवर विश्वास पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. परमेश्वराचेंहि केवळ दयामय व वत्सल रूप एकसारखें आळवणें यांत त्यांना दौर्बल्य व वंचना वाटे. परमेश्वर दयाळू आहे, तसाच रौद्रस्वरूपहि आहे.

"माधुर्यांत आणि आनंदांत जितक्या सहजपणें आपण कालीमाई पाहतों, तितक्याच सहज विपत्ति, भय, दुःख आणि संहार यांमध्येंहि तिला पहावयास शिकलें पाहिजे." मूर्ख लोक कालीमातेच्या गळ्यांत पुष्पहार घालतात आणि लगेच दचकून मागें सरतात व तिला 'परम दयाळू' म्हणून संबोधतात! पण विवेकानंदांचा उपदेश मात्र 'प्रत्यक्ष मरणावर चित्त स्थिर करा;' 'रौद्र तत्त्वाच्या पूजेनेंच सृष्टींतील भीषणतेवर विजय मिळवितां येईल व मृत्युंजय होतां येईल.......' असा होता!

या अर्थानें पाहतां ते 'वैष्णवजन' नसून 'वीरशैव' होते. त्यांच्या सान्निध्यांत आलेल्या कित्येक साधकांना व सिद्धांना, त्यांना शंकराचा अवतार म्हणण्याचाहि मोह होत असे! त्यांच्या या शैव वृत्तीचें आणखी एक लक्षण सांगतां येईल. त्यांनीं जागजागीं संन्यास-धर्माचा आत्यंतिक गौरव केलेला आढळतो. स्वतःच्या सुखदुःखाबद्दल महाकठोर; पण दीनदुबळ्यांच्या दुःखाबद्दल मात्र परम करुण, अशा सश्रद्ध व शूर संन्याशांची लहानशी सेना हिंदुस्थानचाच काय, पण जगाचाहि उद्धार करूं शकेल, असा त्यांचा विश्वास होता.

"जगाचा इतिहास, म्हणजे ज्यांचा स्वतःवर विश्वास होता, अशा दहापांच माणसांचा इतिहास होय. या आत्मविश्वासानेंच आंतील आत्मतेज बाहेर येतें. (आणि मग) तुम्हांला अशक्य म्हणून कांहीं रहातच नाहीं!"

वैराग्याइतकाच त्यांचा शौर्यावर कटाक्ष होता. पण या शौर्यांत केवळ मान्यामान्यांचा अन्तर्भाव नव्हता. जी निर्भयता 'सत्या'पर्यंत पोहोंचली नाहीं, ती गुंडाची निर्भयता होय. आणि गुंड हा बाहेरून शूर आणि आंतून भेकड असतो. सत्याशिवाय 'अभय' पुरें होत नाहीं; आणि अभयाशिवाय सत्यपालन शक्य नाहीं, असा त्यांचा कटाक्ष होता. आणि या बाबतींत त्यांच्या संदेशाशीं गांधीजींच्या संदेशाचें शंभर टक्के साम्य होतें. पण कधीं कधीं ते याच्यापुढें जात आणि 'निष्क्रियतेपेक्षां दुष्कर्म पुरवलें' असें म्हणत. अमेरिकेपेक्षां हिंदुस्थानांत गुन्ह्यांचें प्रमाण कमी आहे असें कोणी म्हणतांच ते उसळून म्हणत, "परमेश्वर करो आणि माझ्या देशांत गुन्ह्यांचें प्रमाण वाढो! कारण हिंदुस्थानची सच्छीलता म्हणजे मेलेल्या माणसांची सच्छीलता आहे!"

मोक्षाच्या मार्गांत शिरूं पाहणाऱ्या शिष्याचें वैराग्य म्हणजे केवळ जीवन-कलहाचा कंटाळा आहे, कीं वैषयिक जीवनाची खरीखुरी जुगुप्सा आहे, याची ते पुरी शहानिशा करून घेत. आणि वासना बाकी ठेवून केवळ वैतागानें संन्यास घेऊं पाहणारांना ते आधीं वासनांचा हिशोब पुरा करून यायला सांगत. आणि हा 'नेटक्या प्रपंचा'चा उपदेश केवळ त्राग्याचा नसे; त्यांना यशस्वी संसाराचें सौंदर्य मान्य होतें. निदान रडव्या वैराग्यापेक्षां हंसरा प्रपंच खास बरा, असें त्यांचें मत होतें. एका तरुण मुमुक्षूला तर त्यांनीं द्रव्यार्जनाला सहाय्य करण्याचीहि तयारी दाखविली होती. ते त्याला म्हणाले, "तुला खरोखरच मोक्षाची तळमळ असेल तर गोष्ट वेगळी. नाहीं तर तुला पैसा कमाविण्याचा मार्ग सांगतों. काश्मीरच्या शाली घेऊन मजबरोबर अमेरिकेंत चल आणि लाखों रुपयांची कमाई करून ऐषआरामांत रहा!"

सांसारिक महत्त्वाकांक्षेप्रमाणेंच शारीरिक विलासासंबंधींहि त्यांस तिटकारा नव्हता, उलट हौस होती. घोड्यावरून रपेट करून आल्यावर वाटलेल्या शारीरिक उत्साहाचें रसभरित वर्णन करून त्यांनीं आपल्या एका गुरुबंधूला कळविण्याचें आढळतें. "प्रिय महेंद्र! शरीरधारणेचें स्वारस्य काय तें मला आज कळलें!" अशा अर्थाचे उद्गार त्यांनीं एका पत्रांत वरील प्रसंगीं काढलेले आहेत! तसेंच ते खाण्यापिण्याच्या बाबतींत 'भोक्ते' पुरुष होते, इतकेंच नव्हे तर स्वतः पाकसिद्धींत तरबेज होते, हें प्रसिद्धच आहे. 'सोवळे-पणा' हें त्यांचे ब्रीद नसून 'सामर्थ्य' हें त्यांचें ब्रीद होतें. व म्हणूनच, मोठे पाश टाळण्याच्या बाबतींत ते अत्यंत कठोर असले (उदाहरणार्थ स्त्रियांचा पाश). तरी लहान सहान शरीरसुखांच्या बाबतींत ते सर्वसाधारण साधकापेक्षां उदार होते.

पण याचा अर्थ ते संसार आणि संन्यास यांचा अर्धवट व सोयीस्कर समन्वय प्रतिपादणारे होते, असा मात्र नाहीं. उलट संसार, वैषयिकता, द्रव्यलोभ, कीर्तिलोभ या बाबतींत त्यांच्याइतका कडक आणि आत्यन्तिक असलेला नेता आधुनिकांत दाखविणें कठीण जाईल. 'संन्यास' हेंच विवेकानंद-संप्रदायांतील परमोच्च जीवन होय. आणि तो 'संन्यास' म्हणजे देखील शरीर सुकल्यावर, गात्रें थकल्यावर, उदासपणें केलेला स्वत्वाचा

त्याग नव्हे, तर ऐन तारुण्यांत एखाद्या प्रणयोन्मत्त प्रेमिकानें आपल्या प्रेमस्थानापुढें ठेवलेला सर्वस्वाचा नजराणा ! इतर फुलें मात्र देवाला टवटवीत असतां प्रिय होतात आणि जीवन-कुसुम तेवढें सुकल्याशिवाय तो स्वीकारीत नाहीं, अशी संन्यासाची सोयीस्कर व्याख्या करण्यास ते तयार नव्हते ! हिंदुस्थानचें भवितव्य अशीं टवटवीत जीवनकुसुमेंच घडवितील, असा त्यांचा विश्वास होता ! केवळ वैयक्तिक सुखाचाच नव्हे तर वैयक्तिक मोक्षाचा आणि ब्रह्मचिंतनाचाहि त्याग देशबांधवांच्या सुखाकरितां व उद्धाराकरितां करणें, हें विवेकानंद-प्रणीत संन्यासाचें रहस्य आहे; व याच अर्थानें, शंकराचार्यांचें वैराग्य आणि बुद्धाची करुणा यांच्या मिलाफाचें त्यांनीं स्वतःच सांगितलेलें ध्येय, स्वतःच्याच जीवनांत व संप्रदायांत त्यांनीं आचरून दाखविलें.

पण हें करून दाखविण्याकरितां त्यांना स्वतःमध्यें व स्वतःच्या संप्रदायांत क्रान्ति करावी लागली. वीर आणि विलासी ‘ नरेन्द्रा ’चा अद्वैतदर्शी ‘ विवेकानंद ’ रामकृष्णांनीं तयार केला. पण या अद्वैतमग्न संन्याशाचा ‘ देशभक्तपीठ-संस्थापक ’ तयार करण्याचें कार्य त्यांचें त्यांनाच करावें लागलें. प्रथम स्वतःची क्रांति व नंतर गुरुबंधूंची क्रान्ति, एवढें केल्यावर प्रत्यक्ष संघटना करणें हें काम हातीं घ्यावें लागलें व हें ( रामकृष्ण मिशन स्थापण्याचें ) कार्य करतांना भोंवतालच्या राष्ट्रकार्यांतील दोषांचा विटाळ होऊं न देण्याची खबरदारी घ्यावी लागली. राजकीय चळवळ्ये, सुधारक व थिऑसफिस्टादि धर्मसंप्रदाय, या सर्वांतील दोष त्यांना दिसलेहि होते आणि भोवलेहि होते. व म्हणून ते सर्व टाळून त्यांना एक संघटना उभी करायची होती. तिजमध्यें कर्मकांडाचें वा ध्यानधारणेचें स्तोम माजवून चालणार नाहीं, तसेंच लोकशाहीचें स्तोम माजवून चालणार नाहीं, हें त्यांस माहीत होतें. पोकळ चर्चा, कायद्यांचा कीस, आणि बहुमतांच्या हातांची मोजदाद, हेंहि एक धर्मावडंबरच आहे ! आणि हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशांत सर्वत्र अज्ञान व दारिद्र्य यांची आग भडकलेली असतां, या बौद्धिक आणि तांत्रिक चैनबाजीला अवसर आहे कुठें ? आज हिंदुस्थानला सर्वस्वाचा होम केलेल्या देशभक्त ‘ हुकूमशहा ’ची, महन्ताची, ‘ डिक्टेटर ’ची गरज आहे ! रामकृष्ण मिशनच्या संघटनेंत त्याग, बहुजनहित, देशभक्ति आणि शरीरकष्ट यांचें जेवढें माहात्म्य आहे, तेवढें लोकशाहीचेंहि नाहीं, कीं अध्यात्मचिंतनाचेंहि नाहीं.

हिंदुस्थानांतील गरीब जनतेचा विचार विवेकानंदांच्या डोक्यांत अहोरात्र असला, तरी रामकृष्ण मिशनची संघटना अखिल जगाचें ध्येय विसरलेली नाहीं. किंबहुना एके जागीं विवेकानंदांनीं या संस्थेच्या कार्यासंबंधीं काढलेले गर्वोद्गारहि यथार्थ असेच म्हणावे लागतील. विवेकानंद म्हणतात, " रामकृष्ण मिशनची स्थापना होण्यापूर्वींची हिंदुस्थानांतील प्रत्येक चळवळ ही पाश्चात्यांपुढें झोळी पसरण्याची चळवळ होती. निदान पाश्चात्यांना कांहीं देण्याची तरी त्यांची भूमिका नव्हती. तर उलट रामकृष्ण मिशन हें बाह्य जगाला कांहीं तरी देण्याकरितां जन्माला आलें आलें आहे. नव्हे, लाचार नसलेली अशी ही एकच संस्था आहे ! "

रामकृष्ण मिशन हें केवळ सोयीकरितां राजकारणापासून अलिप्त होतें असें नव्हे, तर राजकारणाशीं त्यांच्या या उदार आन्तरराष्ट्रीयवादाचें व मानवतावादाचें जमण्यासारखेंच नव्हतें. त्यांच्या घटनेंत जसा हिंदुस्थानांतील जनतेचा ( masses चा ) उल्लेख आहे, तसाच अखिल मानवजातीचें कल्याण, ( बाह्यतः ) भिन्न असलेल्या धर्मांचें ऐक्य, धर्माबरोबरच विज्ञानाचा आणि कलांचा प्रसार या गोष्टींचाहि उल्लेख आहे. तथापि राजकीय चळवळीचें मात्र या संस्थेला पहिल्यापासून वावडें आहे. इतकेंच नव्हे, जिला राजकीय ठशाची प्रतिकार बुद्धि म्हणतात, तिची हद्द विवेकानंदांसारख्या क्षत्रियानेंहि कायमची सोडली होती. ते काश्मीरमध्यें गेले असतां तेथील प्राचीन देवालयांतील कालीमातेची मूर्ति मूर्तिभंजक म्लेच्छांनीं छिन्नविच्छिन्न केलेली पाहून त्यांस परमावधीचा संताप आला. ते रक्त सांडण्याचीहि भाषा बोलले. परंतु एवढें मोठें आध्यात्मिक तेज क्षुद्र राजकीय मारामाऱ्यांत खर्च होऊं नये म्हणूनच कीं काय कोण जाणे, देवीनें स्वामीजींना साक्षात्कार दिला आणि सांगितलें,

" म्लेच्छांनीं माझ्या मंदिरांत प्रवेश करून मूर्ति भ्रष्ट केली, तर तुला त्याच्याशीं कर्तव्य काय ? वेड्या ! तूं माझें रक्षण करीत आहेस ?—कीं मी तुझें रक्षण करतें ? "

या साक्षात्कारानंतर क्षुद्र देशाभिमानाचें वैय्यर्थ्य या क्षात्रिय संन्याशालाहि पटलें. ते भगिनी निवेदिता यांना म्हणाले,

" माझा सारा देशाभिमान-ज्वर उतरला ! आतांपर्यंत मी चुकत होतों....

आतां माझा देशाभिमान उरला नाहीं. आतां मी केवळ ( कालीमातेचें ) एक लहान अर्भक आहें."

स्वदेशाच्या काय कीं परदेशाच्या काय अन्तिम कल्याणाचा त्यांचा मार्ग म्हणजे धर्म आणि अध्यात्म हाच होता. पण धर्मांतहि ते संकुचितपणाला थारा देत नसत. जे जे म्हणून सत्याचा शोध करीत आहेत, ते ते धर्माच्याच मार्गांत आहेत, अशीच त्यांची भूमिका होती व म्हणून नास्तिक विज्ञान-भक्तालाहि ते पतित मानावयाला तयार नव्हते. अध्यात्माशिवाय पाश्चात्य देशांनाहि गति नाहीं, ही त्यांची ठाम श्रद्धा होती; पण विज्ञानाला अपराधी ठरविण्याची त्यांना गरज भासली नव्हती! विज्ञानवादीहि अखेर अध्यात्मापर्यंत येऊन पोहोंचल्याखेरीज राहणार नाहींत, अशी त्यांची खात्री होती.

त्यांनीं स्वतंत्र असें तत्त्वज्ञान-दर्शन शोधून काढलें नसलें, तरी जुन्या अद्वैत-सिद्धान्ताचे त्यांनीं विशिष्ट समाजाला अनुलक्षून जें पुनर्निरूपण केलें आहे, तें प्रायः नवसिद्धान्ताइतकेंच जिवंत आणि नवीन आहे. विशेषतः त्यांनीं माया-वादावर इंग्लंडमध्यें दिलेलीं व्याख्यानें आणि राजयोगावर त्यांनीं तोंडीं मजकूर सांगून लिहून काढविलेला ग्रंथ यामध्यें त्यांची जुन्या सिद्धान्तांना नवा जन्म देण्याची ही शक्ति असाधारण स्वरूपांत प्रत्ययाला येते.

विवेकानंदांचा धर्म कितीहि उदार, तर्कशुद्ध आणि विज्ञानाभिमुख असला, तरी राममोहन अगर दयानंद यांच्याप्रमाणें ते नवा संप्रदाय स्थापून सनातन धर्माच्या कांहीं भागावर बहिष्कार घालण्याचा प्रकार करीत नव्हते. त्यांना त्याची जरूरीच वाटत नव्हती. आणि या अर्थानें पाहतां, सनातन हिंदु धर्माचा आहे त्या स्वरूपांत स्वीकार करणारे, आहे त्या स्वरूपांत त्याचें मंडन करणारे, मोठ्यांत मोठे अर्वाचीन आचार्य विवेकानंद हेच होत.

वर्णश्रेष्ठतेमुळें शिरलेला स्वार्थ, दंभ आणि अन्याय काढून टाकण्याच्या बाबतींत ते आत्यंतिक होते. पण जुन्या सुधारकांप्रमाणें उपासना आणि देवता यांच्या क्षेत्रांतहि ऐक्य प्रतिपादून ख्रिस्ती आणि मुसलमानी धर्माप्रमाणें आपला धर्म सुटसुटीत करण्याचा खटाटोप मात्र त्यांस मान्य नव्हता. आणि खरें पाहिलें तर एकच देव आणि एकच धर्म-पुस्तक पाहिजे म्हणणारांना, धर्मापेक्षां राजकीय ऐक्याचीच काळजी अधिक लागलेली असते! आणि

राजकारण हें मुख्य साध्य करून, धर्माला त्याचें एक सोयिस्कर साधन बनाविणें ही गोष्ट विवेकानंदांनीं कालत्रयीं कबूल केली नसती.

'इष्टदेवते'ची कल्पना हें हिंदुधर्माचें एक असाधारण वैशिष्ट्य आहे, असें विवेकानंदांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. आणि ज्यांना केवळ राजकीय स्पर्धा करावयाची नसून खरोखरच धर्माची भूक असेल त्यांना हिंदुधर्मातील साधन बाहुल्य आणि देवता-बाहुल्य हें त्यांचें दौर्बल्य न वाटतां बळच वाटेल. 'अनेक' देव मानण्यानें 'एक' देव रागावतो, ही सेमिटिक जमातींनीं काढलेली कल्पना, देवावर मानवी मत्सराचा आरोप करणारी आहे! त्या कल्पनेचा मनुष्यनिर्मित व राजकारणप्रेरित जाच सोडल्यास, इष्टदेवतेची हिंदु-धर्मातील उदार नैसर्गिक आणि काव्यमय कल्पना अनेक राष्ट्रांतील मुमुक्षूंना मोहित करील यांत शंका नाहीं.

भलत्या क्षेत्रांत एकधर्मीपणा ( Uniformity ) चें स्तोम माजविणें हा खुळेपणा आहे. सर्व जगानें एकच धर्म आणि एकच पैगंबर मानला पाहिजे असें म्हणणें, हा जेवढा अडाणीपणा आहे तेवढाच आमच्या धर्मानें 'विश्व-देवां'ची विशाल व रम्य कल्पना सोडून एकच निर्गुण निराकार देव मानला पाहिजे, ही कल्पना खुळेपणाची आहे.

"Uniformity for him ( Vivekanand ) spelt death. He rejoiced in the immense diversity of religions. Let them grow and multiply." असें रोमाँ रोलाँ विवेकानंदांच्या धार्मिक उदारमतवादाबद्दल म्हणतात. तर स्वतः विवेकानंद म्हणतात, "... I accept all religions, that were in the past, and worship with them all, I worship God with every one of them ... Is God's book finished or is it still a continuous revelation going on? It is a marvellous book,—these spiritual revelations of the world. The Bible, the Vedas, the Kuran and all other sacred books are but so many pages, and infinite number of pages remain yet to be unfolded... We stand in the present but open ourselves to the infinite future..."

पण 'आमच्या विशिष्ट जमातीला पवित्र पुस्तक धाडतां क्षणीं परमेश्वरानें आपला ग्रंथलेखनाचा रोजगार कायमचा थांबवला,' ही कल्पना घट्ट कवटाळून बसणाऱ्या संकुचित जमातींना विवेकानंदांचा हा विशाल विश्वधर्म कधीं काळीं समजेल का ?

विवेकानंदांच्या धर्मसंदेशाचें रहस्य त्यांच्या समाजसेवेच्या, दौर्बल्य-निषेधाच्या आणि विश्वधर्माच्या कल्पनांत असलें, तरी त्यांच्या संदेशाचें अपूर्व तेज कोणत्याहि तात्त्विक विचारांत नसून तो सांगण्याच्या असाधारण आवेशांत आहे. जें विवेकानंदांनीं सांगितलें तें अनेक अर्वाचीनांनीं सांगितलें आहे. पण उपनिषदें आणि महाभारत यांजमधील महर्षींच्या वाणीनंतर एवढी ओजस्वी आणि काव्यमय वाणी या देशांत अन्यत्र क्वचितच ऐकूं आली असेल. या वाणींत नुसते सिद्धान्त नव्हते, तर प्रत्यक्ष कामाला हांक होती. या संदेशांत नर-जन्माचे तर प्रश्न सोडविलेले होतेच; पण विशेषतः एका विशिष्ट राष्ट्राच्या जन्ममरणाचा प्रश्न सोडविलेला होता. जें रामदासांनीं आपल्या भाबड्या आणि खडबडीत मराठी वाणीनें महाराष्ट्राच्या मराठ्यां-करितां केलें, तें या आधुनिक राष्ट्रवादी संन्याशानें हिंदुस्थानच्या हिंदूंकरितां अमोघ वक्तृत्वपूर्ण आंग्लवाणीनें केलें !

विवेकानंद हिंदु होते, वेदान्ती होते, बंगाली कायस्थ क्षत्रिय होते, तत्त्ववेत्ते होते, समाजसेवक होते. पण या सर्वांहून अधिक म्हणजे ते कवि होते ! आणि कोणत्याहि संदेशांत केवळ कवीच जें तेज, जो प्रकाश ओतूं शकेल, तो प्रकाश त्यांनीं या सनातन धर्माच्या सनातन संदेशांत ओतला. त्यांतील तत्त्व, अगर त्यावरील भाष्य, ही विवेकानंदांची हिंदुस्थानला देणगी नसून, त्यांतील श्रद्धा आणि स्फूर्ति ही त्यांची या देशाला देणगी आहे. आणि ही देणगी भाष्य-काराची नसून जन्मजात कवीची आणि द्रष्ट्याची आहे !

त्यांच्या एक शिष्या **मिस् मॅक्लिऑड** यांना ते स्वतः म्हणाले होते,
"Do you not see that I am first and foremost a poet ?"

जीवनसंदेशाच्या सजावटीपुरतेच केवळ ते कवि होते असें नाहीं; तर त्यांचीं जगाकडे व जन्माकडे पाहण्याची दृष्टीच कवीची होती. '**कविः कवीनाम्**' हें एका प्राचीन मंत्रांतील ईश्वरवर्णन विवेकानंदांना सर्वश्रेष्ठ ईशस्वरूप-वर्णन वाटत असे !

वीर, वेदान्ती, राष्ट्रभक्त आणि कवि एवढे एकाच राष्ट्रपुरुषांत एकवटले तर त्याचा हिंदुत्वसंदेश कोणतें रूप धारण करील, हें विवेकानंदांच्या सहस्र-पर्णी वाङ्मयांत पहायला सांपडतें.

"His words are great music, phrases in the style of Beethoven stirring rhythms like the march of Handel choruses. I cannot touch those sayings of his, scattered as they are through the pages of books at thirty years' distance without receiving a thrill through my body like an electric shock. And what shocks, what transports must have been produced when in burning words they issued from the lips of the Hero!"

विवेकानंद-वाणीचें हें स्तवन, माझ्यासारख्या त्यांच्या एका भारतीय भक्तानें गायिलेलें नसून, जगद्विख्यात फ्रेंच साहित्यिक **रोमाँ रोलाँ** यांनीं गायिलेलें आहे! विवेकानंदांच्या शब्दाशब्दांतील जो विद्युत्स्पर्श एका परधर्मी साहित्यिकालाहि जाणवला, तो त्यांच्या रक्तामांसाच्या भारतीयांना चैतन्य देणार नाहीं काय?

ऐ सूर हुब्बे कौमी
इस ख्वाबसे जगा दे
भूल हुवा फसाना
कानों में फिर सुना दे ॥
मूर्दा तबीयतोकी
अफ्सुरदगी मिटा दे ॥
उठते हुवे शरारे
इस राखसे दिखा दे ॥

—चकबस्त
( पं. ब्रजनारायण, लखनौ )

: ३ :

# महम्मद इक्‌बाल



सुप्रसिद्ध मुसलमान कवि शेख महम्मद इक्‌बाल उर्फ डॉ. सर महम्मद इक्‌बाल यांना निवर्तल्याला येत्या एप्रिलमध्यें बारा वर्षें होतील. ब्रिटिश रियासतींतील हिंदुस्थानच्या इतिहासांत काव्यप्रतिभेच्या जोरावर जगद्विख्यात झालेल्या पुरुषांची संख्या फारच लहान आहे. रवींद्रनाथ आणि महम्मद इक्‌बाल या दोन नांवांखेरीज एकहि नांव साहित्यगुणांमुळें परदेशांत पोहोंचलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल. शरद्‌बाबूंचें नांव देशोदेशीं जाण्याच्या योग्यतेचें होतें, पण तें वरील दोन नांवांइतकें विख्यात झालें नाहीं आणि सरोजिनी नायडू यांचें नांव कांहीं काळ इंग्रजी भाषा बोलणाऱ्या देशांत गाजलें, तरी वरील तीन नांवांच्या मानानें तें साहित्यगुणांत बरेंच खालच्या दर्जाचें होतें, एवढें नमूद केलें म्हणजे हा जागतिक कीर्तीचा हिशोब स्थूलमानानें पुरा झाला म्हणावयास हरकत नाहीं.

रवींद्रनाथ यांचें वाङ्मय व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास हिंदुस्थानच्या चारी दिशांस झाला व होत आहे. सुमारें सत्तेचाळीस वर्षांमागें त्यांस त्यांच्या

'गीतांजलि' या गीतसंग्रहाबद्दल 'नोबेल' पारितोषिक मिळाल्यापासून तर त्यांचें नांव इंग्रजी शिक्षितांच्या लेखीं पुण्यश्लोकांच्या नामावळीपैकींच होऊन बसलें. उच्च दर्जाचें विपुल वाङ्मय लिहिणारांची संख्या कोणत्याहि प्रांतांत म्हणण्यासारखी मोठी नसल्यामुळें जगद्विख्यात झालेल्या कोणाहि भारतीयाच्या ग्रंथांचा आणि जीवनेतिहासाचा अभ्यास प्रत्येक प्रांतांत होणें जरूर आहे. रवींद्रनाथांच्या नंतर हें भाग्य शरच्चंद्र यांस निदान गंगेपासून कावेरीपर्यंतच्या भागांत तरी लाभत आहे. तथापि महम्मद इक्बाल यांच्या संबंधांत मात्र वेगळी स्थिति आढळते. त्यांचें नांव विख्यात आहे, त्यांच्या नांवाचा 'पाकिस्तान'च्या उदयाशीं संबंध असूनहि त्यांच्यासंबंधीं सुशिक्षितांच्या मनांत आदर आहे हें खरें; तथापि वरील दोन साहित्यरत्नांप्रमाणें महम्मद इक्बाल यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें वा पारायणें अन्य भाषी प्रांतांत होत असलेलीं आढळत नाहींत.

सर्व-साधारण महाराष्ट्रीयाला 'इक्बाल' हें नांव—

'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा'

या देशभक्तिपूर्ण गीताचा कर्ता म्हणूनच माहीत असतें. पण त्याहूनहि पाकिस्तान कल्पनेच्या पुरस्कर्त्याचें म्हणून तें नांव अधिक माहीत असतें! इक्बाल यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें मराठींत न होण्याला कारण ते स्वतः अगर त्यांचे ग्रंथ इस्लामचे अभिमानी आहेत एवढेंच आहे असें मात्र नाहीं. एका पक्क्या हिंदुत्वाभिमानी विद्वानांनीं देखील त्यांचें चरित्र चरित्र-कोशांत निविष्ट करतांना, अविकृत गुणग्राहकता दाखविली आहे! * अर्थात् इक्बाल यांचा धर्माभिमान त्यांच्या ग्रंथांच्या आड आला असें म्हणतां येणार नाहीं.

इक्बाल यांनीं कादंबऱ्या अगर लघुकथा लिहिल्या नाहींत; त्यांनीं फक्त काव्य आणि तात्त्विक गद्य लिहिलें; हेंच त्यांच्या ग्रंथांकडे मुसलमानेतरांचें दुर्लक्ष होण्याचें मुख्य कारण.

त्यांनीं कादंबऱ्या लिहिल्या नाहीत; आणि काव्यहि अर्वाचीन हिंदूंना प्रिय होणाऱ्या आलंकारिक काव्यशैलींत न लिहितां, ऋग्वेद, उपनिषदें, महाभारत वगैरे प्राचीन ग्रंथांच्या संदेशपर ( Prophetic ) शैलींत लिहिलें. त्यामुळें त्यांचें प्रांतिक भाषांत भाषांतर झालें तरी त्यांस वाचक मिळतीलसें वाटत

* हा उल्लेख विद्यानिधि चित्रावशास्त्री यांच्या चरित्र-कोशांतील सुंदर गुणग्रहणाचा आहे.

नाहीं. गीतांजलींतील भक्तीचें, रूपकांचें आणि शैलीचें माधुर्य भारताच्या प्रत्येक भागांतील सर्वसामान्य वाचकालाहि आधींच सुपरिचित होतें. परंतु '**अस्रारे खुदी**' (व्यक्तिविकास-रहस्य), '**पयामे मश्रीक**' (प्राच्य-देशीय संदेश) '**रुमूझे बेखुदी**' (समष्टिजीवन-रहस्य) वगैरे ग्रंथांतील तत्त्वज्ञान ओळखीचें नव्हतें. शिवाय इक्बाल यांनीं आपल्या उत्तर आयुष्यांत प्रेम, देशभक्ति यांसारखे सर्वपरिचित विषय आणि हिंदुस्थानीसारखी सुपरिचित भाषा यांचा त्याग करून तत्त्वज्ञान या विषयावर फारसीसारख्या आंतरराष्ट्रीय भाषेंत लिहिण्यास सुरुवात केली. त्यामुळें भारतीय वाचकांपैकीं निदान हिंदू वाचकांना तरी या मुसलमान कवीकडे दुर्लक्ष करण्याखेरीज गत्यंतर उरलें नाहीं.

परंतु इक्बाल यांच्या काव्याकडे दुर्लक्ष म्हणजे केवळ एका उर्दू-फारसी कवीच्या काव्याकडे दुर्लक्ष, असा अर्थ नव्हता. उर्दू-फारसी काव्याची परंपरा हिंदुस्थानांत मुसलमानी अमलामुळें बरीच जुनी आहे. प्रेमाची उत्कटता, प्रेमाकरितां सर्वस्वत्यागाची तयारी, वफादारीचें माहात्म्य, बेपर्वाईबद्दल जळफळ, दुनियेच्या क्षणभंगुरत्वाबद्दल हळहळ, दिलदार वृत्तीबद्दल आदर आणि या सर्वांच्या मागें पार्श्वसंगीताप्रमाणें आर्तस्वर चालू ठेवणारी निर्वाणीची दैवशरणता हे स्थूलमानानें उर्दू कवितेचे ठळक विषय अगर Motif म्हणून सांगतां येतील. फारसी काव्यापैकीं सूफी संप्रदायी कवींच्या काव्यांत वरील सुराहून वेगळे सूर ऐकूं येतात व अद्वैताच्या साक्षात्काराचें मधुर आणि उदात्त वातावरण असतें हें खरें आहे. तथापि वैराग्य, माधुर्य आणि अद्वयानंद यांचें बाळकडू लाभलेल्या हिंदी वाचकाला तें काव्य फारसें अपूर्व वाटणार नाहीं. उर्दू आणि फारसी या दोन भाषांच्या काव्यवाङ्मयांतील दैवशरणता आणि प्रेमपूजन यांचीच परंपरा इक्बाल यांनीं चालविली असती अगर अधिक उज्ज्वल केली असती, तर त्यांच्या ग्रंथांचें अध्ययन अखिल भारतांत मोठेंसें आवश्यक होतें असें नाहीं. पण इक्बाल यांनीं या मधुर आणि कलंदर वृत्तीच्या काव्यपरंपरेचाच केवळ त्याग केला असें नव्हे, तर बहुतेक पौर्वात्य राष्ट्रांच्या रक्तांत भिनलेल्या जीवनविषयक दृष्टिकोनांतच क्रांति केली. निदान तशी क्रांति करण्याकरितां या लोकोत्तर तत्त्ववेत्त्याचा आत्मा तळमळत होता. केवळ कवि म्हणून नव्हे, तर गाढा पंडित, तत्त्ववेत्ता आणि

संदेशदाता म्हणून इक्बाल यांचें महत्त्व आशियांतील राष्ट्रांना फार मोठें आहे.

त्यांचें शिक्षण प्रथम लाहोर येथें झालें. अरबी-फारसी या भाषांचें तर ते पंडित होतेच, पण तत्त्वज्ञान या विषयाची त्यांना प्रथमपासूनच गोडी होती. लाहोर येथील कॉलेजांतच त्यांनीं कांहीं दिवस प्रोफेसर म्हणून काम केल्यावर वयाच्या बत्तिसाव्या वर्षीं पुढील शिक्षणाकरितां ते इंग्लंडला गेले. फारसी गूढवादावर प्रबंध लिहून त्यांनीं केंब्रिज आणि म्यूनिच या दोन विद्यापीठांची डॉक्टरेट मिळविली. त्याबरोबरच बॅरिस्टरीचीहि परीक्षा देऊन ते लाहोरला परत आले. त्यांनीं कांहीं दिवस वकिलीहि केली, परंतु अखेर काव्यलेखन, तत्त्वचिंतन आणि विद्यादान यांतच मन रमल्यामुळें वकिली सोडून दिली. पंजाब युनिव्हर्सिटीच्या सेनेट व सिंडिकेटचे ते सभासद होते; व ओरिएंटल फॅकल्टीचे डीन होते. प्रसंगवशात् त्यांनीं राजकारणांतहि भाग घेतला होता. परंतु त्यांत त्यांचें लक्ष वकिलीइतकेंच होतें.

‘ असारे खुदी ’ ( व्यक्तिविकास-रहस्य ) हा त्यांचा फारसी ग्रंथ १९१५ सालीं म्हणजे त्यांच्या वयाच्या बेचाळिसाव्या वर्षीं प्रसिद्ध झाला. आणि त्या ग्रंथानें अखिल मुसलमानी जगांत आश्चर्य, उत्साह आणि अभिमान यांची एक लाटच उसळली. या ग्रंथाच्या प्रकाशानंतर इक्बाल हे एक हिंदुस्थानी कवि आणि पंजाबी प्रोफेसर न राहतां मुस्लिम धर्माला नवजीवन देणाऱ्या इमाम गझाली, जलालुद्दीन रुमी, वगैरेंच्या उच्च पदवीला जाऊन पोहोंचले.

पण त्यांच्या वैयक्तिक विकासाचा आणि धार्मिक संदेशाचा संबंध केवळ मुसलमानी धर्म आणि मुसलमानी समाज यांच्याशींच होता असें नव्हे, जागतिक तत्त्वविचारांच्या दोन लाटांवर ते आरूढ होते. एकीकडून ते मौलाना जलालुद्दीन रुमी या विख्यात प्राचीन सूफी तत्त्ववेत्त्याचे वारसदार होते; तर दुसरीकडून ते नीत्शे आणि बर्गसाँ यांच्या तत्त्वज्ञानावर पोसलेले मल्ल होते. या तीन तेजस्वी तत्त्वज्ञानांचें रसायन पचवून त्यांनीं आपलें ‘ खुदी ’ चें म्हणजे ‘ व्यक्तिमहत्त्वाचें ’ अथवा ‘ व्यक्तिविकासाचें ’ एक नवीनच तत्त्वज्ञान तयार केलें होतें.

' असारे खुदी ' हा काव्यग्रंथ अनेक दृष्टींनीं नीत्शेच्या ' Thus Spake Zarathushtra' या ग्रंथासारखा आहे. अमर्याद देवतुल्य सामर्थ्याचा मानव निर्माण करणें हें नीत्शेच्या तत्त्वज्ञानाचें ध्येय होतें. देव आणि धर्म यावर नीत्शेचा विश्वास नसून वंशशुद्धि आणि डार्विनप्रणीत उत्क्रांतिसिद्धान्त यांचा त्याच्या मनावर पगडा होता. इक्बाल मात्र केवळ धार्मिक होते असें नव्हे, तर कुराणनिष्ठ होते. तथापि व्यक्तीच्या सामर्थ्याचा विकास हेंच त्यांचेंहि ब्रीदवाक्य होतें. 'असारे खुदी'च्या इंग्रजी भाषांतराला जोडण्याकरितां प्रो. निकल्सन् यांस धाडलेल्या टिपणांत ते म्हणतात—

" खरा ( सिद्ध ) पुरुष केवळ सृष्ट जगत् आत्मसात् करूनच थांबत नाहीं, तो प्रत्यक्ष परमेश्वरालाहि आपल्या व्यक्तिमत्त्वांत सामावून घेतो. Life is a forward assimilative movement. "

असें हें बलेच्छेचें जिगीषु तत्त्वज्ञान आहे ! नीत्शे व बर्गसाँ यांच्याच तत्त्वज्ञानाचा प्रतिध्वनि उमटविण्याच्या आरोपापासून तों सनातनी धार्मिक निष्ठेचाच पुनः पुरस्कार करण्यापर्यंत सर्व आरोप इक्बाल यांच्यावर कित्येकदां करण्यांत आलेले आहेत. स्वतः इक्बाल हे श्रद्धावान् मुसलमानाप्रमाणें कुराण हेंच अंतिम आणि शाश्वत सत्य मानणारे होते यांत शंका नाहीं. तथापि त्यांनीं सांगितलेलें तत्त्वज्ञान इतकें स्वतंत्र आणि अभिनव आहे कीं, तें केवळ कुराणांतूनहि काढतां येणार नाहीं, कीं नीत्शेमधूनहि काढतां येणार नाहीं; कीं केवळ बर्गसाँमधूनहि काढतां येणार नाहीं. अखिल मानवाची आजची आध्यात्मिक अवनति आणि त्यांतल्या त्यांत पौर्वात्य राष्ट्रांचा मानसिक अधःपात पाहून एका अत्यंत भावनाप्रधान, अंतर्मुख, मानी मुसलमान तत्त्ववेत्त्याला जो काव्यमय संदेश सुचला, तोच इक्बाल-प्रणीत वेदान्त होय, असें म्हणतां येईल. पाश्चात्य देशांत धिंगाणा घालणारा जडवाद आणि साम्राज्यवाद, पौर्वात्य देशांना कमजोर बनविणारा दैववाद आणि ( भक्तिमार्गी ) गूढवाद यांपैकीं प्रत्येकांत त्यांना मानवी अधःपाताचीं बीजें दिसत होतीं. कुराणाचा कडक आणि स्फूर्तिदायक संदेश समोर असूनहि उमरखय्याम अज्ञेयवादी आणि भोगवादी झाला; तोच संदेश समोर असूनहि गालिबसारखा श्रेष्ठ कवि दुःखवादी झाला.

इराणमधील सूफी संत प्रेमाच्या अद्वैतांत दंग होऊन मृदु बनले. यांपैकीं कशांतच इक्बाल यांना मानवी भवितव्याची पूर्तता दिसेना. खऱ्या तत्त्व-संशोधनाचें पर्यवसान दुःख आणि आर्तता यांत होणें शक्य नाहीं, अशी ग्वाही त्यांचें मन त्यांना देत होतें. त्यांना सर्वश्रेष्ठ वाटणारा तत्त्ववेत्ता आणि कवि जलालुद्दीन रूमी हाच काय तो या दैववादी आणि दुःखवादी कवीहून सर्वस्वीं भिन्न असा संदेश देत होता. त्याच्याच गूढ पण गंभीर अशा मार्गानें आत्मसंशोधन करून इक्बाल यांनी आपलें व्यक्तिविकासाचें तत्त्वज्ञान काढलें. त्याकरितां प्रथम त्यांना व्यक्तिमत्त्वाचें गूढ रहस्य अंतर्मुख होऊन शोधून काढावें लागलें. इक्बाल यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि संदेशाचा पाया त्यांच्या ' व्यक्तिमत्त्वा ' संबंधींच्या स्फूर्ति- दायक दृष्टिकोनांत आहे.

इक्बाल यांचें आत्मतेजासंबंधींचें हें मत अनेकांना आपल्याकडील वेदान्तासारखेंच वाटेल. ते म्हणतात : " व्यक्त जगताचें हृदय तुझ्याखेरीज कोणी नाहीं !

अव्यक्तसृष्टीची खूण तुझ्याखेरीज कोणी नाहीं. जीवनाच्या मार्गांत निर्भय-पणें पावलें टाक—

कारण विश्वाच्या विशाल सागरांत तुझ्याखेरीज कांहीं नाही. "

या इक्बाल-प्रणीत स्फूर्तिदायक मंत्रांत ' चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ! ' ह्या वाक्याचेच निनाद ऐकूं येतील. एखादें तत्त्वज्ञान जुनें कीं नवें, हें ग्रंथाधारांनीं ठरविणारे पंडित, हें तत्त्वज्ञान अनेकांनीं सांगितलें आहे असें अर्थपूर्ण अभिनयानें सांगतील, परतु जुनेंच तत्त्व एखाद्याला नव्या वाटेनें आणि स्वतःचें म्हणून प्रतीत होण्यांत केवढें क्रांतिकारक सामर्थ्य आहे, हें याच तत्त्वांतून इक्बाल यांनीं बांधून काढलेल्या स्वयंपूर्ण तत्त्वप्रणालींत दिसून येईल.

एखादें प्रसिद्ध तत्त्व नुसतें शाब्दिक सत्य म्हणून उच्चारणें वेगळें आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग आणि आधार बनविणें वेगळें. ' तौहीद ' हें मुसलमानी धर्मांतील तत्त्व परमेश्वर एकच मानावयास सांगतें हें प्रसिद्ध आहे. परंतु इक्बाल यांच्या मतें हें तत्त्व अंगी बाणल्याची खूण म्हणजे केवळ अनेक देवांची पूजा न करणें किंवा मूर्तिपूजा न करणें, एवढीच नसून निर्भय

१०२५३

बनणें ही आहे. देव एकच मानणें, म्हणजे देवाखेरीज दुसऱ्या कशाल्याहि महत्त्व अगर भय न मानणें, येथपर्यंत या तत्त्वाच्या संचाराची व्याप्ति आहे.

'जगांत माझ्याखेरीज कांहीं नाहीं' या प्रतीतीचेहि असेच कित्येक व्यापक उपसिद्धान्त इक्बाल यांनीं मानले आहेत. इक्बाल यांना असें दिसून आलें कीं, सूफी वेदान्त असो कीं हेगेलियन वेदान्त असो, त्यांत व्यक्तिमत्त्वाच्या विसर्जनावर, विलीनकिरणावर भर आहे. इक्बाल यांस व्यक्तिमत्त्वाचें 'विसर्जन' नको आहे; तर 'विकसन', प्रसरण, आक्रमण हवें आहे. ब्रह्म किंवा ईश्वर म्हणून एक पूर्ण वस्तु मुळांतच आहे व आपण तिची ओळख पटवून घेऊन तिजमध्यें बुडायचें, ही कल्पना इक्बाल यांस मान्य नाहीं. विश्वांत नवनिर्मिति एकसारखी चालू आहे. विश्व ही एक 'घटना' किंवा वस्तु नसून 'प्रक्रिया' किंवा Process आहे. म्हणून व्यक्तीचें ध्येय जें मुळांत पूर्ण आहे अशा एखाद्या ब्रह्मांत विलीन होणें हें नसून आत्मप्रकटीकरण, आत्मविकास, नवनिर्मिति हें आहे. या व्यक्तिमत्त्वविकासांत हळूहळू परमेश्वरासारखा होऊन जातो हें खरें; पण अखेर तो ईश्वररूपीं विलीन होतो हें मात्र इक्बाल यांस मान्य नाहीं. तो एवढें विशाल व्यक्तिमत्त्व संपादन करतो कीं, ईश्वरत्वाचाहि अंतर्भाव या मानवत्वांत होतो. अशा प्रकारें शास्त्रीय ज्ञानाच्या योगें तो निसर्गावर स्वामित्व गाजवूनच थांबत नाहीं, तर आत्मविकासाच्या जोरावर परमात्म्याला तो आत्मरूपांत पचवितो !

Life is a forward assimilative movement या इक्बाल यांच्या महासूत्राचा अर्थहि हाच होय. नराची करणी एवढी मोठी आहे कीं, अखेर "नरका नारायण हो जाय !" एवढेंच नसून "नारायण नरका हो जाय !" येथपर्यंत या करणीचें महत्त्व आहे !

'व्यक्तिमत्त्व' आणि 'शक्तिमत्त्व' यांत इक्बाल फरकच करीत नाहींत. कमकुवतपणा, शैथिल्य, ढिलेपणा यांचा उद्भव दिसला कीं व्यक्तिमत्त्व किडूं लागलें, सडूं लागलें म्हणून समजावें. या दृष्टीनेंच इक्बाल "Personality is a state of tension" अशी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या करतात. ही 'सायस्त'*

* State of tension याला मराठींत रूढ प्रतिशब्द नाहीं. प्रो. वाडेकर यांच्या मानसशास्त्रपरिभाषाकोशांतून वरील शब्द घेतला आहे.

स्थिति जाऊन निरायास, शिथिल, विश्रांत स्थिति (Relaxation) येणें म्हणजेच आध्यात्मिक मरण होय. संनद्ध असणें हेंच जीवन; शिथिल, विश्रांत असणें हेंच मरण. बौद्धांचें ' निर्वाण ', सूफी भक्तींतील 'विलीनभाव' यांचा या व्यक्तिमत्त्वविकासाला उपयोग नाहीं.

अर्थात् व्यक्तिमत्त्व समर्थ आणि सन्नद्ध राखण्याकरितां ज्या गुणांचा उपयोग होतो, ते गुण म्हणजे इक्बाल-प्रणीत दर्शनांतील प्रमुख नैतिक मूल्यें होत.

यांत पहिलें स्थान ' प्रेम ' उर्फ ' इष्क ' या गुणाला आहे. इक्बाल यांचें तत्त्वज्ञान नीत्शेच्या तत्त्वज्ञानासारखें हिंसेचें तत्त्वज्ञान आहे, अशी समजूत करून घेणारांना ' इष्क ' उर्फ ' प्रेम ' या गुणाला महत्त्व दिलेलें पाहून आश्चर्यच वाटेल. (वास्तविक नीत्शेचें तत्त्वज्ञानहि व्यावहारिक फायद्याकरितां हिंसेचा पुरस्कार करीत नाहीं!) शिवाय इष्क म्हणजे स्त्रीपुरुष संबंधांतील रंगेलपणा व पागलपणा हा अर्थ कवटाळून बसणारांना तर आपलें अर्धवट ज्ञान विसरल्याशिवाय इक्बाल यांच्या तत्त्वज्ञानांतील 'इष्क' चें माहात्म्य समजणारच नाहीं. प्रेमाची व्याख्या इक्बाल यांनी ' आपलेसें करून घेण्याची इच्छा ' अशी केली आहे. या इच्छेंत प्रेमिकाच्या व्यक्तिमत्त्वाचाहि विकास अपरिहार्य असतो. ' आशक ' आपली ' माशुक ' अपूर्व गुणांनीं युक्त समजत असतो; व ती मिळविण्याकारितां हवा तो त्याग करून स्वतःच्या अंगींहि अपूर्वत्व आणण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा प्रकारें खऱ्या प्रेमामुळें उभयतांचाहि व्यक्तिविकास होणें अपरिहार्य असतें.

पण मुसलमानी अध्यात्मांत प्रेम याचा अर्थ याहूनहि थोडा गूढ आहे. प्रेम म्हणजे एक प्रकारचें ' कार्य-प्रेरक-ज्ञान ' होय, असें या अध्यात्मांत मानलें आहे. कुराण आणि ' हादिस ' (Tradition of the Prophet) यांत याच कर्तृत्व-प्रेरक, पराक्रमवर्धक अंतःस्फूर्तीला ' **इमान** ' असें म्हटलें आहे.* भारतीय आर्यांच्या परिचित भाषेंत सांगायचें झालें तर ' इष्क ' म्हणजे एक प्रकारची प्रेमजन्य श्रद्धा असते. पण डोळे मिटून विश्वास ठेवायला सांगणारी श्रद्धा मात्र ही नव्हे. ही ' निर्मात्री श्रद्धा ' (Creative Faith)

* एफ्. के. खान दुराणी : 'Iqbal's Doctrine of the self'.

आहे. शिरीनच्या प्रेमामुळें फरहादला इराणमधील बेसतुन पहाड फोडण्याची जी हिम्मत आली, ती याच श्रद्धेमुळें !

एफ्. के. दुराणी 'Iqbal's Doctrine of the Self' या पुस्तकांत म्हणतात : "Intellect calculates; Love goes straight to action regardless of risks and dangers."

आजकालचे कित्येक महाराष्ट्रीय 'द्रष्टे' श्रद्धेचीं स्तोत्रें गातात, पण श्रद्धेचें मूळ प्रेमांत आहे, ही गोष्ट मात्र विसरतात. जो कशानेंच मोहित होत नाहीं—वेडा झाला नाहीं, असा रुक्ष महाराष्ट्रीय 'द्रष्टा' जेव्हां श्रद्धेच्या गोष्टी बोलूं लागतो, तेव्हां हंसावें की रडावें, हेंच मला कळत नाहीं !

प्रेम या सद्‌गुणाच्या विरुद्ध इक्‌बाल कोणता गुण मानतात, हें पाहिलें म्हणजे त्यांच्या 'इष्क' चें स्वरूप कळेल. 'सु' आल (Su, al) उर्फ याचना व परावलंबित्व हा ते कर्तृत्वप्रेरक प्रेमाच्या विरुद्ध असा गुण मानतात.

वासना वाईट मानणें हा आपण आत्मोन्नतीचा प्रस्थानबिंदु मानतों, तर उलट इक्‌बाल यांच्या तत्त्वज्ञानांत या वासनेचीच महती गायिलेली आहे ! 'असारे खुदी' या ग्रंथराजांत ते लिहितात—

"Life is preserved by purpose
Because of the goal, its caravan-bell tinkles
Life is latent in seeking,
Its origin is hidden in desire;
Keep desire alive in threat
Lest thy little dust become a tomb"*

या परिच्छेदाचें तात्पर्य एवढेंच कीं, इच्छा, आशा, वासना सरल्या कीं जीवनहि संपलें. कशासाठीं तरी धडपड हेंच जिवंत असल्याचें लक्षण आहे. आपल्याला कोणाता तरी मुक्काम गांठायचा आहे म्हणून तर आपल्या उंटाच्या घंटा खळाळत आहेत. या पंचमहाभूतात्मक देहाची माती आणि थडग्याची माती एकच होऊन जाऊं नये अशी इच्छा असेल, तर बाबांनो ! वासनेची

* Asrar I-Khudi (Nicholson).

ज्योत जागती ठेवा ! पण इष्क म्हणजे जशी इष्कबाजी नव्हे, तशीच वासन म्हणजेहि नुसती भोग-वृत्ति नव्हे. कारण ते म्हणतात:

"Desire keeps the self in perpetual uproar, it is a restless wave of the Self's Sea.Desire is a noose for hunting ideals, and brings integration to one's deeds."

तात्पर्य, भावनांचें जाळें जीवाला बद्ध करण्याकरितां नसून ध्येयरूपी विहंगम हस्तगत करण्याकरितां आहे !

इक्बाल यांचें प्रवृत्तिवादी तत्त्वज्ञान ऐहिक वासनातृप्तीवरच थांबत नाहीं, याची खूण म्हणजे '**इष्क**' या गुणाइतकेंच त्यांनीं '**फक्र**' या गुणाला दिलेलें महत्त्व ही होय. '**फक्र**' म्हणजे मुळांत फकिरी वृत्ति होय. परंतु प्रत्येक गुणाचाच अर्थ आत्मविकासाला उपयुक्त अशा कमाल मर्यादेपर्यंत ताणावयाचा असा इक्बाल यांचा बाणा असल्यामुळें फकिरीचा अर्थ त्यांनीं फारच खोल आणि व्यापक केला आहे. या फकिरींत ते ऐहिक निर्धनतेचा आणि अपरिग्रहाचा अंतर्भाव करीत नसून बौद्धिक आणि भावनात्मक आलिप्ततेचा अंतर्भाव करतात.* अर्थात् ही फकिरी 'वस्तु-विषयक' नसून 'वृत्तिविषयक' असते. एखादा आलमगीर ( औरंगजेब ) साम्राज्यशाही गाजवूनहि फकीर राहतो तो याच वृत्तीमुळें होय ! या अलिप्तवृत्तीचा आणि संसारापासून प्रत्यक्ष निवृत्त होऊन वैरागी होण्याचा संबंध नाहीं, असें मात्र इक्बाल मुद्दाम बजावतात. कारण संसार आणि समाजजीवन यांतून बाजूला होणें हें दुबळे-पणाचें लक्षण समजतात. सारांश, ही फकिरी वैभवाच्या अभावीं पत्करायची नसून वैभवशाली माणसांनींच मानसिक अधःपात होऊं नये म्हणून पत्करायची आहे.

इक्बाल यांचें तत्त्वज्ञान प्रवृत्तिवादी आहे. इतकेंच नव्हे तर बलपूजक आहे. इतकें असूनहि त्यांची '**नायबते इलाही**' ( ईशप्रतिनिधित्व ) ची कल्पना किंवा 'मर्देकमाल्' ( अतिमानव ) ची कल्पना नाझी संप्रदायांतील सर्वथैव पार्थिव कार्यक्षमतेशीं सदृश नाहीं. याचें मुख्य कारण इक्बाल् हे जड-

* बशीर अहमद दार : A Study in Iqbal's Philosophy.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४५ वि:
क्रमांक ११७५ नों: दि: १६/७/

वादी आणि साम्राज्यवादी नाहींत. आत्म्याचें अमरत्व आणि आध्यात्मिक मूल्यांचें श्रेष्ठत्व, यांवर त्यांचा विश्वास आहे. किंबहुना त्यांच्या ‘ खुदी ’च्या ( व्यक्तिमत्त्वविकासाच्या ) कल्पनेचा पायाच आध्यात्मिक मूल्यांत आहे.* अध्यात्मवादांतील कित्येक प्रसिद्ध सिद्धान्त सिद्ध करण्याकरितां कुराणासारख्या मुसलमानांच्या अपौरुषेय ग्रंथाप्रमाणेंच बर्ग्सॉसारख्या आधुनिक तत्त्ववेत्त्याच्या ग्रंथांचाहि ते मुक्तहस्तानें उपयोग करतात. मानवी मर्त्यत्वाची कल्पना मानवी कालकल्पनेशीं निबद्ध आहे. पण बर्ग्सॉ यानें कालविषयक कल्पनेंतच क्रांति घडवून आणली आहे. आपल्या कालविषयक कल्पनेंत ‘ दिक् ’ कल्पनेचें मिश्रण असतें. पण खरा काल ( Duration ) हा दिशेप्रमाणें पसरलेला नाहीं. खऱ्या काळाला अनुक्रमयुक्त ( Serial ) विस्तार नाहीं. या खऱ्या काळाचा ( Pure Time ) अनुभव घेणें म्हणजेच आपलें अमरत्व अनुभवणें होय. ‘ आत्मत्व अनुभवणें ’, ‘ अमरत्व अनुभविणें ’ हीं एकच होत.

काळासंबंधींची रूढ ‘ अनुक्रमशील ’ कल्पना नष्ट होण्यास म्हणजेच खऱ्या कालाची जाणीव होण्यास, खऱ्या अस्तित्वाचा क्षण अनुभवणें आवश्यक असतें. ‘ पयामे मश्रीक ’ ( प्राच्यदेशीय संदेश ) या काव्यांत इक्बाल यांनीं मानवी अस्तित्वासंबंधींचे सनातन प्रश्न अत्यंत काव्यमय भाषेंत विचारले आहेत.† “ मी कोण आलों कुठून ? ” हे प्रश्न कवि पहाडांना विचारतो, पण, उत्तर नाहीं ! तो चंद्राला प्रश्न करतो, पण पुनः तीच अभेद स्तब्धता त्याच्या वांट्याला येते !

या विशाल विश्वांत मनुष्यप्राणी एकटा आहे. पोरका आहे. तो इथें कां आला, इथून कां जाणार, कुठें जाणार, हें त्याला या विशाल सृष्टींत कोणी सांगायला तयार नाही ! जडवाद्यांप्रमाणें जनावराचें जीवन जगणेंहि त्याला सहन होत नाहीं. बुद्धीला शरण जावें तर ती वस्तुजाताचें बाह्यांग चाचपीत आणि लांबीरुंदी मोजीत बसते. फार काय ? प्रत्यक्ष धर्म देखील त्याला वाट

* क. जी. सैयद्दीन Iqbal’s Conception of Good Character.

† एफ्. के. खान दुराणी.

दाखवूं शकत नाहीं. कारण स्वतःचें रहस्य ( अस्रारे खुदी ) समजलें नाहीं तर धर्मग्रंथांतील एक अक्षरहि ( खऱ्या अर्थानें ) समजत नाहीं.

अखेर इक्बाल सांगतात, “ ( सत्यशोधनाचा ) रस्ता बंद आहे. ( पुढें जाणार कुठें ? ) ” “ हे मार्गसंशोधका ! आतां एकदां स्वतःमध्यें निमज्जन करून पहा; कारण महासागराच्या पोटांत मासा कधींच वाट चुकत नाही ! ”

आध्यात्मिक पोरकेपणाला ( Loneliness ) तोंड देणें, ‘ खऱ्या काळाचा अनुभव घेणें ’ ही इक्बाल यांच्या तत्त्वज्ञानांतील भाषा वाचणारास बर्गसाँबरोबरच कृष्णमूर्तींचीहि आठवण झाल्याखेरीज राहणार नाहीं. कृष्णजी एकलेपणाच्या वाटेनें साक्षात्कार करून घ्या म्हणतात, पण वासनाक्षयापासून सुरुवात करतात; तर उलट इक्बाल वासना सोडूं नका, तिचा पदर पकडून उंच उंच चढा आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास करा, असें सांगतात.

नीत्शे आणि इक्बाल यांच्या तत्त्वज्ञानांत विलक्षण सादृश्य असलें, तरी तफावतहि तितकीच मोठी आहे. दोघेहि निवृत्तिवादाचे कट्टे वैरी होते. ( या बाबतींत आधुनिक महाराष्ट्राचे सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्ते आहिताग्नि राजवाडे हे या दोघांनाहि जवळचे आहेत ! ) इक्बाल यांस हिंदी आणि इराणी भक्तिमार्गांतील, दुनियेच्या नश्वरतेसंबंधींचा ओरडा बंद पाडावयाचा होता; तर नीत्शे यास खिस्ती धर्मांतील विरक्ति आणि आपला गुरु शोपेनहौर याचा दुःखवाद यांचा नाश करावयाचा होता.

पण नीत्शेचा विकासवाद जडवादी होता. इंद्रियातीत अशा ज्ञेयापर्यंत अथवा ज्ञात्यापर्यंत जाण्याची त्याची तयारी नव्हती. कारण तो मुळांत डार्विनचा हात धरून निघालेला होता ! पण त्यालाहि कित्येक गूढ अनुभव आले असून अर्वाचीन युरोपांत कोणी त्या मार्गांतला गुरु अगर समान-धर्मा न सांपडल्यामुळें त्याची मजल ‘ स्तब्धावस्थे ’ पलीकडे गेली नाहीं. विज्ञानवादी पाश्चात्य राष्ट्रांनीं मात्र या विदेहावस्थेला ‘ Dementia ’ उर्फ बुद्धिभ्रंश ठरविलें. इक्बाल प्रवृत्तिवादी आणि बलपूजक आहेत, इतकेंच नव्हे तर पाकिस्तानच्या चळवळीमागील स्फूर्तिदाते तत्त्वज्ञहि तेच आहेत, ही गोष्ट खरी. तसेंच त्यांच्या तत्त्वज्ञानांत क्रांतिपूजकांच्या निर्घृणतेचा अंतर्भाव होतो; Live dangerously या तत्त्वाचाहि अंतर्भाव होतो. युरोपीय

पंडितांना नीत्शेची अध्यात्मविकासांतील स्तब्धावस्था समजली नाहीं. हिंदुस्थानांत जन्मला असता तर त्याला मार्ग व गुरु सांपडला असता असें आहिताग्नि राजवाडे नेहमीं म्हणत असत. तेच शब्द इक्बाल यांनीं (जविदनामा काव्यांत) वापरलेले पाहून मजप्रमाणेंच अनेकांना आश्चर्य वाटेल. मुसलमान गूढवादी लोक ज्या अवस्थेला **मकामे काब्रया** म्हणतात त्या अवस्थेंत नीत्शे होता; व त्याला अहमद सर हिंदीसारखा गुरु भेटावयास हवा होता, असें इक्बाल **जविदनामा** या काव्यांत म्हणतात.

खरें आहे. 'इष्क' (प्रेम) या तत्त्वाचें माहात्म्य गाणाऱ्या तत्त्वज्ञानांत निर्घृणतेला स्थान असावें, याचें कित्येकांना नवल वाटेल. कारण प्रेमाचा धर्म आणि दयेचा धर्म यांत अर्वाचीन हिंदु मन नेहमींच गफलत करीत असतें. पण नीत्शेला 'दया' म्हणजे पंचमहापातकांचा अर्क वाटे! आपलें एखाद्या व्यक्तीवर, समाजावर अगर तत्त्वावर प्रेम असल्यास आपल्याला त्या प्रेमाखातर व त्याच्या रक्षणाखातर निर्घृण बनावेंच लागतें. सृष्टींतील द्वंद्वाच्या नियमाचाच हा एक भाग आहे. चांगल्या वस्तूचें रक्षण करावयाचें म्हटल्यास वाईट वस्तूंचा नाश करण्यास तयार व्हावें लागतें. पण दयेचा धर्म सृष्टींतील या न्यायाकडे डोळेझांक करतो आणि चांगल्याबरोबर वाईटालाहि जीवदान देतो व न कळत चांगल्या वस्तूच्या नाशाची तरतूद करून ठेवतो! 'प्रेम' निर्घृण व्हायला भीत नाहीं, तर दया न कळत निर्घृण कृतीला कारणीभूत होते! प्रेम आणि दया यांतील फरक आपण जितक्या लवकर ओळखूं तितकें बरें. आत्मविकास अगर ध्येयप्राप्ति यांच्या राज्यांत संघर्ष, विनाश व क्रांति यांखेरीज एक पाऊलहि पुढें सरकतां येत नाहीं.

"It is slaying by the strength of its own arms.
That it may become conscious of its own strength."

* * *

"The excuse for this wakefulness and cruelty is the shaping and perfection of spiritual beauty."

तथापि नीत्शेला हवा असलेला 'सुपरमॅन्' (**मर्दे कमाल**) आणि हिटलर यांत जेवढा संबंध, तेवढाच पाकिस्तानच्या नांवानें झालेलीं कृत्यें आणि

इक्बालचें तत्त्वज्ञान यांत संबंध, हें आपण विसरून चालणार नाहीं. यांत इक्बाल यांना अगर पाकिस्तानवाल्यांना पापमुक्तता मिळवून देण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे, असें मात्र समजू नये ! आणि इक्बाल यांच्या तत्त्वज्ञानांतून पाकिस्तानी दुष्ट कृत्यांचा जन्म झाला असें मानलें, तरीहि आपणांस त्यांच्या तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं. पाकिस्तानकल्पनेला विरोध करण्यालाहि इक्बालच्या तत्त्वज्ञानांतूनच अधिक स्फूर्ति येणें शक्य आहे, असें थोडा खोल विचार केल्यास कळून येईल. इक्बाल यांचें आत्मविकासाचें तत्त्वज्ञान आत्मसात् केल्यास, आपण पाकिस्तानकल्पनेचे यशस्वी विरोधक तरी होऊं, नाहीं तर बलवान् मित्र तरी होऊं !

मला त्यांचें तत्त्वज्ञान आत्मरहस्याचें आणि आत्मबलाचें तत्त्वज्ञान म्हणूनच आवडतें. ज्या सूफी गूढवाद्यांवर इक्बाल यांचा राग होता, त्यांच्या अद्वैतानंदाचें माधुर्यहि मला कित्येकदां इक्बाल त्यांच्या काव्यांत प्रतीत होतें. ते एके ठिकाणीं म्हणतात—

" मातेच्या गर्भाशयाचा भेद करून बालक जन्माला येतें; आणि विश्वाच्या गर्भकोशाचा भेद केल्यावरच मनुष्याचा खरा जन्म होतो.

भल्या मनुष्या ! हें विश्व आपल्या वस्त्रावरून दिक्कालाची धूळ झाडून स्वच्छ उघडें होईपर्यंत धीर धर ! "

* * *

आणि गूढ वेदान्ताबरोबरच इक्बाल विसाव्या शतकांतील मानवाला लवकर कळेल असा क्रांतिकारक आक्रोशहि करतात :

" या अल्ला ! मी तर महापूर आहें ! मला निरुंद पाटवणांतून वहायला कां लावतोस ? मला पर्वतश्रेणींवरून उड्या घेऊं दे ! "

* * *

" एखाद्याजवळ कांहीं सांगण्याचें सामर्थ्य असेल तर तें समजून घेणाराच कोणी भेटत नाहीं; अरेरे ! ज्यांच्या हृदयांत एखादें रहस्य स्फुरत असेल, त्यांची गति खरोखरच मोठी दुस्तर आहे ! "

* * *

इक्बाल यांचा संबंध पाकिस्तानपेक्षां आत्मज्ञान आणि क्रांति यांच्याशींच अधिक आहे; पण आत्मज्ञानांतून कोणी बळ मिळवतात, तर कोणी दौर्बल्य मिळवितात! आत्मज्ञानांतून बलप्राप्ती करून घ्यावयाची झाल्यास इक्बाल, नीत्शे आणि आहिताग्नि राजवाडे यांचें प्रवृत्तिवादी तत्त्वज्ञान महाराष्ट्रानें वाचलें पाहिजे.

♣ ♣ ♣

: ४ :

# आहिताग्नि राजवाडे



माझ्या कित्येक वाचकांच्या मनांत आहिताग्नि राजवाडे हें नांव उच्चारतांच कोणत्या कल्पना उभ्या राहतील याची मला पूर्ण कल्पना आहे. 'एक कट्टर सनातनी पंडित!' 'कित्येक दुर्बोध ग्रंथांचा कर्ता' याच त्या कल्पना होत. पण हे अगदींच गैरमाहीतपणाचे गैरसमज सोडले, तरी ज्यांना आहिताग्नींची याहून अधिक जानपछान असेल त्यांचे कांहीं वेगळेच गैरसमज असल्याचें आढळून येईल. 'शंकराचार्यांना शिव्या देणारे असे एक विचित्र वैदिक धर्माभिमानी' हा त्यांच्यासंबंधींचा समज होय. अर्थात् हा दुसरा समज खोटा आहे असें नव्हे. पण त्या समजामुळें सर्वसाधारण महाराष्ट्रीय मनुष्य त्यांना ज्या कोटींत ढकलील, ती कोटी मात्र खरी आहे असें नव्हे !

पण मला माझ्या वाचकांना दोष देण्याचा तितकासा अधिकार नाहीं. कारण कांहीं वर्षांपूर्वीं मला कोणी या विख्यात पंडितासंबंधीं माहिती विचारली असती, तर मीं हीच माहिती पुरविली असती !

सुमारें पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. माझ्या एका व्यासंगी मित्रांनीं मला अहिताग्नींचें 'खिस्तान्तक नीत्शे' हें पुस्तक मुद्दाम आणून दिलें. पण राजवाड्यांच्या संबंधींचें माझें अज्ञान आणि नीत्सेसंबंधींचा माझा अभिमान हीं दोन्ही ह्या वेळीं इतक्या कोटीला जाऊन पोहोंचलीं होतीं कीं, मी तें पुस्तक वाचण्याचेंहि नाकारलें. मीं माझ्या मित्राला साफ सांगितलें, 'नीत्शेचें तत्त्वज्ञान समजावून घेणारा व सांगणारा मनुष्य महाराष्ट्रांत असू शकेल, या गोष्टीवरच माझा विश्वास बसत नाहीं !"

पण सर्वसाधारण महाराष्ट्राचे आणि खास माझे स्वतःचेहि गैरसमज दूर होण्यास मला राजवाडे यांचे ग्रंथ वाचीपर्यंत वाट पहावी लागली नाहीं. तें कार्य केवळ अल्पपरिचयानेंहि अंशतः घडून आलें. १९३५ च्या संस्कृति-संरक्षक परिषदेच्या विषयनियामक समितींत प्रथम आहिताग्नि यांच्याशीं माझा प्रत्यक्ष संबंध आला. इतर अल्पज्ञ सनातन्यांहून हा महापंडित दुसऱ्याचें म्हणणें ऐकण्यास आणि स्वतःचा आग्रह सोडण्यास अधिक तयार आहे, हें पाहून मला अधिक आश्चर्य वाटलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं एका नवीन मासिकाच्या निमित्तानें एकत्र आलेले कित्येक मुंबईकर साहित्यिक पुण्यांत आले होते. त्यांना घेऊन मी राजवाडे ह्यांचिकडे गेलों होतों. या मंडळींत खांडेकर, वि. ह. कुलकर्णी, काणेकर, दौंडकर, प्रभाकर पाध्ये, वगैरे विविध जातींची आणि मतांची मंडळी होती असें मला आठवतें. कपाळाला भस्म चर्चून आणि अंगावर शाल लपेटून आहिताग्नि आम्हां अगदीं वेगळ्या वृत्तीच्या लोकांशीं मनमोकळेपणानें बोलत होते. थोड्या वेळानें खालून चहा आला. माझी कल्पना—आमची सर्वांची कल्पना अर्थातच अशी होती कीं, हा कडक सनातनी पंडित, एक चहा अजिबात घेणार तरी नाहीं किंवा घेतलाच तर आम्हां जातिधर्मशून्य मंडळींना धडा देण्याकरितां वेगळ्या बैठकीवर बसून चहा घेईल ! तसें काहींच घडलें नाहीं. अहिताग्नींनीं अगदीं हंसत खेळत त्याच बैठकीवर चहा घेतला. पण दुरून परिचय करून घेण्याच्या अशा चार-दोन प्रसंगांनी मला आहिताग्नि आग्रही नाहींत एवढेंच कळून आलें होतें. त्यांच्या विशाल व्यासंगाची आणि स्वतंत्र प्रतिभेची कल्पना मात्र मला फार वेगळ्या प्रसंगीं आली. आणि ती आल्यानंतर—त्यांची अनेक मतें मला अद्याप पटत नसूनहि—मी त्यांचा निःसीम चाहता बनलों.

सुमारें आठ वर्षांमागें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें मी सांगली येथें पूर्ण विश्रांतीकरितां राहिलों असतां केवळ यदृच्छेनें मीं आहिताग्नि यांचें ' गीता-भाष्य ' तेथील नगर वाचन मंदिरांतून आणविलें. त्या ग्रंथाचीं दहा-पांच पानें वाचून होतात, तोंच आहिताग्नि राजवाडे यांच्यासंबंधींचें माझें आणि मजसारख्या अनेकांचें अज्ञान मला चांगलेंच कळून आलें. एकाच ग्रंथांत क्रांतिकारक दृष्टिकोन आणि असाधारण व्यासंग हीं तर दिसून येतातच, पण केवळ प्रौढ गंभीर आणि नादमधुर भाषाशैलीच्या दृष्टीनेंहि हें पुस्तक मराठी तत्त्वज्ञान-वाङ्मयांत अपूर्व ठरेल. या ग्रंथाच्या गाढ गांभीर्यावरून मला गीता-रहस्याचें स्मरण झालें; अमोघ तर्कपद्धतीवरून मला जुन्या आचार्यांचें स्मरण झालें; आणि सुगम मधुर गद्यसरणीवरून मला प्रिं. गोळ्यांच्या ' हिंदुधर्म आणि सुधारणा ' या सुरस ग्रंथाचें स्मरण झालें. त्यानंतर लगेच मीं त्यांचे आणखी दोन प्रमुख ग्रंथ- ' नासदीयसूक्तभाष्य ' ( प्रथम खंड ) आणि ' ख्रिस्तान्तक नीत्शे ' हे आणून वाचले. हे तिन्ही ग्रंथ वाचीत असतां माझ्या मनांत लज्जा आणि अभिमान या परस्परविरोधी भावना एकाच वेळीं उसळत होत्या. लज्जा अशासाठीं कीं, एवढें मोठें ऋषितुल्य मन ह्याच पिढींत स्फुरत असतां मी आणि मजसारखे अनेक–अनेक वर्षें या समुद्राच्या कांठीं कोरडे राहिलों ?– नव्हे त्या समुद्रालाच कोरडा ठरविण्याचा यत्न करते झालों ! आणि अभिमान अशाकरितां कीं, अखेर हे ग्रंथ वाचण्यास मी जगलों !

फिरून पुण्यास येतांच मीं आहिताग्नींची भेट घेण्याचें ' धाडस ' केलें. आतां, त्यांच्या विशाल बुद्धिमत्तेचा प्रत्यय आल्यावर, मला तें पूर्वीइतकें सोपें वाटत नव्हतें. पण कांहीं लोकांच्या तोंडून त्यांच्या ' जमदाग्नित्वता 'ची दंतकथा ऐकली असूनहि मला अनुभव मात्र अगदीं उलटा आला !

राजवाडे ह्यांच्या भेटीस जाणारांस ते आपल्या प्रशस्त वाड्याच्या वरच्या मजल्यावरील दोन-तीन दालनांपैकीं एखाद्या दालनांत भस्म चर्चून प्रसन्न वृत्तीनें येरझारा घालतांना दिसत. ते घरीं सामान्यतः अंगांत कांहीं घालीत नसत; किंवा उत्तरीयहि घेत नसत. त्यांची मुद्रा ( नाक आणि हनुवटी ह्यांच्या विशिष्ट ठेवणीमुळें ) एखाद्या रोमन वीर मुत्सद्द्याप्रमाणें भासे. त्यांची

आकृति भव्य वाटली, तरी त्या मानानें उंची थोडी कमीच भासे. यांवावतींत त्यांना पाहून डॉ. केतकरांच्या आकृतीचें स्मरण होतें. त्यांचा वर्ण गव्हाप्रमाणें तांबूस श्यामल होता. शरीर निर्लोम होता. डोळे आणि नाक यावरून भासणारी त्यांची तर्क-कर्कशवृत्ति आवाज ऐकून अधिकच प्रत्ययाला येई. त्यांचें साधें बोलणें म्हणजे देखील एक प्रकारची गर्जना असे! त्यांनीं 'पुरुषोत्तऽम!' अशी आपल्या नातवाला मारलेली हांक किंवा 'चारुऽऽ' अशी आपल्या मुलीला मारलेली हांक, जर एखाद्या नवख्या माणसानें ऐकली, तर त्याची गाळणच उडे! त्याला वाटे, आतां या बिचाऱ्या मुलांची घडगत दिसत नाहीं. पण आहिताग्नींची ती प्रेमळ हांक असे! एका मनुष्याशीं संभाषण करतांना देखील ते मैदानी सभेंत बोलल्यासारखें बोलत-पण याचा अर्थ ते आमच्या कित्येक 'नॉन-स्टॉप' बोलणाऱ्या साहित्यिकांप्रमाणें घडघड घडवड पुस्तकी पॅरिग्राफ बोलतात असा केला, तर मात्र चूक होईल! त्यांच्या भाषणांत विद्वत्ता तर असेच असे. (ती असे म्हणून सांगणें म्हणजे समुद्रांत पाणी असतें असें सांगण्यासारखें आहे!) पण ती पुस्तकी नसे. जिवन्त बनून आपल्यासमोर उभी राहते. त्यांचा विषय 'अध्यात्म' हा होता. पण मूळचे ते राजकारण आणि अर्थशास्त्र यांचे विद्यार्थी. सुप्रसिद्ध प्रि. बेन यांचे ते विद्यार्थी होते. नेहमीं ते आपल्या इंग्रज गुरूसंबंधीं जितक्या आदरानें बोलत तितक्या आदरानें फारच थोडें शिष्य आपल्या गुरुविषयीं बोलत असतील. लोकमान्य टिळकांचे ते प्रथमपासून निस्सीम भक्त होते. अद्यापहि वीर—पुढारी म्हणून लोकमान्यासंबंधीं ते आदरानेंच बोलत. पण तत्त्वज्ञान आणि तात्त्विक विचार यांत टिळक जावे तितके खोल गेले नाहींत, म्हणून तेवढ्यापुरता त्यांचा टिळकांसंबंधींचा आदर पुढें पुढें टिकला नाहीं. चाफेकर बंधूंच्या वेळच्या दहशतवादी देशभक्तांशीं त्यांचा निकटचा संबंध आला असावा असें वाटतें. निदान त्या वेळच्या पुण्याच्या भूमिगत चळवळीसंबंधी त्यांच्याजवळ भरपूर आठवणी आहेत. (राजवाडे ह्यांना बी. ए. ची पदवी घेतांना कॉन्व्होकेशन् हॉलमध्यें येण्यास परवानगी नव्हती. त्यांना सक्तीनें 'इन अव्सेन्शिया डिग्री' घ्यावी लागली, यावरून त्यांच्या तरुणपणच्या राजकीय हालचालींसंबंधीं कांहींशीं कल्पना येऊं शकेल!)

अर्थात् इतिहास आणि राजकारण हेच विषय अद्यापहि या भाष्यकारांच्या खाजगी भाषणांत ऐकूं येतात ! पण आजकालच्या राजकारणी मंडळींच्या, इतिहासाध्यापकांच्या अगर पत्रपंडितांच्या लिहिण्याबोलण्यावरून राजवाड्यांच्या बोलण्याची कल्पना येणार नाहीं. मला वाटतें, मि. गार्डिनर यांनीं चेस्टरटन्-संबंधीं लिहितांना असें म्हटलें आहे, कीं, " चेस्टरटन् ह्यांच्या बोलण्यावरून ते प्लेटो-ॲरिस्टॉटल यांच्याशीं बातचीत करून आले असावेतसें वाटतें !" राजवाडे ह्यांच्याशीं बोलणाऱ्यांसहि असेंच वाटे. ते नाना फडणिसां-संबंधीं बोलत असोत कीं कार्डिनल् रिश्येलसंबंधीं बोलत असोत; शिवाजी महाराजांच्या व्रतबंधासंबंधीं चर्चा करोत, कीं आठव्या हेन्रीच्या विवाहांचीं वर्णनें करोत, कीं सीझरच्या मोहिमांचे वर्णन करोत, " न खलु धीमतां कश्चिदविषयो नाम " या संस्कृत वचनाची आठवण झाल्याखेरीज रहात नसे. अनेक देशांसंबंधीं आणि अनेक शतकासंबंधीं राजवाड्यांइतक्या अधिकारानें आणि आवेशानें बोलणारा विद्वान् माझ्या तरी पहाण्यांत नाहीं.

ते तर्कनिष्ठुर होते; व्यासंगी होते; सनातनी होते; निःस्पृह आणि सडे-तोड होते; यावरून ते त्रिसुभाऊ राजवाडे ( किंवा इतरहि कित्येक ) यांसारखे रुक्ष असतील अशी कोणीं कल्पना केली तर ती मात्र साफ चुकीची ठरेल. इतिहासांत त्यांना जे जे थोर पुरुष म्हणून वाटलें, त्यांच्यासंबंधींचे ग्रंथचित्रादि साहित्य तर त्यांच्या संग्रहीं होतें; पण त्यापैकीं कांहींचे सुंदर अश्वारूढ पुतळे त्यांच्या बैठकींचा दिवाणखाना सुशोभित करीत आहेत, असें आढळून येईल.

त्यांचा बैठकीचा दिवाणखाना म्हणजे त्यांच्या अष्टपैलू व्यासंगी बुद्धिमत्तेला शोभेलसें एक सुंदर विद्यामंदिरच आहे, असें डोळस माणसाला दिसून आल्या-खेरीज रहाणार नाहीं. विविध आरामशीर आसनें, विविध लेखन-साहित्य, सुव्यवस्थित हस्तलिखितें ( अर्थात् स्वतः राजवाडे ह्यांचीं ); मुद्दाम काढविलेल्या तसाविरी, मुद्दाम करविलेले पुतळे, या सर्वांनीं सुशोभित अशा दिवाणखान्यांत बसून, वयाच्या सत्तरीपर्यंत आपला अष्टांग व्यासंग पुण्याची आणि जगाची पर्वा न करतां चालविणारा दुसरा विद्वान् महाराष्ट्रांत असल्यास मी त्याची आदरानें भेट घेईन. ( पण तसा कोणी असल्याचें माझ्या ऐकण्यांत मात्र नाहीं ! )

त्यांचा ग्रंथसंग्रहहि त्यांच्या ज्ञानसमर्पित जीवनाला शोभेसाच आहे. त्यांना लागणारीं पुस्तकें त्यांना स्वतःलाच विकत घ्यावीं लागत; कारण तीं इतरांना लागण्याचा फारसा संभव नसल्यानें पुण्यासारख्या विद्यानगरींतील ग्रंथालयांतहि तीं संग्रहित नसतात ! नासदीयसूक्तभाष्याचा उत्तरार्ध लिहितांना त्यांना जीवशास्त्र, मानसशास्त्र, कामशास्त्र, प्रसूतिशास्त्र वगैरेसंबंधीं जीं फ्रेंच व जर्मन पुस्तकें लागलीं तीं त्यांचीं त्यांना स्वतः विकत घ्यावीं लागलीं. फ्रेंच, जर्मन, लॅटिन, ग्रीक व झेंद या भाषांचा परिचय त्यांस विविध विषयांच्या आवश्यकतेप्रमाणें करून घ्यावा लागला. हिंदुस्थानांत मार्क्स येण्यापूर्वींच त्यांनीं प्रि. बेन यांच्या प्रवचनांनीं प्रवृत्त होऊन फ्रेंच भाषान्तरांतून मार्क्स्‌चा कॅपिटल ग्रंथ वाचला !

अर्थात् त्यांचें वाचन म्हणजे वेळ घालविण्याचें साधन नसून नवनिर्मितीचें साधन होतें व म्हणूनच शेकडों पुस्तकांच्या शेकडों पानें काढलेल्या नोट्स् त्यांच्या संग्रहीं तयार असत. कॉलेजमध्यें असतांना प्रि. बेन यांच्या वर्गांतील व्याख्यानांच्या लिहून घेतलेल्या नोट्स् आजहि त्यांच्या घरीं सुवाच्य वाचनीय स्थितींत आहेत ! ( दिल्ली युनिव्हर्सिटीचा एक पीएच्. डी. करितां प्रबंध लिहिणारा पदवीधर विद्यार्थी, बेनसंबंधींच्या सामुग्रीकरितां राजवाडे यांच्याकडे मुद्दाम आला होता. ) कॉलेजमध्यें असतांना ते जितक्या निरलसपणें अभ्यास करीत तितक्याच निरलसपणें ते शेवटपर्यंत अभ्यास करीत. कम्युनिस्ट साहित्यशास्त्रज्ञ क्रिस्टोफर कॉडवेल् यांचें 'Illusion and Reality' हें काव्यमीमांसेचें पुस्तक साहित्याच्या अगर तत्त्वज्ञानाच्या प्रोफेसरांनाहि पहिल्या वाचनांत ससजण्यासारखें नाहीं. त्यांतील कांहीं भाग राजवाड्यांच्या द्वंद्वात्मक आणि समष्टिप्रधान ( समाजवादी ? ) प्रतिपादनाला जवळचा वाटल्यानें मीं तें पुस्तक त्यांना वाचावयास सांगण्याचें धाडस केलें. राजवाडे मार्क्स आणि मार्क्सवाद यांच्या एकांगीपणाचा नेहमीं खूपच उपहास करीत असल्यानें तें पुस्तक बहुधा तुच्छतापूर्वक मजसारख्या साहित्यिकांस साभार परत केलें जाईल, अशी माझी कपल्ना होती. पण मी पुन्हा चौकशी करण्याकरितां गेलों, तेव्हां मोडी लिपींत काढलेल्या त्या पुस्तकाच्या नोट्स्‌चा पुडका राजवाडे यांनीं मजपुढें टाकला व त्या नूतन ग्रंथकाराची मुक्तकंठानें स्तुति केली !

इतिहास-राजकारणाचे विद्यार्थी आणि क्रांतिकारक देशभक्तांचे चाहते म्हणून राजवाडे यांनीं आपल्या जीवनाला सुरवात केली; आणि अखेर ते अग्निहोम चालविणारे मीमांसक भाष्यकार म्हणून विख्यात झाले ! एवढ्या परिवर्तनाच्या पोटांत त्यांचे अनेक आवडते व्यासंग आणि उद्योग दडलेले आहेत व म्हणूनच चालू चळवळी अगर चळवळ्ये यांच्या कोणत्याहि वर्गी-करणांत अगर 'लेबलां'त राजवाडे यांचें ' सर्वतंत्र स्वतंत्र ' ( नागपूरकरांनीं दिलेलें उपपद ) कर्तृत्व बसविणें मुश्कील पडतें. ज्ञानार्जन आणि ज्ञानप्रसार यांत त्यांनीं आपलें आयुष्य घालविलें हें उघडच आहे. पण त्यांच्या ज्ञानार्जन-पद्धतींत आणि ज्ञानदानपद्धतींतहि त्यांनीं आपल्या विशालत्वाला साजेशा नव्या वाटा शोधून काढल्या.

त्यांनीं आपल्या ग्रंथलेखनाला स्वतःची अशी पद्धति तयार केली. या पद्धतीचें वर्णन ' भाष्यलेखन ' या शब्दानें बऱ्याच अंशीं होईल, पण पूर्णांशानें होणार नाहीं. भाष्य आणि ज्ञानकोश यांचें मिश्रण त्यांच्या लेखनांत आढळेल. त्यांचा प्रथम ग्रंथ जो 'गीताभाष्य' त्यांत त्यांनीं गीतेच्या पहिल्या तीन अध्यायांच्या विवेचनांत अनेक भौतिक आणि आध्यात्मिक सिद्धान्तांची चर्चा केली. तथापि मानसशास्त्र, जीवशास्त्र, समाजशास्त्र, विकासवाद वगैरे शास्त्रांचा आणि सिद्धान्तांचा खल त्या ग्रंथांत पानोपानीं आढळतो. अनेक ग्रंथाधार आणि आकृति यांनींहि तो ग्रंथ सजलेला आहे ! पुढें हा ग्रंथ लिहितांना नासदीयसूक्तावर लिहितां लिहितां एकेका ऋचेवरून अनेक शास्त्रें व उपशास्त्रें यांची त्यांनीं मीमांसा केली आहे. पूर्वार्धाच्या प्रथम खंडांत त्यांनीं क्रान्तिकारक असें द्वंद्वात्मक अध्यात्मशास्त्र सांगितलें आहे आणि उत्तरार्धाच्या प्रथम खंडांत एकदम कामशास्त्रांत उडी घेतली आहे ! हा वीस रुपये किमतीचा ग्रथ म्हणजे कामशास्त्राचें खोल तत्त्वज्ञान ( Metaphysics of Sex ) आणि कामशास्त्राचा ज्ञानकोश आहे, असें म्हटलें तर मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. परदेशांतील अनेक पदव्या मिळविणाऱ्या आणि आपल्या नैपुण्यामुळें देशभर विख्यात झालेल्या डॉ. म्हसकर यांजसारख्या लोकांनीं या ग्रंथाचें अनेकवार पारायण केलें आहे व मुक्तकंठानें स्तुति केली आहे ! याच ग्रंथाचा उत्तरार्ध आतां लिहून तयार आहे. पहिल्यांत मुख्यत्वें शरीरशास्त्रीय ( Sex Physiology चा ) भाग आला आहे. समसंभोग,

आत्मसंभोग, तृतीय प्रकृति, कामातिरेक, मंदकामता, यांसारखे सर्व प्रश्न व त्यांच्या विविध बाजू यांचा विचार या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडांत झाला आहे. पण या वरवरच्या विषयकथनावरून वाचकांस त्या ग्रंथाच्या अन्तरंगाची कांहींच कल्पना येणार नाहीं. कारण कामाविष्काराच्या विविध आणि विकृत प्रकारांचीं उदाहरणें देण्याच्या निमित्तानें ग्रीस, रोम, मिसरपासून चीन, हिंदुस्थानपर्यंतच्या अनेक देशांच्या हजारों वर्षांच्या इतिहासांतील गुप्त भानगडींचा यांत आधार व पुरावा म्हणून उपयोग केलेला आढळेल ! सीझरसारख्या जगज्जेत्याची समसंभोगवृत्ति, कुप्रसिद्ध रोमन बादशहा नीरो याची लैंगिक विकृति, यासारख्या प्रसिद्ध गोष्टींपासून तों अनेक राजेराण्या आणि ऐतिहासिक स्त्रीपुरुष यांच्या खळबळ उडवून देणाऱ्या ( Sensational ) भानगडींपर्यंत शेंकडों अद्‌भुत कथांनीं या ग्रंथास आधार पुरविलेले आढळतील. पण सर्वांचा रोख अखेर केवळ मूळ कामशास्त्रीय सिद्धान्ता-कडेच असलेला आढळेल—नव्हे मूळ द्वंद्वात्मक अध्यात्मापर्यंत नेऊन भिड-विलेला आढळेल !

या विकृत लिंगाजिज्ञासेच्या ( Abnormal Sex Psychology च्या ) ग्रंथांतून 'षड्दर्शनसमन्वय' हा ग्रंथ निघाला आहे हें कोणाला खरें वाटेल ? विषयाच्या ओघांत वेगवेगळ्या भारतीय दर्शनांच्या तुलनांचा विचार आला तो इतका वाढला कीं, आहिताग्नींनीं तो वेगळा ग्रंथ म्हणूनच प्रसिद्ध करावयाचें ठरविलें.

' ख्रिस्तान्तक नीत्शे' या नांवावरून त्या ग्रंथांत अत्यंत मूलगामी अशी कलामीमांसा (Art Criticism) येऊन गेली असेल, असें कोणाला वाटेल; पण या ग्रंथांत गायन, नाट्य व इतर कला यांची जितकी मूलगामी चर्चा आढ-ळेल, तितकी त्या विषयासंबंधीं गाजलेल्या मराठी पुस्तकांतहि आढळणार नाहीं. पुण्यांतलि एका मोठ्यांत मोठ्या लायब्ररींत त्यांचा हा कामशास्त्रा-वरील ग्रंथ वेदांताच्या शाखेंत वर्गीकृत केलेला आढळेल ! आणि याला कारण ' नासदीयसूक्तभाष्य ' या नांवाखालीं तो प्रसिद्ध झाला एवढेंच !

राजवाडे यांचें ' ईशावास्योपनिषद्‌भाष्य ' युद्धापूर्वी थोडेंफार छापून झालें होत व उरलेले नंतर छापलें गेलें. या ग्रंथांत शंकराचार्यांच्या भाष्याचें सप्रमाण व सविस्तर खंडन आढळेल. फलज्योतिष शास्त्रासंबंधींची अशाच

मूलगामी पद्धतीनें मीमांसा करणारा त्यांचा ग्रंथ तयार आहे. त्याच्या प्रास्ताविक भागांत ' शास्त्र ' कशाला म्हणावें, यासंबंधीं केलेली चर्चा अत्यंत खोल आणि व्यापक आहे.

आणि या विविध शास्त्रीय विषयांवरील ग्रंथांहूनहि अधिक कुतूहलजनक ग्रंथ म्हणजे राजवाडे लिहीत होते तें ' आत्मचारित्र ' ! यांत शेकडों रम्य आणि समाजोपयोगी आठवणी येऊन गेल्या आहेत. या ग्रंथाचा बराच भाग लिहून तयार आहे. पण यांतील कुतूहलजनक वैयक्तिक आणि सामाजिक इतिहासापेक्षांहि मला या ग्रंथाचें महत्त्व दुसऱ्याच दृष्टीनें अधिक वाटतें. आपल्याकडे शास्त्रीय विचार व धार्मिक ऊहापोह करणारे लोक हे प्रायः रुक्ष आणि स्वचरित्राविषयीं उदासीन असे असतात. किंबहुना त्यांनीं स्वतःसंबंधीं उदासीनता दाखवावी, अशी समाजाची त्यांच्याविषयीं अपेक्षा असते. जे एवढे शास्त्रपारंगत आणि तत्त्वजिज्ञासू, त्यांनीं "मी लहानपणीं कैऱ्या पाडीत असें," आणि " लहानपणीं मला अमुक विषय आवडत नसे " असल्या क्षुल्लक गोष्टी कशाला सांगत बसावें अशी आम्हां ' वेदान्ती ' भारतीयांची दृष्टि असते ! अर्थात् ही दृष्टि ' वेदान्ती ' म्हणजेच संन्यासी आणि विटकी आहे, हें सांगावयास नकोच ! या विटक्या वृत्तींतूनच इतिहास आणि चरित्रें यासंबंधींची भारतीयांची कुप्रसिद्ध अशी उदासीनता जन्म पावली आहे. स्वतःच्या जीवनांत रमणें ( Interest घेणें ) हें कलावंताच्या प्रकृतीचें प्रमुख लक्षण आहे; इतकेंच नव्हे तर तें आधुनिकतेचें वैशिष्ट्य आहे. त्यांतून आहिताग्नि हे तर आपल्या रम्य अहंकारामुळें प्रसिद्ध आणि प्रिय झालेला इंग्रज आचार्य प्रिन्सिपाल बेन यांचे पट्टशिष्य आणि अमर्याद अहंकाराबद्दल गाजलेला फ्रेडरिक् नीत्शे याचे परम भक्त ! अर्थात् राजवाड्यांना अहंकाराचें वावडें नव्हतें; इतकेंच नव्हे तर त्यांच्या अहंकारामुळें त्यांच्या लेखनशैलीला आणि भाषाशैलीला एक प्रकारचा डौल आला आहे असें आढळून येईल ! ज्यांनीं मराठी भाषेला असाधारण प्रौढत्व आणून दिलें, ज्यांनीं केवळ ' बाला ' असलेली तिची आधुनिक गद्य शैली प्रौढा आणि पुरंध्री बनविली, त्या गद्य-प्रभूंमध्यें तर राजवाडे यांची गणना करावीच लागेल; पण प्रौढगंभीर गद्य वाङ्मयांत इतकी कर्णमधुर गद्यसरणी निरपवादपणें पानापानांत लिहिणारा दुसरा लेखक दाखविणें कठीण जाईल, असेंहि ज्ञात्यांस आढळून येईल.

त्यांनीं लिहिलेल्या हजारों पानांत शेंकडों सुंदर प्रतिशब्द आणि पारिभाषिक शब्द विखुरलेले आढळतील. दैनिकांच्या तरुण उपसंपादकांनीं बनविलेले हास्यास्पद आणि सदोष शब्द आज तरुण लेखकांच्या वापरांत आहेत-पण राजवाड्यांचे शब्द त्यांच्या ऐकण्यांतहि नाहींत ! कारण शैली म्हटली कीं फडके, खांडेकर, साने गुरुजी; तत्त्वज्ञानात्मक गद्य म्हटलें कीं वामनराव जोशी वगैरे वाङ्मयीन ' कुंपणा 'पर्यंतच आजच्या साहित्यिकांची धांव जाणार !

पण तरुणांचें कशाला ? आमच्या तज्ज्ञांचीहि तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. ज्या कामशास्त्रविषयक ग्रंथामुळें विख्यात डॉक्टरहि राजवाड्यांचे भक्त बनले आणि ज्याची ज्यादा प्रत ब्रिटिश म्यूझियमनें मागून घेतली, तो ग्रंथ आमच्या दक्षिण महाराष्ट्र पारितोषिक समितीकडे ( अनिच्छेनें ) धाडण्यांत आला होता. पण त्याला पारितोषिक मिळालें नाहीं ! !

अमक्याला युनिव्हर्सिटीनें सन्मानार्थ ' डॉक्टरेट ' द्यावें; तमक्याला राजकवि नेमावें; म्हणून आपण बऱ्याच सूचना व चर्चा करतों. पण महामहोपाध्याय ही पदवी किंवा ' डॉक्टरेट ' राजवाडे-केतकर यांच्यासारख्या मंडळींकडे वळली नाहीं, ही गोष्ट महाराष्ट्रीय विद्वत्तेच्या इतिहासांत नमूद झाल्याखेरीज राहणार नाहीं !

राजवाड्यांचें वेगळेपण विद्वत्तेंत नसून विद्वत्तेपेक्षांहि त्यांना स्वतःचें जीवन, व्यासंग आणि प्रचार यांसंबंधीं वाटणाऱ्या रम्य अभिमानयुक्त प्रेमांत होतें ! त्यांत त्यांचें असाधारणत्व होतें ! पण यामुळें केवळ ते त्यांच्या चाहत्यांस अधिक आकर्षक वाटले, एवढाच जर कोणी या व्यासंग-क्षेत्रींय रंगेलपणाचा अर्थ करीत असतील, तर ते अज्ञ होत. राजवाड्यांच्या अहंकाराचा, रसिकतेचा आणि रंगेल वृत्तीचा उपयोग समाजाला झाला हें समजण्याइतकी सूक्ष्म दृष्टि आमच्या वाङ्मयाभ्यासकांनीं आणि समाज-निरीक्षकांनीं दाखवावयास हवी. शेंकडों पुस्तकें वाचणें आणि तीं वाचलीं आहेत याची साक्ष आपल्या परपुष्ट लिखाणाच्या तळटीपांनीं पटविणें एवढाच त्यांच्या व्यासंगाचा अर्थ नाहीं. त्यांचा व्यासंग म्हणजे एक ' प्रेमकथा ' आहे ! —एक 'रोमान्स' आहे ! 'एका अभिनव अध्यात्मसिद्धान्ताच्या चिंतनांत,

चित्रणांत आणि व्याख्यानांत रंगलेलें ऋषितुल्य पंडित "—असेंच राजवाडे यांचें वर्णन भावी इतिहासकाराला करावें लागेल. वेडगळ आणि क्षुद्र अहंकारानें त्यांच्या भेटीस जाणाऱ्याच्या वांट्यास त्यांचा तापट सडेतोडपणा कधीं कधीं येत असेल, पण प्रांजल आणि आदरयुक्त जिज्ञासेनें त्यांच्या अग्निहोत्र-मंदिरांत ( वस्तुतः तत्त्वज्ञानमंदिरांत ! ) प्रवेश करणारांस फार वेगळें जग नजरेस पडेल. एका वर्षीच्या त्यांच्या शारदीय ज्ञानसत्रांत लोकांच्या इच्छे-वरून त्यांनीं फ्रेंच रेव्होल्यूशनवर व्याख्यानें दिलीं. एका ' फ्रेंच रेव्होल्यूशन' या विषयावर सुमारें पन्नास-साठ व्याख्यानें देणें हें कामहि कमी परिश्रमाचें नव्हे; पण राजवाड्यांच्या ज्ञानसत्रांत परिश्रमापेक्षां प्रेम आणि काव्यमयता—रोमान्स—यांचाच सुगंध अधिक दरवळत असे. या एका व्याख्यानमालेकरितां दुर्मिळ फ्रेंच, जर्मन आणि इंग्लिश ग्रंथांतून निवडलेलीं शंभर-सव्वाशें ऐतिहासिक चित्रें त्यांनीं आपल्या द्वितीय कन्येकडून तयार करवून घेतलीं होतीं ! मोठ्या आकाराचीं, मुद्दाम काढवलेलीं व फ्रेम केलेलीं हीं चित्रें आजहि त्यांच्या घरीं जपून ठेवलेलीं आहेत. त्यांच्या फ्रेम्स्नाहि आजच्या काळांत सहज दोन-अडीच हजारांपर्यंत खर्च येईल ! तीं सांभाळणें म्हणजेहि एक म्यूझियम् सांभाळण्याइतकी तकलीफ आहे. या चित्रांचें प्रदर्शन त्यांनीं त्या सालच्या आपल्या ज्ञानसत्रासोबत मांडलें होतें. हें प्रदर्शन पाहण्यास अनेक युरोपियन विद्वान् गृहस्थ व त्या वेळचे मुंबईचे जे. जे. स्कूल ऑफ् आर्टचे डायरेक्टर व फ्रेंच कॉन्सलहि राजवाड्यांच्या निमंत्रणावरून आले होते !

हा सर्व ज्ञानदानाचा व्याप एक वयोवृद्ध पंडित केवळ एकट्याच्या खाजगी परिश्रमानें—स्वतःच्या राहण्याच्या घरांत करीत असे. असा एक मनुष्य म्हणजे पुणें विद्यापीठ होय !—नव्हे असा एक मनुष्य म्हणजेच जुन्या ज्ञानोपासक तपोधन महर्षींचा खराखुरा वारस होय !

पण विद्येचें आगर असलेल्या पुण्यानें या तत्त्ववेत्त्याचा आणि तत्त्वज्ञान मंदिराचा कोणता उपयोग केला ? किती पीएच. डी. चे विद्यार्थ्यांनीं त्यांच्याशीं विचारविनिमय केला ? त्यांनीं लेखनाच्या ओघांत सहज निर्मिलेलें सुंदर परिभाषिक शब्द किती भाषापंडित माहीत करून घेत आहेत ? किती संपादकांनीं त्यांच्याजवळ असलेल्या अपार ऐतिहासिक माहितीचा संग्रह त्यांच्या जिवंत वाणींतून ऐकण्याचा लाभ घेतला ?

क्षणभर आपण असें धरून चालूं कीं, त्यांची वृत्ति कडक होती व त्यांचीं मतें सनातनी होतीं. पण त्यांच्याजवळ असलेली अपार माहिती ही तर कडक, कडू किंवा सनातनी नव्हती ना? आणि गुरूचा कडकपणा सहन करूनहि त्याच्या 'गृहीं' राहून ज्ञान मिळविणें ही ज्या देशाची परंपरा, त्या देशांतली नवी पिढी, जिवंत ज्ञानकोश असलेल्या आणि स्वतःचीं ठाम मतें असलेल्या राजवाडे यांच्यासारख्या विद्वानानें सिनेमा नटासारखें 'मधुर' आणि 'आग्रहशून्य' बोलणें बोलावें असा आग्रह धरूं लागलीं तर दुर्दैवच नव्हे कां!

व्यक्तिशः माझा अनुभव वेगळा आहे. अशा अनेक जिव्हाळ्याच्या बाबी आहेत कीं, ज्यावर त्यांचीं मतें मला पटलेलीं नाहींत; पटण्याचा संभव नाहीं, आणि तरीहि त्यांच्या दृष्टिकोनाचें महत्त्व आणि त्यांच्या व्यासंगाचें विशालत्व मला पटतें;– इतकेंच नव्हे; तर एखाद्या निर्जीव ग्रंथालयाहून अगर गिरणी-वजा युनिव्हर्सिटीहून अशा जिवन्त ज्ञानोपासकाचा एक दिवसाचा सहवास हेंहि मी श्रेष्ठतर ज्ञानसाधन समजतों.

राजवाड्यांच्या संपन्न आणि संमिश्र ( Complex ) व्यक्तिमत्त्वाचें अस्फुट दर्शन देखील या लहानशा लेखांत घडेल कीं नाहीं याची मला शंकाच आहे. मग त्यांच्या विविध मतांचा आणि प्रधान सिद्धान्तांचा विचार करण्यास तर एक ग्रंथच लिहावा लागेल. महाराष्ट्रांत कर्तृत्वाची आणि व्यासंगाची उंची अलीकडे खुरटली आहे, असें आपण म्हणतों. पण ज्यांच्या कर्तृत्वाची किंवा व्यासंगाची आपण अशा प्रसंगीं इतकें हळहळून आठवण काढतों, त्यांचेंहि व्यक्तिमत्त्व एकांगी, एकारलेलें आणि न्यूनपूर्ण असल्याचेंच आपणांस आढळून येईल.

कुणाला अध्यात्माचें वावडें; कुणाला संगीताचें वावडें; कुणाजवळ इतिहास-समाजशास्त्राची शिदोरी नाहीं; कुणाला असलेलें ज्ञान व्यक्त करण्यास लेखनशैली नाहीं, अशी 'वैयक्तिक' हलाखीची स्थिति दिसून येईल. राजवाडे यांच्या विविध विद्यांचें आणि कलांचें वर्णन देण्याला स्वतंत्र लेख लिहावा लागेल! फ्रेंच रेव्होल्यूशनवर दोन महिने व्याख्यानें देणाऱ्या या पंडितानें पाश्चात्य आणि पौर्वात्य नाट्यकलेवर तितकींच व्याख्यानें एक वर्षीं दिलीं होतीं! शास्त्रीय व्यासंगापासून तों मुद्दाम निवडक गायक-गायिकांचीं गाणीं स्वतःच्या घरीं करण्यापर्यंत; अग्निहोत्र चालविण्यापासून तों स्वतः तबलावादनांत

निष्णात होण्यापर्यंत; पुरुष प्रकृतीची मीमांसा करण्यापासून तों लैंगिक विकृतीं-वर ग्रंथ लिहिण्यापर्यंत सर्वगामी बुद्धिमत्ता आणि व्यासंग महाराष्ट्रांत या महापुरुषाखेरीज अन्यत्र दाखविणें कठीण जाईल.

राजवाड्यांच्या अध्यात्मसिद्धान्तांचा येथें निर्देश करणेंहि दुष्कर आहे. तथापि त्यांच्या ग्रंथांच्या वाचकांना स्थूलमानानें एवढें दिसून येईल कीं, शांकराद्वैताच्या पकडींतून भारतीय तत्त्वविचारांची सुटका करणें हें त्यांच्या सर्व भाष्यग्रंथांचें उद्दिष्ट व सारसर्वस्व आहे. वेद, उपनिषदें व गीता 'द्वैताद्वैताची' चर्चा करीत नसून द्वंद्वनिर्द्वंद्वाची चर्चा करीत आहेत. सृष्टींतील द्वंद्वाची–अथवा Polarism ची–कल्पना येणें म्हणजे राजवाड्यांचें तत्त्वज्ञान समजणें होय; आणि द्वंद्व आणि द्वैत यांतील भेद कळणें म्हणजे शांकराद्वैताच्या चक्रव्यूहांतून सुटका होणें होय. आजवर ज्यांनीं शंकराचार्यांना विरोध केला, त्यांनीं अद्वैत खोडलें;–पण द्वैताची कल्पना पत्करली ! पण द्वैत आणि अद्वैत दोहोंचाहि जन्म श्रुतींत अथवा गीतेंत नसून शंकराचार्यांच्या कल्पनासृष्टींत आहे !

अर्थात् वर निर्देशिलेलें अध्यात्ममत अध्यात्माच्या क्षेत्रांत देखील क्रांति-कारक आहे; पण त्याचे इतर क्षेत्रांतील उपसिद्धान्त आणि परिणाम किती दूरगामी आहेत, हें पहायचें असल्यास राजवाडे यांचे कामशास्त्र, ज्योतिष-शास्त्र, षड्दर्शनसमन्वय, कलामीमांसा वगैरेवरील ग्रंथ पहावे. हेगेलचें 'Thesis', 'Antithesis' चें डायलेक्टिक् हेंहि द्वंद्वाधिष्ठितच आहे. पण वैदिक तत्त्वज्ञान, अखिल सृष्टींतील आणि विश्वांतील द्वंद्व शोधून काढून त्यावर विचार, आचार आणि समाज यांची उभारणी करतें; तर हेगेल आपल्या 'डायलेक्टिक' च्या बौद्धिक चौकटींत सर्व विश्वाला, प्रत्यक्ष इतिहासा-लाहि बसवूं पाहतो. म्हणून वैदिक–अर्थात् द्वंद्वनिर्द्वंद्वात्मक तत्त्वज्ञान–हें हेगेल्च्या डायलेक्टिकपेक्षां अधिक नैसर्गिक व व्यापक आहे.

अर्थात् वैदिक तत्त्वज्ञानांतीलहि 'पूर्वमीमांसा' हें राजवाड्यांच्या मतें सर्वांत अधिक मान्य असें 'दर्शन' होय. कारण यज्ञप्रधान धर्म हा व्यक्ति-वादी नसून समाजवादी ( समष्टिवादी ) धर्म आहे.

अर्थात् 'हेगेलियन डायलेक्टिक'पेक्षांहि राजवाडे यांच्या द्वंद्वाचा व्याप व वेग मोठा आहे ! त्यांच्या तत्त्वज्ञानांत सर्वांत अधिक नजिकचा

तत्त्ववेत्ता फ्रेडरिक नीत्शे होय व सर्वांत दूर शंकराचार्य होत ! यज्ञसंस्थेच्या समर्थनानें राजवाडे जुन्या लोकांना प्रिय होतात, तर शंकराचार्यांवरील हल्ल्यानें जुने लोक त्यांना अक्षरशः शिव्याशाप देतात !

पण आधुनिकांना राजवाड्यांचें 'जगत्सत्य' मानणारें समष्टिप्रधान, संन्यासविरोधी तत्त्वज्ञान अधिक जिव्हाळ्याचें वाटावयास हवें. कारण निवृत्ति आणि संन्यास यांनीं हें भारतवर्ष अवनतावस्थेला पोहोंचलें हेंच आम्हां आधुनिकांचें पालुपद नाहीं काय ?

अर्थात् राजवाडे गृहस्थाश्रमी होते व गृहस्थाश्रम हा सर्वश्रेष्ठ आश्रम होय असें मानणारे होते. ईश्वरकृपेनें एवढ्या ध्येयवेडांतूनहि त्यांनीं आपल्या प्रापंचिक जबाबदाऱ्या उत्तम प्रकारें पार पाडल्या. आजच्या काळांत कुणाचीहि नोकरी न पत्करतां आणि ज्ञानार्जन करीत गृहस्थाश्रम चालविणें किती कठीण आहे, हें सांगावयास नकोच. ग्रंथलेखन व व्याख्यान या दोन साधनांनीं राजवाडे यांनीं ज्ञानदानाबरोबर द्रव्यार्जनहि केलें आहे.

राजवाडे यांस तीन मुलगे ( प्रौढ मिळवते ) आणि चार मुली आहेत. त्यांच्या घरांत प्रौढ, सुशिक्षित सुना नांदत आहेत व नातवंडें खेळत आहेत. कर्तव्यदक्ष, भक्तिमान् व स्वतः राजवाडे यांस प्रिय असणाऱ्या अशा त्यांच्या सुशील पत्नींनीं त्यांच्या आदर्श गृहस्थाश्रमांत त्यांचें सहकार्य अखंड केलें. मुलांमुलींना राजवाडे यांनीं विद्या व आचार या बाबतींत स्वातंत्र्य दिलें. त्यांच्या एका मुलाला बेचाळीसच्या चळवळींत शिक्षा झाली होती.

जयप्रकाश नारायण व अरुणा असफअल्ली यांच्यासारखे समाजवादी पुढारी पुण्यांत येत तेव्हां पुण्यांतील तरुण समाजवादी कार्यकर्ते राजवाड्यांच्या वाड्यांतील प्रशस्त जागा चर्चादि कार्यक्रमांकरितां हक्कानें मागून घेत. स्वतः राजवाडे कोणत्याच राजकीय पक्षांत नव्हते. ' आमचे विचार त्यांना कांहीं मर्यादेपर्यंत परवडतील; पुढें आमचें त्यांचें जमणार नाहीं ! " असें ते सांगत.

खाजगी व्यवहारांत राजवाडे खणखणीत, रोखठोक आणि वास्तववादी होते. आधुनिक मानसशास्त्राच्या भाषेंत बोलायचें तर ते मनोगंडरहित ( Complexless ) होते. ते तुसडे किंवा एकलकोंडे मात्र नव्हते.

कोणाहि सरळ मनुष्यास ते प्रेमळ आणि अगत्यवान् होत असें आढळल्यावांचून राहणार नाहीं.

त्यांच्या या विलोभनीय, ऋषितुल्य गृहस्थाश्रमाकडे पाहिलें म्हणजे त्यांत एकच वैगुण्य वाटतें. एवढी ज्ञानगंगा, विद्यानगरी म्हणविणाऱ्या या पुणें शहरांत वहात असून तिजमधील विद्यार्थ्यांस मात्र त्या गंगेंत स्नान करण्याची क्वचितच बुद्धि झाली !

आणि बुद्धि झाली तरी तें कर्म सोपें नाहीं ! 'शिकवणें ही एक कला आहे,' हें आधुनिक शिक्षणशास्त्रानें ओळखलें; पण शिकणें हीहि एक कला आहे; ती या देशांत होती आणि ती आतां लुप्त होत चालली, हें आमचें गुरु-शिष्य आणि शिक्षण-शास्त्रज्ञ केव्हां ओळखणार ?

♣ ♣ ♣

: ५ :

# मानवेंद्रनाथ रॉय



जगप्रसिद्ध क्रांतिवादी राजकीय तत्त्ववेत्ता मानवेंद्रनाथ रॉय यांच्या शोचनीय निधनानें सभा गजबजून निघाल्या नाहींत; पण हिंदुस्थानमधील व जगामधील बुद्धिमंतांच्या मनांत गजबज झाली यांत शंका नाहीं.

रॉय यांच्या अतुल तेजस्वी जीवनाचा आरंभ दहशतवादी बंडखोर म्हणून झाला; पण त्यांच्या जीवनाचा अंत एक असामान्य तत्त्ववेत्ता म्हणून झाला. विसाव्या शतकांत घडत असलेल्या जागतिक इतिहासाकडे रॉय हे प्रायः एखाद्या योगेश्वर कृष्णाच्या समचित्तानें पहात असत आणि याच अर्थानें ते तत्त्ववेत्तेहि होते आणि तत्त्ववेत्त्यांतहि ते असामान्य होत. राष्ट्राराष्ट्रांचें राजकारण हा इतक्या निर्विकार आणि तरीहि सश्रद्ध !—चिंतनाचा विषय होऊं शकेल, ही कल्पना या अध्यात्मवादी भारतांत तरी रॉय यांच्या अवतारापूर्वी अशक्यच वाटली असती ! त्यांच्या त्या स्थितप्रज्ञ इतिहासमंथनाला उपमा काय ती मार्क्स आणि लेनिन या तत्त्वज्ञजोडीचीच देतां येईल.

पण कां कोण जाणे, रॉय यांचें व्यक्तिमत्त्व व चरित्र त्यांच्या या पाश्चात्य गुरुद्वयाच्या चरित्राहूनहि धीर गंभीर वाटते.

रॉय यांच्या वांट्याला थोर राजकीय कर्तव्यापेक्षां चिंतनच अधिक आलें. हें त्याचें कारण म्हणावें तर मार्क्सची स्थिति तीच होती. रॉय यांना मात्र आमची ही तुलना आवडली नसती. कारण निदान लेनिनला तरी ते प्रायः ....... काय मानीत तें शब्दांत सांगणेंच कठीण आहे.

रॉय हे विसाव्या शतकाच्या द्वितीय चरणांतील ( Quarter मधील ) बुद्धिवादी, क्रांतिवादी, मानवतावादी तत्त्वनेत्यांचे निःसंशय मुकुटमणि होते आणि अध्यात्मवादाबद्दल ख्यात अशा या भारतांतच तद्विरुद्ध दृष्टीनें दार्शनिकांचा मुकुटमणिहि जन्मावा, ही गोष्ट आश्चर्याची व अभिमानाची वाटते. पण रॉय यांच्या निधनानें आमच्या मनांत भारताहूनहि बंगालचा विचार अधिक आला. हिंदुस्थानचा हा पूर्वेकडील प्रान्त म्हणजे खरोखरीच एक अद्भुत देश–चांगल्या अर्थानें ‘ गौडबंगाल ’–आहे यांत संशय नाहीं. दोन वर्षांमागें योगिराज अरविंद समाधिस्थ झाले, तेव्हां जगाला वाटलें कीं, बंगालच्या प्रतिभेचा शेवटचा किरण अस्ताला गेला. पण असें म्हणणारे लोक केवळ अध्यात्माच्या पूर्वेकडे पहात होते. अध्यात्मवादाच्या पश्चिमेकडे धगधगत असलेला हा मानवेंद्र-भास्कर त्या वेळीं ते विसरले होते. पण आतां मात्र खरोखरच वाटूं लागलें कीं, रत्नखनीसारख्या वंगभूमीचा शेवटचा हिरा आज सर्वग्रासी काळाच्या पोटांत गडप झाला.

राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, रवींद्रनाथ टागोर, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, शरच्चंद्र चटर्जी, अरविंद घोष, जगदीशचंद्र बोस, मानवेंद्रनाथ रॉय............एकामागून एक इतकीं जगद्विख्यात माणसें हिंदुस्थानच्या दुसऱ्या कुठल्याहि भागानें दिलीं नसतील !

पण रॉय हे सर्वांहून अगदीं भिन्न जातीचे युगपुरुष होते, ही गोष्ट विसरतां येत नाहीं. युरोपीय तत्त्वचिंतनाच्या क्षेत्रांत मानवेतिहासाकडे केवळ बुद्धीनें व कठोर वास्तवनिष्ठेनें पाहून जें एक अपूर्व तत्त्वज्ञान उभारण्यांत आलें आहे, त्या हिमालयाचे रॉय म्हणजे एक उत्तुंग शिखर होत. ते कोणत्याहि विषयावर लिहोत; जुन्याच विषयावर पुन्हां नव्यानें लिहोत; स्वचरित्रांतील आठवणींसारख्या वैयक्तिक विषयावर लिहोत; कीं परराष्ट्रांत होऊन गेलेल्या क्रांतीवर लिहोत–त्यांचे शब्द म्हणजे स्थितप्रज्ञाच्या गंभीर वाणीसारखे वाटत.

अनुक्रम २८०८८ वि: ..७७...
क्रमांक ...२२८०५... नों दि: २४...

एखाद्या दूरस्थ, अचल आणि सनातन सत्यावर दृष्टि खिळलेली असल्या-खेरीज मानवी वाणीला ही स्थिरता, ही लयबद्धता, ही श्रद्धा प्राप्त होतच नाहीं.

अध्यात्मवादी असोत कीं अनात्मवादी असोत, असे पुरुष हे निःसंशय द्रष्टे होत; महर्षि होत.

रॉय यांनीं—मला वाटतें १९३६ सालीं फैजपूर येथील कॉंग्रेसमध्यें—सुमारें चाळीस मिनिटांचें जें भाषण केलें, त्याचा केवळ वर्तमानपत्री अहवाल वाचून ज्या संवेदना झाल्या त्या आम्हांला अद्याप स्मरतात. तें एकच भाषण ऐकूनहि विचारी मनुष्याला ‘ हा कोण संप्रति नवा पुरुषावतार ?’ असे उद्गार काढावेसें वाटलें असतें ! शाब्दिक तर्कशास्त्राखेरीज घटनांचें ( Events चें ), इतिहासौघांचें म्हणून एक लॉजिक असतें आणि तें शब्दांच्या खेळासारखें निर्जीव नसतें. हें सत्य तीन माणसांच्या लिखाणांतील एक एक पान वाचूनहि पटेल. तीं तीन माणसे माणसें म्हणजे मार्क्स, लेनिन आणि रॉय ! यानंतर १९३७ सालीं पुणें येथील वसन्त व्याख्यानमालेंत रॉय यांचीं मार्क्सवादावरच तीन व्याख्यानें झालीं. तीं ऐकून हा मनुष्य जागतिक राजकरणाचा दार्शनिक आहे याविषयीं पुरतीच खात्री पटली.

पण रॉय यांची मोहिनी किंबहुना कोणाहि खऱ्या महापुरुषाची मोहिनी म्हणजे भूमितीच्या सिद्धान्तानें किंवा बीजगणितांच्या फॉर्म्युल्यानें, घातलेली मोहिनी नव्हे ( आणि नुसते फॉर्म्युले, नुसतीं कोष्टकें मोहिनी घालूं तरी कशीं शकतील ? ) हें अमोघ आकर्षण त्यांच्या सिद्धांतांत नव्हतें; विद्वत्तेंत नव्हतें. ( तें बेपर्वाईनें, अडखळत आणि भाषेच्या चुका करीत बोलत ! ) मग तें आकर्षण कशांत होतें ?

तें मानवी भवितव्यासंबंधींच्या त्यांच्या दुर्दम्य श्रद्धेंत आणि स्वतः निवड-लेल्या मार्गासंबंधींच्या त्यांच्या जबरदस्त आत्मविश्वासांत होतें.

या श्रद्धेनें आणि आत्मविश्वासानें निर्जीव शब्द सजीव बनतात आणि साधीं माणसें अवतारी पुरुषाच्या झोकांत बोलूं लागतात.

पण या मुख्य गोष्टीखेरीजहि रॉय यांच्या आकर्षणाच्या अनुषंगिक बाजू सांगतां येणार नाहींत असें नाहीं. अगदीं मामुली गोष्ट ही कीं, जी शेंकडों

निर्बुद्ध लोकांनाहि लाभलेली असते. ती म्हणजे अप्रतिम शरीराकृति. ती या पुरुषाला शंभर टक्के लाभली होती. स्पेनमधील एका मोठ्या शहराच्या बाजारपेठेंत आपल्या बेताची ‘ वॉकिंग स्टिक ’ मिळवायला कशी पंचाईत पडली, याचें त्यांनीं एका ठिकाणीं वर्णन केलें आहे. सहा फुटांहून अधिक उंची, ताठ कणखर आणि मजबूत बांधा, वीरांना शोभेसें खंबीर जबड्याचें हाड व धारदार लांब नाक या सर्व संपदेमुळें या पुरुषापुढें उभें रहातांना एखाद्या कमांडरलाहि लाज वाटली असती. पण त्यांच्या विचारसंपदेप्रमाणेंच त्यांच्या शरीरसंपदेंतहि स्थिर अंशाहून चल ( Dynamic ) अंशांचेंच महत्त्व अधिक होतें. धिप्पाड रॉय यांस पाहून एखाद्या पर्वतशिखराचें स्मरण होण्याऐवजीं त्या शिखरावरील गगनभेदी गरुडाचेंच स्मरण अधिक होई. त्यांच्या व्यक्तिमत्त्वांतील हा संचारी भाव कोणत्या अवयवांतून व्यक्त होई ? मला वाटतें, बेपर्वाई आणि आत्मविश्वास यांनीं अक्षरशः फुरफुरणाऱ्या त्यांच्या नासिकाग्रांत-नाकपुड्यांत—व्यक्त होई. कांहींसा जीवणीच्या अकारण हालचालींतहि व्यक्त होई. पण रॉय यांच्या व्यक्तिमत्त्वांत जबरदस्त सामर्थ्य घालणारा घटक आणखी एक होता. तो घटक म्हणजे त्यांच्यांतील अतुलनीय आत्मनिरपेक्षता-Objectivity ! कर्तबगार पुढारी प्रतिभावान ग्रंथकार म्हटलें कीं, स्वयंकेंद्रित व आत्मनिष्ठ असावयाचे.

त्या अहंकारामुळें त्यांच्या शब्दांना व हालचालींना एक प्रकारची गोडीहि येते. पण शारीरिक व बौद्धिक देणग्या असामान्य असून त्या देणग्यांसंबंधीं परमावधीची बेफिकरी असेल तर त्याचा परिणाम इतरांवर विलक्षण होतो.

रॉय यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचें बीज आत्मविश्वास व आत्मनिरपेक्षता यांच्या अपूर्व मिलाफांत होतें.

मी स्वतः जडवादी नसल्यानें व मार्क्सवादी ‘ सुतराम् ’ नसल्यानें रॉय यांच्या विचारांच्या खंडनांतच लिहिलें आहे. आणि असें असूनहि आजच्या हिंदुत्वाला कोणत्या नमुन्याचे पुरुष ( Type of Manhood ) हवे आहेत, यासंबंधीं स्वप्न रंगवावयाचें असेल तर रॉयसारखे पुरुष हवेत असें मी एकाच शब्दांत सांगेन. जडवाद व बुद्धिवाद हे रुक्ष आणि वांझ वाद आहेत असा

माझा दावा असला तरी मी असें म्हणेन कीं, रॉयसारखे लोक हिंदुस्थानांत निर्माण होण्याची हमी असेल तर एका शतकापुरता हिंदुस्थाननें जडवाद देखील पत्करावा! भगवद्गीता आणि फुटबॉल यांतून आजच्या हिंदुस्थाननें फुटबॉलची निवड करावी असे कट्टे आत्मवादी विवेकानंद ज्या अर्थानें म्हणत त्याच अर्थानें आजच्या हिंदुस्थानला रॉयसारखे कणखर वास्तववादी हवेत असें मी म्हणेन.

प्रत्यक्ष राजकारणांत रॉय अलीकडे कांहीं वर्षें बाजूला पडले होते यांत नवलहि नाहीं आणि कमीपणा नाहीं. कमीपणा असलाच तर राजकारण या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या क्षेत्राला आहे. पक्षसंघटना, सत्तापहार, अनुयायांची सख्या या गोष्टींना महत्त्व न देतां तत्त्वप्रचाराला महत्त्व देणारा पुढारी राज्यकर्ता होण्याऐवजीं ज्ञानदाता झाल्याचेंच दृश्य इतिहासांत अधिक दिसतें.

सारांश तात्कालिक सत्तालाभापेक्षां चिरकालीन सत्तालाभाकडे रॉय यांनीं लक्ष दिलें व तें उघडया डोळ्यांनीं दिलें हें उघड आहे. ही सत्ता हा थोर तत्त्ववेत्ता आपल्या ग्रंथसंभाराच्या द्वारें अनेक देशांतील राजकारणावर अनेक शतकें गाजवील, याविषयीं आम्हांला शंका नाहीं.

रॉय यांच्या लिखाणांत एकच एक विचार, एकच एक सिद्धान्त अनंत प्रसंगांनीं व प्रमाणांनीं नटविलेला दिसेल. कोणाहि प्रेषितप्राय प्रचारकाला ही पुनरुक्ति करावीच लागते. तथापि रॉय यांनीं विविध देश व विविध जीवन पाहिलें होतें. अनेक विषयांतील त्यांच्या आवडी साध्या निकोप ( Normal ) माणसाला साजेशा होत्या. सुमारें दहा वर्षांमागें पुण्यांत रॅडिकल हुमॅनिस्टांच्या परिषदेच्या निमित्तानें रॉय आले असतां प्रस्तुत लेखकाला त्यांच्याशीं सुमारें दीड तासपर्यंत राजकारणेतर विषयांवर मनमुराद संभाषण करण्याची सुसंधि लाभली होती. आपली असामान्य बुद्धि, विद्वत्ता व कीर्ति साफ विसरून मजसारख्या सर्वस्वीं अनोळखी माणसाशीं समरस होण्याची शक्ति हें त्यांच्या खऱ्या थोरपणाचें व निर्भेळ निरहंकारित्वाचें लक्षण होय यांत शका नाहीं. आमचा हा राजकारणबाह्य विषयांवरील स्वैर संवाद त्या वेळीं इतका रंगला कीं, तर्कतीर्थ जोशी यांच्या संपादकत्वा-

खालीं त्या वेळीं निघत असलेल्या एका साप्ताहिकांत तो अक्षरशः ( संवाद-रूपानेंच ) प्रसिद्ध करण्यांत आला. प्रसिद्ध व्यक्तींच्या साधेपणाला हिंदुस्थानच्या सार्वजनिक जीवनांत कांहीं चमत्कारिक अर्थ येऊन बसला आहे. या दृष्टीनें रॉय यांचा साधेपणा वेगळा पण अस्सल होता असें मी म्हणेन.

रॉय हे राजकारणाच्या गर्दींतील पुढारी झाले नाहींत, हें आश्चर्यकारकहि नाहीं कीं वाईटहि नाहीं. तथापि त्यांची उपेक्षा झाली असें म्हणतां येत नाहीं. अखिल हिंदुस्थानभर थोडेच पण निष्ठावान् व बुद्धिमान् अनुयायी रॉय यांना लाभले होते. अत्यंत अडचणीच्या परिस्थितींतहि त्यांचें प्रख्यात साप्ताहिक उच्च विचारप्रसाराचें कार्य करीत होतें. त्यांचे ग्रंथहि एकामागून एक प्रसिद्ध होत होते. हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या व गतानुगतिक देशांत इतक्या क्रांतिकारक विचाराच्या मनुष्याची एवढी कदर केली गेली हेंच विशेष ! राजकारणाखेरीज अन्य क्षेत्रांत इतक्या स्वतंत्र विचारांचा व इतका निरिच्छ पुरुष असता तर त्याची याहूनहि उपेक्षा झाली असती.

रॉय यांच्या जीवनांत एकमात्र निखालस दुर्दैवाची घटना व ती म्हणजे डोंगराच्या कड्यावरून पडून त्यांना झालेली दुखापत ही होय. त्या दुष्ट अपघातानेंच रॉय यांचें आयुष्य निदान वीस वर्षांनीं कमी केलें असें कोणीहि म्हणेल. त्या अपघातांतून ते इतके दिवस वांचले यालाहि कारण त्यांच्या पत्नींनीं व अनुयायांनीं त्यांची निस्सीम प्रेमानें केलेली शुश्रूषा हेंच होय. हिंदुस्थानांतीलच काय पण जगांतील अनेक देशांतील बुद्धिमान् लोक या क्रांतिकारकाच्या व तत्त्ववेत्त्याच्या निधनानें दुःखी झाले असतील यांत शंका नाहीं.

हिंदुस्थानांत विद्येच्या पुनरुज्जीवनाची चळवळ युरोपप्रमाणें झाली नाहीं. ती व्हावयाला हवी हें रॉय यांच्या विचाराचें पालुपद असे. हें पुनरुज्जीवन त्यांच्या क्रांतिकारक ग्रंथांनीं व साप्ताहिकांनीं मोठ्या सामर्थ्यानें सुरू केलें व तेंच कार्य त्यांचे विद्वान् व निष्ठावान् अनुयायी पुढें चालू ठेवतील, असा विश्वास वाटतो.

♣ ♣ ♣

: ६ :

## वॉल्ट व्हिटमन



एखादें राजकीय तत्त्वज्ञान काव्याला स्फूर्ति देईल काय ?-आणि एखाद्या कवीच्या स्फूर्तींतून एखादें राजकीय तत्त्वज्ञान उदय पावेल काय ?-आणि एखाद्या कवीच्या स्फूर्तींतून आदर्श लोकशाहीचीं सूक्तें स्रवूं लागतील काय ?

आजच्या राजकारण-युगांत हे प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. हे प्रश्न क्वचित् विचारले गेलेहि आहेत. राजकारणी लोकांनीं त्यांचीं उत्तरें आपल्या सोयीप्रमाणें दिलींहि आहेत !

कवीच्या स्फूर्तींतून नवीं राजकीय तत्त्वज्ञानें स्रवल्याचीं उदाहरणें इतिहासांत अर्थातच अधिक आहेत. पण आधींच निघालेल्या राजकीय प्रयोगांवर लुब्ध होऊन काव्यरचनेला प्रवृत्त होणाऱ्या कवींचीं उदाहरणें केव्हांहि कमीच असणार ! राजकारणी लोकांच्या वाङ्मयीन अपेक्षा मात्र या ऐतिहासिक अनुभवाच्या उलट असतात ! " एखाद्या 'इझम्' वर अगर त्या 'इझम्' च्या तत्त्वानुसार चालू झालेल्या राज्ययंत्रावर साहित्यिक लोक अद्याप कसें साहित्य

प्रसवत नाहींत ? ” असा त्यांना प्रश्न पडतो; आणि साहित्यिकांच्या काल-पराङ्मुखतेवर त्या दोषाचें ‘ राजकीय खापर ’ फोडलें जातें !

उलट प्लेटो, रूसो, नीत्शे, गांधी, इक्बाल, सावरकर यांच्यासारख्या स्वप्नदर्शी ‘ कवीं ’च्या प्रतिभेंतून राजकीय तत्त्वज्ञानें आणि प्रयोग यांचा उदय झाल्याचें दाखवितां येईल. या महर्षींपैकीं प्रत्येकानें आपलें स्वप्न राज्य-रूपानें साकार होण्याची आशा केली. पण त्यांनीं कल्पिलेलीं राज्यें जन्मतःच तरी भंगलीं, नाहीं तर भंगलेलींच तरी जन्मास आलीं ! त्यांचीं ध्येयस्वप्नें मात्र वाङ्मयरूपानें अभंग राहून भावी राजकीय प्रयोगांना जन्म देणार आहेत. प्लेटोच्या आदर्श-राज्याचा उच्चार अनेक शतकें होत आहे व होईल; पण त्यानें वांछिलेले **फिलॉसफर राज्यकर्ते** अद्याप तरी जगांत अवतरलेले नाहींत. रूसोचें ध्येय आणि फ्रान्समध्यें प्रत्यक्ष घडलेली राज्यक्रांति यांत साधर्म्य वेताचेंच होतें. नीत्शेला हवा असलेला ‘ लोकोत्तर ’ मानव आणि नाझी-जर्मनीनें तयार केलेला मानव यांत कांहीं साम्य होतें, असें नीत्शेच्या द्रष्ट्यांखेरीज कोणीच म्हणूं धजणार नाहीं ! इक्बालच्या कल्पनासृष्टींतील इस्लामचें राज्य आणि पाकिस्तानमध्यें प्रत्यक्ष साध्य झालेली राजवट यांत काडीचेंहि साम्य नाहीं, हें इक्बालच्या ग्रंथांचे अभ्यासक जाणतातच. गांधींचें अहिंसानिष्ठ ध्येयराज्य आणि गांधींच्या कॉंग्रेसनें आज प्रत्यक्ष स्थापन केलेलें राज्य यांतहि साम्य तितपतच आहे. सावरकरांनीं रचलेलीं ‘ अभिनव ’ भारताचीं स्वप्नें आणि आजचा खंडित भारत यांतहि साधर्म्य अत्यल्पच आहे.

कविकल्पना आणि ऐतिहासिक घटना यांजमधील ही अपरिहार्य विपरीतता पाहतां, अमेरिकन लोकशाहीच्या दर्शनानें ज्याला स्फूर्ति लाभली अशा **वॉल्ट व्हिटमन** (१८१९-१८९२) सारख्या ‘ लोकशाहीच्या शाहिरा ’ची महती इतिहासांत अधिकच भासूं लागते. अमेरिकन वसाहती आपल्या मायभूमीपासून स्वतंत्र झाल्या त्या वेळीं अगर उत्तर आणि दक्षिण संस्थानांमध्यें उद्भवलेल्या अंतर्गत युद्धाच्या दिव्यांतून अमेरिकन ‘ रिपब्लिक ’ सहीसलामत बाहेर पडलें त्या वेळीं पाश्चात्य जगांत राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि इतिहास-शास्त्र यांचे नवे नवे विचार मांडले जात होते, यांत शंका नाहीं. तथापि

अमेरिकेंतील राज्यक्रांति ही कोणीं राजकीय सांप्रदायिकांनीं केलेली नसून, स्वातंत्र्यप्रेमी, पापभीरु, व्यवहारनिपुण अशा सर्वसामान्य वसाहतवाल्यांनीं केलेली होती. शेजारधर्म, माणुसकी, स्वाभिमान, रोकठोक व्यवहारवाद हेंच त्यांचं तात्त्विक भांडवल होतें. वॉशिंग्टन, फ्रँकलिन्, लिंकन यांच्यासारखे राष्ट्रनिर्माते मुत्सद्दी आणि इमर्सन्, थोरो, वॉल्ट व्हिटमन यांच्यासारखे तत्त्वज्ञ कवि यांच्या कृतींतून आणि उक्तींतून या नूतन राष्ट्राला कांहींसें अस्फुट तत्त्वज्ञान लाभत होतें. मूळ वसाहतवाल्यांचा कडक नैष्ठिकपणा ( Puritanism ) मागें पडून सृष्टि आणि मानव यांच्यामधील सौंदर्यावर आणि अद्वैतावर भर देणारें व्यापक गूढवादी तत्त्वज्ञान स्फुरूं लागलें होतें आणि स्वातंत्र्यभक्तीची परिणति लोकशाहीच्या पूजनांत होत होती; पण राजकीय आणि आध्यात्मिक या दोन्ही उत्साहांना मागें टाकणारा असा केवळ ऐहिक सुबत्तेचा म्हणून एक उत्साह अमेरिकेंत लवकरच एवढा उसळला कीं, अमेरिका हा कायमचा लक्ष्मीपूजकांचाच देश म्हणूनच ठरतो कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली. आजच्या अमेरिकेसंबंधींहि जगांत तीन सूर ऐकूं येतील. कोणी अमेरिकेच्या अफाट साधनसंपत्तीबद्दल आणि अफाट वार्षिक मिळकतीबद्दल बोलतील; कोणी अमेरिकेच्या आजच्या आंतरराष्ट्रीय ध्येयवादाबद्दल धन्योद्गार काढतील; तर कोणी अमेरिका हा एक पोरकट, चैनी आणि संयमहीन द्रव्यलोभ्यांचा मुलूख आहे असें म्हणतील.

आज जागतिक राजकारणांत अभूतपूर्व स्थान घेऊन बसलेल्या या महान् राष्ट्राच्या आध्यात्मिक भवितव्याचा विचार करणारा राष्ट्रीय कवि म्हणून वॉल्ट व्हिटमन याचें स्थान अपूर्व आहे; पण त्याला अमेरिकेचा राष्ट्रीय कवि म्हणण्यापेक्षां अमेरिकन लोकशाहीचा कवि म्हणणेंच अधिक युक्त होईल. अमेरिकेच्या भवितव्याचें रहस्य ‘ लोकशाही ’ या एकाच शब्दांत आहे, अशी त्याची श्रद्धा होती. पण लोकशाही हें व्हिटमनचें ‘ राजकारण ’ नसून तो त्याचा धर्म होता. एक प्रकारें तो स्वतःला अमेरिकन लोकशाहीचा प्रेषितच मानी, असें म्हटलें तरी चालेल. प्रख्यात अमेरिकन महर्षि थोरो जेव्हां व्हिटमन याची भेट घेण्याकरितां ब्रुकलिन येथें गेला, तेव्हां त्यानें त्याला पाहून “ Probably the greatest democrat that ever lived ” असे उद्गार काढले.

अमेरिकन लोकशाहीनें व्हिटमनसारख्या असाधारण ध्येयपूजक कवीला स्फूर्ति दिली हें तिचें इतिहासांत श्रेष्ठत्व म्हणून खासच गणलें जाईल. पण एखाद्या लोकशाहीचा शाहीर म्हणजे तिचा भाट नव्हे, हेंहि व्हिटमन याच्या वाङ्मयावरून लक्षांत आल्याखेरीज राहत नाहीं. किंबहुना एखाद्या राज्य-पद्धतीच्या अगर एखाद्या राष्ट्राच्या भक्ताला त्या राष्ट्राच्या उणीवा जितक्या तीव्रतेनें जाणवतात, तितक्या इतरांना जाणवणें शक्य नसतें.

व्हिटमन याच्या प्रख्यात '**तृणपर्णें**' ( Leaves of Grass ) या काव्यसंग्रहांत अमेरिकन राज्य, अमेरिकेचे अध्यक्ष व अमेरिकेचें सर्वसामान्य रहिवासी यांचे पवाडे जागजागीं गायिलेले आढळतात. पण तत्कालीन अमेरिकन समाज व वाङ्मय हीं त्याला किती अपूर्ण व उणीं वाटत होतीं हें पहावयाचें असेल, तर 'Democratic Vistas' ( **लोकशाहीचीं भावी दृश्यें** ' ) हा त्याचा प्रमुख गद्य प्रबंध पाहावा.

लोकशाहीची प्रतिष्ठापना एखाद्या परदेशी पार्लमेंटच्या 'ॲक्ट' नें तर होणें शक्यच नाहीं; पण स्वदेशांतील सशस्त्र क्रांतीनें अगर घटनासमितीनेंहि ती होणें शक्य नसतें. या साधनांनीं राजकीय लोकशाहीची स्थापना होईल, व फार तर खऱ्या लोकशाहीचा रस्ता साफ केला जाईल. खरी लोकशाही म्हणजे आध्यात्मिक लोकशाही होय. व्हिटमननें बाह्यक्रांति आणि अन्तःक्रांति ( Physical Revolution आणि Inner Revolution ) असा स्पष्ट फरक केलेला आढळेल. अमेरिकेच्या इतिहासांत ज्या विजयांना आणि क्रान्त्यांना मोठें महत्त्व आहे त्यांना तो केवळ बाह्य क्रान्त्यांत जमा करतो आणि आध्यात्मिक क्रांतीकरितां तळमळतो : " जगाची अर्थातच अशी कल्पना आहे आणि आमचीहि अशी कल्पना आहे कीं, समान मताधिकार, निवडून दिलेलें सरकार, कामगार वर्गाला प्रतिष्ठा मिळवून देणें आणि कसबी कामगारांचें आज्ञाधारक, शिस्तबद्ध, सुखवस्तु राष्ट्र बनणें एवढेंच युनायटेड स्टेट्स्‌चें ध्येय आहे. होय, अमेरिकेपुढील कार्याचे हे भाग आहेत यांत शंकाच नाहीं. पण तेवढ्यानें त्या कार्याची रूपरेषा संपते असें नाहीं .... कारण जोंपर्यंत अंतरंग बदललें नाहीं, तोंपर्यंत बहिरंगांत कोणताहि फेरफार झाला तरी त्याचा उपयोग नाहीं. "

व्हिटमन आध्यात्मिक लोकशाहीचीं स्वप्नें रचीत होता, त्या काळीं अमेरिकेनें राष्ट्रनिर्मितींतील दोन महत्त्वाचे टप्पे आधींच ओलांडले होते. पण अमेरिकेनें आपली राजकीय बैठक पक्की केली होती म्हणूनच व्हिटमन त्या-पुढच्या टप्प्याकरितां अधीर झाला होता. राजकारण झालें; आतां धर्म-विधि, समाजव्यवस्था वाङ्मय, शिक्षण, पोषाख या सर्वांची नवी रचना व्हावयास हवी. त्याकरितां अमेरिकन जीवनाच्या विविध अंगांचें संकलित चित्र ( 'Ensemble' ) न्याहाळलें पाहिजे. तो अमेरिकन राष्ट्राला विचारतो : "कारण आपण आज आहोंत, तसे विस्कळित आणि विभागलेले कसे काय राहूं शकूं ? ( "For how can we remain divided, contradicting ourselves this way? I say, we can only attain harmony and stability by consulting 'ensemble' and the ethic purports." — Vistas, p. 343 )

पण ऐक्याची त्याची कल्पना म्हणजे केवळ एखाद्या पक्षाचे, नेत्याचे अगर राजकीय 'इझम्'चे हुकूम सर्वांनीं सारखे पाळणें किंवा एका राजकीय कार्यक्रमांत बिनविरोध सामील होणें, एवढीच नव्हती. तत्कालीन अमेरिकन जीवनांत त्याला अंतर्विरोध ( 'Contradicting ourselves' ) दिसत होता. राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापित झालें होतें; परंतु वाङ्मय, विचार आणि आचार यांच्या क्षेत्रांत अमेरिकेचें पराधीनत्व संपलें नव्हतें. अमेरिकन साहित्यिक म्हणजे जुन्या युरोपियन साहित्यिकांची एक नक्कल, अमेरिकन मनुष्य म्हणजेहि युरोपियन माणसाची नक्कल—ही स्थिति त्याला नको होती. आपण जुनें राज्य संपुष्टांत आणलें, जुन्या संस्था आणि परंपरा विसर्जून टाकल्या—मग नवा मनुष्य अद्याप जन्माला कां येत नाहीं, अशी त्याला टोचणी लागली होती.

'अमेरिका' आणि 'लोकशाही' हे दोन समानार्थी शब्द होत, असें म्हणण्यापर्यंत व्हिटमन याची मजल गेली होती. पण त्याचें सर्वांगीण लोक-शाहीचें स्वप्न मात्र राज्यशास्त्रवेत्त्याचें नसून साहित्यिकाचें होतें. आणि म्हणूनच तें अधिक सजीव, सखोल आणि एकजीव होतें. 'देशांत सार्वत्रिक मतदान असेल, सार्वत्रिक शिक्षण असेल आणि तरी माझ्या प्रिय आस्थेवाईक

वाचकांनो ! ज्या मुख्य गोष्टी त्यांचीच अजीबात वाण असेल ! ' ( Vistas, p. 304 ) असे तो एके जागीं मोठ्या काकुळतीनें उद्गार काढतो. दुसऱ्या एके ठिकाणीं तो म्हणतो :

"I will not gloss over the appalling dangers of universal suffrage in the United States. In fact, it is to admit and face these dangers I am writing." त्याबरोबरच तो आपल्या वाचकांना असें स्पष्ट बजावतो कीं, लोकशाहीवरील आपला हा प्रबंध म्हणजे अर्थशास्त्रपठनाचें फळ नाहीं, तर शांततेच्या काळांत आणि यादवींच्या काळांत देशभर फिरून, सर्वसामान्य लोकांत मिसळून, समाजाचें अवलोकन करून जें मिळवलें त्याचें हें फळ होय. कायदेकानूंच्या रूपानें होणाऱ्या तांत्रिक लोकशाहीहून अधिक सजीव लोकशाहीचें स्वप्न त्याच्या डोळ्यांपुढें तरळत होतें. पण जगांत कोठेंच त्याला ती प्रत्यक्ष दिसत नव्हती ! राजकीय संस्थांचा परिपाक सामाजिक व्यवहारांत उतरला पाहिजे; सामाजिक व्यवहाराचा परिपाक व्यक्तिशः नागरिकाच्या बदललेल्या ढंगांत दिसला पाहिजे आणि या बदललेल्या नागरिकाचा अंतरात्मा काव्यांत, कथा-वाङ्मयांत, संगीतांत, शिल्पकलेंत दिसला पाहिजे. तसा तो दिसत नाहीं तोंपर्यंत, कोणतीहि नवी 'शाही' खरीखुरी रुजली असें म्हणण्यास व्हिटमन तयार नव्हता. तो चिडून म्हणतो :

"The United States are destined to surmount the gorgous history of feudalism or else prove the most tremendous failure of time." ( Vistas )

सरंजामशाहीचीं झगझगीत राजवट झटकून मागें टाकणें सोपें आहे, पण समाजमनांत सरंजामशाहीइतकें खोलवर जाऊन रुजणें मात्र सोपें नाहीं, याची कल्पना राजकीय नेत्यांहून व्हिटमनच्या कविमनाला अधिक होती. युरोपमधील ज्या क्षात्रधर्मप्रधान कालखंडा ( Age of chivalry ) चा प्रभाव व्हिटमनच्या काळापर्यंत प्रायःजसाच्या तसा होता, त्याचीं पाळेंमुळें समाजबंधनांत, धार्मिक समजुतींत, व्यक्तीच्या अंतःप्रेरणांत, हाडामासांत, जातकुळींत शेकडों वर्षें किती खोलवर गेलीं होतीं, याची त्यास जाणीव होती. त्या मानानें

लोकशाहींतून लोकसमूहाला मिळणारी स्फूर्ति किती अल्प आणि किती उथळ होती! सरंजामशाहींतील, म्हणजेच दाक्षिण्यप्रधान क्षात्रयुगांतील शिल्पकला, शिष्टाचार, राजधर्म, लोकधर्म, कुलाचार, काव्यसंगीतादि कला किती खोलवर पोहोंचल्या होत्या! लोकशाहीचीं गाणीं, लोकशाहीचीं मंदिरें कोठें आहेत? कीं, कायदे-कानूपुरती लोकशाही आणि अंतरंगांत मात्र पिढ्यान्‌पिढ्या मुरलेली सरंजामशाही?

व्हिटमनच्या कविमनाला सतावून सोडणारा हा प्रश्न अद्यापहि सुटला आहे, असें मला वाटत नाहीं. युरोपियन सरंजामशाहीची दरबारी 'आदब' स्वतंत्र अमेरिकेंत अद्यापहि खितपत आहे, म्हणून व्हिटमनला वाईट वाटे. पण ती पुरती मारून काढणेंहि अशक्य नाहीं. आणि तेवढेंच व्हिटमनला हवें असतें, तर आजच्या कांहीं लोकशाही देशांत व्हिटमन सुखानें नांदला असता. पण सरंजामशाहीची 'आदब' मारणें जितकें सोपें आहे, तितकें नवीन 'आदब' निर्माण करणें सोपें नाहीं. कारण स्वामिनिष्ठाप्रधान राज्य, उपचार, आचार, परंपरा आणि कला नाहींशा केल्यावर, बाजारीपणा, दुकानदारी, नफेबाजी आणि संभावित लुटारूपणा यांनाच एकदम ऊत आला! जुन्या जमान्यांतील साम्राज्यें, सामंत-मंडळें आणि देवस्थानें हीं जनतेला लुटीत असलीं, तरी त्यांना आपण 'लोकाधार' असल्याची जी श्रद्धा व जबाबदारी वाटत होती, ती नव्या युगांतील नफेबाज लुटारूंत कां निर्माण होत नाहीं? सारांश, मागासलेली स्वामिनिष्ठा आणि पुढारलेली 'नफा-निष्ठा' यांच्याव्यतिरिक्त एखादी नवी निष्ठा निर्माण करतां येईल काय, हा लोकशाही युगाचा मुख्य प्रश्न आहे.

व्हिटमनचें या प्रश्नाला पुढीलप्रमाणें उत्तर आहे :—

"Viewed today, from a point of view sufficiently over-arching, the problem of humanity, all over the civilized world, is social and religious, and is to be finally met and treated by literature. *The Priest Departs and the Devine Literatus Comes.*" —(Vistas, p. 304)

प्रसिद्ध इंग्लिश टीकाकार मॅथ्यू ॲर्नोल्ड यानेंहि भावी काळांत धर्मांची जागा काव्य आपल्याकडे घेईल, असें भाकीत केलें होतें. व्हिटमन यास आधु-

निक मानवतेचा प्रश्न हा राजकीय प्रश्न नसून धार्मिक प्रश्न आहे असें वाटत असून तो सोडविणारा नेता साहित्यिक हा होय, अशी त्याची श्रद्धा दिसून येईल. काव्य आणि कला हीं मानवी उद्धाराचीं प्रमुख साधनें मानणारांची कलेसंबंधींची कल्पनाहि, लोकशाहीसंबंधींच्या कल्पनेप्रमाणेंच सामान्यांहून वेगळी असणार हें उघड आहे. व्हिटमनच्या ' लोकशाही श्रद्धे ' ची सोपान-परंपरा पुढीलप्रमाणें सांगतां येईल. एकोणिसावें शतक संपून विसावें शतक सुरू होण्याच्या सुमारास राष्ट्राराष्ट्रांत विजेच्या साहाय्यानें नित्य आणि निकट संबंध ठेवतां येईल : पॅसिफिक आणि अटलांटिक हे दोन महत्त्वाचे महासागर आमचे ( अमेरिकनांचे ) झालेले असतील; आणि कोणा तरी एकाच राष्ट्रा-कडे जगाचें नेतृत्व आलेलें असेल ( आणि व्हिटमनच्या मतें जगाच्या इति-हासांत प्रत्येक कालखंडांत कोणा तरी एकाच राष्ट्राचें व्यक्तिमत्त्व प्रभावी ठरत असतें. ) आणि हें पुढारी राष्ट्र अमेरिका हेंच असणार हें उघड आहे. पण लक्षांत ठेवा, ( व्हिटमन बजावतो ) खरें, तेजस्वी जागतिक नेतृत्व संपत्ति, व्यापार अगर आरमार यांच्या जोरावर होत नसून, कोणाचें बौद्धिक दास्य न पत्करणाऱ्या, खंबीर, स्वतंत्र राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाच्या जोरावरच होतें. " या सिद्धान्तमालिकेच्या पुढचा व्हिटमनचा सिद्धान्त म्हणजे, ' वाङ्मय हाच तो राष्ट्रीय आत्मा होय.' (This soul, its other name in these 'Vistas' is literature). व्हिटमन म्हणतो, " प्राचीन यहुदी राष्ट्र अगर ग्रीक राष्ट्र यांच्या जीवनांतील आजहि अमर असा भाग म्हणजे त्यांचीं काव्येंच होत. "

हिंदुस्थानच्या व्यक्तिमत्त्वाचें दर्शन त्याच्या रामायण-भारतांत घडतें; ग्रीस आणि ज्यूडा यांच्या अंतरंगाचें दर्शनहि त्यांच्या काव्यांतच घडतें. इंग्लंडच्या आत्म्याचें दर्शनहि त्याच्या वाङ्मयांत घडतें. पण अमेरिकेचा आत्मा कोणता ? कारखाने, शेती आणि लाखों लोकांनीं गजबजलेलीं शहरें हाच एखाद्या राष्ट्राचा आत्मा म्हणतां येईल काय ? आणि याच आत्म्याच्या शक्तीवर तो देश जगाचें नेतृत्व करूं शकेल काय ?

माणसामाणसांतील उत्कट आणि प्रेममय सख्य हाच अमेरिकेचा आत्मा होय; आणि तोच आत्मा अमेरिकेच्या वाङ्मयांत आणि रीतिरिवाजांत व्यक्त

झाला पाहिजे, असें व्हिटमनचें म्हणणें होतें. पण नूतन काव्याची आणि शिष्टाचारांची व्हिटमन याची मागणी आणि प्रचारवादी लोकांची नव-वाङ्मयाची मागणी यांतील मूलभूत भेद ओळखला पाहिजे. व्हिटमनच्या डोळ्यांपुढें एक सद्भावना मूर्तिमंत उभी होती आणि ती काव्याचा विषय होण्यासारखी म्हणजेच प्रेममय आणि सुंदर होती. दोन नागरिकांतील साधा शेजारधर्मच इतका उत्कट आणि रमणीय झाला पाहिजे कीं, त्यानें निदान-पक्षी आज ललित-वाङ्मयांत आद्य रसाची जागा घेऊन बसलेल्या स्त्री-पुरुषांतील शृंगारिक आकर्षणाशीं टक्कर दिली पाहिजे, असा व्हिटमनचा आग्रह होता. तो म्हणे, त्याखेरीज आजच्या अमेरिकन लोकशाहींतील जडवादित्वाबद्दल आणि ग्राम्यतेबद्दल भरपाई होणार नाहीं आणि त्याखेरीज 'अध्यात्मीकरण'हि होणार नाहीं.

'Spiritualization of Politics' हा शब्दप्रयोग आपल्याकडे प्रथम ना. गोखले यांनीं केला आणि नंतर गांधीजींनीं तर त्याच्या प्रत्यक्ष प्रयोग-करितांच जन्म खर्ची घातला. व्हिटमन यानें 'Spiritualization of Democracy' असा शब्दप्रयोग केला आहे. आणि माणसांमाणसांत अत्यंत रमणीय नागरिकमैत्री निर्माण होणें म्हणजेच आध्यामिक लोकशाही निर्माण होणें होय, असा त्याचा सिद्धान्त आहे.

सर्वसामान्य मनुष्य, Average Man, हा लोकशाहीचा आद्य घटक होय. या सर्वसामान्य माणसावरच व्हिटमनचा भर होता. परंतु आंकडे-शास्त्रांतील गणिती 'ॲव्हरेज्' आणि व्हिटमनसारख्या कवीच्या दृष्टीला दिसलेलें 'ॲव्हरेज्' यांत फरक आहे, हें पुष्कळदां लक्षांत घेतलें जात नाहीं. सुप्रसिद्ध व्यक्तिवादी व आचारस्वातंत्र्यवादी लेखक डी. एच्. लॉरेन्स यानें व्हिटमन याच्या 'सामान्य' माणसाच्या पूजनावर कडाडून टीका केली आहे. ('Selected Essays : Democracy' पहा.) मानवी समता, मानवी हक्क वगैरेसंबंधींच्या घोषणा, 'सामान्य माणूस' हा प्राथमिक घटक समजूनच करण्यांत आलेल्या आहेत. डी. एच्. लॉरेन्स म्हणतो : "All these sweet abstractions rest upon the fatal little hypothesis of the Average...What is the Average ? As we are

all aware, there is no such animal. It is a pure abstraction." या काल्पनिक मानवी प्राण्याचा उपयोग फार तर फूटपट्टीप्रमाणें 'माप' म्हणून करतां येईल. पण आपण असे आचरट जंगली लोक आहोंत कीं, त्या फूटपट्टीचीच ( म्हणजे 'man in street चीच ) आपण पूजा करूं लागलों ! आहार-निद्रा-भय-मैथुन एवढ्यापुरतें सामान्य मनुष्याचें माप ठरवितां येईल. पण याच्या पुढच्या गोष्टींचा-गूढ आध्यामिक आकांक्षांचा-प्रांत सुरू झाला कीं, प्रत्येक मनुष्याचें माप स्वतंत्र आहे. आणि म्हणून मानवी समानता ही एक मूर्खपणाची कल्पना आहे, असें लॉरेन्स म्हणतो.

लॉरेन्ससारख्या प्रकृतिपूजकांची ही टीका राजकीय नियोजनांत गृहीत धरलेल्या 'माणसा' ला लागू पडली, तरी व्हिटमनच्या मानवपूजनाला लागू पडेलसें वाटत नाहीं. 'तृणपर्णें' या त्याच्या आद्यग्रंथाचें आद्यसूक्त पुढील पंक्तींनीं सुरू होतें :

" One's self I sing, a simple separate person
Yet utter the word Democratic the word En–Masse

आणि त्या सूक्ताचा शेवट,

The modern man I sing'

असा आहे. व्हिटमनच्या स्तोत्राचा विषय झालेला 'मानव' म्हणजे त्यानेसुमारींतील 'सामान्य' मानवहि नव्हे, कीं नीत्शेचा 'असामान्य' मानवहि नव्हे. तो सामुदायिक ( En-Masse ) मानव होता. पण अशा सामुदायिक प्रेमसिंचनाचीहि व्यक्तिवाद्यांनीं अनेकदां भरपूर थट्टा उडविली आहे. आधुनिक समाजशास्त्राचा जनक फ्रेंच तत्त्ववेत्ता आगुस्त कोम्ते याच्या मानवतापूजनाचा उल्लेख करून पुण्याच्या प्रसिद्ध डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल वेन थट्टा करीत : " Humanity ! What a poor substitute for a God ! " कोम्ते किंवा त्याचाच वैचारिक वारस जॉन स्टुअर्ट मिल् यांचें 'मानवतापूजन' नीरस आणि दरिद्री असेलहि. आणि तरी व्हिटमनच्या मानवतापूजनाचा अर्थ समजावून घेणें अगत्याचें आहे. कारण तें भिन्न आहे.

'मानवता', 'समूहात्मक मानव' हा काव्याचा विषय झाला पाहिजे, हा व्हिटमनचा आग्रह असला, तरी तो आजवर काव्य-विषय कां झाला

नाहीं, याचेंहि कारण व्हिटमन यास चांगलें अवगत आहे. अब्राहम लिंकन याचें "The Government of the people, by the people, for the people" हें प्रख्यात सूत्र राजकारणी पुढारी एखाद्या चुणचुणीत उखाण्याप्रमाणें वापरतात. पण त्यांतील people शब्दानें लिंकनसारख्याच्या अंतःकरणांत उभें राहणारें चित्र त्याच्या काळीं तरी फारच थोड्यांच्या डोळ्यांपुढें उभें रहात असेल ! आणि राजकारणांत मतें मिळविण्याकरितां अगर वाङ्मयांत 'आधुनिक' ठरण्याकरितां तो महामंत्र डोळे मिटून वापरणारांचीच संख्या अधिक ! डोळे उघडून होणाऱ्या व्यवहारांत राजे-राण्या-शेट सावकार यांच्यासारख्या गर्भश्रीमंतांच्या सहवासांत जें माधुर्य अनुभवास येतें तें ग्राम्य निर्धनांच्या सहवासांत कोठून येणार ? व्हिटमन म्हणतो : " राजेरजवाड्यांच्या पापाचरणांत आणि हलकटपणांतहि एक प्रकारची रोषणाई असते ! एक प्रकारचें Glamour असतें ! पण बिचाऱ्या बहुजनसमाजाचें मात्र वाक्यरचने-पासून केशरचनेपर्यंत सर्वच अशुद्ध आणि घाणेरडें ! "

सर्वसामान्य सुशिक्षिताची भावना ही वरील प्रकारची असते. पण म्हणून सामान्य जनसमूहाचें म्हणून एक वेगळें सौंदर्य नाहीं, असें कसें होईल ? मात्र तें पहाण्यास " कलावंताचें दुर्लभ विश्वसंचारी आणि अनंतानें उजळलेलें " असें मनच हवें असतें.

(" The people ! like our huge earth itself, which to the ordinary scansion, it is full of vulgar contradictions and offence, man viewed in the lump, displeases and is a constant puzzle and affront to the merely educated classes. The rare cosmical, artist-mind, lit with the Infinite, alone comfronts his manifold and oceanic qualities."—' Vistas ', p. 314. )

आपल्याला व्हिटमनचें लोकशाहीचें स्वप्न समजून घ्यायचें असेल, तर व्हिटमन हा मुळांत काय होता तें समजावून घेतलें पाहिजे. व्हिटमन 'राष्ट्रवादी' होता कीं आन्तरराष्ट्रीयवादी होता, लोकशाहीवादी होता कीं अध्यात्मवादी होता ? व्हिटमन याच्या गद्य लिखाणांत '**डेमॉक्रॅटिक व्हिस्टाज्**' या

प्रबंधास जेवढें महत्त्व आहे तेवढेंच '**लीव्हज् ऑफ ग्रास**' या काव्य-ग्रंथाच्या सुविख्यात व सुविस्तृत प्रस्तावनेस आहे. ही प्रस्तावना म्हणजे जणुं एखाद्या अर्वाचीन ऋषीनें एका बैठकींत, अखंड वाणीनें गायिलेलें आधुनिक उपनिषदच आहे, असें म्हटलें तरी चालेल ! व्हिटमनच्या मुक्तछंदात्मक काव्यांत अनेक जागीं रटाळ गद्यप्राय भाग आढळतो. त्या मानानें उलट त्याच्या काव्यसंग्रहाची प्रस्तावनाच अधिक काव्यमय आहे असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे. अर्वाचीन पाश्चात्य गद्यांत नीत्शे आणि इमर्सन् या दोघांच्या गद्याइतकें उत्स्फूर्त गद्य अन्य कोणाचें दाखविणें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पण 'लीव्हज् ऑफ ग्रास' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत व्हिटमन यानें निर्भेळ उत्स्फूर्ततेच्या बाबतींत या दोघां आधुनिक ऋषीनाहि मागें टाकलें आहे ! या प्रस्तावनेंत व्हिटमननें रेखाटलेलें अमेरिकन मनुष्याचें चित्र आपल्या राष्ट्रीय हेव्यादाव्याच्या युगांत जर कोणीं उद्धृत केलें, तर तो अमेरिकेचा पक्षपातीच काय, पण आश्रितहि गणला जाण्याचा संभव आहे ! पण ज्याला, 'एका राष्ट्रासंबंधींचें प्रेम म्हणजे दुसऱ्या राष्ट्रासंबंधींचा द्वेष' हें आधुनिक राजकीय समीकरण अंतिम सत्य वाटत नसेल, त्यानें व्हिटमनकृत 'अमेरिका-प्रशस्ति' जरूर वाचावी ! आजच्या अमेरिकन नागरिकांचें वर्णन म्हणून रुचत नसेल तर निदान लोकशाहीच्या युगांतील आदर्श राष्ट्राचें आणि आदर्श नागरिकांचें स्तोत्र म्हणून तरी हें काव्यमय गद्य वाचण्यासारखें आहे :

"Here is not merely a nation but a teeming nation of nations...The freshness of candour of their physiognomy —the picturesque looseness of their carriage–the fierceness of their roused resentment–their curiosity and welcome of novelty–the air of their persons who never knew how it felt to stand in the presence of superiors – the terrible significance of their elecions–these, too, are unrhymed poetry...the United States themselves are essentially the greatest pomes. ...*

* येथें मुळांतील काव्यमयतेचा नव्हे, तर व्हिटमनच्या अमेरिकन स्वभावासंबंधींच्या कल्पनेचा नमुना देण्याचा उद्देश असल्यानें, अवतरण तुटक घेतलें आहे. शेवटचें वाक्य तर क्रम सोडून मागचें पुढें घेतलें आहे.

व्हिटमनची ही स्वजनप्रशस्ति वाचतांना तो केवळ राष्ट्रवादी नव्हता, तर विश्वबंधुत्ववादी व अध्यात्मवादी होता, हें लक्षांत घेतलें पाहिजे. त्याची जाणीव व्यापक आणि सर्वसंग्राहक झालेली असल्यानें त्याला ( ब्रिटिश ज्ञानकोशानें म्हटल्याप्रमाणें ) विसंगत विधानांची भीति वाटेनाशी झाली होती ! ( Such large perception freed him from the dread of inconsistency."— Encyclopeadia Britannica)· जो व्हिटमन स्वजातिबांधवांचें एवढें काव्यमय स्तवन करतो, तोच 'डेमोक्रॅटिक व्हिस्टाज्'.मध्यें समकालीन समाजाच्या नैतिक आणि सांस्कृतिक अवनतीचें चित्र पुढीलप्रमाणें काढतो. "आणि आज सभोंवारचा कल्पनातीत थिल्लरपणा, पक्षोपपक्षांतील जळफळाट, बेइमानी, पहिल्या दर्जाच्या नेत्यांचें आत्यंतिक दुर्भिक्ष आणि या सर्वांच्या भरीला सामान्य लोकसमूहांत आढळणारा बेसुमार क्षुद्रपणा आणि ग्राम्यपणा आणि त्याच्याहि भरीला प्रतिवर्षी अधिकाधिक भीषण होणारा मजुरांचा प्रश्न, या सर्व आपत्तिचक्रांतून अमेरिका बाहेर पडणार तरी कशी ?" ( Vistas, p. 355. गोषवारा ).

विश्वाच्या बुडाशीं असलेल्या अंतिम सत्यावर, सौंदर्यावर, शहाणपणावर आणि निरामयतेवर व्हिटमनचा दृढ विश्वास होता ! आधुनिक विज्ञानानें तो विश्वास डळमळीत होण्याऐवजीं दृढमूल व्हायला हवा, असा त्याचा आग्रह होता. आजच्या जगांतील राहणी अत्यंत कृत्रिम आणि जडवादी आहे. आजचा मानवी विकास म्हणजे केवळ मेंदूचा केलेला विकास होय. आज दारिद्र्यामुळेंहि मनुष्याची अवनति होत आहे आणि संपत्तीनेंहि अवनतीलाच हातभार लागत आहे. आज मानवी सद्गुणांचे उच्च आदर्शच नाहींत. अशा शेंकडों कुप्रवृत्ति आहेत कीं, ज्या सहज मारून टाकतां येतील, पण ज्या आज जणुं एक सांचाच्या ओतीव लोखंडी पिढ्या निर्माण करीत आहेत ! या सर्व केवळ बुद्धिवादी आणि केवळ देहवादी प्रवृत्तींना जर तितक्याच प्रबळ अध्यात्मवादी प्रवृत्तींनीं टक्कर दिली नाहीं, तर आधुनिक संस्कृति नाश पावेल, असा त्यानें स्पष्ट इशारा दिला आहे. ( Vistas, p. 357. गोषवारा. )

आज नव्या पौरुषाचा नमुना हवा आहे, नवा मानव हवा आहे, नवा पुरुष, नवी स्त्री हवी आहे, असा त्याचा आक्रोश होता. केवळ अमेरिकन

मानवच नव्हे तर सर्व जगांतील आधुनिक मानव लोकशाहीच्या मार्गी विकासाची आणि पूर्णत्वाची वाट चालत आहे, असा त्याचा विश्वास होतें. हा नवमानव होत आहे तरी कोणत्या स्वरूपाचा ? ' अभिमानी, उद्धत, न्यायप्रिय, सहिष्णु, स्नेहाळ, स्त्रीला समान योग्यतेची मानणारा, प्रगतिप्रिय असूनहि भौतिक प्रगति म्हणजेच अंतिम ध्येय मानणाऱ्या विचारसरणीचा धिक्कार करणारा ' असा मानव आज निर्माण होत आहे, हा व्हिटमन याचा विश्वास होता.

हा मानव अमेरिकेंत वावरत आहे, असें त्याला श्रद्धेच्या आणि प्रसन्नतेच्या क्षणीं दिसे ! तर उलट निराशेच्या क्षणीं त्याला अमेरिकेचें भवितव्य तरी काय, असाहि प्रश्न पडे ! अमेरिकेंत व्हिटमनच्या कसोटीला उतरण्यासारखीं माणसें किती आहेत, या प्रश्नापेक्षांहि, माझ्या मतें, अमेरिकेसारख्या बाल-राष्ट्रानें नवमानवाचा एक ' मानदंड ' निर्माण केला, या गोष्टीला अधिक महत्त्व आहे. अमेरिकेंत तरी खऱ्या ' अमेरिकनां'ची संख्या किती आहे, हा मनोरंजक प्रश्नहि कांहीं अमेरिकाभिमान्यांनीं चर्चिला आहे आणि अस्सल अमेरिकन म्हणून घेणें किती कठीण आहे, तें मोठ्या अभिमानानें कथन केलें आहे. " The Democracy of Mark Twain " या मथळ्याखालीं मार्क ट्वेनसंबंधीं लिहिणाऱ्या एका टीकाकारानें या बाबतींतील अमेरिकन अभिमान पुढीलप्रमाणें व्यक्त केला आहे : ( लेखनकाल १९१० ).

" अमेरिकेंतील दहा कोटी लोकांना आम्ही ' अमेरिकन ' गणतों, अशी कोणाची कल्पना असेल तर ती चूक आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, आमच्यांतील ( अस्सल ) अमेरिकनांची संख्या आम्ही हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच मानतों ! नुसता कायदेशीर अमेरिकन नागरिक व्हायला काय ?–अमेरिकेंत जन्म घेतला म्हणजे बस् ! परंतु खरा 'अमेरिकन' होण्याला कांहीं वेगळेच गुण लागतात ! " असें म्हणून पुढें लेखकानें " प्रत्यक्ष अमेरिकन राष्ट्राचा जनक वॉशिंग्टन हाहि या कसोटीला उतरत नाहीं; कारण He lacked a certain indispensable tang ! * " असें म्हटलें आहे !

* Tang म्हणजे झणझणीतपणा, खणखणीतपणा.

प्रखर विह्टमनच्या मानवी आदर्शांच्या वर्णनांतहि धाडसीपणा, बेफिकीरपणा, फुरकारपणा या गुणांना जणुं आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झालेलें दिसेल. आपल्या विख्यात प्रस्तावनेंत तो लिहितो :

"..to speak in literature with the perfect insouciance† of the movement of animals ... is the flawless triumph of art" तसेंच ' लीव्हज् ऑफ् ग्रास ' मधील एका धुंद, कलंदर वृत्तीच्या कवितेंत तो म्हणतो :

One hour to madness and joy !
O furious ! O confine me not.
* * *
O to speed, where there is space
enough and air enough at last !
* * *
To find a new non-chalance with
the best of nature !
To have the gag removed from
one's mouth !
To have the feeling today
or any day.
— I am sufficient as I am." *

आजच्या जगांत लोकशाही आणि कम्युनिझम् असे दोन तट पडले आहेत आणि या दोन तटांतील कोणत्या तटाकडे जावें, असा प्रश्न जगांतील

† Insouciance या फ्रेंच शब्दाचा अर्थ carelessness, thoughtlessness असा आहे.

* या कवितेंतील बंधनातीत होण्याच्या ऊर्मींची तुलना माधव ज्यूलियन् यांच्या ' तेथें चल राणी ' मधील ऊर्मींशीं करावीशी वाटेल. पण माधव ज्यूलियन यांस समाजाचें तर राहोच, पण पद्यरचनेचेहि कृत्रिम बंध तोडवत नसल्यानें त्यांची कविता व्हिटमनच्या या बेबंद ऊर्मींच्या मानानें दुर्बल वाटते.

दुय्यम राष्ट्रांपुढें उभा आहे. तात्पुरती राजकीय सोय म्हणून अमेरिकेशीं अगर रशियाशीं घरोबा करणें वेगळें; पण या दोन बलाढ्य राष्ट्रांपैकीं कोणें राष्ट्र आज उच्चतर ध्येय साध्य करीत आहे, असा स्वतःच्या मनाशीं विचार करतांना, आपलीं स्वतःचीं मूल्यें निश्चित हवींत. कोणताहि धर्म अगर कोणतेंहि राज्य बरें कीं वाईट, हें ठरविण्याची अखेरची कसोटी म्हणजे त्या राज्यांत अगर धर्मांत कोणत्या नमुन्याचा मनुष्य तयार होतो हीच आहे. आणि त्याच्याहिआधींची कसोटी म्हणजे कोणत्या नमुन्याचा मानव त्या राज्याच्या प्रवर्तकांनीं डोळ्यांसमोर ' आदर्श ' म्हणून ठेवला आहे, ही होय. यंत्र-युगांतील कार्यक्षमता संपादल्यानंतरहि ज्यानें सात्त्विकता, सौजन्य, प्रसन्नता, आस्तिक्यबुद्धि यांसारखे दैवी गुण गमावले नाहींत, असा मनुष्य व्हिटमनला हवा होता, हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून थोडेंफार स्पष्ट झालें असेल, अशी समजूत आहे. व्हिटमन हा 'आधुनिक मानवा'चा शाहीर आहे, सामुदायिक आणि सामान्य माणसाचा शाहीर आहे. आणि तो मानव निर्भय, सरळ, प्रेमळ, ' आधुनिक ' दृष्टीचा आणि तरी सश्रद्ध असा पाहिजे, असा त्याचा संदेश आहे. उत्पादन, यंत्रसाहित्य आणि शास्त्रीय ज्ञान यांतील निव्वळ ' प्र-गति, ' अंधपणें पुढें जाणें, हें त्याला पुरेसें वाटत नाहीं. तो केवळ प्रगतीचा भोक्ता नाहीं, तर मुक्ततेचा, श्रद्धेचा आणि मानवी सौहार्दाचा भोक्ता आहे. पण हीं सात्त्विक मूल्यें कायदेबाजी, घटनाबाजी आणि संस्थाबाजी ( ' mere institutionalism ' ) यांतून निर्माण होणें शक्य नाहीं, हा त्याचा आणखी एक महत्त्वाचा सिद्धान्त आहे. साध्यासुध्या माणसांतील ईश्वरदत्त चांगुलपणा आणि ईश्वरी योजनेंतील मांगल्य यांचा घरोघर, रानोरान, पानोपान निःशंक अनुभव घेणारें आणि तो प्रामाणिकपणें जसाच्या तसा रंगविणारें ' वास्तववादी ' काव्य—यांच्याच द्वारें नव्या मानवाचा आणि आध्यात्मिक लोकशाहीचा उदय होईल, अशी त्याची दुर्दम्य श्रद्धा होती.

या आधुनिक पण आध्यात्मिक मानवतेचें आणि लोकशाहीचें पोषण व्हिटमनची अमेरिका करणार, कीं लेनिनचा रशिया करणार, कीं गांधींचा हिंदुस्थान करणार, या प्रश्नाचें उत्तर राजकारणी लोकच देऊं शकतील ! तें

प्रस्तुत लेखाच्या कक्षेबाहेर आहे. आदर्श ठरविणें मुख्य आहे; त्या आदर्श-प्राप्तीकरितां कोणत्या राजकीय गोटांत शिरावयाचें, हा प्रश्न गौण आहे !

लोकशाहीचा व मानवतेचा एक स्फूर्तिदायक आदर्श आधुनिक जगापुढें ठेवण्याचें कार्य व्हिटमन यानें केलें आहे आणि त्याला ती स्फूर्ति पुरविण्याचें कार्य ‘ युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिका ’ या अर्वाचीन इतिहासांतील विख्यात लोकशाहीनें केलें आहे, एवढें मात्र खरें.



## : ७ :

# श्री अरविंद

जगद्विख्यात भारतीय सिद्धपुरुष श्रीअरविंद घोष यांचें निर्याण म्हणजे अर्वाचीन भारताच्या उज्ज्वल पुनरुत्थापनपर्वाच्या शेवटच्या अंकाची समाप्ति होय. भारताचे राजकीय लढे त्याच्या जिवन्तपणाचे पुरावे असतील; पण त्याच्या अपूर्व भवितव्याचे आणि भविष्याचे पुरावे पहावयाचे असतील, तर त्याच्या आध्यात्मिक कर्तृत्वांतच पहावयास सांपडतील. राजकीय स्वातंत्र्याचा लढा फिलिपाईन बेटें, हिंद एशिया, मलाया यांसारखे देश–कीं, ज्यांना हिंदुस्थानसारखा उज्ज्वल इतिहास नाहीं–तेहि चालवितात. तथापि महापुरुषांची आणि सिद्ध पुरुषांची अखंड परंपरा व त्यांच्या द्वारें महान् अध्यात्मदर्शनांची अखंड परंपरा जगाला देऊन जगाचें गुरुत्व करणें, हें हिंदुस्थानचें अद्वितीय भाग्य आहे. ज्यांना हें मत म्हणजे भाबड्या देशभक्तीची खुळी कल्पना वाटत असेल, त्यांनीं आजच्या अवनत कालांतहि हिंदुस्थाननें जगाला दिलेल्या दैवी पुरुषांची सूर्यमाला पहावी आणि जगांतील कोणत्या राष्ट्रांत इतके थोर पुरुष एका शतकांत निर्माण झाले आहेत तें सांगावें ?

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम २४०६६ दि: १०.
क्रमांक ७७०५ मो. दि. ७५१

रामकृष्ण परमहंसांनीं आपल्या आशिक्षित पण साक्षात्कारी वाणीनें बंगालच्या सुशिक्षित पिढीला आकर्षून घेतल्यापासून तहत गेल्या ५ डिसेंबरपर्यंत, ईश्वराला आव्हान देणाऱ्या या आधुनिक नास्तिक जगताला प्रथम स्वत: ईश्वर पाहून मग ईश्वरी मार्ग दाखविण्याचें कार्य कोणता एकच देश करीत असेल तर तो हिंदुस्थान होय. अरविंद आणि रमण महर्षि यांचें एकाच वर्षीं महाप्रयाण घडल्यानें, प्राचीन ऋषींच्या मंत्रांचें जिवन्त दर्शन घडविणारा विख्यात महापुरुष आज उरला नाहीं म्हटलें तरी चालेल. तथापि श्री जे. कृष्णमूर्ति हे भारतीय वा अन्य कोणतीच परंपरा मानणारे नसले तरी अरविंद अगर रामकृष्ण यांच्या साक्षात्कारी अधिकारानें जगाला अध्यात्माचा उपदेश करण्याकरितां आपणांत आहेत व त्यांच्या द्वारें जगद्गुरुत्वाची परंपरा आजहि अखंड चालू आहे, हें आपणांस विसरतां येत नाहीं.

अध्यात्माला एक ‘खूळ’ समजणारे लोक सर्वच काळांत आढळतात. हल्लींच्या काळांत तर सर्व पक्षांना स्वपक्षमंडनाचीं अधिक घवघवीत साधनें उपलब्ध असल्यानें अध्यात्मविरोधी लोकहि अधिक वाक्चतुर झाले आहेत. पण नास्तिक्याच्या वाढीबरोबरच आस्तिक्याचीहि वाढ झाली आहे, ही गोष्ट कित्येक लोक विज्ञानज्वराच्या उन्मादांत विसरतात. खरी गोष्ट ही आहे कीं, जगांतील आस्तिक्याची आणि नास्तिक्याची बेरीज आजहि पूर्वींइतकीच आहे. वाढ झाली आहे ती दोहोंच्याहि मांडणींत झाली आहे· कारण मांडणी ‘विज्ञाना’वर अवलंबून असते, तर मूळ ज्ञान हें साक्षात् दर्शनावर अवलंबून असतें. पण आस्तिक्य आणि नास्तिक्य, इस्लाम आणि कुफ्र, दैवी संपत् आणि आसुरी संपत् यांच्या या ऐतिहासिक लढ्यांत आजतागायत केवळ ‘बरोबरी’ झाली आहे, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. विज्ञानाच्या वाढी-बरोबर आस्तिक्य—सूर्योदयापुढें ध्वान्त पळून जातें त्याप्रमाणें—पळ काढीत आहे हा भ्रम मात्र खुळेपणाचा ठरत आहे. बर्गसाँसारखे विद्वान् पंडित आणि अरविंदांसारखे पाश्चात्यविद्या-पारंगत हेहि दक्षिणेश्वरच्या निरक्षर रामकृष्णांप्रमाणेंच ‘कालिमाते’च्या अगर व्हर्जिन मेरीच्या साक्षात् दर्शनाच्या धुंदीनें वेडावून गेलेले पाहिले म्हणजे नास्तिक्याला विसाव्या शतकांत आलेलें बाळसें ज्ञानावर आधारलेलें नसून अज्ञानावर आधारलेलें आहे, असें दिसून येईल.

श्री अरविंदांच्या महाप्रयाणानतर त्यांच्या अद्भुत जीवनांतील घटनांची उजळणी वृत्तपत्रांनीं केलीच आहे. श्री अरविंद यांनीं केंब्रिज युनिव्हर्सिटीचा क्लासिकल ट्रायपॉस मिळविला होता व ते पहिल्या वर्गांत आले होते. आय्. सी. एस्. परीक्षेंतील ग्रीक-लॅटिनच्या 'पेपर्समध्यें' तर त्यांना जेवढे मार्क मिळाले तेवढे त्या परीक्षेच्या इतिहासांत कोणालाच मिळालेले नव्हते. श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं, आपल्या अचूक दृष्टीनें हेरून हें रत्न आपल्या राज्यांत आणल्यावर त्यानें ऐहिक कर्तृत्वाच्या सर्व कसोट्या उतरून दाखविल्या. अरविंदबाबू प्रथम रेव्हिन्यू डिपार्टमेंटमध्यें काम करीत असत. श्रीमंत सयाजीरावांसारख्या कुशाग्र बुद्धीच्या कडक महाराजांची या तरुण सिव्हिल सर्व्हंटावर बहाल मर्जी होती. यावरून संस्थानी रेव्हिन्यू खात्यांतील किचकट कामहि हा जन्मजात कवि लीलेनें आटोपी, हें उघड आहे.

वंगभंगाच्या तेजस्वी चळवळींत नवभारताच्या डोळ्यांत प्रथम भरलेला हा दैदीप्यमान तारा पुढें सतत चाळीस वर्षें गूढवादाच्या गुहेंत लपला म्हणून कित्येक पराक्रमी राजकारणभक्तांनीं खेद केला आहे. राजकारणांतील पराक्रमी पुरुषांचे हर्ष आणि खेद पुष्कळदां उथळ ज्ञानावर आणि उथळ आकांक्षांवर अधिष्ठित असतात. अरविंदासंबंधींचा हा राजकारणी खेदहि तसाच आहे. अरविंदबाबू राजकारणांतून परतून योगसाधनांत शिरले नव्हते, तर योग-साधनेंतून किंचित्काळ मागें सरकून राजकारणांत शिरलेले होते, ही गोष्ट लोक विसरतात. चौदा वर्षें इंग्लिशस्तानमध्यें काढलेला, जन्मभाषेची व बाळपणाचीहि ओळख त्या वेळीं विसरलेला हा करडा हपिसर सेक्रेटरिएट-मध्यें गेला असता तर मुंबईकर पट्टेवाल्यानें त्याला 'नो व्हेकन्सी' असें सांगून बाहेर घालविला असता, इतका त्याचा पोषाख जाडाभरडा असे. वृत्तीनें ते पहिल्यापासून अत्यंत सात्त्विक आणि ईश्वरपरायण असत. त्यांना विषयविष्ठेमागें धावणाऱ्या या ओढाळ दुनियेचा तिळमात्र संपर्क नव्हता. त्यांना कसलेंहि अन्न, कसलेंहि कपडे, कसलेंहि घर, कसलेहि नोकर-चाकर चालत असत. बडोद्यांत ते जसल्या घरांत रहात, तसल्या घरीं त्यांच्या आसिस्टंटचे आसिस्टंटहि राहिले नसते. अहोरात्र ध्यानांत आणि परमात्म-चिंतनांत ते दंग असत. बडोदा कॉलेजांत प्रोफेसर आणि व्हाईस प्रिन्सिपॉल म्हणून काम करीत असतांना तेथील युरोपियन प्रिन्सिपॉलनीं प्रा. घोष यांची विर्दहा

90243

अवस्था पाहून सेंट जोन या इतिहासप्रसिद्ध साक्षात्कारी फ्रेंच बाईचें स्मरण होत असल्याचें नमूद केलें आहे. अरविंदबाबूंच्या बालपणच्या आठवणी उपलब्ध नाहींत. परंतु ते अकरा वर्षांचे असतांनाचा फोटो मात्र उपलब्ध आहे. लहान मुलें बहुधा मधुरदर्शनच असतात पण त्या फोटोंतील चेहऱ्याइतका सात्त्विक, इतका मधुरभाव, इतका other-worldly चेहरा माझ्या तरी पहाण्यांत नाहीं !

सांगावयाची गोष्ट ती ही कीं, हा पुरुष राजकारणांत पडला हेंच उलट आश्चर्य आहे. राजकारणांत पडणारांचे चेहरे असे नसतात. आणि खरोखर अरविंदबाबूंच्या राजकारणाचा चेहराहि वेगळा होता. ते बॉंबच्या खटल्यांत सांपडल्यामुळें कित्येकांना त्यांच्या राजकारणांत प्रथम कांहीं जळजळीतपणा दिसत होता, तो त्यांच्या ध्यानधारणेमुळें अखेर मळमळीत ठरला, असा भ्रम झालेला दिसतो. पण त्यांच्या राजकारणाचा तोंडावळा सावरकर, खुदीराम, भगतसिंग यांच्या राजकरणासारखा नव्हता. टिळकांच्या राजकारणासारखाहि नव्हता. तो गांधींच्या राजकारणासारखाच आधिक होता. राजकारण हा त्यांच्या धर्मकारणाचा एक भाग होता. ते गांधीजींप्रमाणें धर्मात अहिंसेला फाजील महत्त्व देत नसले तरी व्यक्तीच्या व राष्ट्राच्या जीवनांत ते धर्माला राजकारणाहून श्रेष्ठ स्थान देणारे होते व या अर्थानेंच त्यांचें राजकारण गांधीजींच्या राजकारणाला अधिक जवळ होतें.

अलिपूर बॉम्ब केसमधून निर्दोषी म्हणून सुटतांच त्यांनीं जें भाषण केलें व जें 'उत्तरपारा स्पीच' म्हणून अर्वाचीन राजकारणाच्या इतिहासांत अमर झालें आहे त्यांत ते म्हणतात :

"I spoke once before, that this movement is not a political movement and that nationalism is not politics but religion, a creed, a faith. I say it again today, but I put it in another way. I say no longer that nationalism is a creed—I say that it is Sanatana Dharma which for us is nationalism."

अर्थात् ही भाषा बोलणाऱ्या 'राजकारणी' पुढाऱ्याला लवकरच 'देशाची आपल्या कार्यक्रमाला अद्याप तयारी नाहीं' आणि 'आपण

आजच्या राजकारणाचे नेते नाहीं ' असें आढळून येणें अपरिहार्य होतें. वस्तुतः गांधींच्या राजकारणाला तरी देश कुठें तयार होता ? आणि अपात्र अनुयायांना आत्यंतिक ध्येयवादी कार्यक्रम दिल्यानें झालेले परिणाम अद्याप हिंदुस्थानच्या राजकाणांत धुमसतच आहेत.

पण जे अरविंदबाबू स्फोटक अशा वंगभंग चळवळींत पुढारी होते तेच अखेर चाळीस वर्षं मौनांत मग्न राहिले, म्हणून हळहळणारांनीं ' राजकारणाव्यतिरिक्त करण्यासारखें कांहीं आहे ' याचें स्मरण ठेवल्यास फार बरें होईल. काव्य, टीकाशास्त्र, सांस्कृतिक टीका आणि सर्वांत महत्त्वाचें म्हणजे मानवी जीवनांत आणि भवितव्यांत अपूर्व क्रांति करील असें योगशास्त्र आणि अध्यात्मदर्शन लिहितांना राजकारणाचा उच्चार व्हावा, हेंहि थोडें ओंगळ वाटल्यावांचून रहात नाहीं.

अरविंदबाबूंच्या काव्यरचनेमुळेंहि ते अमर व्हावेत आणि ज्या इंग्रजी भाषेंत त्यांनीं ती रचना केली, तिचे मस्तक अधिक उन्नत व्हावें इतकी तिची योग्यता आहे. श्रेष्ठ काव्यांतून अध्यात्मकल्पना सूचित आणि उत्तेजित होतात हें इष्ट आहे; पण केवळ अध्यात्मकल्पनेवरच केलेलें काव्य या दृष्टीनें अरविंदांच्या ' सावित्री ' महाकाव्याची योग्यता जगाच्या वाङ्मयांत सर्वमान्य होण्यासारखी आहे. काव्य, पांडित्य आणि साक्षात्कारी जीवन यांच्या त्रिवेणीसंगमामुळें योगिराज अरविंद यांचें जीवन श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनासारखें अपूर्व झालें यांत शंका नाहीं.

केंब्रिजच्या पदवीधरांत चमकलेला आणि केवळ तांत्रिक बेफिकिरीमुळें सिव्हिल सर्व्हिसमध्यें न शिरलेला हा असामान्य बुद्धीचा तरुण बडोद्यांत अधिकारावर असतांहि अहोरात्र ईशचिंतनांत आणि तत्त्व-जिज्ञासेंत मग्न असे. अधिकाराच्या नोकरीनेंच केवळ त्यांना मोह पडला नाहीं असें नव्हे, तर नूतनपरिणीत पत्नीनेंहि त्यांना त्यांच्या दैवी उद्दिष्टापासून परतविलें नाहीं. सर्व सुखें केवळ हांकेची वाट पहात असतां हा तरुण मुमुक्षु आपल्या पत्नीला लिहितो : " माझीं उद्दिष्टें आणि माझे उद्योग इतरांच्या........उद्योगांहून फार वेगळे आहेत. ( ज्या चमत्कारिक माणसाच्या जीवनाशीं तुझें नशीब बांधलें गेलें आहे, ) त्याला तूंहि इतरांप्रमाणें वेडा ठरवून मोकळी होणार काय ? कीं, मग तूं

कोपऱ्यांत बसून आपल्या नशिबाच्या नांवानें रडणार ? कीं सहधर्मिणी म्हणून ( त्याच ध्येयामागें ) धावणार ? ”

देवासाठीं वेडा झालेल्याला देव पावतो; परंतु हा वेडा मानवेतिहासाचें आणि मानवी उत्क्रांतीचें अध्ययन केलेला वेडा होता. स्वतःच्या पुनर्जन्मा-बरोबरच त्याला मानववंशाच्या पुनर्जन्माचें–नव्या मानवी अवताराचें–चित्र स्पष्ट दिसूं लागलें होतें. भावी मानवाची जी आकृति नीत्शेला अर्धवट दिसली होती, जी शॉसारख्या बुद्धिवाद्याला अर्धवटहि दिसली नव्हती आणि आधुनिक पाश्चात्यांत जिचें खरें लावण्य आणि खरें माहेर फ्रेंच तत्त्ववेत्ता बर्गसाँ यालाच दिसलें होतें, तिच्या चिंतनांत अरविंद मग्न होते.

मानवानें आतां मानव्याच्या पलीकडे जायला हवें, हें नीत्शेला दिसत होतें. शॉ आणि वेल्स हे तीच विशाल कल्पना ‘ Progress ’ च्या भिकार आधुनिक चौकटींत कोंबण्याचा प्रयत्न करीत होते. इव्होल्युशनचें मूळ कशांत आहे व पर्यवसान कुठें आहे, हें दिसतांच दिपून जाऊन बर्गसाँ प्रायः गूढवादी झाला होता. त्याच मानवी उत्क्रांतीचें स्वरूप आणि तिजमधील मानवाची भूमिका श्री अरविंदांनीं भारतीय अध्यात्मविद्या, पाश्चात्य विज्ञान आणि स्वतःचा साक्षात्कार यांच्या त्रिविध भूमिकेवरून स्पष्ट केली आहे. “ The Yoga we practice is not for ourselves but for humanity. ” अर्थात् हेंच जुन्या भाषेंत सांगावयाचें तर ते मोक्षाच्या मागें नसून ब्रह्मप्राप्तीच्या आणि ‘ अवतार ’-निर्मितीच्या मागें होते. “ Yoga is the technique of actuating the dream of centuries. ”

मानवी उत्क्रांतीची शेवटची पायरी प्रत्यक्ष चढणें हें अवघड ध्येय क्षणभर बाजूला ठेवलें तरी तिच्या केवळ कल्पनेमुळेंहि इतर क्षेत्रांतील प्रश्न किती पटापट सुटूं लागतात, हें पहावयाचें असेल तर श्रीअरविंदांचें अनेक विषयांवरचें लिखाण वाचावें. शेली, कीट्स् यांसारख्यांची रोमँटिक धडपड, भारतीय कलेतील अभिव्यक्तीची धडपड, नीत्शेला सुपरमॅनच्या स्वप्नामुळें झालेला काव्यमय उन्माद या सर्वांची संगती श्रीअरविंदांसारखा अंतिम सत्यसाक्षात्कार झालेला आणि आधुनिक शास्त्रांनीं सज्ज असा ऋषि किती लीलेनें लावून दाखवितो हें पाहून अचंबा वाटतो, आणि म्हणूनच ज्यांना

ब्रह्मज्ञानाची घाई नाहीं अशांनीं देखील अरविंदांच्या अपूर्व वाङ्मयाकडे पाठ फिरवून चालणार नाहीं.

पण ज्यांना काव्य आणि अध्यात्म हे विषय टाकाऊ वाटत असतील त्यांना अरविंदबाबूंनीं शिवकालीन वीररत्न बाजी प्रभु यांच्या जीवनावर एक काव्य लिहिलें आहे, याची आठवण करून दिली पाहिजे.

काव्याच्या भावितव्यासंबंधीं, भारतीय संस्कृतीच्या भूतकालासंबंधीं व अर्वाचीन जगांतील अनेक सांस्कृतिक प्रश्नांसंबंधीं त्यांनीं जें खोल आणि गाढ विवेचन केलें आहे, तेवढ्यानेंहि ते अर्वाचीन तत्त्वविवेचनांत जगद्विख्यात झाले असते. जगांतील काव्याचे विषय आणि सौंदर्याची वाढ खुंटल्यामुळें आतां घाण चिवडण्याखेरीज नवीन विषयच उरला नाहीं अशी ज्यांनीं कल्पना करून घेतली आहे त्यांच्या उसन्या उसनवाऱ्या आणि चोऱ्या देखील किती टीचभर प्रांताला जखडलेल्या आहेत. हें पाहिलें म्हणजे कींव येते. पण संतांच्या घरीं भीक मागायला देखील पुण्याई लागते हेंच खरें.

सामान्यतः आध्यात्मिक क्षेत्रांतील महान् व्यक्तीसंबंधीं महाराष्ट्रांतील, राजकारणी वृत्तपत्रें ज्या सुरांत लिहितात त्याहून वेगळ्या सुरांत श्री अरविंद यांच्या संबंधांत लिहिलें गेलें ही समाधानाची गोष्ट आहे. मला मुंबईची त्या सुमाराचीं दैनिकें पहावयास सांपडलीं नाहींत, तथापि पुण्याच्या दैनिकांनीं आपला बुद्धिवादी अध्यात्मद्वेष एका आठवड्यापुरता आवरून धरून या श्रेष्ठ पुरुषासंबंधीं उचित अभिज्ञता दाखविली हें पाहून कोणालाहि समाधान होईल. तथापि ' जनवाणी ' या पुण्याच्या समाजवादी साताहिकानें व्यक्त केलेलें विचार वाचून मात्र खेद झाल्यावांचून रहात नाहीं. अरविंदबाबूंच्या प्रयाणाच्या निमित्तानें या आपल्या अग्रलेखांत राजकारणांतून निवृत्त होऊन अध्यात्मचिंतनांत विराम पावण्याच्या वाईट 'खोडी'संबंधीं चिकित्सा केली आहे. राजकारण सोडल्यावर आमच्या तैलबुद्धीनें त्यांना चारचौघांसारखें ' सभ्य ' नागरिकाचें जीवन घालविणें कां जमूं नये, याचें या पत्राच्या संपादकांना मोठें कोडें पडलें आहे. अरविंदांच्या भोंवतीं आश्रम मांडण्यांत आला, या गोष्टीनेंहि या संपादकांना मोठा खेद झाला आहे. (परमार्थ आणि पारलौकिकता यासंबंधींच्या सदर संपादकांच्या कोत्या कल्पनांत

तो आश्रम मावत नाहीं एवढेंच त्याचें कारण ?) आणि अखेर या पत्रानें अरविंदांना २४ वर्षांमागें ता. २८ नोव्हेंबर रोजीं जी अंतिम सिद्धि प्राप्त झाली तिजसंबंधींहि आपल्या खुरट्या राजकीय व्यासपीठावरून कुचेष्टेचे उद्गार काढले आहेत.

वास्तविक अध्यात्म हा खुळेपणा म्हणून म्हटल्यावर आपल्या विशाल समाजवादी व्यासपीठावरून अरविंदांसारख्या महर्षींच्या महाप्रयाणाची उपेक्षा करणेंच या पत्राचें कर्तव्य ठरलें असतें. पण चारहि खंडांत ज्याचे डंके वाजले त्याच्यासंबंधीं अजीबात लिहिलें नाहीं, तर संपादकीय सर्वज्ञतेला बट्टा लागतो ! पण ज्यांचे डंके चारी खंडांत वाजले, ज्यांचे ग्रंथ चारी खंडांत आज अभ्यासिले जात आहेत, ज्यांच्यासंबंधीं मोटमोठाले पंडित विवरणात्मक ग्रंथरचना करीत आहेत, त्यांच्यावर लिहितांना अधिक माहिती, निदान अधिक जबाबदारी दाखविण्याचें मात्र या पत्राला कारण वाटलें नाहीं. अगदीं मुखपृष्ठावरच अरविंदबाबूंचा फोटो छापून त्याच्याखालीं जाड टाइपांत 'अरविंद बोस' (?) असें छापण्यापर्यंत या पत्राचें अरविंदासंबंधीचें ज्ञान आहे ! अरविंदांना अंतिम सिद्धि प्राप्त झाली तो दिवस अरविंदांच्या इतकाच जगप्रसिद्ध आहे. पण सदर पत्रानें अरविंदांना ही सिद्धि १९४६ (सेहेचाळीस) सालीं प्राप्त झाली असें दोन जागीं छापलें आहे. एखादा मनुष्य राजकारणांत नसेल तर त्याची ध्येयप्राप्ति १६ वर्षांनीं झाली काय आणि ३६ वर्षांनीं झाली काय, सदर ' बुद्धिवादी ' पत्राच्या दृष्टीनें एकच ! (वस्तुतः अरविंदांना अंतिम सत्याचें दर्शन १९२६ सालीं झालें हें प्रसिद्ध आहे !) एखाद्या सामान्य बुद्धीच्या माणसानें मार्क्सवादासंबंधीं चार सारांशवजा पुस्तकें लिहिलीं अगर गांधी-नेहरूंच्या पुस्तकांचें मराठी भाषांतर केलें तर त्याला लगेच महाराष्ट्राचे वैचारिक पुढारी बनविणाऱ्या या राजकारणाच्या लोकांना अरविंदांच्या विशाल ग्रंथरचनेची तरी कांहीं दखल असावयाला हवी होती ? राजकारणांत होणारा हा बौद्धिक विकास पाहिला म्हणजे तैलबुद्धीचे लोक राजकारणांतून बाहेर कां पडतात, याचें सदर पत्राला पडलेलें कोडें इतरांस पडण्याचें कारण नाहीं. पण या लहानशा लेखांत दिलेली अत्यल्प माहिती वाचणारासहि हें दिसून येईल कीं, अरविंद राजकारणाबाहेर पडण्याचा प्रश्नच नव्हता. ते आरंभापासूनच राजकारणाच्याच काय पण

या दुनियेच्या बाहेर होते. बॉंब कटाशीं संबंध असल्याच्या भयंकर आरोपावरून अरविंदबाबूंच्या घराची जेव्हां पोलिसांनीं झडती घेतली, तेव्हां त्यांना सबंध घरांत एका कागदांत लहानशी मुकटीच काय ती 'संशयास्पद' म्हणून जप्त करतां आली. पोलिस आणि राजकारणी लोक यांच्या स्फोटक द्रव्याविषयींच्या कल्पना सारख्याच स्थूल असतात ? पोलिसांना तें बॉंबकरितां लपवून ठेवलें ॲसिड वाटलें, पण तीं श्रीअरविंदांनीं परमादरानें जतन केलेली रामकृष्ण परमहंसांच्या दक्षिणेश्वर येथील निवासस्थानांतील धूळ होती ! या धार्मिकतेंतून आणि या आदरांतूनच जगाला हलविणारे अरविंदाचे विचार उदय पावले आहेत. बॉंबखेरीजहि कांहीं स्फोटक शक्ति आहेत हें राजकारणी लोक ओळखतील, त्याच वेळेस राजकारणाची आजची पातळी बदलेल.

♣ ♣ ♣

: ८ :

# बर्नार्ड शॉ



" .... By laughter only you can destroy evil without malice. " —शॉ ( तोंडी उद्गार )

गेले कांहीं महिने चारी खंडांचे डोळे लंडननजीकच्या ॲयट सेंट्–लॉरेन्स या लहानशा गांवाकडे लागून राहिले होते. हर्टफर्ड् परगण्यांतील या खेड्यांत विसाव्या शतकांतील सर्वांत अधिक विख्यात पुरुषाचें वास्तव्य गेल्या नोव्हेंबरच्या दोन तारखेपर्यंत होतें. गेल्या जुलैअखेर पंचाण्णवाव्या वाढदिवसामुळें जगाच्या वृत्तपत्रांचें लक्ष या ' आर्ष ' ज्ञानवृद्धाकडे वळलें होतेंच; पुढें सप्टेंबरमध्यें शॉ यांना झालेल्या अपघातामुळें तर तें लक्ष शॉ-निवासाकडे अधिकच वळलें. अशा वयांत व अशा अपघातानंतरहि शॉ यांनीं मरणाशीं हंसत हंसत झुंज घेऊन 'शॉव्हियन' चमत्कारासंबंधींची जगाची भूक भागविली. भीषण अपघाताचा वार झेलून, शॉ शतायु होण्याची शर्यत जिंकणार, असेंहि वाटूं लागलें होतें ! परंतु गेल्या ऑक्टोबरच्या अखेरीस, अचानकपणें शॉ

यांचा शक्तिपात होत असल्याच्या वार्ता आल्या व नंतर दोनच दिवसांत हा जगद्विख्यात महापुरुष इहलोक सोडून गेला.

पाश्चात्यांतील बौद्धिक व्यवसायी लोकहि ऐंशी वर्षांपर्यंत सहज जगतात. शॉ यांच्या बुद्धींतील चैतन्य आणि चापल्य अखेरपर्यंत जगाला स्तिमित करीत असलें, तरी शॉ देखील ऐंशीव्या वर्षानंतर पूर्वींचे राहिले नव्हते. अगदीं अलीकडचें त्यांचें जीवन पाहिल्यास, यापुढें जिवंत राहण्यांत त्यांना सुख अधिक कीं कष्ट अधिक, असा प्रश्नच पडला असता. दोन महिन्यांपूर्वींच्या अपघातानें त्यांच्या भक्तांना शॉ यांच्या महाप्रयाणासंबंधीं अप्रिय इशारा दिलेला होता. आणि तरीहि बुद्धिमत्तेचा आणि आशावादाचा हा हिमालय खरोखरीच कायमचा नष्ट झाला, ही वार्ता विद्युत्संदेशांनीं चारी खंडांत पोंचविल्यानंतर सर्व सुशिक्षित जगाला विषण्णतेचा धक्का बसून—

"Paths of glory lead
but to the grave"

ही उदासवाणी काव्यपंक्ति आठवली असेल !

कां कोण जाणे, पण महापुरुषांची कर्तबगारी म्हणजे मृत्यूवर एक प्रकारचा विजय असें मर्त्य मानवांना वाटत असतें ! मग तो मनुष्य सुएझ कॅनॉल बांधणारा असो कीं हॅम्लेट लिहिणारा असो—अहिंसक लढाईचें तंत्र काढणारा असो ! त्यांतून बर्नार्ड म्हणजे तर मानवी बुद्धीचे आणि मानवी कर्तृत्वाचे बिनीचे झुंजार होते. विज्ञानाधिष्ठित विचार आणि विचाराधिष्ठित आचार यांच्या जोरावर पृथ्वीचा स्वर्ग बनवितां येईल; त्याला आडमुठ्या, अत्याचारी क्रांतीची देखील गरज नाहीं, अशी त्यांची ( तर्कशुद्ध ! ) श्रद्धा !—नव्हे, ग्रेट ब्रिटनमध्यें आपण आपल्या ग्रंथांच्या आणि '**फेबियन सोसायटी**'-सारख्या नेमस्त समाजवादी संस्थेच्या वारें शांततामय क्रांति प्रत्यक्ष घडवून आणली असा त्यांचा अभिमान ! कीर्ति, द्रव्य, ज्ञान, लेखन, आरोग्य यांपैकीं प्रत्येक क्षेत्रांत त्यांनीं अक्षरशः जें म्हटलें तें खरें करून दाखविलें. आणि अखेर आम्हां भारतीयांच्या प्राचीन भीष्माचार्यांप्रमाणें ते इच्छामरणी होण्याचा चमत्कारहि करून दाखवितात कीं काय, असें वाटूं लागलें होतें ! परंतु विसाव्या शतकांतील मानवाला बलवत्तर करणारा हा आधुनिक महर्षि अखेर

सामान्य पामराप्रमाणें गलितगात्र होऊनच मृत्यु पावला हें वाचून, अखिल जगाला प्रथम मृत्यूच्या सार्वभौमत्वाचें भय वाटलें असेल आणि त्यानंतर आजच्या जगाच्या एक प्रेमळ आप्त आणि शूर मित्र त्याला सोडून दुसऱ्या जगांत गेला म्हणून दुःख झालें असेल यांत शंका नाहीं !

बर्नार्ड शॉ यांच्या जीवनसंदेशाविषयीं लिहिणें ही एक बिकट कामगिरी आहे. विशाल आणि बहुरंगी व्यक्तिमत्त्वाच्या कोणाहि पुरुषासंबंधीं लिहिणें अवघडच असते. त्यांतून शॉ याचे विचार आणि आचार जगाला गोंधळून टाकणारे म्हणून प्रसिद्ध ! पण या अवघडपणांत स्वतः शॉ यांनीं आणि जगभर पसरलेल्या त्यांच्या चाहत्यांनीं अधिकच भर टाकली आहे. शॉ यांनीं स्वतः-संबंधीं इतकें बोलून व लिहून ठेवलें आहे कीं, त्यांच्यावर भाष्य करणाराला धाकच वाटतो ! शिवाय जो मनुष्य साऱ्या जगांत प्रसिद्ध आणि साऱ्या जगाचा कुतूहलविषय होऊन राहिल्यालाच पन्नास वर्षे लोटून गेलीं, त्याच्या-संबंधीं टीकाकारांनीं अनंत प्रकारें लिहून ठेवलें असल्यास नवल नाहीं. नुसत्या गेल्या वाढदिवसाच्या निमित्तानेंच दिल्लीपासून न्यूयॉर्कपर्यंतच्या मुत्सद्द्यांनीं आणि ग्रंथकारांनीं शॉ यांच्या जीवनकार्यची मूल्यमापन केलेलें आहे आणि असे मूल्यमापनात्मक उद्गार शॉ यांच्या कानी गेले कीं फिरून शॉ यांनीं त्या उद्गारांचें मूल्यमापन केलें आहे !

कांहीं महिन्यांपूर्वीं सर्व जगांतील विख्यात बुद्धिमंतांना अलीकडच्या काळां-तील तीन सर्वश्रेष्ठ पुरुषांचीं नांवें सुचविण्याच विनंती एका वृत्तपत्रानें केली होती. त्या वेळीं अनेक प्रसिद्ध लोकांनीं सुचविलेल्या त्रयींत शॉ यांचें नांव होतें यांत तर नवल नाहींच; पण शॉ यांनीं—मला वाटतें—स्टॅलिन व गांधी हीं दोन नांवें स्पष्टपणें अंतर्भूत केलीं; आणि "तिसऱ्या महापुरुषाचें नांव घेणें विनयाला सोडून होईल," असें म्हणून स्वतःचें नांव सूचित केलें ! आजच्या जगांतील श्रेष्ठ पुरुष शॉ यांना सर्वश्रेष्ठ पुरुषांत निरपवादपणें अंतर्भूत करीत होते, स्वतः शॉ हेहि सर्वश्रेष्ठ पुरुषांत स्वतःला अंतर्भूत करीत होते ! अशा स्थितींत शॉ यांच्यासंबंधीं मत देणें वास्तविक अत्यंत सोपें व्हावयाला हवें; परतु स्वतःला निःशंकपणें पुण्यश्लोकांच्या यादींत घालणारे महापुरुष ( नीत्शे आणि इक्बाल सोडल्यास ) शॉ हे एकच असल्यानें फिरून टीकाकारांची

त्रेधा उडते ! पण शॉ त्यांत आणखी एक अडचण उभी करून ठेवीत. नीत्शे आणि इक्बाल गंभीरपणें स्वतःला युगपुरुष म्हणवीत, तर शॉ तसें म्हणून पुन्हा वर डोळे मिचकावीत ! त्यामुळें तर बिचारे टीकाकार अधिकच गोंधळांत पडत !

पण युगपुरुषांना जणुं युनिव्हर्सिटी स्कॉलर किंवा रेसचे घोडे समजून, त्यांच्या पृष्ठभागावर नंबराचे शिक्के मारण्याचा पोरकटपणा सोडला, तरी तब्बल अर्धशतक आपल्या बुद्धिवैभवानें आणि स्वतंत्र वाण्यानें जगाला दिपवून सोडणाऱ्या या पुरुषाच्या सामर्थ्याचें रहस्य तरी कोणतें, हा प्रश्न त्याच्या महाप्रयाणाचें दुःख ओसरल्यावर, प्रत्येकाच्या मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. आणि महापुरुषांच्या मोठेपणाची चिकित्सा करणें अवघड असतें हें जितकें खरें, तितकेंच त्यांच्यासंबंधीं प्रचलित चुकीच्या समजापासून ती चिकित्सा सुरू करणें सोपें हें खरें ! शॉ यांच्यासंबंधीं जगांतील अनेक विख्यात लेखकांनीं व स्वतः शॉ यांनीं लिहिल्यावरहि किती गैरसमज असूं शकतात, हें नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांतील वृत्तपत्रें पाहिल्यास दिसून येईल ! एका संपादकांनीं शॉ यांस निरुपयोगी हुशारी दाखविणारे ‘ बिरबल ’ ठरविलें होतें, तर दुसऱ्या वार्ताहरानें त्यांच्या ‘ घरच्या मंडळींना ’ मुंबई कॉर्पोरेशननें दुखवट्याचा संदेश धाडल्याची बातमी दिली होती ! तिसऱ्यानें त्यांची आई तर ‘ यःकश्चित् गाणारीण ’ होती, अशी बदनामीकारक माहिती दिली होती ! एका ( राष्ट्रीय ) मुसलमान संपादकानें ‘ **शॉ यांच्या प्रेताचें दफन** ’ असें मोठ्या ठशांत छापून खालीं त्यांच्या शवाच्या राखेची विल्हेवाट कथन केली होती !

शॉ हे खरे राजकीय कार्य करणारे होते, समाजसुधारक होते, कीं साहित्यिक होते, हा खरोखरच विवाद्य प्रश्न आहे. जग त्यांना साहित्यिक मानीत आहे–‘ शेक्सपियरनंतरचे सर्वश्रेष्ठ इंग्रजी नाटककार ’ मानीत आहे. शॉ यांनींहि स्वतःची शेक्सपियरशीं तुलना केली आहे व शेक्सपियरसंबंधीं त्वेषयुक्त तुच्छतेचे उद्गारहि काढलेले आहेत. तथापि शॉ यांचा जीव केवळ साहित्यांतच होता, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. किंबहुना आपली बिनतोड शैली, वादनिपुणता आणि नाट्यनिपुणता—त्यांनीं आपले राजकीय,

सामाजिक, नैतिक आणि तत्त्वज्ञानात्मक सिद्धान्त विसाव्या शतकाच्या गळीं उतरविण्याकरितां—वापरली असेंच दिसून येईल. विशेषतः 'फेबियन सोसायटी'-सारख्या उघड राजकीय संस्थेशीं त्यांनीं स्वतःला इतकें निगडित करून घेतलें होतें कीं, राजकारणाला त्यांच्या जीवनांत साहित्याइतकेंच महत्त्व देणें प्राप्त आहे. 'फेबियन एसेज् इन सोशिॲलिझम्' या पुस्तकाच्या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या आवृत्तींत तर त्यांनीं मजूर सरकार म्हणजे फेबियन् सोसायटीचेंच सरकार होय, असे उघड अभिमानोद्गार काढले आहेत. वयाच्या सव्विसाव्या वर्षींच एका तत्कालीन समाजवाद्यांचीं व्याख्यानें ऐकून त्यांचीं मतें एक प्रकारच्या समाजवादाकडे झुकूं लागलीं होतीं. त्यानंतर कार्ल मार्क्सचा भांडवलशाहीवरील विख्यात ग्रंथ त्यांच्या वाचनांत आला व ते शास्त्रीय-समाजवादी बनले. सिडने आणि बिॲट्रिस् वेब् या दांपत्यासारख्या विख्यात समाजवाद्यांचें कार्यक्षेत्र असलेल्या फेबियन् सोयायटींत शिरल्यावर त्यांना अनुरूप संस्थेचा व सहकाऱ्यांचा लाभ झाला. या सहकाऱ्यांतूनच त्यांना जन्माची सहचारिणीहि लाभली.

स्वतः शॉ यांनींच एका प्रसंगीं असें कबूल केलें आहे कीं, कार्ल मार्क्सचा 'भांडवल' हा ग्रंथ वाचल्यावर 'जगांत कांहींतरी करण्यासारखें आहे' अशी उमेद आपल्या मनांत उत्पन्न झाली. मार्क्सच्या समाजवादाचें स्थान शॉ यांच्या जीवनांत मोठें असलें तरी समाजवादाच्या क्षेत्रांतील शॉ यांचें कार्यहि तितकेंच मोठें आहे. फेबियन सोसायटींत सुप्रसिद्ध वेब दांपत्यासारखे विख्यात लेखक व कार्यकर्ते असूनहि त्या संस्थेला इतकी प्रख्यात बनविण्याचें श्रेय शॉ यांच्याकडेच जातें, असें म्हणावें लागतें. इतर लोक केवळ कार्यकर्ते होते, तर शॉ हे त्या सोसायटीचे मुख्य 'पार्टी'; मुख्य 'स्टार' होते, असें म्हणावें लागेल. त्या सोसायटीकरितां त्यांनी शेंकडों प्रचारात्मक व्याख्यानें दिलीं, लेख लिहिले व पॅम्फ्लेट्स् लिहिलीं. वस्तुतः रुक्ष अर्थशास्त्र हा मार्क्सवादाचा गाभा आहे. पण अर्थशास्त्रप्रधान समाजवादाच्या रुक्ष आंकड्यांना व निर्जीव कोष्टकांना, जिवंत व मोहक बनविण्याचें कसब या जातिवंत साहित्यिकाच्या अंगीं होतें.

शॉ यांच्या व्यक्तित्वाची आणि वक्तृत्वाची मोहिनी केवढी असे, याचें वर्णन प्रो. जोडसारख्या शॉ-पूजकापासून ते चेस्टरटनसारखा त्यांच्या वैचारिक प्रति-

स्पर्ध्यापर्यंत अनेकांनीं केलें आहे. विशेषतः शॉ यांचा नितांतमधुर आवाज आणि आयरिश उच्चारपद्धति यांवर इंग्लिश श्रोतेहि लुब्ध असत. भरपूर उंची, सरळ सडपातळ ताठ शरीरयष्टि, तकतकीत लाल दाढी, नाक व भिवया यांतून धगधगणारी बौद्धिक उग्रता, केवळ प्रचारतंत्र म्हणून जय्यत ठेवलेला सहेतुक उद्दामपणा, विचित्र पण आकर्षक अहंकार आणि असाधारण हजरजबाबीपणा—या अपूर्व गुणसमुच्चयामुळें, त्या वेळीं ऑक्सफर्डला शिकत असलेल्या मि. जोड् यांजसारख्या बुद्धिमान् इंग्रज तरुणांना शॉ म्हणजे व्याख्यानापुरताच स्वर्गातून उतरलेला एखादा देव वाटत असे. ग्रीक भाषेचें सुप्रसिद्ध पंडित प्रो. गिल्बर्ट मरे यांनीं ऑक्सफर्डच्या असंख्य कॉलेजकुमारांतून चौघांना निवडून या बौद्धिक नेपोलियनपुढें परिचयार्थ सादर केलें, त्या वेळचें जोड् यांनीं केलेलें वर्णन वाचण्यासारखें आहे ! या कोवळ्या इंग्रज विद्यार्थ्यांनीं गांगरून जाऊं नये अशी खबरदारी शॉ घेत असूनहि, वाघापुढें कोंकराची उडावी तशी, या स्कॉलर्सची गाळण उडालेली होती ! एकाच मेजावर उपाहार करतांना, शॉ यांनीं मागितल्यावरून मीठमिरी ठेवलेलें भांडें पुढें करण्याचा मान मिळाला तरी तेवढयानेंहि हे तरुण इंग्रज विद्यार्थी धन्य आणि पुलकित होत !

एवढया असामान्य व्यक्तिमत्त्वाचा कार्यकर्ता फेबियन सोसायटींत सांपडल्यानें समाजवादाला फार मोठा लाभ झाला असला तरी त्या घटनेबद्दल कित्येकांना सखेद आश्चर्यहि वाटलेलें आहे. जो पुरुष नाट्य, संगीत, टीका-लेखन, वक्तृत्व यांसारख्या अनंत क्षेत्रांत मूर्धाभिषिक्त झाला असता (व झाला होताहि), ज्यानें तोंडांतून सहज उच्चारलेलें एकेक वाक्य हिऱ्यासारखें दैदिप्यमान आणि हिऱ्याइतकेंच दुर्भेद्य असे, त्यानें एखाद्या सेन्सस अधिकाऱ्याप्रमाणें अगर विमाविद्येंतील ‘ अॅक्च्युअर ’प्रमाणें जन्ममरणाचे, लोकसंख्येंत दरमाणशीं प्रातीचे आणि करांचे आंकडे डोक्यांत भरीत राहावें याची एकीकडून चेस्टरनसारख्या आनंदवादी तत्त्ववेत्त्याला हळहळ वाटे, तर दुसरीकडून लेनिनसारखा कट्टा कम्युनिस्ट नेता, ‘ दुबळ्या फेबियन मंडळींत येऊन पडलेला देवदूत !’ असें म्हणून शॉ याची मनःपूर्वक कींव करीत असे !

शॉ हे बाह्यतः अहंकाराचे तुरे लावून नाचतांना दिसले, तरी त्यांच्या जीवनाचें रहस्य विशिष्ट तत्त्वांच्या आणि मतांच्या प्रचारांत होतें. त्यामुळें चेस्टरसनसारख्यांनीं त्यांच्या आंकडेवारीबद्दल आणि काबाडकष्टांबद्दल केलेली हळहळ व्यर्थ होती. तर उलट शॉ यांची राजकारणांतील भूमिकाहि–मुख्य प्रधान अ‍ॅटली यांनीं म्हटल्याप्रमाणें–पुढाऱ्याची नसून पुढाऱ्यांच्या गुरूची असल्यानें लेनिनला शॉसंबंधीं वाटलेली हळहळहि एका अर्थानें व्यर्थच आहे.

शॉ यांनीं समाजवाद सुबोध करण्याकरितां लिहिलेलें Intelligent Woman's Guide to Socialism हें पुस्तक समाजवादी वाङ्मयांतहि महत्त्वाचें आहे, आणि शॉ यांच्या वाङ्मयांतहि महत्त्वाचें आहे. असें म्हणतात कीं, या पुस्तकानंतरच्या पुस्तकांतून शॉ यांच्या बुद्धिमत्तेची पहिली धार पुन्हा दिसली नाहीं अगदीं अलीकडेहि ( १९४५ सालीं ) शॉ यांनीं एक राजकारण-विषयक ग्रंथ (Everybody's Political What's What) लिहिला; पण त्यांत त्यांच्या 'Intelligent Woman's Guide' ह्या ग्रंथाची चमक नाहीं.

शॉ यांच्या विविध क्षेत्रांतील मतांनीं तर राजकारणी लोक गोंधळून जातात; पण प्रत्यक्ष राजकारणांतील त्यांचीं मतेंहि राजकारणी लोकांना सोयीचीं नाहींत—नव्हे, समजण्यासारखींहि नाहींत. राजकीय सनातनीपणा आणि बंडखोरपणा ( टोरीझिझम् आणि बोल्शेव्हिझम् ) यांचें त्यांच्या मतांत विचित्र मिश्रण होतें, असें प्रसिद्ध व्यक्तिचित्रकार गार्डिनर यांनीं पंचवीस वर्षांपूर्वीं म्हटलें होतें, तेंच आजहि म्हणतां येण्यासारखें आहे. विशेषतः पार्लमेंटरी राज्ययंत्राची तर ते अलीकडे भारीच टर उडवीत असत. "राजाला फाशीं द्यायचें झालें तर पार्लमेंटची संमति लागत नाहीं; पण एखाद्या ओढ्यावर पूल बांधायचा झाला तर पार्लमेंट तीन पिढ्या चर्चा करीत राहतें!" अशी टिंगल शॉ यांनीं फेबियन सोसायटीच्या पन्नाशीच्या ग्रंथांत केली आहे.

"Democracy must decide the thing to be done; but democracy doing the thing is like leaving the passangers to run the train."

( काय करायचें तें लोकशाहीनेंच ठरविलें पाहिजे; पण तें प्रत्यक्ष करण्याचें काम लोकशाहीकडे सोपविणें म्हणजे गाडीचें एंजिन चालविण्याचें काम पॅसेंजर-मंडळीकडे सोपविण्यांतलाच प्रकार होय ! )

या त्यांच्या उद्‌गारांत लोकशाहीसंबंधींच्या त्यांच्या दृष्टिकोनाचें सार आलें आहे. '**ॲपल् कार्ट**' या नाटकांतहि त्यांनीं पार्लमेंटरी लोकशाहीची अशीच थट्टा केलेली आढळेल.

कॉंझर्वेटिव्ह मतें आणि बोल्शेव्हिक मतें या दोहींचाहि सारखाच स्वीकार आणि धिक्कार करणाऱ्या या स्वैर टीकाकाराला कम्युनिस्टांप्रमाणेंच कॉंझर्वेटिव्हांच्याहि शिव्या खाव्या लागल्या आहेत ! 'That Chatter-box of Socialism' ( बोलघेवडा समाजवादी ) ही पदवी—मला वाटतें,—शॉ यांना चर्चिल् यांनींच बहाल केली होती !

पण शॉ यांच्या विचारधनाचें मापन करतांना राजकारण, समाजसुधारणा, नैतिक प्रश्न, वाङ्मय, तत्त्वज्ञान यांपैकीं कोणतें तरी एकच दालन खोलून बसून चालणार नाहीं. आणि शॉ यांच्या विचारमंदिरांतील दालनें तितकीं पृथक्‌हि नाहींत. किंबहुना शॉ यांचें कार्य एका विशिष्ट पिढीचें अथवा विशिष्ट क्षेत्रांतील दुराग्रह नाहींसे करण्याचें होतें, ही कल्पनाच मुळीं तितकीशी बरोबर नाहीं. कांहीं काळ सर्व लोकांची ( आणि अखेरपर्यंत कांहीं लोकांची ) कल्पना, शॉ हे केवळ विक्षिप्त बोलून गंमत उडवणारे हुशार विदूषक आहेत, अशी होती, पण ती अर्थातच चुकीची होती. ही गोष्ट खरी कीं, बर्नार्ड शॉ हे लंडनच्या साहित्यिकांत चमकूं लागले तेव्हां इंग्लिश समाज आणि इंग्लिश नाट्य-वाङ्मय निर्जीव आणि परंपरापीडित झालेलें होतें. हेंहि खरें आहे कीं, भांडवशाहीच्या रोगावर समाजवादाचा तोडगा त्या वेळीं आजच्या-इतका मान्य आलेला नव्हता. हेंहि खरें कीं, परंपरागत नीति, शिष्टाचार आणि धर्म यांचें दडपण त्या वेळीं इंग्लिश समाजांत फार होतें. वाक्‌चातुर्याबद्दल व स्वतंत्र मतांबद्दल गाजलेले ऑस्कर वाइल्डच्या जातीचे बुद्धिमंतहि शॉ यांच्या मानानें संकुचित व यांत्रिकच होते. या कोंदट आणि कुजट वातावरणांत शॉ यांनीं एक प्रकारचा बौद्धिक झंझावात निर्माण केला हें खरें आहे. पण तेवढ्यावरून 'शॉ यांचें कार्य तेवढ्या पिढीपुरतेंच होतें व पुढच्या पिढींत शॉ

हे केवळ अंगस्वभाव म्हणून विदूषकाप्रमाणें वाकुल्या करीत राहिले' असें म्हणणें म्हणजे शॉ यांच्यासंबंधीं अज्ञान दाखविणें होय. ऐतिहासिक दृष्टिकोन आणि मानवी प्रगति यांच्यासंबंधीं पुस्तकी कल्पना कवटाळून बसल्यामुळें असे वैचारिक प्रमाद होतात. व्हिक्टोरिया राणीच्या अथवा सातव्या एडवर्डच्या काळांतील श्रीमंत इंग्रज कुटुंबांत जे दुर्ग्रह असत, ते मार्क्स, शॉ अगर वेल्स यांच्या ग्रंथांच्या प्रकाशनाबरोबर–छापखान्यामुळें हस्तलिखित ग्रंथांची विक्री बंद झाली त्याप्रमाणें !–एकदम नष्ट झाले, ही कल्पनाच मुळीं पुस्तकी आहे ! ते ग्रह आजहि लंडनच्या, मुंबईच्या व पुण्याच्या समाजांत आहेत व म्हणून 'शॉ हे म्हातारपणीं बिरबलप्रमाणें धंदेवाईक खुषमस्करे बनले' हें मुंबईच्या एका दैनिकानें व्यक्त केलेलें मत अत्यंत हास्यास्पद आहे.

पाश्चात्य (ॲलोपॅथिक) वैद्यकासंबंधींचीं शॉ यांचीं मतेंच उदाहरणार्थ घेतां येतील. 'ॲलोपथी'मधील अनेक सिद्धान्त, चिकित्सापद्धति व शुश्रूषापद्धति अशास्त्रीय आणि मागासलेल्या आहेत, हें आपलें मत शॉ यांनीं '**डॉक्टर्स डिलेमा**' या नाटकाच्या प्रस्तावनेंत बिनतोड आणि झगझगीत कोटिक्रमांत मांडलें. तेव्हांपासून आतांपर्यंत ॲलोपेथिक डॉक्टरांच्या सिद्धान्तांत आणि उपचारपद्धतींत अनेक बदल झाले असले तरी त्यांचे प्रमुख दोष नाहींसे झाले आहेत असें नाहीं. आणि म्हणूनच आजच्या ॲलोपाथ्स्नींहि ती प्रस्तावना वाचण्यांत त्यांच्या विद्येचें व व्यवसायाचें कल्याणच आहे. आणि म्हणूनच पंचाण्णवाव्या वर्षींहि शॉ यांनीं आपली शुश्रूषा करणाऱ्या डॉक्टरना आपल्या या तिखट पुस्तकाची प्रत सप्रेम नजर केली !

बर्नार्ड शॉ यांना ठरीव छापाचे क्रांतिकारक समजल्यामुळेंच 'त्यांच्या विचारांचें महत्त्व विशिष्ट पिढीपुरतेंच होतें' असा गैरसमज होतो. परंतु राजकारणाबाहेर उभे असलेले क्रांतिकारक, क्रांति ही एकदां 'करून टाकण्या'ची गोष्ट आहे, असें कधींच समजत नाहींत. राजकीय संस्था, सामाजिक संकेत, निसर्गांतील सौंदर्य या गोष्टी पाहतां पाहतां शिळ्या, निर्जीव आणि अर्थशून्य होतात. त्यांचा मूळ उद्देश जगाला दाखवून, त्यांत प्रत्यहीं नवें चैतन्य भरण्याचें कार्य निर्जीव शास्त्रें आणि यांत्रिक राज्यघटना यांच्याकडून कधींच होत नसतें. त्याकरितां शॉ यांच्यासारखे मूर्तिमंत क्रांतीचे

द्रष्टे ऋषि प्रत्येक पिढींत निर्माण होणें अथवा प्रत्येक पिढीकडून अभ्यासिले जाणें हाच एक क्रांतीचें अग्निहोत्र तेवतें ठेवण्याचा मार्ग असतो. कार्ल मार्क्सचा अर्थ समजावून सांगण्यापुरताच शॉ यांचा उपयोग होता असें नव्हे, तर सेंट जोनचा अर्थ सांगण्याला आणि सेंट गांधींचा अर्थ सांगण्यालाहि शॉ यांची गरज होतीच ! आणि या अर्थानें शॉ हे अखेरपर्यंत जिवंत व 'जागरूक' होते–शॉ हे अखेरपर्यंत ताजेच होते. दुर्दैव हें कीं, पंचाण्णव वर्षांपैकीं साठ वर्षें स्वतः शॉ यांनीं हें ओरडून सांगितल्यावरहि तें डोक्यांत न शिरणारे लोक आहेत !

गांधीजी व शॉ यांची भेट झाली त्या वेळीं शॉ त्यांना म्हणाले होते, "मिस्टर गांधी, तुम्ही व मी ज्या जातीचे आहोंत, त्या जातीचीं माणसें जगांत फार थोडीं आहेत !"

उत्क्रांति, क्रांति, पुरोगामित्व, विज्ञानवाद, नवनीति, नवमतवाद यांपैकीं प्रत्येक चीज–तिच्यावर जागता पहारा करण्यास शॉ संप्रदायी लोक नसतील तर–एका दिवसांत शिळी आणि नासकी होऊन जाईल, हें ज्याला समजेल तो 'शॉ शिळे झाले' असें म्हणण्याचा अप्रयोजकपणा करणार नाहीं.

पण क्रांतीचा आणि नवनिर्मितीचा ग्राम्य अर्थ घेतल्यास मात्र शॉ यांनीं नवीन अशी कोणतीच परंपरा काढली नाहीं असें म्हणावें लागेल, हें कित्येक नवमतवाद्यांनाहि माहीत नसेल ! धर्माच्या क्षेत्रांत ते निरीश्वरवाद मानण्या-इतपतहि 'नवे' नव्हते; तत्त्वज्ञानांत त्यांनीं कोणतेंहि नवें तत्त्व काढलें नाहीं–नव्या संज्ञा देखील वापरल्या नाहींत; शोपनहोर, नीत्शे, बर्गसाँ आणि बट्लर यांच्या कल्पना व संज्ञा जशाच्या तशा घेतल्या. ज्या नाटकाच्या क्षेत्रांत ते गेलीं चाळीस वर्षें चक्रवर्ती होऊन बसले होते, त्या क्षेत्रांतहि त्यांनीं–नावीन्यपूजकांच्या व्याख्येप्रमाणें पाहिल्यास–कांहीच 'नवें' आणलें नाहीं. ते इब्सेनचे उघड भक्त असले, तरी त्यांचें नाट्यतंत्र जुन्या मोलि-यरच्या–किंबहुना प्राचीन युरिपायडिस्च्या तंत्राशींच अधिक जुळतें आहे, असें हेस्केथ, पिअर्सनसारख्या टीकाकारांचें मत आहे. शेक्सपियरचेंहि तंत्र त्यांनीं थोडेंफार उचललें आहे. ते शेक्सपियरपासून फटकून निघाले याचें मुख्य कारण, ते मतप्रचारांकरितां नाटकें लिहीत, तर शेक्सपियर 'जीवन-

चित्र' म्हणून नाटकें लिही, एवढेंच आहे. तात्पर्य, क्रांतिकारक म्हणून गाजलेल्या शॉनीं स्वतः फारच थोड्या कल्पना अगर पद्धति काढल्या.

त्यांच्यासंबंधींच्या इतरहि कल्पना तितक्याशा खऱ्या नाहींत. शेक्सपियरला ते अगदीं भरचौकांत उभे राहून शिव्या देत असले तरी शेक्सपियरपेक्षां स्वतःला ते मनापासून मोठे समजत कीं नाहीं याची शंकाच आहे! ('अँटनी आणि क्लिओपात्रा' या नाटकाला ते पोरकट उल्लूपणा म्हणतील, पण 'किंग लियर' या नाटकाला सर्वश्रेष्ठ ट्रॅजेडी म्हणून गौरवितील!) इंग्लंडची ते खूप टर करीत असले तरी इंग्लंडचें त्यांना अपरिमित कौतुक वाटत असें, असें समजण्याला अनंत पुरावे आहेत. त्यांची आत्मश्लाघा वाचून सामान्य मनुष्य स्तिमित होऊन जाईल; पण "त्याच्याइतका दुसऱ्याचे गुण ओळखणारा व स्वतःकडे दुर्लक्ष करणारा मनुष्य विख्यात साहित्यिकांत तरी आढळला नसता" असा मि. गार्डिनर यांचा अभिप्राय आहे! 'पॅरेडॉक्स' उर्फ 'विरोधाभासात्मक उद्‌गार' हा तर जणुं शॉ यांच्या वाङ्मयनिर्मितीचा 'ट्रेड-मार्क' च झाला होता; पण 'पॅरेडॉक्स' या शब्दाच्या ग्रीक धात्वर्थाप्रमाणें पाहिलें तर शॉ यांच्या लेखनांत अगर उद्‌गारांत फारच थोडें 'पॅरेडॉक्स' आढळतील, असा अभिप्राय 'पॅरेडॉक्स' चे सम्राट् चेस्टरटन यांनींच दिला आहे! 'दारिद्र्य हा गुन्हा आहे,' 'संपत्तिमान होणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे,' असें शॉ यांनीं आपल्या 'Major Barbara' मध्यें प्रतिपादिलें असल्यानें, ते पैशाचे लोभी होते, असें एखाद्यास वाटेल. (त्यांच्या मृत्युलेखांत एका मराठी दैनिकानें तसें स्पष्ट म्हटलेंहि आहे!) पण त्यांनीं जितक्या वेळां केवळ परोपकारार्थ पैशावर लाथ मारली आहे, तितक्यावेळां विरक्तीचा महिमा गाणाऱ्यांनींहि लाथ मारली नसेल! हजारों रुपयांची प्राप्ति होण्यासारखी मागणी झिडकारून शॉ एखाद्या अयशस्वी साहित्यिक मित्राचें लिखाण दुरुस्त करीत बसत असत! आणि दीडदोन महिन्यापूर्वी अंतकाळाचा म्हणून संदेश लिहून ठेवला असता, तर त्या दहावीस ओळींबद्दल सुमारें पंचवीस हजार रुपये शॉ यांना मिळत होते. पण त्यांनीं त्या कल्पनेचा धिक्कार केला. पोरकट अमेरिकन वृत्तपत्रकारांच्या व शॉ यांच्या कल्पना पैशाच्या महत्त्वासंबंधींहि जुळत्या असणें शक्त नव्हतें; मग अंतकाळच्या गांभीर्यासंबंधीं त्या कशा जुळत्या असणार?

पाश्चात्य वृत्तपत्रें शॉ यांजकडे प्रक्षोभक वृत्तविषय म्हणून पहात. तत्त्वदर्शी युगपुरुष म्हणून पाहत असतीं, तर अशी मागणी करून त्या महापुरुषाच्या अंतकाळाचा उपमर्द त्यांनीं खास केला नसता !

नाटककार या दृष्टीनें त्याच्यासंबंधींचें आजच्या जगाचें मतहि बरेंच अवास्तव असल्यानें तें भावी टीकाकार मान्य करणार नाहींत. नाटककार या नात्यानें शॉ यांची तुलना शेक्सपियरशीं कां व्हावी, हेंच मला समजत नाहीं. कारण, तशी तुलना करणें म्हणजेहि-शेक्सपियरचा अपमान होईल इतकी त्या दोघांत तफावत आहे. शेक्सपियर आपल्या नाटकांत शाश्वत मानवी संसाराचें चित्र काढी, तर शॉ हे विशिष्ट युगांतील विशिष्ट संस्थेचें, समजुतीचें अगर संप्रदायाचें चित्र काढीत—नव्हे, त्यांची सुधारणा करण्यापुरतेंच एक व्यंगचित्र तयार करीत. समाजशिक्षण या दृष्टीनें त्यांच्या नाटकांचा उपयोग मोठा असला, तरी जीवनचित्र म्हणून त्यांच्या नाटकांना महत्त्व फारच थोडें आहे. जें काय वाङ्मयीन महत्त्व त्यांच्या नाटकांना आहे, तें त्यांच्या प्रक्षोभक शैलीमुळें आणि कोटिक्रमामुळें आहे. हे दोन्ही गुण उत्कृष्ट प्रतिपादनांत, आर्ग्युमेंटमध्यें मोडतात. पण काळाच्या उंचीला गेल्याखेरीज वाङ्मय शाश्वत आणि श्रेष्ठ होत नाहीं. राजकीय प्रतिपादनहि काव्याच्या उत्तुंग पातळीवर पोंचवितां येतें. प्लेटो आणि बर्क यांनीं आपल्या राजकीय गद्यानें तें सिद्ध करून दाखविलें आहे. पण 'सेंट जोन' हें एकच नाटक वगळल्यास इतर कांहीं थोड्या ( Heart break House ) सारख्या नाटकांतील थोडे प्रसंग सोडल्यास, काव्यमयतेचें आणि शॉ यांचें वाकडें होतें असेंच दिसून येईल. हें त्याच्या हातून चुकीनें घडत होतें असें नाहीं, तर ते मुद्दाम तसें करीत होते. भावनाविवश होणें, जीवनाकडे काव्याच्या नेत्रांनीं पहाणें, हा ते एक वेडेपणा, अपक्वपणा समजत. त्यामुळें त्यांचें वाङ्मय तर्कशुद्ध विचार करायला शिकविण्याचें अप्रतिम साधन झालें असेल; पण तर्कशुद्ध विचार म्हणजे जर श्रेष्ठ वाङ्मय असतें, तर मार्क्सचें 'कॅपिटल' हें शेक्सपियरच्या नाटकांहून श्रेष्ठ वाङ्मय मानावें लागलें असतें ! शॉ यांना केवळ प्रतिपादनहि करायचें नव्हतें, कारण केवळ मतप्रतिपादनाचें वाङ्मय शॉ यांच्या वाङ्मयाइतकें लोकप्रिय होत नाहीं. म्हणून शॉ यांनी जिला 'Argument at the maximum' असें म्हणतां येईल, अशी एक विलक्षण

मतप्रतिपादनपद्धति काढली. विडंबन व विनोद यांच्या भरपूर मिश्रणानें त्यांनीं आपलें मतप्रतिपादन कमालीचें आकर्षक केलें. पण वर्ण्य विषयांत तल्लीन होणें वेगळें आणि वर्ण्य विषयाला जणुं एखादा रोग मानून स्वतःला डॉक्टर समजणें वेगळें ! समाजसुधारक आणि समाजशिक्षक म्हणूनच शॉ यांचें नांव इतिहासांत सर्वश्रेष्ठ राहील; नाटककार व साहित्यिक म्हणून त्यांचें स्थान गौणच राहील !

ही गौण भूमिका त्यांनीं जाणूनबुजून पत्करली होती. जीवनाकडे ज्या कौतुकाच्या, आसक्तीच्या आणि आत्मीयतेच्या भूमिकेनें पाहिल्यानें त्यावर काव्य करावेंसें वाटतें, ती कौतुकाची, आश्चर्याची आणि गूढतेची भूमिकाच शॉ यांना मान्य नव्हती. सारांश, ' रोमँटिक ॲटिट्यूड ' म्हणजे पोरकटपणा, असा शॉ यांचा सिद्धान्त असल्यामुळें, प्रेमाचीं दृश्यें देखील प्रेमाला मूर्खपणा मानूनच त्यांना रंगवावीं लागलीं ! ( प्रेमासंबंधींचा हा अट्टाहास त्यांनीं आपल्या ' Man and Superman ' या नाटकांत अगदीं तात्त्विक परिसीमेपर्यंत नेऊन पोंचविला आहे. )

" Philosophers have tried to explain the world; let us now try to change it. " अशा अर्थाचे उद्गार मार्क्स यानें काढले आहेत. शॉ यांनीं म्हटलें असतें—

" Poets have so far loved the world; let us now try to reform it ! "

शॉ यांचा दृष्टिकोन उपयुक्त असेल, सत्यहि असेल; पण त्यांतून काव्य जन्मणें शक्य नव्हतें !

स्वतः शॉ यांनीं चित्रकला आणि संगीत यांच्या क्षेत्रांत, मायकेल ॲंजेलो व बेथोव्हेन यांच्या काळांत जी उदात्तता होती, ती आज राहिली नाहीं, म्हणून दुःख केलें आहे. इतकेंच नव्हे, तर अठराव्या शतकांत Passion या शब्दाला Irresistible impulse of the loftiest kind ' असा अर्थ होता, तर आमच्या काळांत त्याचा अर्थ 'कामवासना' (Concupiscence) एवढाच होतो म्हणूनहि दुःख केलें आहे ! ' बॅक टु मॅथ्युसेला ' या प्रसिद्ध नाटकाच्या प्रस्तावनेंत शॉ म्हणतात—

" In Beethoven's day, the business of art was held to be ' the sublime and beautiful. ' In our day, it has fallen to be the imitative and voluptous....one might say to the art of Europe what Anthony said to the corpse of Ceaser, ' Are all the conquests, glories, triumphs, sports shrunk to this little measure ' ? "

' सौंदर्य आणि उदात्तता ' यांचें माहात्म्य केवळ संगीत व चित्रकला यांच्यापुरतेंच मर्यादित न ठेवतां शॉ यांनीं वाङ्मयांतहि तें माहात्म्य मानलें असतें, तर शेक्सपियरमधील वा डाण्टेमधील उत्तमोत्तम भागाला वेडगळ-पणांत जमा करण्याची चूक त्यांनीं केली नसती !

पण वाङ्मयांत मात्र ' सौंदर्य आणि भव्यता ' यांच्यापेक्षां वास्तवतेला महत्त्व दिल्यानें त्यांचें वाङ्मय भव्य व सुंदर होण्याऐवजीं नुसतें ' वास्तव ' आणि ' प्रचारक ' झालें !

' शॉ यांनीं रोमँटिक दृष्टिकोनाचा शेवट केला ' असाहि शोध अलीकडे मराठींत प्रसिद्ध झालेल्या शॉविषयक लिखाणांत एका प्रतिष्ठित नियत-कालिकांत वाचायला सांपडेल. वस्तुस्थिति अशी आहे कीं, रोमँटिसिझमूचा शेवट करण्याऐवजीं रोमँटिसिझमचा धसका घेऊन, स्वतःच्या वाङ्मयांतील उदात्त व काव्यमय भागाचा मात्र शेवट शॉ यांनीं केला ! श्रेष्ठ वाङ्मयाच्या —म्हणजेच काव्यमयतेच्या !—मंदिरांत पदार्पण करण्याऐवजीं विडंबनाच्या आणि प्रचाराच्या उघडयावाघडया बखळींतच सर्कशीचा तबू ठोकून शॉनीं आपला वाङ्मयीन जन्म काढला !

पण शॉ यांचीं नाटकें आणि प्रस्तावना वाचणारा आणि पचविणारा वाचक अखिल आधुनिक ज्ञानाचा आणि विचारांचा अर्कच आत्मसात् करील, यांत मात्र शंका नाहीं. संपूर्ण शॉ वाचणाऱ्या आणि पचवणाऱ्या मनुष्याला मी एका अपूर्व विश्वविद्यापीठाचा पदवीधर असेंच मानीन !

शॉ यांचीं नाटकें म्हणजे अत्यंत हुशार माणसानें लिहिलेलीं प्रचाराचीं ' पॅम्फ्लेट्स् ' अशी टीका यामुळेंच होते. शॉ यांच्या वाङ्मयांतच काय, पण त्यांच्या संपूर्ण तत्त्वज्ञानांतच या काव्यद्वेषामुळें मोठें वैगुण्य राहिलें, ही गोष्ट

चेस्टरसन्सारख्यांनीं उत्कृष्टपणें विशद केली आहे. ( चेस्टरसन् यानें शॉवर जें पुस्तक लिहिलें त्याचें स्वागत शॉ यांनीं 'The best book that I have provoked' असें केलें होतें, असें या ठिकाणीं सांगणें जरूर आहे. )

हा फैसला केवळ शेक्सपियर किंवा डाण्टे यांच्या तुलनेनेंच द्यावा लागतो असें नव्हे; तर आधुनिक काळांतील मेटरलिंकसारखे गूढवादी आणि फ्रेंच नाटककार, ब्रूएसारखे गंभीर वास्तववादी हेहि शॉ यांच्या मानानें फारच उच्च वाङ्मयीन पातळीवर पोंचलेले दिसतील.

'वाङ्मय म्हणजे रुग्ण मानवतेला औषधोपचार' अशी कल्पना केल्यामुळें शॉनीं त्यांतून काव्याची हकालपट्टी केली असली तरी वृत्तीनें ते रुक्ष अगर नीरस नव्हते. ते संगीताचे निस्सीम भक्त होते, हें विसरून चालणार नाहीं.

त्यांच्या मद्यमांसनिवृत्तीवरून पाश्चात्य टीकाकारांनी त्यांना सोवळे आणि विरक्त ठरविले असले, तरी हाहि समज इतर समजांप्रमाणेंच दिशाभूल करणारा आहे.

मांस खाणें अगर तंबाखू ओढणें एखाद्याला घाणेरडेपणाचें वाटल्यास, लगेच तो विरक्त कसा काय ठरतो, हें आपणां भारतीयांना तरी कळणें कठीण आहे ! आणि आपल्या कल्पनासृष्टीच्या सुगंधानें सदैव धुंद असलेल्या साहित्यिकाला वेगळ्या मद्यपानाची आवश्यकता कोणती, हाहि प्रश्नच आहे. पण या तीन गोष्टी वर्ज्य केल्यानें शॉ यांच्या सोवळेपणाचा मोठाच बोभाटा झाला आहे ! तथापि, आपल्याइकडील सोवळ्या लोकांना धक्का बसेल अशा कित्येक गोष्टी शॉ यांच्या जीवनांत भरपूर असल्यामुळें, त्यांच्या सोवळेपणाच्या कल्पनाहि थोड्या तपासूनच घेतल्या पाहिजेत !

शॉ यांचा विवाह वयाच्या बेचाळिसाव्या वर्षीं झाला. विवाह झाला त्या सुमारास त्यांनीं राजकीय व वाङ्मयीन श्रमांच्या अतिरेकानें आपली प्रकृति इतकी बिघडवून घेतली होती कीं, त्यांना उभें राहण्याचाहि शक्ति नव्हती. त्यांच्या पत्नींनीं त्यांना कडक शिस्तीनें पथ्यपाणी करायला लावून वर्ष दोन वर्षांत खडखडीत बरें केलें. उशिरां सुरू झालेला हा संसार पंचेचाळीस वर्षे अत्यंत सुखासमाधानानें चालल्यावर मिसेस शॉ यांस १९४३ सालीं 'सवाष्ण-पणीं' मरण आलें.

विवाह होण्याच्या सुमारास शॉ व विख्यात नटी एलेन् टेरि यांचा जो पत्रव्यवहार चालू होता व जो एलेन् टेरीच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाला, तो पाहिल्यास शॉ यांच्या वृत्तींत केवळ सोवळेपणा आणि प्रचारकी बाणा नसून रंगेलपणाहि भरपूर होता, असें दिसून येईल. शॉ यांच्या प्रेमपत्रांचा विषय होणारी ही एकच स्त्री होती असेंहि नाहीं. मिसेस् पॅट्रिक कॅंबेल् या बाईला त्यांनीं लिहलेलीं पत्रेंहि तितकींच काव्यमय आहेत. अर्थात् यांपैकीं एकाहि प्रेमसंबंधांत पुरतें गुरफटून जाण्याइतके ते रिकामे नव्हते. शिवाय या दोन प्रख्यात नटींवरील त्यांचें प्रेम तरी ‘ कायिक ’ अनुभवापर्यंत गेलें नसून फक्त वाचिक आणि मानसिक अवस्थेंत होतें, असें शॉ यांनीं आपले मित्र फ्रॅंक हॅरिस यांना कळवलें होतें आणि ज्याला कांहीं महत्त्वाचें जीवितकार्य आहे, त्याला वेळाच्या आणि खर्चाच्या दृष्टीनें प्रेमाचे खेळ परवडण्यासारखे नसतात. असेंहि ते म्हणत ! शिवाय “ शॉ यांच्यासारखे असाधारण बुद्धिमत्तेचे पुरुष एकाच स्त्रीला सर्वस्व अर्पण करीत नसतात,” असाहि इशारा फ्रॅंक हॅरिस यांनीं देऊन ठेवलाच आहे ! तथापि ज्या प्रेमाला आणि काव्यमयतेला शॉनीं अनेकदां उघड पागलपणांत जमा केलें आहे, त्या काव्यमयतेला या पत्र-व्यवहारांत मज्जाव नाहीं, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. मिसेस् पॅट्रिक कॅंबेल् हिला ते एका पत्रांत लिहितात “ .......तूं माझी सखी आहेस आणि माझी लाडकी आहेस. अन् म्हणून तूं आज इकडे आली नाहींस तरी तुला माफ आहे. पण या प्रदेशाचा मात्र ( तूं आली नाहींस म्हणून ) मोठाच विरस झाला. शिवारांतले उंदीर आणि ससे गल्लीगल्लींत ( तुझ्या पावलांकडे ) डोळे लावून बसले होते; पण जेव्हां त्यांनीं पाहिलें कीं, तूं नसून मीच माझ्या कर-करणाऱ्या, खडखडणाऱ्या सायकलवरून येत आहें तेव्हां वैतागून ते दूर पांगले ! ( फार काय, पण ) आकाशदेखील संतप्त झालें. त्यानें एवढा आक्रोश केला आणि तोंड भरभरून पर्जन्याच्या इतक्या चुळा माझ्या अंगावर थुंकल्या कीं, पांच मिनिटांत रस्त्याचें खळखळणाऱ्या ओढ्यांत रूपांतर झालें....”

हें काव्यमय पत्र आपल्याइतकेंच त्या पत्राच्या मालकिणीलाहि खास आवडलें असेल, असें म्हणून फ्रॅंक हॅरिस उद्गारतात, “स्थितप्रज्ञ ‘सुपरमॅन’ देखील प्रेमांत पडल्यावर कधीं कधीं ‘ असा ’ होऊं शकतो ! आणि तो ‘तसा’ होत नसता तर ‘ ‘ **हार्टब्रेक हाउस** ’ सारखें नाटक लिहूंच शकला नसता.

आणि शॉनें जर ‘ हार्टब्रेक हाउस ’ सारखें नाटक लिहलें नसतें, तर लोकांचें शॉवरील प्रेम त्याच्या मरणानंतर पांच महिनेहि टिकलें नसतें ! ”

माझी खात्री आहे कीं, रुक्ष प्रचारवादीलोकांचे खेरीज सर्वांनाच फ्रँक हॅरिसप्रमाणें वाटेल. मला तर रोमान्सद्वेष्टया शॉनीं हें पत्र लिहिलेलें नसून तें एखाद्या उर्दू गझलचें इंग्रजी भाषांतर आहे असेंच वाटलें.

“ आयी है फस्ले बहार, आह !
कोई क्या करें ? ।
जब न ये पहेलू मे यार, आह !
कोअी क्या करें ? । ”

( वसन्तकाळ आला आहे—अरेरे ! पण माणूस करणार काय ? जोंवर सखी जवळ आलेली नाहीं, तोंवर माणूस करणार काय ? )

* * *

ता. ५ नोव्हेंबर रोजीं शॉ यांचें शव अन्त्य संस्कारांकरितां हालविण्यांत आलें. तेव्हां शवपेटिकेवर कोणीं तरी सुगंधी रोझ्मेरीची लहानशी डहाळी आणून वाहिली होती. सतत तीस वर्षें जिनें शॉ ह्यांच्यावर अकृत्रिम लोभ केला, तिच्या बागेंतील रोझमेरीचीं तीं पानें होतीं ! एलेन् टेरीच्या कन्येची मैत्रीण, एक प्रसिद्ध लेखिका आणि शॉ यांच्या प्रेमपत्रसंग्रहाची संपादिका क्रिस्टोफर सेंट जॉन हिनें दोन नोव्हेंबरलाच तीं पानें खुडून ठेवलीं होतीं ! “ कारण ” ती म्हणाली—

“ I knew Ellen Terry would have liked it. ”

## : ९ :

## सावित्रीदेवी मुखर्जी



सुमारें सात वर्षांपूर्वीची गोष्ट. सावित्रीदेवी मुखर्जी या पुण्यांत आल्या असून त्यांचा मुक्काम केसरीच्या अभ्यागतगृहांत आहे असें मला समजलें होतें. त्यांचीं ठिकठिकाणीं व्याख्यानेंहि होत होतीं. हिंदु संस्कृतीबद्दल अभिमान बाळगणारी युरोपिअन स्त्री या दृष्टीनेंहि मला त्यांच्यासंबंधीं कुतूहल होतेंच. त्याहूनहि दुसऱ्या एका—इतरांच्या दृष्टीनें क्षुल्लक !—गोष्टीनेंहि मला त्यांच्यासंबंधीं आदरयुक्त कुतूहल वाटत होतें. १९४१ सालच्या त्यांच्या मुक्कामापूर्वींहि पुण्यांत त्या येऊन गेल्या होत्या व त्या वेळीं एका जाहीर सभेंत त्यांची ओळख करून देतांना एका स्थानिक पुढाऱ्यानें त्यांची तुलना स्वामी विवेकानंद यांच्या विख्यात युरोपीय शिष्या सिस्टर निवेदिता यांच्याशीं केल्याचें माझ्या स्मरणांत होतें. विवेकानंद आणि त्यांची हिंदभक्त शिष्या निवेदिता यांच्यासंबंधीं मी अनेक वर्षे निस्सीम पूज्यभाव बाळगीत आलों आहें. इतका कीं, त्यांच्याशीं अंशमात्र सादृश्य असणाऱ्या व्यक्तीलाहि न भेटतां राहणें मला अशक्य होतें.

कोणत्याहि प्रकारच्या औपचारिक परिचयाची अगर पूर्वसूचनेची व्यवस्था न करतां १९४१ च्या ऑगस्ट महिन्यांतील एका दोन प्रहरीं मी अभ्यागत-गृहाच्या त्यांच्या खोलीशीं दाखल झालों व नमस्कार केला. मजसमोर मला सुमारें पस्तीस वर्षें वयाची हिंदु पेहरावांतील स्त्री दिसत होती. त्यांच्या खाण्यापिण्याची व दैनिक कार्यक्रमाची चौकशी करण्याकरितां केसरींतील कोणी मंडळी आलेली होती. स्थानिक कॉलेजच्या चर्चा-मंडळाचे एक चिटणीसहि कांहीं कार्यक्रम ठरवीत होते. मी प्रारंभींच त्यांस माझ्या येण्याचा उद्देश थोडा वेगळा असल्याचें सांगितलें. " मी कोणत्याहि संस्थेमार्फत कार्यक्रम ठरविण्याकरितां आलें नाहीं, " असें मीं त्यांस सांगितलें. माझ्याशीं अगर भेटीस आलेल्या इतर मंडळींशींहि बोलण्यास त्या फारशा उत्सुक दिसल्या नाहींत. इतरांचें कांहीं ना कांहीं काम असल्यामुळें तें पत्करून अगर नाकारून त्यांना वाटेला लावणें शक्य होतें; पण मला तसेंहि वाटेला लावणें सोपें नव्हतें !

त्यांच्या कपाळाला आठ्या पडलेल्या दिसल्या. मी मामुली सार्वजनिक कामाकरितां आलेला असतों, तर त्यांची ती नाराजी पाहून मी परतलोंहि असतों. पण त्यांचा ' अभ्यास ' करणें हेंच माझें काम होतें. आणि म्हणून मला त्यांच्या कपाळावरील आठ्यांचाहि अर्थ समजून घेणें प्राप्त होतें.

हिंदुस्थानांतील विशिष्ट कार्यक्षेत्रांत का होईना गाजलेली आणि युरोपांतील प्रख्यात विद्यालयांतून अनेक पदव्या पटकावणारी ( त्या ' एम्. ए., एम्. एस्सी., पीएच्. डी. ' आहेत ) वृत्तीनें गंभीर आणि कडक असणारी ही पुरंध्री त्या वेळीं मांडीवर एक मरतुकडें मांजर घेऊन बसलेली होती. भेटीला आलेल्या लहानमोठ्या, प्रसिद्ध-अप्रसिद्ध माणसांना वाटेला लावून तिला त्या मांजराशीं खेळावयाचें होतें कीं काय ?

आपल्या विचित्र छंदाच्या हकीकतींनीं ऐदी वृत्तपत्रकारांना खाद्य पुरविणाऱ्या अमेरिकन नटीसारखा हा छांदिष्टपणा असेल, असें समजून एखादा भारतीय संस्कृतीचा अभिमानी परतहि निघाला असता ! मी परत निघालों नाहीं; आणि त्यामुळेंच मला त्या मरतुकड्या मांजराची आणि त्याचबरोबर मरतुकड्या हिंदू संस्कृतीची हकीकत या विदुषीच्या तोंडून ऐकावयाला सांपडली.

संभाषणाला केवळ सुरुवात म्हणून मी त्यांच्या हिंदुधर्माभिमानाविषयीं आदरभाव आणि त्यांच्या जीवितकार्यासंबंधीं कुतूहल व्यक्त केलें; माझ्या प्रशंसोद्गारांसंबंधीं किंचित् तुच्छताच दर्शवीत त्या म्हणाल्या–

" मला ' मिशन ' वगैरे कांहीं नाहीं. निदान आज तरी मी हिंदुधर्म, हिंदुजाति आणि त्यांच्यासंबंधींचें माझें जीवितकार्य वगैरे कांहीं जाणत नाहीं. आजचें माझें मिशन्, माझें जीवितकार्य एकच ! आणि तें म्हणजे या अर्धपोटी, रोडावलेल्या मांजराला एखादें आश्रयस्थान शोधणें ! मघाशीं आलेल्या गृहस्थांना मी तेंच विचारीत होतें. इथें एखादी जीवदया-संस्था, एखादा पांजरपोळ कांहीं आहे का ? आणि असल्यास या मांजराला आज, आत्तांच्या आत्तां तेथें कोणी नेऊन पोहोंचवील का ? **त्याच्या खाण्या-पिण्याची व राहण्याची व्यवस्था झाल्यावर मग मी माझ्या जेवणाचा विचार करणार आहें !** "

पूर्वीं कळलेल्या माहितीवरून माझ्या मनांत सावित्रीदेवींबद्दल उत्पन्न झालेला आदर अद्यापहि टिकून असला, तरी मला या विदुषीच्या स्वभावांत कांहीं विचित्र अतिरेक, कांहीं फॅड्स् आहेत, असें वाटूं लागलें.

बाई पुढें बोलूं लागल्या–" तुम्हांला जर मुक्या जनावरांसंबंधीं दया नाहीं, तर हजारों कोसांवरील परकीयांना तुमच्यासंबंधीं सहानुभूति वाटावी, अशी अपेक्षा तुम्हीं कां करावी ? या अशक्त दुर्बळ मांजराला तुमचीं हिंदु मुलें मघाशीं दगड मारीत होतीं. इतर देशांत तुम्हांला असें कधींहि आढळणार नाहीं. आधीं, तेथील मुलें तसें करणार नाहींत; आणि तीं तसें करूं लागल्यास मोठीं माणसें त्यांना तसें करूं देणार नाहींत ! "

त्या मांजराची खाण्यापिण्याची व्यवस्था झाल्यावर आमचें बोलणें इतर विषयांकडे वळलें आणि हिंदुसमाजांतील निर्दयतेसंबंधींचा आपला राग विसरून सावित्रीदेवी अनेक विषयांवर माझ्याशीं मोकळेपणानें बोलूं लागल्या. ' मोकळे-पणानें ' हा शब्द अशा प्रसंगीं वापरावयाचा ठरलेला म्हणूनच मी वापरून गेलों, असें मला वाटतें. कारण त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीला कांहीं वेगळेच शब्द वापरावे लागतील. त्या कधीं चिडून, कधीं आवेशानें, कधीं उदासीनपणें कधीं मोठ्यानें, तर कधीं स्वतःशींच पुटपुटल्याप्रमाणें बोलत होत्या. एक गोष्ट

मात्र निश्चित कीं, त्या आपल्या बोलण्याचा कांहीं आकर्षक परिणाम व्हावा, आणि आपल्या या साहित्यिक श्रोत्यानें ( इतपत माझी माहिती बोलण्याच्या ओघांत त्यांना मिळाली होती ) त्याची प्रसिद्धि करावी या हेतूनें मात्र एकहि अक्षर बोलत नव्हत्या.

मी तेथें एक मिनिटहि थांबू नये, असा त्यांच्या प्रारंभींच्या चर्चेचा अर्थ होता; पण त्या दिवशीं त्या माझ्याशीं निदान दोन-अडीच तास तरी बोलत बसल्या होत्या. नंतर तीन चार वर्षांनीं त्या पुण्यास आल्या त्या वेळीं त्यांनीं मुद्दाम निरोप पाठवून मला बोलावून घेतलें. फ्रान्समध्यें असलेल्या आपल्या वृद्ध मातोश्रींना भेटण्याकरितां परवान्याची वाट पहात त्या या खेपेस पुण्यांत बरेच दिवस राहिल्या होत्या; त्यामुळें अनेकवार अनेक तास त्यांच्याशीं बोलण्याची मला संधि मिळाली.

त्यांच्याशीं १९४१ सालीं माझ्या झालेल्या पहिल्याच भेटींत मला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें आणि त्यांच्या हिंदप्रेमाचें वेगळेपण थोडेफार लक्षांत येऊन चुकलें. त्या वेळीं मीं त्यांचें लिखाणहि वाचलेलें नव्हतें; कीं जाहीर भाषणहि ऐकलेलें नव्हतें. त्यामुळें त्यांच्या हिंदुत्वाभिमानाचा मी चांचरत चांचरत अंदाज घेत होतों. सिस्टर निवेदिता, शीलवतीबाई केतकर यांच्यासारख्या हिंदप्रेमी युरोपीय विदुषींचे मी मधूनमधून उल्लेख करीत होतों. त्यांना या तुलना तितक्याशा मान्य नव्हत्या. त्यांच्या हिंदुत्वप्रेमाचें मूळ आणि हिंदुत्व-प्रेमाचें स्वरूप वेगळेंच असल्याचें त्या आग्रहानें प्रतिपादीत होत्या आणि हिंदु सामाजासंबंधीं त्यांच्या तिरस्काराच्या शब्दांनींच ज्या संभाषणाची सुरुवात झाली त्या संभाषणांत अखेर कांहीं वेगळेंच हिंदुत्वप्रेम मला पहावयास सांपडलें असल्यास नवल कसलें ?

**........" जगांतील मोठ्यांत मोठीं माणसें पहावयाचीं असतील तर तुम्हांला हिंदुस्थानांत शोधावीं लागतील; आणि जगांतील क्षुद्रांतील क्षुद्र, भिकारांतील भिकार मानवी नमुने पहावयाचे असतील तरीहि तुम्हांला हिंदुस्थानांतच दिसतील !**

" मानवी इतिहासाच्या प्रारंभापासून ज्यानें प्रत्येक शतकांत एक तरी सर्वश्रेष्ठ पुरुष निर्माण केला आहे, असा हिंदुस्थान हा एकच देश आहे !

" इतर धर्मांचे लोक धार्मिक बाबतींत असहिष्णु आणि अनुदार आहेत; तर हिंदु लोक धर्मांत उदार आणि सामाजिक आचारांत असहिष्णु व अनुदार आहेत...."—यांसारखे, त्यांचे पहिल्याच भेटींतील कांहीं उद्गार मला अद्यापहि आठवतात !

बोलण्याच्या ओघांत, विभागशः का होईना, त्यांचें पूर्वचरित्रहि मला पुष्कळसें समजलें. आणि चालू चरित्रांतील जीवितकार्यहि समजलें. हिंदु-समाजाच्या रोगाची त्यांनीं केलेली चिकित्सा आणि त्यावर त्यांनीं ठरविलेलें निदान हेंहि माझ्या ध्यानांत येऊं लागलें. त्यांच्या विचारांचा आणि प्रचाराचा तर आजच्या अवनत हिंदु समाजाला उपयोग आहेच; पण केवळ त्यांच्या वैयक्तिक चरित्राचें मननहि आपल्याकडील कार्यकर्त्यांना-विशेषतः स्त्रियांना उत्तेजक वाटेल.

सावित्रीदेवी या जन्मानें ग्रीक आहेत, पण त्यांचें सर्व शिक्षण फ्रान्समध्यें व फ्रेंचमधून झालें, या दृष्टीनें त्या अर्ध्याअधिक फ्रेंच आहेत. पण त्यांना ग्रीक म्हटलें काय आणि फ्रेंच म्हटलें काय, त्यांच्या मनाची आणि संस्कृतीची पूर्वपीठिका सहसा ध्यानांत येणार नाहीं. " युरोपला विटलेली एक युरोपिअन् स्त्री ", " ख्रिस्ती धर्माला विटून हिंदुस्थानकडे वळलेली एक ख्रिस्ती स्त्री " असें त्यांचें वर्णन केल्यास तें अधिक यथार्थ होईल. पण एवढ्यानें माझ्या महाराष्ट्रीय सुशिक्षितांना काय बोध होईल, याची मला कांहींच कल्पना नाहीं. त्यांना कदाचित् वाटेल कीं, हिंदी वाङ्मयाचे आणि तत्त्वज्ञानाचे गोडवे गाणाऱ्या प्राच्यविद्यापंडितांच्या जातीची ही एखादी विदुषी असेल; त्यांना कदाचित् वाटेल कीं, थिऑसफिस्ट मंडळींसारखी ही स्त्री आत्मोन्नतीच्या मार्गाला लागली असेल व हिंदुस्थानांत योगसाधन करण्याकरितां आली असेल. पण हे दोन्ही समज चुकीचे ठरतील. आम्हां हिंदु लोकांची आजची स्थिति मोठी चमत्कारिक आहे. आम्हांला आमचा व आमच्या संस्कृतीचा इतका वेडा अभिमान असतो कीं, त्यामुळें आम्ही आधुनिक जगाकडे आणि त्याच्या कर्तृत्वाकडेहि कधीं कधीं पाठ फिरवून बसतों; तर उलट " तुमच्या इतिहासांत आणि संस्कृतींत अभिमानास्पद असें काय आहे ? " म्हणून आम्हांला कोणीं विचारलें, तर चार थिऑसफिस्टांनीं, नाहीं तर चार ' वेदिक स्कॉलर्स 'नीं जें कांहीं वरचेवर उगाळून ठेवलें असेल, त्यापलीकडे आम्हांला आमच्या-

समोरचे अभिमानविषय पाहण्याची पात्रता नसते ! सावित्रीदेवी यांना हिंदु-धर्मातील नेमकी कोणती गोष्ट मोहित करती झाली, हें आजच्या सुशिक्षितांच्या पिढीला समजावून सांगणें खरोखर कठीण आहे. असें देखील म्हणतां येईल कीं, त्यांना हिंदुधर्माचा अभिमान आहे हें म्हणणें खरें नसून, त्यांना हिंदूंच्या राहणीचा–हिंदूंच्या देशाचा, फार काय हिंदु माणसांचा, अभिमान आहे ! कारण त्यांच्या मतें हिंदु लोक म्हणजेच हिंदुस्थान ! हिंदु मनुष्य म्हणजेच हिंदु संस्कृति !

त्या म्हणतात, हिंदूंच्या षड्दर्शनांचा अभिमान बाळगून त्यांचें रक्षण करण्याची यातायात घेऊं नका ! कारण त्यांचें रक्षण युरोपमधील ग्रंथालयें आणि म्यूझिअम्स् देखील करतील. हिंदु वाङ्मयाचीहि गोष्ट तीच आहे. पण रक्षण जर करावयास हवें असेल, तर तें हिंदु समाजाचें–हिंदु माणसांचें–हिंदु म्हणविणाऱ्या तुम्हां आम्हां हाडामासाच्या माणसांचें !

आणि याचें कारण त्यांच्या दृष्टीनें सांगावयाचें तर हिंदुधर्म हा एका ग्रंथांत नाहीं; अनेक ग्रंथांतहि नाहीं; एका पैगंबरांत नाहीं, अनेक ऋषींतहि नाहीं. तो जिवन्त हिंदूंच्या प्रत्यक्ष राहणींत–आचारांत, चालीरीतींत, संस्कारांत, सणावारांत आहे. त्या वेदांवर, उपनिषदांवर, सांख्य-वैशेषिकादि दर्शनांवर, वेदान्तावर मोहित झाल्या असत्या, तर त्यांना सुवेझ कॅनॉल ओलांडण्याचें कारणच नव्हतें. त्या रामायणावर, शाकुंतलावर, गीतांजलीवर लुब्ध झाल्या असत्या तरीहि त्यांना युरोप सोडण्याचें कारण नव्हतें. त्या हिंदूंच्या राहणीवर–म्हणजे प्रत्यक्ष हिंदु माणसांवर लुब्ध झाल्या. हीं माणसें जगलीं नाहींत, जगवलीं नाहींत, तर जगांतील एक बहुमोल जीवनपद्धति नाहींशी होईल असें त्यांना वाटलें, म्हणून त्या हिंदुस्थानची वाट चालूं लागल्या.

पण त्यांचें हें हिंदुस्थान-प्रेम असें एकमुखी नाहीं. त्या हिंदुस्थानावर लुब्ध होत्या एवढेंच नव्हे, तर त्या युरोपला विटल्या होत्या. किंबहुना हिंदुस्थान-खेरीज त्या सर्व देशांना त्या विटल्या होत्या. खिस्ती, मुसलमान, यहुदी, वगैरे धर्मांचे लोक कर्तबगार असतील;—त्यांचे धर्म प्राचीन, उदात्त आणि सत्य असतील. ( आणि ते तसे आहेत असेंच त्या मानतात. ) पण ते धर्म

रुक्ष व एकांगी आहेत. आणि पाश्चात्य देश तर आज एका क्रूर संस्कृतीच्या फेऱ्यांत सांपडले आहेत. सुंदर मूर्तींची, काव्यमय अवतारांची. रम्य निसर्ग-देवतांची पूजा करणारा व त्या पूजेसाठींच अनेक रम्य पूजाविधि संस्कार, सणवार आणि पौराणिक कथा निर्माण करणारा, सुंदर आणि काव्यमय धर्म आज पृथ्वीच्या पाठीवर हिंदुधर्माखेरीज दुसरा कोणताहि नाहीं !—कोणताहि उरला नाहीं ! — एकच देव व एकच धर्मग्रंथ मानणाऱ्या खिस्त्यांनी आणि मुसलमानांनीं उरूं दिला नाहीं ! म्हणून सावित्रीदेवी अक्षरशः अश्रु गाळतात.

सावित्रीदेवी यांचा जगाच्या इतिहासाचा व्यासंग फार गाढ आहे. वर वर्णिलेलें त्यांचें ‘ऐतिहासिक दुःख’ समजावून घ्यावयाचें असल्यास ग्रीकांच्या काळापासूनचा युरोपचा आणि पश्चिम आशियाचा इतिहास माहीत असावयास हवा. पण इतका दूरचा ऐतिहासिक प्रवास वाचकांस करावयास न लावतां एवढेंच म्हणतां येईल कीं, सावित्रीदेवींच्याच मायभूमींतून ज्या सुंदर मूर्तिपूजक राष्ट्रीय धर्माला ‘दुष्ट’ खिस्तांनीं आपल्या ‘एक-पुस्तकी’ धर्माच्या आंधळ्या कल्पनेमुळें हाकलून लावलें, नव्हे मारून टाकलें, तो सुंदर ग्रीक धर्म जर जिवंत असता तर सावित्रीदेवींनीं हिंदुस्थानांत येण्याची कदाचित् तसदी घेतलीहि नसती. यहुदी, खिस्ती, मुसलमानी हे सर्व एकेश्वरी आणि ‘एक-पुस्तकी’ धर्म इतके एकाक्ष आणि रुक्ष आहेत कीं, सुसंस्कृत, सौंदर्यप्रिय, वैचित्र्यप्रिय व्यक्तींना त्यांची शिसारी आल्याखेरीज राहणार नाहीं, असें सावित्रीदेवींचें मत आहे. निदान ग्रीस-रोममधील सुंदर आणि वैचित्र्ययुक्त राष्ट्रीय धर्माला हुसकावून लावण्याचें तरी त्या रुक्ष आणि संन्यासी अशा खिस्ती धर्माला कारण नव्हतें, असें त्यांचें म्हणणें आहे ! पण झालें तें झालें ! आज ग्रीस देश आहे, पण ग्रीक माणसें नाहींत ! देश ग्रीस आणि माणसें खिस्ती अशी आजची स्थिति आहे ! ग्रीकांचा सुंदर धर्म—म्हणजे अर्थात् त्यांची सुंदर काव्यमय राहणी आणि उपासनापद्धति आज पुस्तकांत आणि म्यूझियममध्यें शोधावी लागणार. **जिवंत ग्रीक धर्म, ग्रीक राहणी, ग्रीक माणसें आतां कुठें सांपडणार ? सावित्रीदेवी म्हण-तात. एका अर्थानें तीं हिंदुस्थानांतच सांपडतील !**

या अर्थानें पाहतां सावित्रीदेवी यांना हिंदुस्थानांत आल्यानें जगांतील एकमेव सुंदर आणि नैसर्गिक धर्माचीच काय ती जोड होणार नव्हती, तर

त्यांना आपल्या वाडवडिलांच्या जगत्प्रसिद्ध ग्रीक धर्माचा प्रत्यक्ष आचार पहावयास सांपडणार होता !

पण सावित्रीदेवींच्या त्या ध्येयप्राप्तीच्या आनंदाची कल्पना येण्यास आधुनिक युरोपीय वाङ्मयाच्या द्वारें आपल्या मनावर दडपण टाकणाऱ्या रुक्ष, निराकार, एकेश्वरी मताच्या कल्पना थोडा वेळ बाजूला टाकल्या पाहिजेत. **हिंदु देवतांच्या रूपानें प्राचीन भारतीयांनीं अनंत सुंदर ध्येयें व कल्पना साकार करून ठेवल्या आहेत. पराक्रम, पावित्र्य, सौंदर्य, विद्या, कला, निरामयत्व, निर्विघ्नत्व, जें जें म्हणून भारतीय स्त्री-पुरुषांच्या आकांक्षांच्या कक्षेंत येऊं शकतें, त्याची मूर्ति त्यांनीं साकार करून निःशंक श्रद्धेनें पूजिली आहे !** त्यांचीं व्रतें, त्यांचे संस्कार, त्यांचीं तीर्थक्षेत्रें या सर्वांचा मिळून हा भावसमृद्ध वैदिक धर्म बनला आहे. संन्यासमार्गी, पराक्रमाकांक्षी, विरक्त, अनुरक्त, अपत्य-वत्सल, संसारत्यागी कोणत्याहि मार्गांतील मनुष्य असो, त्याच्या मनोधर्मा-प्रमाणें त्याच्या अमर्याद विकासाच्या या विशाल धर्मांत दैवतें, व्रतें, संस्कार आणि विधि विपुल आहेत. सारांश हाच काय तो ' **सनातन मानव धर्म** ' या नांवास पात्र असून, इतर ' **एक-पुरुष-प्रणीतधर्म** ' हे ' **पंथ** ' या नांवाला पात्र आहेत. अशा या धर्माची नुसती ऐतिहासिक माहितीच नव्हे तर त्याचे चालते बोलते वारसदार, कन्यापुत्र एका देशांत उपलब्ध आहेत म्हटल्यावर, सावित्रीदेवींना रुक्ष एकेश्वरी धर्मानें ग्रासलेल्या आपल्या दुर्दैवी युरोप खंडांत राहवलें नसल्यास आश्चर्य कसलें ?

मला वाटतें, सावित्रीदेवी या आपल्या वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी आपल्या वृद्ध मातेला सोडून, या वृद्धतर आर्यधर्मरक्षक भारतमातेच्या भेटीकरितां निघाल्या. सिस्टर निवेदिता यांना प्रथम विवेकानंद भेटले, आणि नंतर हिंदुधर्म भेटला. मिसेस् शीलवतीबाई केतकर यांच्या मातापितरांनाच हिंदी संस्कृतीविषयीं आकर्षण वाटे; तरी डॉ. केतकर यांच्या ज्ञानदानाच्या कार्यांत सहकार्य करण्याचें त्यांनीं ठरविलें नसतें, तर त्यांनीं हिंदुस्थान आपला मानला असता की नाहीं, याची शंकाच आहे. सावित्रीदेवी यांचें हिंदुधर्माविषयींचें, म्हणजेच ( त्यांच्या मतें ) हिंदु राहणीसंबंधींचें, प्रेम मात्र निरपेक्ष आणि दुर्दम्य होतें.

त्या हिंदुस्थानांत केवळ अभ्यासक अगर लेखक म्हणून आल्या नाहींत तर हिंदु संस्कृतीच्या प्रत्यक्ष अनुयायी व वांटेकरी होण्याकरितां म्हणून आल्या. प्रत्यक्ष हिंदभूमींत वास्तव्य केल्यावर त्यांना या प्राचीन आणि रूढिग्रस्त समाजांतील गुंतागुंतीचा अधिकाधिक अनुभव येऊं लागला; कित्येक दोषहि दिसूं लागले. पण त्या दोषांचा मूळच्या सुंदर संस्कृतीशीं अविभाज्य संबंध आहे, असें त्या मानीत नाहींत. एखाद्या सुंदर इमारतीवर सांचलेल्या कोळिष्टकांप्रमाणें त्या या रूढिजनित दोषांना मानतात.

युरोपिअन लोक हे जितके धाडसी, तितकेच निश्चयी आहेत. एखादी गोष्ट करायची म्हटल्यावर ते ती पुरी केल्याशिवाय रहात नाहींत. विवाहाशिवाय स्त्रीला हिंदु संस्कृतीचा पुरता अधिकार आणि अनुभव प्राप्त होत नाहीं हें त्यांना समजतांच त्यांनीं हिंदु गृहस्थाशीं विवाह करण्याचें ठरविलें. आणि हिंदु संस्कृतीच्या स्वीकारांत आणि आचारांत कोणतेंहि वैगुण्य राहूं नये म्हणून अधिकतम संस्कारवान् आणि अधिकारवान् जातींतील गृहस्थाशीं अर्थात् ब्राह्मणाशीं विवाह करण्याचें ठरविलें. त्यांच्या पतीचें नांव असित-कृष्ण मुखर्जी. हा विवाह अर्थातच प्रेमाचा परिणाम नसून पूर्वसंकल्पाचा आणि इष्टमित्रांच्या प्रयत्नांचा परिणाम होता. कलकत्त्यांतील एका ग्रीक कुटुंबानें या या वधूवरांचा परिचय आणि विवाह घडवून आणला. सावित्रीदेवींचे पति बुद्धिमान्, विद्वान् ( ते लंडन युनिव्हर्सिटीचे पीएच् डी. आहेत. ) व स्वतंत्र विचारांचे आहेत. तथापि उभयतां पतिपत्नी आपआपल्या ध्येयांत मग्न असल्यानें त्यांच्या जीवनांत संसाराहून ध्येयपूजाच अधिक आहे. सावित्रीदेवी यांस अपत्यें नाहींत.

सावित्रीदेवी यांनीं भरतखंडांतील पवित्र क्षेत्रांच्या यात्रा अनेकवार केल्या आहेत. पासपोर्टच्या विलंबामुळें पुण्याहून लवकर निघतां येत नाहीं, असें दिसतांच त्या रामेश्वरपर्यंत पुनः यात्रा करून आल्या ! त्यांचे हे सर्व प्रवास तिसऱ्या वर्गानें !–**व्रत म्हणून नव्हे तर पैशाच्या अभावीं अपरिहार्य म्हणूनच तिसऱ्या वर्गानें** !—होतात. तिसऱ्या वर्गानें प्रवास करणारास जे हाल आणि अपमान सोसावे लागतात त्यांनाहि त्या,––**अहिंसेनें नव्हे तर बाणेदार प्रतिकारानें तोंड देतात.** यःकश्चित् रेल्वे पोलिसांनींहि

क्वचित् त्यांच्याशीं धक्काबुक्की केल्याचे त्यांना अनुभव आहेत. एका रेल्वे अधिकाऱ्यानें प्रथम त्यांच्या तक्रारीकडे तुच्छतापूर्वक दुर्लक्ष करून नंतर ( दिवसा उजेडीं त्या युरोपिअन आहेत हें लक्षांत येतांच ! ) आस्थेवाईकपणें दाद घ्यायची तयारी दाखविली, तेव्हां त्यांनीं त्याला बाणेदारपणानें " **मला हिंदूंना मिळणारा न्याय हवा; युरोपियनांना मिळणारा न्याय नको !** " असें उत्तर दिल्याचें मला सांगितलें !

सामान्यतः त्यांना परप्रांतांतील लोक बंगाली किंवा रजपूत हिंदु स्त्री समजण्याचा संभव अधिक. त्यांचा पोषाख उच्चवर्णीय बंगाली स्त्रीचा असतो. बंगाली पद्धतीचें लुगडें, कपाळाला व भांगांत कुंकू, दोन्ही हातांत बऱ्याच बांगड्या, अंगांत ब्लाउझ नसून चोळी—असा असतो. त्यांचा वर्ण आणि बांधा हिंदुस्थानांत सामान्यतः दिसणाऱ्या युरोपियन स्त्रियांच्या वर्णाहून व बांध्याहून वेगळा आहे. इंग्लिश स्त्रियांप्रमाणें त्या लाल, धिप्पाड आणि पुरुषी नाहींत. त्यांचे केसहि इंग्रज स्त्रियांच्या केसांसारखे—पिवळसर वाखासारखे नाहींत. त्यामुळें त्यांना प्रवासांत एखादा मनुष्य हिंदी स्त्री समजणें देखील शक्य आहे. त्यांची उंची सर्वसाधारण महाराष्ट्रीय स्त्रियांइतकीच असून, बांधा सडपातळ आहे. चेहरा व बोलणें-चालणें पूर्ण जनानी आहे. त्यांत इंग्लिश हडेलहप्पी अगर ताठरपणा नाहीं. अर्थात् त्या बाणेदार व निःस्पृह मात्र आहेत.

त्यांना हिंदु संस्कृतीविषयीं आणि तिच्या ' वारसदार ' अशा आपणां हिंदु लोकांविषयीं अत्यंत आदर आहे ही गोष्ट खरी; पण तेवढ्यावरून त्यांचे आणि ज्यांना आपण सामान्यतः हिंदुत्वनिष्ठ म्हणतों त्यांचे विचार सारखे असतील, अशी कल्पना केली तर ती मात्र खरी ठरणार नाहीं.

हिंदुधर्म म्हणजे एक सांस्कृतिक राष्ट्रवाद किंवा राष्ट्रीय धर्म आहे यासंबंधींचें त्यांचें प्रमेय (Thesis) त्यांनीं " Beware Hindus " या ग्रंथांत मांडलें आहे. त्यांतील जागतिक इतिहासाचें सूक्ष्म ज्ञान, समाजशास्त्रीय सिद्धान्तांसंबंधींचा पक्केपणा व इतर धर्मांच्या लोकांसंबंधींची उदार पुरोगामी बंधुत्वाची दृष्टि केवळ असाधारण आहे. या विलक्षण ( Remarkable ) स्त्रीचे ग्रंथ वाचतांना विवेकानंद, केतकर, सावरकर, एम्. एन्. रॉय

यांजसारख्या बौद्धिक महामल्लांचें स्मरण होतें हें सांगितल्यास,— दिवसांतून केव्हांतरी दोन चपात्या आणि भाजी खाऊन टाइपरायटरशीं बसणाऱ्या या ध्येयमग्न, लोकविलक्षण विदुषीच्या प्रखर बुद्धिमत्तेची कल्पना येईल.

आपल्या वृद्ध मातोश्रींना भेटण्याकरितां आणि प्राचीन इजिप्तमधील एका सूर्यपूजक विश्वधर्मासंबंधींचा आपला ग्रंथ छापवून घेण्याकरितां सावित्रीदेवी हल्लीं युरोपमध्यें गेल्या आहेत. गेल्या वर्षी आइस्लंडमधून आहिताग्नि राजवाडे यांस आलेलें त्यांचें पत्र मीं त्या वेळच्या माझ्या ‘ सारथी ’ साप्ताहिकांत छापलेंहि होतें.

सावित्रीदेवींचें लिखाण सूत्रमय असतें. त्यांचें शंभर पानांचें एक पुस्तक वाचणें आणि इतरांचीं इतिहास, समाजशास्त्र यांसंबंधींचीं दहा पुस्तकें वाचणें सारखें होय.

एखाद्या ठोकळेबाज ‘ इझम् ’ शीं लग्न लावून, जगांतील अनेक बहुमोल ज्ञानसाधनांकडे पाठ फिरावेणें, ही आजच्या पिढीची मुख्य बौद्धिक विकृति होय ! त्यांना या विकृतीनें आधींच पछाडलें नसेल, त्यांना तरी हा हा लेख वाचून सावित्रीदेवींचे ग्रंथ वाचण्याची बुद्धि झाल्यास माझ्या श्रमांचें सार्थक झालें असें मी समजेन.

♣ ♣ ♣

## : १० :

## पं. जवाहरलाल नेहरू



स्वतंत्र हिंदुस्थानचे पहिले पंतप्रधान—साठाव्या वर्षीं तरुण असलेले हिंदु-स्थानचे अत्यंत प्यारे असे पुढारी पं. जवाहरलाल नेहरू आज चिरतरुण अशा अमेरिकन राष्ट्राचा अपूर्व पाहुणचार घेत होते. जागतिक वृत्तसंस्था अशी वार्ता सांगत होत्या कीं, जागतिक युद्धांत विजयश्री मिळवून देणारे पंतप्रधान चर्चिल यांनाहि जितकें थाटाचें स्वागत मिळालें नसेल, तितकें थाटाचें स्वागत पारतंत्र्यांतून नुकतेंच डोकें वर काढणाऱ्या एका 'आशियायी' राष्ट्राच्या या पंतप्रधानाला लाभले. चारी खंडांचीं वृत्तपत्रें असें बोलत होतीं कीं, कोणाहि मुत्सद्याच्या आगमनानें अमेरिकन जनतेचा सागर यापूर्वी एवढा कधींच उचंबळलेला दिसला नव्हता. अमेरिकेची सुखी आणि विलासी जनता जगप्रसिद्ध सिनेमानटाचें आणि 'बेसबॉल'च्या खेळांत विजयी वीर ठरणारांचेंच कौतुक इतक्या बेहोषपणें करते, असें म्हणतात. देशाकरितां अनेकदां तुरुंगवास पत्करणारा, सौम्य स्वभावाबद्दल कुप्रसिद्ध अशा हिंदु समाजांत जन्माला आलेला असा एक पौर्वात्य पुढारी जगांतील

अत्यंत बलाढ्य आणि धनाढ्य राष्ट्राचें हृदय एका क्षणांत काबीज करतो, हें अर्वाचीन काळांतील एक गूढच म्हणावें लागेल.

कांहीं संशयात्मे यांत प्रचाराचा भाग किती याची चौकशी करतील; तर कांहीं राजकारणमग्न लोक दोन्ही राष्ट्रांच्या राजकीय गरजेशीं या स्वागताचा संबंध जोडतील. आणि तरीहि आज हिंदुस्थानचा पंतप्रधान म्हणून दुसरा एखादा पुढारी गेला असता, तर त्याच्या वांट्याला हीच लोकप्रियता आली असती, असें म्हणण्याचें धाडस मंद बुद्धीच्या माणसाखेरीज कोणीच करणार नाहीं असें मला वाटतें.

न्यूयॉर्कमधील ज्या भव्य इमारतीच्या चाळिसाव्या मजल्यावर नेहरूंचा मुक्काम होता तेथें त्यांच्या नऊ चिटणिसांना बारा टेलिफोनवरून लोकांना उत्तरें देतां देतां पुरेवाट होते आहे ! न्यूयॉर्कमधील मोठमोठाले पंडित व तत्त्ववेत्ते मुलाखतीसाठीं याचना करीत होते. मोठमोठे शास्त्रीय तज्ज्ञ हिंदुस्थानच्या तात्कालिक अडचणींवरील उपाययोजनांसह नेहरूंची भेट घेण्याची धडपड करीत होते. चौकस अमेरिकन कुमार-कुमारी आपल्या शिक्षकांना हिंदुस्थान आणि नेहरू यांच्याबाबत प्रश्न विचारून बेजार करीत होते. आणि कित्येक शांतताप्रिय, सुखवस्तु नागरिक तर नेहरूंना व त्यांच्या लोकोत्तर शांतता-कार्याला दुवा देण्याकरतांहि फोनकडे धाव घेत होते !

या सर्व प्रकारांत अमेरिकन जनतेच्या बालसदृश भावनाप्रधानतेखेरीज कांहींच न पाहणारांस आंतरराष्ट्रीय मनाचें ज्ञान आणि राजकीय कल्पकता फारच बेताची लाभली आहे असें म्हणावें लागेल. न्यूयॉर्कच्या नागरिकांच्या मानसिक प्रतिक्रियेंत ‘ अमेरिकन ’ अतिरेकाचा भाग तर आहेच, पण त्या अतिरेकांत जेवढा जिवंतपणा आहे, जेवढी आंतरराष्ट्रीय जीवनाची जाणीव आहे, तेवढी या राजकीय संशयवादांत खासच नाहीं ! जगप्रसिद्ध मुत्सद्दी, जगत्संचारी पत्रपंडित व जगप्रसिद्ध विद्यापीठचालक यांनीं जवाहरलालजींचा गौरव वेगवेगळ्या संबोधनांनीं केला. कोणाला ते महामुत्सद्दी वाटले, कोणाला शांततेचे अग्रदूत वाटले, तर कोणाला कम्युनिझमविरोधी तटबंदीचे खंबीर बुरूज वाटले.

पण त्यांतल्या त्यांत दोन व्यक्तींचे उद्‌गार माझ्या मनांत अधिक काळ घोळत राहिले. त्यांतील एक व्यक्ति म्हणजे अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट्

मि. डीन अॅचेसन आणि दुसरी व्यक्ति म्हणजे अमेरिकेंतील एका प्रख्यात ग्रंथालयाची ग्रंथपालिका ! मि. अॅचेसन् यांनीं नेहरूंना अब्राहम् लिंकन सारख्या अमेरिकन राष्ट्रपुरुषाच्या बरोबरीला बसविलें व त्यांचें वर्णन ' अे स्कॉलर अिन् पॉलिटिक्स् ' ( राजकारणाच्या धकाधकींत पडलेला विद्वान् ) असें केलें; तर त्या बिचाऱ्या ' लायब्रीण ' बाईनें हळहळून म्हटलें, " आई आई ! पंडितजी ! यापुढें आतां तुमच्या नशिबीं तुरुंगवास नाहीं— म्हणजे मग ग्रंथलेखनहि नाहीं ! "

लोकनेता आणि मुत्सद्दी या नात्यानें नेहरूंची योग्यता रतिमात्र कमी न लेखतांहि मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, दोन टोकांच्या दोन व्यक्तींनीं काढलेल्या वरील उद्‌गारांत पंडितजींच्या जागतिक आकर्षणाचें बीज बऱ्याच अंशानें सांपडतें. युरोप-अमेरिकेंतील सुबुद्ध नागरिकाला आज दोन गोष्टीं-बद्दल पाहिल्या प्रतीचें कुतूहल आहे. एक म्हणजे जागतिक शांतता; आणि दुसरें म्हणजे आशियांत डोकें वर काढूं लागलेला निकोप राष्ट्रवाद. नेहरू हे दोन्ही गोष्टींचे निःसीम पुरस्कर्ते आणि शूर प्रतिनिधि आहेत. आधुनिक इतिहासांत शांततावादाचा पैगंबर आणि—दुर्दैवानें शांततावादाचाच परम पवित्र बळी !—म्हणून ज्या महात्म्याचें नांव आजरामर राहील त्यानें स्वतःच जाहीरपणें पंडितजींना आपल्या जीवित संदेशाचे वारसदार म्हणून गौरविलेलें जगाला माहित आहे. आणि आशिया खंडांतील ज्या खंडतुल्य राष्ट्राचें स्वातंत्र्य म्हणजे जागतिक साम्राज्यवादाचें मरण, त्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे पंडितजी हे विजयी नेते आहेत.

तथापि पंडितजींचें हें नेतृत्व आणि हा संदेश सर्वसामान्य अमेरिकन नागरिकाच्या कानापर्यंत—नव्हे अंतर्मनापर्यंत--नेऊन पोंचविण्याचें कार्य मात्र त्यांच्या असाधारण भाषाप्रभुत्वानेंच केलें आहे. जगांतील सर्वच मुत्सद्दी आज शांततावादी आहेत. रशियानें चाळीस वेळां वापरलेला ' प्रतिबंधा 'चा ( व्हेटो ) अधिकार शांततेला नमन करूनच वापरलेला आहे ! मॉ. व्हिशिन्स्की संयुक्त राष्ट्रमंडळाच्या अध्यक्षाला न जुमानतां सभागृह डोक्यावर घेतात तेंहि शांततेकरितांच. पण नेहरूंच्या राष्ट्रवादांत आणि शांततावादांत पुरोगामी अमेरिकन नागरिकाला नवी आशा दिसूं लागते, याचें कारण त्याला नेहरूंचें अंतरंग इतर कुठल्याहि मुत्सद्द्याच्या अंतरंगाहून अधिक स्वच्छपणें पाहिल्याचें

स्मरतें. त्यानें नेहरूंचे इंग्लिश ग्रंथ वाचलेले असतात; निदान त्या ग्रंथांचे प्रतिध्वनि अगर उतारे तरी लोकप्रिय नियतकालिकांतून वाचलेले असतात.

आणि नेहरूंच्या जगप्रसिद्ध ' आत्मचरित्रां ' तच केवळ नव्हे, तर त्यांतील अर्ध्याकॉलमी उताऱ्यांत देखील त्यांचें अंतरंग कोणाहि आंग्लभाषी वाचकाला स्वच्छपणें प्रतीत होतें. एक प्रख्यात अमेरिकन पत्रकार एका हिंदी पत्रप्रतिनिधीला म्हणाला, " राजकारणी लोकांच्या तोंडच्या अर्थशून्य ब्रह्मज्ञानाच्या आम्हांला आतां कंटाळा आला आहे. आणि म्हणूनच हा एक तरी रोखठोक बोलणारा पुरुष पाहून आम्हांला धीर आल्यासारखें वाटतें. "

त्याच हिंदी प्रतिनिधीनें असेंहि कळविलें आहे कीं, पंडित नेहरूंचे जाहीर आणि खाजगी उद्‌गारहि सुस्पष्टता, मनोधैर्य आणि प्रांजलपणा यांमुळें अमेरिकन जनतेला आकृष्ट करून घेत आहेत. नेहरूंच्या मोहिनीचें रहस्य एखाद्या अपूर्व राजकीय सिद्धान्तांत नाहीं, कीं त्यांनीं यशस्वी केलेल्या एखाद्या प्रचंड क्रांतींत नाहीं. त्यांच्या मोहिनीचें रहस्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत आहे आणि तें व्यक्तिमत्त्व शब्दाशब्दांत प्रतीत करून देण्याचें सामर्थ्य त्यांच्या भाषाप्रभुत्वांत आहे. ( व्यक्तिमत्त्वाची मोहिनी म्हणतांच शरीरसौष्ठवाचें आकर्षण असा अर्थ घेण्याइतके अप्रबुद्ध वाचक हा लेख वाचणार नाहींत असें मी धरून चालतों ! ) नेहरूंच्या मोहिनीचा गाभा कोणता तें सांगणें तितकेंसें कठीण नाहीं; पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा नेमका सांगणें मात्र कठीण आहे. पण तो दोनच शब्दांत सांगण्याचें धाडस करायचें झालें, तर मी म्हणेन, " आधुनिकता आणि सात्त्विकता. "

एका दृष्टीनें पाहतां पंडित जवाहरलाल हे जगांतील पहिले ' आधुनिक सभ्य गृहस्थ ' होत. हिंदुस्थानांत सात्त्विकतेला तोटा नाहीं; पण आधुनिकतेच्या अभावीं ती सात्त्विकता भाबडेपणांत भर टाकीत आहे. पाश्चात्य देशांत सभ्य गृहस्थांना तोटा नाहीं; पण ' जंटलमन् ' ही संज्ञाच जुन्या जमान्याची आणि पांढरपेशा सद्‌गुणांची द्योतक होय, असें मानण्याकडे आधुनिक युगाचा कल आहे. पण युद्धोत्तर कालांतील—किंवा ' मॉस्कोत्तर ' कालांतील म्हणा !—सभ्य गृहस्थ कसा असावा, हें अद्याप ठरायचेंच आहे ! अर्वाचीन हिंदुस्थानच्या मानानें पाश्चात्य देशांतील नागरिकांत सभ्यता, नागरवृत्ति, नागरिकधर्म अधिक

प्रमाणांत आहेत असें मी म्हणेन, पण पाश्चात्य देशांतील शंभर टक्के 'सभ्य' असा नागरिक देखील राष्ट्राच्या हिताखातर अनार्यवृत्तीनें वागण्यास कचरत नसे व नाहीं. तसेंच आर्थिक झगडण्यांत तो स्वकीयांशीं वागतांनाहि सर्पव्याघ्रादि जंगलच्या मानकऱ्यांचें अनुकरण करण्यास कचरत नाही! नव्या स्पर्धा आणि जुन्या सद्गुणकल्पना यांचा मेळ बसविण्याकरितांच एका दृष्टीनें समाजवादासारखीं तत्त्वज्ञानें निघालीं आहेत हें खरें. पण अखेर कोणत्याहि तत्त्वज्ञानाचा निष्कर्ष त्या तत्त्वज्ञानानें प्रत्यक्ष निर्माण केलेला मानवी नमुना हाच असतो. आणि म्हणूनच एका अर्थानें जवाहरलाल हे समाजवादोत्तर जगांतील आदर्श 'सद्गृहस्थ' होत असें म्हणतां येईल. पण समाजवादोत्तर जग कुठें आहे? तें तर अद्याप कुठेंच दिसत नाही! आणि म्हणूनच जवाहरलाल हे उद्यांच्या जगांतील सभ्यतेचे 'आदर्श' आहेत असेंहि म्हणतां येईल.

मला समाजवाद अमान्य नाहीं; तरी मी समाजवादी आहें असें मला म्हणतां येणार नाहीं. पण नेहरू हे समाजवादी जगाचे प्रतिनिधि असें म्हटल्यास समाजवाद्यांनाहि ती त्यांच्या तत्त्वज्ञानाची अवास्तव स्तुति वाटेल, अशी मला खात्री आहे. कारण नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वांतील सर्व घटकांचा खुलासा समाजवादानेंहि होणार नाहीं. मी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या ज्या भागाला 'सात्त्विकता' म्हणून म्हटलें आहे, तो भाग समाजवादानें मनुष्याच्या अंगांत येईल असें नाहीं; नव्हे, समाजवादानें तो वाढीला लागेल अशी देखील हमी नाहीं. मी तो भाग जन्मजात आणि आंतराष्ट्रीय आहे असें म्हणेन, तर कोणी तो भाग प्राधान्येंकरून हिंदी संस्कृतीचा वारसा असून गांधीजींच्या समागमामुळें वाढीला लागला असें म्हणतील, तर कोणी त्या सात्त्विकतेचें धागे पंडितजींच्या ब्राह्मण कुलापर्यंत नेऊन पोंचवितील. (प्रख्यात पाश्चात्य लेखक जॉन गुंथूर यालाहि पंडितजींच्या कांहीं गुणदोषांचा संबंध त्यांच्या ब्राह्मण कुलापर्यंत नेऊन पोंचविण्याचा मोह आवरलेला नाहीं!)

दुसऱ्या शब्दांत सांगायचें झालें तर मी असें म्हणेन कीं, 'सात्त्विक' मनुष्य आधुनिक जगाच्या पातकीपणाला विटून त्याच्याकडे पाठ न फिरवितां त्याच्याशीं समरस झाला, तर बुद्धिवाद, तार्किकता आणि निर्घृणता यांबद्दल बदनाम झालेलें आधुनिक जगहि त्या माणसाच्या पायीं लोटांगण घेईल. नेहरू आणि गांधी यांच्यावर पाश्चात्यांचीहि एवढी भक्ति जडली याचें कारण हेंच होय.

जवाहरलालजींचें व्यक्तिमत्त्व कितीहि आकर्षक आणि थोर असलें तरी आपल्या व्यक्तिमत्त्वाची आकर्षकता पटविण्याकरितां त्यांनीं लेखणी खासच हातीं घेतली नसती. या अर्थानें पाहतां ते साहित्यिक नसून वीर पुरुष अथवा ' मॅन ऑफ ॲक्शन ' आहेत. किंबहुना त्यांचा कल प्राधान्येंकरून शब्दांच्या अलंकृतीहून प्राप्तकर्माच्या कृतीकडेच आहे. निर्जन स्थळीं बसून शब्दांची सृष्टि रंगवणें त्यांना कधींच परवडणार नाहीं, किंबहुना परकीय अमलांतील तुरुंगवासामुळेंच त्यांच्या हातून इतकी ग्रंथनिष्पत्ति झाली असें म्हटलें तरी चालेल. ' डिस्कव्हरी ऑफ इंडिया ' या त्यांच्या ग्रंथांतील ' तुरुंगांतील कालक्रमणा आणि कृतींची ऊर्मि ' (टाइम इन् प्रिझन ॲण्ड दि अर्ज् टु ॲक्शन) या प्रकरणांत त्यांनीं आपल्या कर्मप्रवण वृत्तीची मनोरंजक मीमांसा केली आहे. वृत्तीनें साहित्यिक नसलेल्या परंतु जन्मजात भाषाप्रभु असलेल्या थोर पुरुषानें सक्तीच्या निष्क्रियतेंत केलेलें आत्मावलोकन, असें त्यांच्या दोन प्रमुख ग्रंथांचें वर्णन करतां येईल. यांतील एक म्हणजे त्यांचें जगद्विख्यात आत्मचरित्र व दुसरा म्हणजे ' हिंदुस्थानचा शोध ' ऊर्फ ' दि डिस्कव्हरी ऑफ इंडिया. '

एखाद्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या झगड्यांत परराष्ट्राच्या नैतिक सहानुभूतीला महत्त्व कितपत देतां येईल, हा प्रश्न राजकारणी लोकच मजहून अधिक चांगला सोडवतील. पण ज्या अर्थी समुद्राला अंकित करणारी ब्रिटानिया, झारशाहीला धूळ चारणारा सोव्हिएट रशिया, डॉलर व ॲटम् बॉम्ब या दोहोंनींहि सज्ज असलेली अमेरिका – या तिन्ही साम्राज्यसत्तांना देखील प्रचाराचें हत्यार जवळ बाळगावेंच लागतें; त्या अर्थी दलित राष्ट्रांना बलाढ्य राष्ट्रांच्या सहानुभूतीची गरज आहे असें म्हणणें प्राप्त आहे. जग दुसऱ्या महायुद्धाची वाट चालत असतां आणि हिंदुस्थान गांधींच्या अपूर्व तंत्राचा अवलंब करून ब्रिटिश सत्तेशीं झगडा देत असतां ज्या एकमेव ग्रंथानें पाश्चात्य राष्ट्रांना हिंदी लढ्याचा आंतरराष्ट्रीय अर्थ समजावून सांगितला, तो ग्रंथ म्हणजे नेहरूंचें आत्मचरित्र होय.

सुमारें तेरा वर्षांपूर्वी या ग्रंथाचें परीक्षण करतांना आत्मचरित्र आणि अहंकार यांच्या अपरिहार्य संबंधाचा निर्देश मला करावा लागला होता. मनुष्य अहंकारी असल्याखेरीज आत्मचरित्र लेखनाकडे वळत नाहीं असें

मराठी ग्रंथ संग्रहालय ... 25080 अनुक्रम 1154 दि: 9/6/75

मीं म्हटलें होतें. पण ज्या थोर पुढाऱ्यानें एका मोठ्या राष्ट्राच्या [illegible] लढ्याशीं तादात्म्य करून घेतलें, त्याच्या आत्मचारित्रांत एका संपूर्ण पिढीचें आणि लढ्याचें चित्र उमटणें अपरिहार्य असतें. राष्ट्रीय लढ्यांतील आंदोलनें आणि वैयक्तिक मनांतील हर्ष-खेद यांचें रम्य, संमिश्र चित्र या आत्मचरित्रांत पहावयास सांपडतें.

याच लढ्याची परमावधि होऊन जवाहरलालजी हे अखेरच्या तुरुंगवासांत ( अहमदनगरचा किल्ला : १९४४ ) असतां त्यांनीं 'हिंदुस्थानचा शोध' हें कांहींसें त्याच पुस्तकाला पूरक असें पुस्तक लिहिलें. या दुसऱ्या पुस्तकाचें नांव अनेक दृष्टींनीं अर्थपूर्ण आहे. जवाहरलाल यांना प्रथम हिंदुस्थानचा लढा दिसला आणि नंतर हिंदुस्थान दिसला, असें म्हटलें तर फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. अर्वाचीन काळांत ज्यांनी ज्यांनीं हिंदुस्थानांत राज्यें कमावण्याचा प्रयत्न केला त्यांच्यापैकीं फक्त मराठ्यांनाच थोडीफार राष्ट्रीय भावना होती आणि इंग्रजांच्या अभावीं तेच हिंदुस्थानचे राज्यकर्ते झाले असते, हें वॉरन हेस्टिंग्जचें मत पंडितजींनीं निःसंकोचपणें उद्धृत करून मान्य केलें आहे. पंडितजींनीं हिंदु धर्मासंबंधींहि कित्येक अपरिहार्य पण–आधुनिकांना अप्रिय असे सिद्धान्त या ग्रंथांत मान्य केले आहेत.

परकीयांना हिंदुस्थानच्या अंतरंगाचें आकलन न होण्याचें मुख्य कारण म्हणजे धर्मासंबंधींच्या त्यांच्या एकदेशीय कल्पना होत. इंग्रज राज्यकर्ते असोत, कीं मोगल राज्यकर्ते असोत, ते आपल्या देशाच्या बाहेर कोठेंतरी जन्मलेल्या परक्या धर्मांत ( मूळचा पूर्वजांचा धर्म सोडून ) शिरलेले असणार ! त्यांना हिंदुस्थानचा 'राष्ट्रीय' धर्म व त्यासंबंधींचें प्रेम कांहीं केल्या आकलन होत नाहीं. आपलें राष्ट्र जसें एके काळीं खिस्ताचें अगर महंमदाचें अनुयायी झालें, तसें हें राष्ट्र झाल्यास अनेक प्रश्न सुटतील असें त्यांस वाटतें. 'बाटविणारा धर्म' ( प्रोसेलिटाइझिंग रिलिजन ) आणि 'राष्ट्रीय धर्म' ( नॅशनल रिलिजन ) यांचा मेळ कसा बसवावा हें अकबरसारख्या उदार राज्यकर्त्यालाहि समजलें नाहीं. [ ....And the big problem that faced him was how to reconcile a proselytizing religion like Islam with the national religion and customs of the people and thus to build up national unity. ]–डिस्कव्हरी ऑफ इंडिया–पान २२४.

या गोष्टींचा नेहरूंनीं मार्मिक पण अत्यंत त्रुटित उल्लेख केला आहे. इस्लाम-सारखे कडवे एकेश्वरी धर्म हिंदु धर्मांतील सामाजिक आणि राष्ट्रीय उत्सवांचा भाग आणि पारमार्थिक भाग यांतील फरक ओळखूं शकले असते तर अकबर-सारख्या उदार आत्म्याचें काम सोपें झालें असतें, हें वरील समस्येचें सरळ उत्तर आहे ! विवेकानंद, डॉ. केतकर, सावित्रीदेवी यांसारख्या समाजतत्त्व-वेत्त्यांनीं या दिशेनें या समस्येचा विचार केलाहि आहे. पण नेहरूंनीं त्रुटित कां होईना, हिंदु धर्माच्या वेगळेपणासंबंधीं ऐतिहासिक दखल घेतली हें त्यांच्या या पुस्तकाचें वैशिष्ट्य म्हटलें पाहिजे.

'शीख' पंथासंबंधीं आणि शीखांच्या राजकीय उत्थानासंबंधीं लिहितांनाहि नेहरूंनीं अगदीं त्रुटितपणें एका अत्यंत महत्त्वाच्या ऐतिहासिक सत्याचा उल्लेख आहे. शीख हे हिंदु आहेत कीं नाहींत हा प्रश्न वेगळा; पण शीखांच्या एकूण एक परंपरा हिंदभूमीशीं निगडित आहेत. [ Yet the religion itself had a strong national background and all its traditions were connected with India. ]

या ओझरत्या उल्लेखांतच हिंदु–मुसलमान प्रश्नाचें उत्तर सांपडेल. हिंदु मुसलमान ऐक्याच्या आड महंमद येत नाहीं, कुराण येत नाहीं कीं 'नमाज'हि येत नाहीं. त्या धर्मांचा 'परदेशी उगम' या ऐक्याच्या आड येतो ! धर्मांतर करून मोकळे झालेले लोक 'जन्मभूमी' हून 'धर्मभूमी' लाच अधिक महत्त्व देणें स्वाभाविक असतें; निदान त्यांच्या मनांत या दोन निष्ठांचें द्वंद्व नेहमींच चाललेलें असतें. पण हिंदु-मुसलमान ऐक्याचा प्रश्न सोडवितांना या कटु सत्याचा उल्लेख करणें पुरोगामी पुढारी बहुधा अप्रशस्त समजतात !

धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास या सर्वच प्रांतांत नेहरू यांनीं आपल्या या महत्त्वाच्या ग्रंथांत अनेक बहुमोल व प्रांजल विचार व्यक्त केले आहेत. नेहरूंच्या मनोविकासाचा अभ्यास करणाराला तर या ग्रंथाचें महत्त्व आहेच; परंतु अल्प वयांतच राजकीय कार्याकडे वळल्यामुळें ज्यांना स्वदेशाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीची ओळख करून घेणें जमलें नाहीं अशा अनेक राजकीय कार्यकर्त्यांनीं हा ग्रंथ वाचणें अगत्याचें आहे.

नेहरूंच्या सर्व ग्रंथांत ' आत्मचरित्र ' आणि ' डिस्कव्हरी ऑफ इंडिया ' या दोन ग्रंथांनाच विशेष महत्त्व असलें तरी त्यांच्या जगाच्या इतिहासाचें भाषांतर मराठींत झालें नाहीं, याबद्दल मला नेहमींच वाईट वाटतें. खरें पाहिलें असतां याच ग्रंथाचें भाषान्तर प्रथम व्हावयास हवें होतें. त्यांचें ' आत्मचरित्र ' जगप्रसिद्ध ग्रंथांत स्थान पावलें असलें, तरी हिंदी वाचकांपेक्षा पाश्चात्य वाचकांनाच त्या ग्रंथाची उपयुक्तता अधिक आहे. त्या पुस्तकांच्या मराठी भाषान्तरांसंबंधीं आणि भाषान्तरकारासंबंधीं अनादर न दाखवितां, मला हें सांगितलें पाहिजे कीं, त्या ग्रंथाच्या अप्रतिम इंग्लिश शैलीचें मराठीकरण करणें म्हणजे एक अत्याचार आहे! शिवाय ज्याला इंग्रजी भाषेचें ज्ञान नाहीं, त्याला भाषांतरावरूनहि त्यांतील महत्त्वाचे भाग कळणार नाहींत. पण त्यांचा ' जगाचा इतिहास ' त्यांच्या लहान मुलींकरितां ( त्या वेळीं पुणें येथें शिकत असलेल्या इंदिरेकरितां ) लिहिलेला असल्यानें अत्यंत सुगम आहे. इतक्या लहान मुलाला उद्देशून नेहरूंनीं जगाच्या इतिहासाची कहाणी सांगितली, ही गोष्ट अर्थपूर्ण आहे. ज्याला जगाच्या इतिहासाची पुसट का होईना रूपरेषा डोळ्यापुढें नाहीं, तो ' आधुनिक ' या नांवाला पात्र नाहीं, हाच नेहरूंच्या कृतीचा अर्थ आहे.

केवळ आजच्या राजकारणांतील आपली ' पार्टी-लाइन ' ( पक्षाचें धोरण ) समजून देण्यापुरतीं अभ्यासमंडळें चालविणारांनीं पंडितजींच्या या पंधराशें पानांच्या इतिहासाकडे लक्ष देणें जरूर आहे.

पण पंडितजींना जगाच्या पुरोगामी मुत्सद्दी मंडळींत ज्या ग्रंथानें स्थान मिळवून दिलें आणि त्यांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाबद्दल ज्या ग्रंथानें त्यांची जगभर ख्याती झाली, तो ग्रंथ त्यांचें 'आत्मचरित्र' हाच होय. चालू युगाशीं व आधुनिक जगाशीं समरस झालेलें एक पौर्वात्य मन, या ग्रंथांत अद्वितीय अशा इंग्रजी भाषासरणींत व्यक्त झालेलें पाहून चारी खंडांतील इंग्रजी वाचक मंत्रमुग्ध होऊन गेले असल्यास नवल नाहीं.

बुद्धीची सूक्ष्मता, भावनेची कोवळीक, शास्त्रीय दृष्टीचा आग्रह, जिज्ञासु आणि सुसंस्कृत मनाचा संकोच, विषण्ण अंतर्मुखता, निधडी कार्यप्रवणता, धार्मिक गूढवादाबद्दल निश्चित साशंकता, प्रामाणिक गूढवादी धार्मिकांबद्दल

निःसीम आदर, व्यक्ति, कालखंड आणि चळवळी यांची सूक्ष्म जाणीव, या सर्वांच्या असंख्य सूक्ष्म छटा लीलेनें एकेका वाक्यांत, एकेका विशेषणांत उमटविण्याचें त्यांचें सामर्थ्य अवर्णनीय आहे. जणूं एका थोर राष्ट्राचा लढा आणि नेता पाश्चात्य जगाला कळावा म्हणूनच इंग्रजी भाषा एवढी प्रगल्भ झाली आणि या नेत्यानें तिजवर एवढें प्रभुत्व मिळविलें !

वास्तविक नेहरूंच्या इंग्रजीचें सौंदर्य पटवीत बसणें ही गोष्टच थोडी चमत्कारिक वाटते. काश्मीरचें सौंदर्य किंवा नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचें सौंदर्य जसें स्वयंप्रकाशी आहे तसेंच त्यांच्या इंग्रजीचेंहि आहे. परंतु इतर अनेक गोष्टींप्रमाणें आजच्या महाराष्ट्रांत—विशेषतः पुण्यांत ! इंग्रजीच्या प्रभुत्वाबद्दलहि कित्येक विचित्र कल्पना आढळतात. इंग्रजी भाषेला शृंगारणें म्हणजे ' Alma mater ' ' Au revoir ' यासारखे चार ठरीव वाक्प्रचार वापरणें एवढीच ज्यांची कल्पना; आणि कॉलेज मॅगेझिनखेरीज कुठूनहि ज्यांच्या लिखाणाला मागणी येण्याचा संभव नाहीं, असे काहीं दुर्विदग्ध महाराष्ट्रीय प्रोफेसर, नेहरूंच्या इंग्रजींतील व्याकरण दोषांसंबंधीं चर्चा करतांना पाहून हंसावें कीं रडावें हेंच मला कळत नाहीं !

मला वाटतें, विख्यात फ्रेंच शैलीकार ( व कादंबरीकार ) फ्लोबेर यानेंच म्हटलें आहे कीं, " हो कॉलेजांतील प्रोफेसर मंडळी कलेसंबंधीं बोलूं लागली म्हणजे किती हास्यास्पद ठरतात ! "

नेहरूंच्या आत्मचरित्रांतील बैठकीचा डौल यापुढील त्यांच्या कोणत्याहि लिखणाला येणार नाहीं — नव्हे, आत्मचारित्रालाच पूरक अशा 'डिस्कव्हरी' ग्रंथालाहि आलेला नाहीं. याचें कारण, नेहरूंच्या आयुष्याच्या पूर्वार्धांतील अभिमान व विश्वास ( एक्झॉल्टेशन ॲण्ड सेल्फ-ॲशुअरनेस ) साफ ढळून गेला आहे. एका काळीं सरळ तीराप्रमाणें लक्ष्यभेद करणारे त्यांचें अधीर आणि अभिमानी मन आतां आपल्या लक्ष्यासंबंधीं अर्ध्या वाटेंतच शंकित होतें ! ध्येय-प्राप्तीतील कष्ट अगर अपयश ही ध्येयवादांतील प्रमुख शोककथा नसते; तर ज्याकरितां आपण धडपडत आहोंत तें ध्येयच मुळीं एवढी धडपड करण्यासारखें नाहीं असें वाटूं लागणें ही खरी शोककथा, खरी ' ट्रेजेडी ' असते ! या शोककथेची कबुली नेहरूंनीं ' डिस्कव्हरीं'त अंशतः दिली आहे.

पण नेहरूंसारख्या थोर पुरुषांचें वाङ्मय प्रत्यक्ष कृतीच्या निमित्तानें जितकें प्रगट होतें तितकें मुद्दाम बसून ग्रंथ लिहिण्याच्या निमित्तानें प्रगट होत नाहीं. स्वतःच्या युगाशीं वर्तीनें समरस होणाऱ्या अशा कर्मवीरांकडून 'बैठे' ग्रंथ लिहून घेण्याची अपेक्षाच मुळीं हास्यास्पद होय! गांधींनीं अहिंसेवर अथवा 'हिंदु-मुसलमान ऐक्यावर सोपपत्तिक ग्रंथ लिहिला नाहीं म्हणून हळहळणाऱ्या मनुष्याची वाङ्मयासंबंधींची कल्पना फारच कोती आहे, असें म्हणावें लागतें. स्वतः कर्म आचरत असतां आणि दुसऱ्यांना कर्माचरणाची स्फूर्ति देत असतां अशा व्यक्तींच्या तोंडून जे उद्‌गार निघतील तेंच त्यांचें खरें वाङ्मय. आणि आज जवाहरलाल यांच्या तोंडून हेंच अमर आणि अद्वितीय सूक्त-वाङ्मय प्रत्यहीं प्रगट होत आहे. त्यांच्या अभिजात आत्मचरित्राइतकेंच त्यांच्या या दैनंदिन उद्‌गारांना मी महत्त्व देतों.

जवाहरलाल यांच्या भाषणांतील अपूर्व वक्तृत्वगुण कळण्यास वक्तृत्वा-संबंधींच्या आपल्या कल्पना आपण विसरणें जरूर आहे. वक्तृत्वाची एक स्वतंत्रच तऱ्हा जवाहरलाल यांनीं बनविली आहे यांत शंका नाहीं. गांधी-युगापूर्वीच्या प्रसिद्ध वक्त्यांच्या विद्वत्तापूर्ण आणि आलंकारिक शैलीवरून तर नेहरूंच्या शैलीची कल्पना होणारच नाहीं. पण गांधीयुगांतील गांधी, आझाद वगैरेंच्या शैलीहूनहि नेहरूंची शैली वेगळी आहे. आझाद मुद्दाम भाषाविलास करीत आहेत, हें उघडकीस आल्यावांचून राहात नाहीं. चालू जमाना आणि जमा झालेली जनता यांच्यापेक्षांहि त्यांचें मन सुंदर शब्द व कल्पना यांवरच अधिक लुब्ध असल्यासारखें वाटतें. महात्मा गांधी वाग्विलासाचा प्रयत्न करीत नसत; परंतु आध्यात्मिक शिस्तीला ते इतके जपत असत आणि प्रत्येक शब्द ध्येयच्युतीच्या भीतीनें इतका तोलून वापरीत कीं, त्यांचें हृदय आणि जनतेचें मन यांच्यामध्यें एक जाड काळा पडदा सोडल्याप्रमाणें वाटे. जवाहरलालहि शिस्तीचे भोक्ते आहेत; पण लाखो लोकांच्या समुदायापुढें बोलतांनाहि जणु दहापांच 'जिवाचे जिवलग' गोळा करून त्यांच्यांशीं देशकार्याचे बेत बोलावे, त्यासारखें ते अगदीं सहज बोलतात! एवढ्या प्रचंड समुदायापुढें, इतक्या खळबळीच्या काळांत, इतक्या निःशंक विश्वासाच्या स्वरांत बोलणारा दुसरा वक्ता दाखवून देणें कठीण आहे. जनतेच्या जागृतीच्या या युगांत लाखों लोकांना हलवून

सोडणारे वक्ते मोठे दुर्मिळ असतात असें नाहीं; पण अजस्र लोकसमुदाय लोटला म्हणजे नेहरू जणुं आपल्या स्वाभाविक वातावरणांत येतात—आपल्या ‘ अेलेमेंट ’ मध्यें येतात. इतर पुढारी समुदायाला तोंड देत आहेतसें वाटतें; तर नेहरू समुदायाचेच आहेत, समुदायांतच पहावें असें वाटतें.

‘ जनसमूह ’-रूपी अजस्र प्राण्याला आपल्या आवेशयुक्त शब्दांनीं भारून टाकणारे वक्ते अर्वाचीन क्रांतियुगांत अनेक झाले असतील. रशियन क्रांतींतील लेनिनचा उजवा हात असलेला ट्रॉट्स्की हा आपल्या आत्मचरित्रांत, वक्तृत्वानें भारलेल्या, क्रांतीनें वेहोष अशा आपल्या श्रोत्यांचें एक चित्र रेखाटतो. सर्व वातावरण त्या प्रचंड समुदायाच्या श्वासोच्छ्वासानें कुंद झालेलें, लोकांच्या आरोळ्यांनीं आकाश भेदून गेलेलें; जिकडेतिकडे खांद्याला खांदे, डोक्याला डोकीं भिडलेलीं; प्रत्यक्ष वक्त्याला भोंवतालच्या समुदायाचा अंगस्पर्श होत आहे; क्रांतीला भुकेलेली जनता क्रांतिदेवतेला बिलगून जणू आपल्या कोरड्या ओटांनीं अधीरपणें स्तनपानच करीत आहे !... एकोणीसशें सतरा सालच्या पेट्रोगाडमधील बोल्शेविक् सभेच्या या रौद्रवत्सल चित्रांत आपल्याला वक्त्याचें व श्रोत्यांचें सामर्थ्य खासच दिसून येतें. पण हे श्रोते एक दिवस इतक्याच वेहोषपणें या वक्त्यावरहि उलटूं शकतील, याचीहि जाणीव न कळत स्पर्श करून जाते !

नेहरू आणि जनसमूह यांचें नातें याहून फार वेगळें आहे, हें सूक्ष्म दृष्टीच्या प्रेक्षकाला तेव्हांच कळून येतें. एखाद्या पक्षाला, राजाला अगर राजवटीला मारण्याकरितां हे दोघे एक झालेले नसून कृष्ण आणि पार्थ यांच्याप्रमाणें जन्मांतरींच्या सौहार्दामुळें एकत्र आले आहेत असें वाटतें. एखादा पक्ष अगर नेता नेहरूंवर उलटेल; पण आलम् जनता नेहरूंची आहे....नेहरूंना अंतर देणार नाहीं, हें त्या विराट सभांच्या भालप्रदेशीं स्पष्ट लिहिलेलें आढळून येतें. जणुं एकाद्या संकटांत सांपडलेल्या मित्राला जवळ घेऊन बोलावें, तसें लाखों लोकांशीं बोलणें ही जर एक अपूर्व कला असेल, तर ती नेहरू यांच्याजवळ आहे — नव्हे त्यांनीं पूर्णतेला नेली आहे असें मी म्हणेन !

भक्तिमान् स्वदेशबांधवांपुढेंच नव्हे तर जागतिक प्रश्नांनीं बावरलेल्या पाश्चात्य जनतेपुढेंहि नेहरूंची वाणी आज स्फूर्तिदायक ठरत आहे. कॅनडाच्या

पार्लमेंटपुढील त्यांचें ताजें भाषण आणि शिकागो येथें केलेलें भाषण ( ब्रॉडकास्ट ) जागतिक शांततेच्या इतिहासांत अमर होईल !

गांधीजींच्या ऐतिहासिक हत्त्येनंतरचीं नेहरूंचीं भाषणें अखिल जगाच्या वक्तृत्व वाङ्मयांत अमर स्थान मिळवतील, याबद्दल मला तिळमात्र शंका नाहीं. नेहरू शास्त्रीय दृष्टिकोनाचे भोक्ते आहेत; ते तापटपणाबद्दलहि थोडेफार प्रसिद्ध आहेत; दुबळेपणा, बावळेपणा ( विकनेस् ॲण्ड इन्‌एफिशि-अन्सी ) यांबद्दल त्यांना कमालीचा तिटकारा आहे, पण आपलें हें शास्त्रप्रेम आणि शिस्तप्रेम विसरून दोन ठिकाणीं ते अगदीं हळवे आणि भक्तिमान् बनतात. एक ठिकाण म्हणजे सामान्य शेतकरी-जनता; आणि दुसरें म्हणजे त्या जनतेच्या हृदयाची किल्ली त्यांच्या स्वाधीन करणारा महात्मा.

महात्माजी या लोकीं वावरत असतांहि नेहरूंच्या वाणीला आणि लेखणीला जणुं वर्षाकालाचें भरतें येई ! जॉन गुंथर तर 'स्तुतिगानाचा धबधबा' हे शब्द वापरतो. ( What a waterfall of tributes his pages are ! ) मग नेहरूंचा तो आध्यात्मिक पिता इहलोक सोडून गेल्यावर—खुनी पिस्तुलाला बळी पडल्यावर—नेहरूंच्या काव्यवाणीनें कोणतें रूप धारण केलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. गांधींच्या निधनाच्या दिवशीं राष्ट्राला उद्देशून केलेलें भाषण, अंत्यविधीनंतर दिल्लीच्या पार्लमेंटपुढें केलेलें भाषण, दोन आठवड्यांनीं केलेलें रेडिओवरील भाषण, हीं भाषणें जगाच्या वक्तृत्ववाङ्मयांत अढळ स्थान पावतील. ग्रीक ट्रॅजेडींतील गंभीर, संयमित कला, आणि महाभारताच्या अंतिम पर्वांतील शांत–गंभीर वातावरण यांचा संमिश्र प्रभाव केवळ, कांहीं मिनिटांत अनुभवास आणून देणाऱ्या या स्वयंभू कलेचें वर्णन करणें शब्दांच्या शक्तीच्या बाहेरचें काम आहे.

गंगायमुनांच्या कांठीं उद्गारलेले, आज निर्जीव छापील पुस्तकांत असलेले त्यांचे दुःखकंपित शब्द वाचतांनाहि केवळ आजच्या अस्थिर पिढीचेंच नव्हे, तर शेंकडों पिढ्यांचें सुखदुःख पाहणाऱ्या अमर गंगायमुनांचेंहि हृदय या शूर पुढाऱ्याच्या शब्दांतून बोलत आहे, असा भास झाल्यावांचून राहात नाहीं !

नेहरू शूर, सरळ आणि पुरोगामी आहेत. आजच्या जगाचें त्यांना दिसलेलें दृश्य आपल्या असाधारण भाषाप्रभुत्वानें त्यांनीं आपल्या पिढीला समजावून

सांगितलें आहे. पण शौर्य, सरळपणा, शास्त्रीय दृष्टि आणि भाषाप्रभुत्व हे गुण कितीहि बहुमोल असले तरी राजकारणांत ते निश्चित पुढें पडतीलच असें नाहीं. कारण राजकारण म्हणजे एक 'घाण' ( डर्टी बिझिनेस ) आहे ! अलिकडेच नेहरूंनीं असे उद्‌गार काढल्याचें स्मरतें कीं, "मला जगांत कशाचीहि भीति वाटत नाहीं, पण या जातीयतेची मात्र खरोखर भीति वाटतें."

तसेंच 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'मध्यें त्यांनीं आपल्या शास्त्रीय दृष्टि-कोनासंबंधीं आणि त्यांतून निघालेल्या विचित्र आशावादासंबंधीं थोडी साशंकता व्यक्त केलीच आहे. खरोखर शास्त्रीय दृष्टि, सरळपणा आणि संयुक्तिकता एवढे गुण ज्याच्याजवळ आहेत त्याला मी तरी सर्वगुणसंपन्न ( परफेक्ट ) मनुष्य म्हणेन. पण तो यशस्वी होईल अशी मात्र खात्री मी देऊं शकणार नाहीं. आणि राजकारणांत तर त्याला आपल्या या गुणांचें काय करावें हेंच समजणार नाहीं ! शूर मनुष्य भेकडपणा पाहून आणि सरळ मनुष्य कुटिलपणा पाहून गोंधळून जातो; शास्त्रीय आणि संयुक्तिक दृष्टीचा मनुष्य एका हातानें दुसरा हात कापून घेणारी मूर्ख पिढी पाहून हतबुद्ध होतो ! अशा स्थितींत नेहरूसारख्यांनाहि निराशेचे झटके आल्यास नवल नाहीं. ते लिहितात—"Was human nature so essentially bad that it would take ages of training before it cound behave reasonably ?..And in the meanwhile was every effort to change it radically..doomed to failure ?

आजचें जग बदलण्यास नेहरूंचें सामर्थ्य पुरें पडेल कीं नाहीं कोण जाणें ? पण उद्यांच्या जगाचा नमुना दाखविण्यास त्यांचें व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मय समर्थ आहे, एवढें मात्र खास !

♣ ♣ ♣

नाशी ... संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २५०८० दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

मराठी ग्रं... ...लय ठाणे
९०२५३
REFBK-0010253